
म. ग्रं. स. दा.
विषय
सं. क्र.

संवत् शांतिदास

६८

स्वतंत्र प्रजासत्तांक भारत



भारतीय राज्यघटना

ता. २६ जानेवारीपासून अमलांत यावयाची
स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक
भारताची नवी घटना



किंमत चार रुपये


चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
... बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक : चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २

● प्रथमावृत्ति : जानेवारी १९५०
● मुखपृष्ठावरील चित्र : दिल्ली येथील घटनासमितीचें सभागृह
● चित्रकार : श्री. दीनानाथ दलाल, मुंबई

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २

१ (१९५०)



भारतीय राज्यघटना

★ प्रकाशकाचे दोन शब्द

★ प्रवेशद्वारापाशीं

★ पं. नेहरू यांचें भाषण

★ डॉ. आंबेडकर यांचें भाषण

★ डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें भाषण

★ शब्दसूचि

★ भारतीय राज्यघटना

अनुक्रमणिका

	पृष्ठ
सरनामा	१
भाग १	
संघ व त्याचे प्रदेश	२
भाग २	
नागरिकत्व	३
भाग ३	
मूलभूत हक्क	५ ते १५
सर्वसामान्य	५
समानतेचे हक्क	५
स्वातंत्र्याचे हक्क	७
पिळवणुकीविरुद्ध हक्क	१०
धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क	११
सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क	१२
मिळकत हक्क	१३
सनदशीर इलाजासंबंधी हक्क	१४
भाग ४	
राज्याच्या धोरणासंबंधीं मार्गदर्शक तत्त्वें	१५
भाग ५	
संघ	१८ ते ५९
प्रकरण १ : कार्यकारी	१८–२८
राष्ट्रपति व उपराष्ट्रपति	१८
मंत्रिमंडळ	२६
सरकारची कार्यपद्धति	२७

प्रकरण २ : पार्लमेंट २८–४७
सर्वसामान्य २८
पार्लमेंटचे अधिकारी ३१
कार्यपद्धति ३४
सभासदांची अपात्रता ३५
पार्लमेंटच्या सदस्यांचे अधिकार इ. ३७
कायदेमंडळांतील कार्यपद्धति ३८
अर्थविषयक कार्यपद्धति ४२
सामान्य कार्यपद्धति ४६
प्रकरण ३ : राष्ट्रपतीचे कायदेविषयक अधिकार ४७
प्रकरण ४ : संघाचें न्यायखातें ४८
प्रकरण ५ : भारताचा महालेखापरीक्षक ५८

भाग ६

परिशिष्ट १ 'अ 'मधील राज्यें ५९ ते ९३
प्रकरण १ : सर्वसाधारण ५९
प्रकरण २ : कार्यकारी मंडळ ५९–६४
राज्यपाल ५९
मंत्रिमंडळ ६१
सरकारी कामकाजाची पद्धत ६३
प्रकरण ३ : राज्याचें कायदेमंडळ ६४–८४
सर्वसामान्य ६४
राज्यांतील कायदेमंडळाचे अधिकारी ६८
कामकाजाची पद्धत ७१
सभासदाची नालायकी ७२
कायदेमंडळें व त्यांच्या सभासदांच्या सत्ता इ० ७४
कायदेमंडळाची कार्यपद्धति ७४
अर्थविषयक बाबींची कार्यपद्धति ७८
कामाची सामान्य पद्धत ८२

प्रकरण ४ : राज्यपालाचे कायदेविषयक अधिकार ८४
प्रकरण ५ : राज्यांतील उच्च न्यायालयें ८५
प्रकरण ६ : दुय्यम न्यायालयें ९२

भाग ७

परिशिष्ट १ भाग 'ब'मधील राज्यें ९३ ते ९६

भाग ८

परिशिष्ट १ भाग 'क'मधील राज्यें ९५ ते ९७

भाग ९

परिशिष्ट १ भाग 'ड'मधील प्रदेश व त्या परिशिष्टांत न दर्शविलेले प्रदेश ९८

भाग १०

अनुसूचित व जनजाती क्षेत्र ९८

भाग ११

संघ व राज्य यांचे संबंध ९८ ते १०५
प्रकरण १ : कायदेकानूविषयक संबंध ९८–१०२
कायदेविषयक सत्ताविभागणी ९८
प्रकरण २ : अनुशासनसंबंध १०२–१०५
सर्वसामान्य १०२
पाण्याचे तंटे १०५
राज्याराज्यांत संबंध १०५

भाग १२

अर्थ, मिळकत, करार आणि फिर्यादी १०६ ते १२१
प्रकरण १ : अर्थ १०६ ते ११९
सर्वसामान्य १०६
संघ व राज्य यांत वसूलवांटणी १०७
किरकोळ अर्थव्यवस्था ११४

प्रकरण २ : कर्ज ११९
प्रकरण ३ : मिळकत, देणगी, हक्क, देणीं जबाबदाऱ्या व दावे १२०

भाग १३

भारतीय प्रदेशांत धंदे, व्यापार आणि ने-आण १२३ ते १२५

भाग १४

संघाच्या व राज्याच्या नोकऱ्या १२५ ते १३३
प्रकरण १ : नोकऱ्या १२५
प्रकरण २ : सार्वजनिक नोकऱ्या नेमणूक मंडळें १२८

भाग १५

निवडणुकी १३३ ते १३६

भाग १६

कांहीं वर्गासंबंधीं खास तजविजी १३६ ते १४१

भाग १७

कचेरीची भाषा १४१ ते १४५
प्रकरण १ : संघभाषा १४१
प्रकरण २ : प्रादेशिक भाषा १४३
प्रकरण ३ : उच्चतम, उच्च वगैरे न्यायालयांतील भाषा १४४
प्रकरण ४ : खास सूचना १४५

भाग १८

आणीबाणीच्या तरतुदी १४६ ते १५१

भाग १९

किरकोळ १५२ ते १५८

भाग २०

घटना-दुरुस्ती १५८

भाग २१

तात्पुरत्या व संरक्षणकालीन तरतुदी १५९ ते १७२

परिशिष्टें

परिशिष्ट १ :
भारतांतील राज्यें व प्रदेश १७३ ते १७४
परिशिष्ट २ : १७५ ते १८०
परिशिष्ट ३ :
शपथ अगर प्रतिज्ञा यांचे नमुने १८१ ते १८३
परिशिष्ट ४ :
राज्यपरिषदेंतील सभासदांच्या जागांची वांटणी १८३ ते १८५
परिशिष्ट ५ :
अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जाती यांच्या नियंत्रणासंबंधीं व कारभारा-संबंधीं तरतुदी १८५ ते १८९
परिशिष्ट ६ :
आसांमातील जनजाती प्रदेशांच्या राज्यकार-भारासंबंधीं तजविजी १८९ ते २०४
परिशिष्ट ७ :
विषयसूचि २०५ ते २२०
परिशिष्ट ८ : २२०

• • •

प्रकाशकाचे दोन शब्द

भारतीय घटना समितीनें तीन वर्षांच्या प्रदीर्घ परिश्रमांनंतर स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारतासाठीं जी 'घटना' तयार केली, तिचें तिसरें वाचन ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं घटना-समितींत मंजूर होऊन त्या 'घटने'चें कायद्यांत रूपांतर झालें व आतां ता. २६ जानेवारी १९५० पासून ती अमलांत यावयाची आहे.

या 'घटने'ची मूळ इंग्रजी अधिकृत अशी सरकारी आवृत्ति प्रसिद्ध झाली व लगेच तिची आवृत्ति संपलीहि. सरकारतर्फे हिंदी, मराठी वगैरे भाषांतून घटनेचीं भाषांतरें होणार आहेत, पण त्या गोष्टीस बराच काळ लागणार आहे. आपल्या देशाची नवी घटना काय आहे हें कळून घेण्याची अनेकांना उत्सुकता असणें अगदीं साहजिक आहे. योग्य वेळेला राष्ट्रीय महत्त्वाचीं व उपयुक्त अशीं पुस्तकें प्रकाशित करणे हें आमच्या प्रकाशन-संस्थेचें वैशिष्ट्यच आहे ! 'वसाहतीचें स्वराज्य,' 'फेडरेशन,' 'घटना-परिषद,' 'संयुक्त महाराष्ट्र' हीं आमचीं प्रकाशनें आमच्या या परंपरेस धरूनच वेळोवेळीं निघालेलीं आहेत आणि तीं त्या त्या वेळीं अनेक विद्वानांनीं वाखाणलेलींहि आहेत. आणि म्हणून ज्यावेळीं 'घटने'च्या मराठी भाषांतराची गरज अनेकांना भासूं लागली तेव्हां साहजिकपणें आमचेकडे त्याबद्दल विचारणा होऊं लागली. त्यास अनुसरून आजं आम्ही आपल्या 'नव्या घटनेचें' हें मराठी भाषांतर प्रसिद्ध करीत आहोंत. आमच्या या भाषांतरामुळें आपल्या राष्ट्राची 'नवी घटना' काय आहे हें जाणून घेण्यास चांगलीच मदत होईल यांत शंका नाहीं.

अवघ्या महिन्याभरांत भाषांतर व अडीच-तीनशें पानांची छपाई व्हावयाची असल्यामुळें कामाला जरा घाई झाली. त्यामुळें कांहीं ठिकाणीं भाषांतराचे, कांहीं ठिकाणीं मुद्रणाचे दोष राहिले असतील याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. असे दोष कोणी आमचे निदर्शनास आणले तर आम्ही त्यांचे आभारी होऊं.

'घटने'च्या भाषांतराचें हें काम तसें म्हटलें तर जरा क्लिष्टच ! पण या आमच्या कामांत आम्हांस अनेकांनीं बहुमोल अशी मदत केली आहे. भारतीय पार्लमेंवर निवडून गेलेले श्री. मामासाहेब देवगिरीकर, श्री. रा. प्र. कानिटकर, श्री. दा. न. शिखरे यांचा उल्लेख प्रामुख्यानें केला पाहिजे. ' चित्रशाळा–प्रकाशना 'चे त्यांचे संबंध येवढे जिव्हाळ्याचे आहेत कीं त्यांचे आभार मानणेंहि केवळ औपचारिपणाचें होईल.

या पुस्तकांत आम्हीं मुळांतील इंग्रजी 'घटने'चें शब्दशः भाषांतर दिलेलें आहे. वास्तविक असें पुस्तक टीपांसहित असावयास पाहिजे होतें. पण लौकरांत लौकर आणि कमींत कमी किंमतींत तें द्यावयाचें असा विचार असल्यामूळें नुसतीच ' घटना ' शब्दशः द्यावयाचें आम्ही योजिलें. पण घटना-समितीचा थोडा पूर्वेतिहास व आपल्या नव्या ' घटनें 'तील थोडीशीं वैशिष्ट्यें ' प्रवेश-द्वारापाशीं ' या सदरांत श्री. देवगिरीकर यांनीं दिलीं आहेत. ही ' घटना ' बनविण्यामागें कोणतीं ' उद्दिष्टें ' होतीं हें पं. नेहरूंच्या भाषणानें लोकांना कळावें म्हणून मुद्दाम त्यांचें तें भाषण येथें संपूर्ण दिलें आहे. या 'घटने'च्या तिसऱ्या वाचनानंतर उत्तरादाखल म्हणून मसुदा-समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांचें झालेलें भाषण व घटना-समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें झालेलें समारोपाचें भाषण यांचाहि येथें मुद्दाम अंतर्भाव केला आहे. या साऱ्या भाषणांनीं आपल्या नव्या ' घटने 'चीं वैशिष्ट्यें स्पष्ट होतील असें वाटतें.

— प्रकाशक

प्रवेशद्वारापाशीं:—

२६ जानेवारी १९५० रोजीं सार्वभौम लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य स्थापन होणार आहे. तें राज्य कोणत्या कलमानुसार चालेल या संबंधींची राज्यघटना तीन वर्षांच्या परिश्रमांनंतर भारतीय राज्यघटना परिषदेनें तयार केली आहे. त्या परिषदेचा इतिहास व घटनेचें स्वरूप आणि त्यासंबंधीं थोडक्यांत चर्चा या प्रास्ताविक निवेदनांत केली आहे.

घटना-परिषद प्रत्येक राष्ट्राची घटना बनवीत असते. फ्रान्स, जर्मनी, रशिया, कॅनडा, द. आफ्रिका, आयर्लंड वगैरे राष्ट्रांनीं आपापल्या घटना याच पद्धतीनें तयार केल्या. परतंत्र राष्ट्रें क्रांति करूनच घटना परिषद बोलावतात व घटना तयार करतात असा एक समज आहे; पण तो बरोबर नाहीं. घटना परिषदेला क्रांति ही आवश्यक असते असें नाहीं. भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न राष्ट्रांनीं आपापल्या घटना बनविल्या व त्या कार्यक्षम केल्या. राज्य चालविण्याकरतां जीं तत्त्वें अगर नियम देशांतील ज्ञाते तयार करतात तिला घटना म्हणतात. ही घटना मुक्त वातावरणांत अगर अनिर्बंध स्थितींत तयार केली तर ती जास्त परिणामक्षम होत असते.

हिंदुस्थानकरतां ब्रिटिशांनींच घटना तयार कराव्यात व आमच्यावर त्या लादाव्यात असा पूर्वापार पायंडा होता. १९१० च्या मोर्ले-मिंटो सुधारणा किंवा १९१९ मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा किंवा १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट हे अशा प्रकारें ब्रिटिश पार्लमेंटनें केले व हिंदुस्थानवर लादले. आमच्यांत जोंपर्यंत ताकद नव्हती, तोंपर्यंत आम्ही या सक्तीच्या कायद्याखालीं नांदलों. पण जसजशी स्वराज्याची मागणी तीव्र होत चालली तसतसे आम्ही त्या घटनांना विरोध करीत गेलों. लो. टिळक किंवा डॉ. बेझंट किंवा पं. मोतीलाल नेहरू यांनीं केलेले स्वराज्याचे मसुदे, हे आमच्या आकांक्षाचे निदर्शक नव्हते असें कोण म्हणेल ?

म. गांधी भारताच्या राज्यकारणांत प्रविष्ट झाल्यानंतर १९२२ सालींच त्यांनीं, आम्ही आमची घटना करूं व पार्लमेंटनें ती शिष्टाचार म्हणून मान्य

करावी अशी समज दिली. पण ब्रिटिश सरकार आमचा हा हक्क कुठें मान्य करीत होतें ? नाहीं म्हणावयास १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहानंतर त्यांनीं म. गांधींना गोलमेज परिषदेला बोलावलें, त्यांचें म्हणणें समजून घेतलें व त्यांना परत पाठवून दिलें. १९२८ सालीं सायमन कमिशनला बसलेल्या तडाख्यामुळें आणि १९३० च्या सत्याग्रहामुळें एवढी तरी सभ्यता त्यांनीं दाखवली. पण ती निरर्थक झाली.

१९३५ चा कायदा पास झाला आणि प्रांतिक स्वराज्य मान्य करण्यांत आलें. त्यांतील फेडरेशन हें कधींच अमलांत आलें नाहीं. त्याला कॉंग्रेसनें विरोध केला नसता तर कदाचित् आजचीं निष्प्रभ व विलीन झालेलीं संस्थानें बद्धमूल झालीं असतीं. हिंदुस्थानांत आलेलें स्वातंत्र्य हें एका उडी-सरशीं आलें नाहीं. तें ब्रिटिशांच्या कंजूष स्वभावाप्रमाणें पावलापावलांनीं येत होतें आणि आपल्याभोवतीं रक्षाबंधनें बांधून घेत होतें.

पण जसजसें स्वराज्य जवळ येत गेलें तसतशी सत्तेची अभिलाषा अनेक पक्षोपक्षांत आणि जातीजातींत निर्माण होऊं लागली. कॉंग्रेसपुढें इतर राजकीय पक्ष केव्हांच निष्प्रभ झाले होते. पण जातीयतेच्या मगरमिठींतून सुटण्याऐवजीं आम्ही जास्तजास्त त्या मगरमिठींत अडकले जाऊं लागलों. म. गांधी जातीय ऐक्याचा कितीहि पुरस्कार करीत असले तरी दुसरीकडे ब्रिटिश सरकार जातीयवादाला फूस देत राहिलें आणि जातीय भावनांचे दाहक निखारे फुलवीत राहिलें. या आपत्तींतून कसें सुटावयाचें हा प्रश्न कॉंग्रेस-नेत्यांना चांगलाच भंडावीत राहिला. घटना-परिषदेची आवश्यकता ही आम्हांला स्वातंत्र्याकरतां जितकी वाटली तितकीच किंवा त्याहिपेक्षां जास्त जातीय प्रश्न सोडविण्याकरतां वाटली.

१९३४ सालीं मुंबई कॉंग्रेसमध्यें या कल्पनेचा प्रथम उच्चार करण्यांत आला. त्यानंतर लखनौ, फैजपुर, हरिपुरा, त्रिपुरी वगैरे कॉंग्रेस अधिवेशनां-तून घटना परिषदेची घोषणा कॉंग्रेस करीत राहिली. पण या मागणीचा मूळ पाया लोकशाही हाच होता. स्वयंनिर्णयाचा आमचा हक्क ब्रिटिशांनीं मान्य करावा, लोकशाही पद्धतीनें आम्हांला घटना परिषद भरवूं द्यावी व त्या परिषदेचे निर्णय त्यांनीं मान्य करावे हा कॉंग्रेसच्या चळवळीचा हेतु होता.

पण ज्यांच्यांत विग्रह आहेत अशा दोन्ही पक्षांनीं ती मागणी पुढें मांडली तरच ती खऱ्या अर्थानें मागणी होऊं शकते. जिनांना लोकशाही पद्धत अमान्य होती. कारण तींत हिंदूंचें बहुमत आहे हें त्यांना ठाऊक होतें. ते तर हिंदुस्थान हें एक राष्ट्र नसून दोन राष्ट्रें आहेत असें म्हणत होते; त्यामुळें आम्हीं केलेली घटनापरिषदेची मागणी एकमुखी होऊं शकली नाहीं.

दुसरें महायुद्ध आलें, पण सरकार आम्हांला स्वातंत्र्य देईना आणि आमच्याकडून जातीय प्रश्न सुटला जाईना. १९४२ सालीं ब्रिटिश सरकार अडचणींत सांपडलें आणि त्यावेळीं क्रिप्ससाहेब आपली योजना घेऊन हिंदुस्थानांत आले. पण ती योजना हिंदुस्थानच्या आकांक्षा पुरी करण्यास समर्थ नसल्यामुळें काँग्रेसकडून व नंतर मुस्लिम लीगकडून फेटाळण्यांत आली. पुढें ऑगस्ट महिन्यांत म. गांधींनीं प्रचंड व सर्वव्यापी अशी सत्याग्रहाची लढाई सुरू केली. त्या चळवळीचा परिणाम होत गेला. ब्रिटिशांची पत देशांत व परदेशांत जात चालली आणि १९४५ च्या जून महिन्यांत वेव्हेल-साहेबांनीं सर्व पुढाऱ्यांची मुक्तता करून पुनः एकदां आमचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न पुनः जातीयतेचा प्रश्न न सुटल्यामुळें फसला. त्यानंतर इंग्लंडमध्यें सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि मजूरपक्ष अधिकारारूढ झाला. त्या पक्षनेत्यांनीं आपल्या मंत्रिमंडळांतील तिघांची हिंदुस्थानांत पाठवणी केली आणि पुनः एकदां हा प्रश्न सोडाविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या योजनेंत हिंदुस्थान अखंड रहावा अशीच सूचना होती. लष्करी दृष्ट्या हिंदुस्थान अखंड राहिला तरच तो संरक्षणक्षम होईल असें त्यांचें म्हणणें. त्याकरतां त्यांनीं हिंदुस्थानचे अ, ब व क विभाग केले. जीनांनीं त्या योजनेला अपरिहार्य म्हणून संमती दिली; पण ती खरी नव्हती. ह्या घोषणेंत प्रथम घटना परिषदेला मान्यता मिळाली. हंगामी सरकारची स्थापना करण्याचें ह्याच योजनेनें ठरविलें. काँग्रेसनें ही योजना त्यांत पाकिस्तान नाहीं म्हणून मान्य केली. घटनापरिषदेच्या निवडणुकाहि त्या घोषणेनंतर झाल्या. सप्टेंबर महिन्याच्या २ तारखेला पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं मंत्रिमंडळ स्थापन झालें. त्या मंडळांत ५ जागा लीगकरतां ठेवल्या होत्या. पण लीगनें त्या जागा न स्वीकारल्यामुळें काँग्रेसनेंच

साऱ्या जागा भरून काढल्या. लीगनें १६ ऑगस्ट रोजीं प्रत्यक्ष प्रतिकार-दिनाची घोषणा केली आणि तेव्हांपासून जातीय दंग्यांनीं पेट घेतला. ते दंगे थांबवितां आले नाहींत. पुढें महिना दोन महिन्यांनीं लीगनें आपले पांच प्रतिनिधी मंत्रिमंडळांत पाठविले. जीना आपण घटनापरिषदेंत येणार नाहीं असें बोलत राहिले.

पण हें संमिश्र मंत्रिमंडळ चालणें अशक्य झालें. देशांत दंगे पेटतच होते. अशा प्रकारें बाहेर दंगे, आंत भांडणें आणि लीगचा घटनापरिषदेवर बहिष्कार ह्या पकडींत राष्ट्र सांपडलें. शेवटीं १९४७ च्या फेब्रुवारी महिन्यांत मुख्य प्रधान ॲटली यांनीं आणखी एक घोषणा केली. आम्ही जून १९४७ मध्यें हिंदुस्थान सोडून जाणार आहों आणि जातांना आमचा कारभार मध्यवर्ति सत्तेनें घेतला नाहीं तर प्रांतांवर सोपवून जाणार आहों असें ते म्हणाले. याचा अर्थ प्रांतांकडे सत्ता जाणार म्हणजे येथें पाकिस्तान निर्माण होणार असा केला गेला.

ॲटलीच्या घोषणेनंतर लॉर्ड वेव्हेल यांना परत बोलावलें गेलें व लॉर्ड मौंटबॅटन यांना हिंदुस्थानचे व्हाइसरॉय नेमण्यांत आलें. रक्तपाताला व कट-कटीला कंटाळलेला हिंदुस्थान शेवटीं नाइलाजानें देशाच्या फाळणीला तयार झाला. लॉर्ड मौंटबॅटनची योजना स्वीकारण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. त्या गडबडींत पार्लमेंटनें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा कायदा पास केला आणि १५ ऑगस्टपासून हिंदुस्थान वसाहत सरकार म्हणून स्थापन झालें. तेव्हांपासून २६ जानेवारी १९५० पर्यंत भारत वसाहतीचें स्वराज्य अनुभवीत होता आणि खरें खुरें स्वातंत्र्य २६ जानेवारी रोजीं सुरू होणार आहे. १९४२ पासून १९४७ पर्यंत एकंदर ५ योजना ब्रिटिशांनीं मांडल्या : (१) क्रिप्स, (२) वेव्हेल, (३) त्रिमंत्रि, (४) ॲटली व (५) लॉर्ड मौंटबॅटन. या इतक्या योजना मांडण्याचें कारण आम्ही पाकिस्तान टाळीत होतों हेंच आहे. घटनापरिषद आम्हांला त्याकरतांच पाहिजे होती. पण घटना परिषदेंतील हेतु सफल झाला नाहीं व हिंदुस्थान अखंड राहिला नाहीं हें दुर्दैवी सत्य आहे.

या घटना परिषदेचा असा हा थोडक्यांत पूर्व इतिहास आहे. या पार्श्व-भूमीवर घटनातज्ञ घटना करायला बसले. त्यांची मनःस्थिति काय असेल व

त्यांच्यावर बंधनें कोणतीं असतील याची टीकाकारांनीं अवश्य दखल घ्यावी.

ज्या पाकिस्ताननिर्मितीला धार्मिक किंवा जातीय भावना कारणीभूत झाल्या त्यांचें राज्यकारभारापुरतें संपूर्ण उच्चाटन करणें आमचें कर्तव्य होतें. त्याचप्रमाणें गेल्या दोन तीन वर्षांत कम्युनिस्टांनीं येथें व आशियांत जो धुमाकूळ घातला त्याच्यापासूनहि राष्ट्राचें संकटकालीं रक्षण करण्याची क्षमता घटनेंत असणें अवश्य होतें.

घटना ही राज्याचें स्वातंत्र्य अबाधित ठेवून, त्या राज्याच्या घटकांना व देशांतील व्यक्तींना स्वातंत्र्य देत असते. व्यक्तीच्या किंवा घटकांच्या स्वातंत्र्यामुळें जर राज्यच धोक्यांत येत असेल तर त्या स्वातंत्र्याला मुरड घालणें अपरिहार्य होतें. राष्ट्राचें स्थैर्य नुसत्या लष्करी सत्तेवर अवलंबून नसतें. आर्थिक स्थैर्य नसलेली घटना ही केव्हां कोलमडून पडेल हें सांगतां येत नाहीं. तेव्हां ज्या घटनेंत आर्थिक स्थैर्याची तरतूद नसते ती घटना कितीहि प्रगतिपर वाटली तरी शेवटीं ती क्षीण होत जाते. : सामाजिक समता हीहि असावी लागते. समाज जर भेदाभेदांनीं पोखरला गेला तर त्यांत आपलेपणाची भावना उरत नाहीं आणि राज्य दुर्बळ होत जातें. तेव्हां राज्याच्या स्थैर्याला बाधा येऊं न देतां राजकीय, आर्थिक, सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक वगैरे प्रश्नांचा विचार करावा लागतो.

कोणतीहि घटना चांगली का वाईट हें ठरविण्याचा प्रयत्न सुरुवातीला कोणी करूं नये. कारण घटना ही मूलतः अचेतन असते. तिच्यांतील परिणामक्षमता ही व्यक्ती तिचा वापर ज्याप्रमाणें करतील त्यावर अवलंबून असते. चांगली घटना वाईट कारभारामुळें भ्रष्ट होते आणि बाह्यतः वाईट दिसणारी घटना चांगल्या व्यक्तींच्या हातांत गेली तर ती रूढी, परंपरा, संकेत, दुरुस्त्या वगैरेमुळें चांगली ठरते.

ही घटना म. गांधींच्या कल्पनेप्रमाणें तर नाहींच. त्यांना विकेंद्रीकरण आणि तेंहि प्रत्येक बाबतींत हवें होतें. एखादी व्यक्ती किंवा गांव हा स्वयंपूर्ण व्हावा आणि आपलें रक्षण करण्यास समर्थ व्हावा अशी त्यांची कल्पना होती. समाजवाद्यांना साऱ्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण हवें होतें आणि साम्यवादी त्याच्यापुढें जाऊं इच्छितात. अशा निरनिराळ्या विचारांची एकांगी तरतूद झाली तरी ती टीकेच्या माऱ्यांतून सुटत नाहीं.

हीं सर्व बंधनें पाळून आणि मुख्यतः राष्ट्राचें स्वातंत्र्य कसें टिकेल याचा विचार करून ही घटना तयार करण्यांत आली आहे. ज्या राष्ट्रांत साम्यवाद आहे तेथेंहि व्यक्तींना किती स्वातंत्र्य आहे हें आपण पहातोंच. पण त्याचा विचार करण्याची येथें जरूरी नाहीं.

भारताच्या या 'घटनें'त काय नाहीं हें पाहण्यापूर्वी काय आंहे हें पाहिलें पाहिजे.

आम्हांला लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य निर्माण करावयाचें होतें. जाती, वंश, लिंग, धर्म वगैरेंचा विचार न करतां प्रत्येक व्यक्तीला राजकारणांत समान हक्क द्यावयाचे होते. ते या 'घटनें'त नाहींत असें कोण म्हणेल ? प्रत्येक व्यक्ति राजकीय हक्कांच्या बाबतींत समान आहे व तिला आपलें संरक्षण केलें जाण्याचा हक्क आहे असें जें म्हटलें आहे त्याला 'घटनें'त कोठेंहि बाध आलेला नाहीं. प्रत्येक वयांत आलेल्या स्त्री-पुरुषाला मताचा हक्क आहे. समान संधि, समान नोकऱ्या, समान पगार मिळण्याची तरतूद तिच्यांत केली आहे.

आम्ही धर्मरहित राज्य निर्माण करूं इच्छित होतों. ब्रिटिश अमदानींत जातवारीवर प्रतिनिधित्व दिलेलें होतें. या 'घटनें'त मुसलमानांना खास जागा ठेवल्या नाहींत, नोकरीच्या बाबतींत त्यांना जागा राखून ठेवल्या नाहींत किंवा त्यांची भाषा किंवा लिपी यांना खास संरक्षणें दिलीं नाहींत. हरिजन किंवा रानटी जाती यांना दहा वर्षेंपर्यंत खास हक्क दिले आहेत पण ते धर्मभेदाकरतां नसून त्यांचा मागासलेपणा लक्षांत घेऊन दिलेले आहेत. तेव्हां त्याकरतां कोणी तक्रार करूं नये. अँग्लो-इंडियन लोकांनाही लोकसभागृहांत दोन जागा आणि राज्यसभागृहांत कांहीं जागा द्याव्या अशी तरतूद केली आहे. पण तीहि ते खरेच अल्पसंख्य आहेत म्हणून. या अन्य सवलती दहा वर्षांनंतर अस्तित्वांत राहणार नाहींत.

ही 'घटना' १९३५ च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्यावर आधारलेली आहे असें कांहीं जण म्हणतात. पण ती घटना जातिभेदावर आणि ही 'घटना' जातिभेदशून्यतेवर आधारलेली असल्यामुळे दोहोंत साम्य नाहीं. १९३५ चाच काय पण जगांतल्या अनेक राष्ट्रांचे कायदे विचारांत घेऊन, त्यांतील

दोष व उणीवा टाळून ही घटना केली आहे. इतर राष्ट्रांतील घटनांच्या अनुभवाचा फायदा मिळाला तर तो कां घेऊं नये ?

हिंदुस्थानचें राज्य हा एक राज्यांच्या संघ होणार आहे. फेडरेशनमध्यें लिखित घटना असते; मध्यवर्ती सत्ता व घटक राज्यें यांच्या हक्कांचा स्पष्ट निर्देश असतो आणि मध्यवर्ती व घटक राज्यांत तंटे-बखेडे झाल्यास त्यांच्या निकालाकरतां वरिष्ठ न्यायालयाला अधिकार असतात. या तीनहि गोष्टी या घटनेंत आहेत; तेव्हां हा राज्यसंघ असला तरी फेडरेशनचीं सर्व तत्त्वें त्याला लागू आहेत.

कोणतीहि घटना परिणामक्षम होण्याकरतां तिच्यांत पुरेसा लवचिकपणा असावा लागतो. राज्यावर संकट आलें म्हणजे सारी सत्ता मध्यवर्ती सत्तेला आपल्या हातांत घेतां आली पाहिजे; त्याशिवाय देशाचें रक्षण होत नाहीं. एखादा प्रांत बंडखोर झाला आणि त्याला तशी स्वायत्तता असली तर एका राज्यांत दोन राज्यें निर्माण होऊं शकतील. ती देशविच्छेदनाची एक योजनाच होईल. तें या घटनेनें टाळलें आहे.

त्याचप्रमाणें घटनेंत कांहीं इष्ट अपरिहार्य दुरुस्त्या कराव्या असें वाटलें तर तेंहि करण्याची व्यवस्था घटनेंत आहे. अर्थात ही दुरुस्ती करणें तितकें सोपें ठेवले नाहीं.

मूलभूत हक्कांच्या बाबतींतहि घटनेंत व्यवस्था आहे. मात्र राष्ट्र संकटांत सांपडलें अगर कोणाहि व्यक्तीला केवळ स्वातंत्र्य दिलें आहे व तो त्याचा दुरुपयोग करीत आहे असें वाटलें तर तें स्वातंत्र्य अबाधित राहणार नाहीं. व्यक्तीला समानतेचे, धार्मिक आचार-विचार-प्रचाराचे, शिक्षण मिळण्याचे, वगैरे हक्क दिले आहेत.

त्याचप्रमाणें व्यक्तीला पुरेशीं जीवनाचीं साधनें उपलब्ध व्हावींत, संपत्तीची समान वांटणी व्हावी, सारख्या कामाकरतां सारखा पगार मिळावा, लहान मुलांच्या व प्रौढांच्या श्रमांची नागवणूक होऊं नये, प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क प्राप्त व्हावा, १४ वर्षेंपर्यंत प्रत्येकाला मोफत व सक्तीचें शिक्षण मिळावें, बेकारींत, वृद्धावस्थेंत व आजारीपणांत मदत मिळावी, जीवन-वेतन मिळावें, रोजगार-धंद्याचें वातावरण चांगलें असावें, रजेचा काळ त्याला चांगला

उपभोगतां यावा, त्याला सामाजिक व सांस्कृतिक संधि मिळावी, त्याच्या पौष्टिकतेचें मान वाढावें, वगैरेबाबत सरकारनें प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे.

त्याचप्रमाणें ग्रामपंचायतींची स्थापना, मद्यपान-बंदी, शेतीच्या व दुधाळ जनावरांची हत्या करण्यास प्रतिबंध वगैरे बाबीहि महत्त्वाच्या आहेत. अस्पृश्यता कायद्यानें बंद केली आहे.

राष्ट्रपति ही राज्यांतली आत्यंतिक सत्ता असलेली व्यक्ति आहे. ती व्यक्ती अप्रत्यक्ष निवडणुकीनें निवडली जाणार आहे. त्या व्यक्तीला राज्यपाल व इतर अधिकारी नेमण्याची सत्ता आहे. इतरहि बऱ्याच सत्ता राष्ट्रपतीला आहेत. या सत्तांमुळेंच राज्याचें स्थैर्य टिकणें शक्य आहे. आणि त्याकरतांच ह्या सत्तेची योजना करण्यांत आली आहे.

ही घटना सावधगिरी बाळगण्याच्या दृष्टीनें जितकी सुदृढ करतां येईल तितकी केली आहे. सध्यांचा काळ सुरक्षिततेचा नसल्यामुळें त्याला अनुसरून ही घटना केली असल्यास तें दोषास्पद नाहीं.

अशा प्रकारें तयार केलेल्या घटनेचें आपण स्वागत केलें पाहिजे. पाकिस्तानची तुलना म्हणून नव्हे पण तेथें अद्याप घटना परिषदेला सुरुवातहि झालेली नाहीं. त्यावरून आपली मनोवृत्ति कोणती आहे व पाकिस्तानची कोणती आहे याची कल्पना येते.

ह्या घटनेंत दोष असलेच तर ते फाजील सावधगिरी बाळगल्याचे दोष आहेत. ते अपरिहार्यहि आहेत. पण त्यामुळें आपली वाढ, विकास किंवा प्रगति होण्यास कोणतीहि अडचण येणार नाहीं.

आपल्या राष्ट्रांतील श्रेष्ठ नेते व कायदेपंडित यांनीं उभारलेली घटनेची ही भव्य इमारत भारताच्याच काय पण जगाच्या कौतुकाची विषय झाल्याशिवाय राहणार नाहीं.

—ज्यं. र. देवगिरीकर

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर

पं. नेहरू यांचें भाषण

दिल्ली येथें भरलेल्या हिंदी घटना-परिषदेच्या बैठकींत ता. १ ते डिसेंबर १९४६ रोजीं पं. जवाहरलाल नेहरू यांनीं हिंदी राष्ट्राच्या ध्येयासंबंधींचा ठराव मांडून त्यावर हिंदींत व इंग्रजींत विस्तृत भाषण केलें. या बैठकीच्या वेळीं हिंदी संस्थानिक व मुस्लिम लीग यांनीं घटना-परिषदेवर बहिष्कार घातलेला होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पं. नेहरूंचें हें महत्त्वाचें भाषण येथें समग्र देत आहों:—

" अध्यक्षमहाराज, ही घटना-परिषद सुरू होऊन चार-पांच दिवस झाले. तिनें थोडेसें औपचारिक काम केलें आहे, पण तिला अजून पुष्कळ करावयाचें आहे. घटनेचा इमला बांधण्यासाठीं आपण जमीन साफसूफ करीत आहों. पुढें पाऊल टाकण्यापूर्वी आपल्याला कुठें जावयाचें आहे, आपलें ध्येय काय व आपल्याला कसली इमारत रचावयाची आहे हें समजून घेतलें पाहिजे. जेव्हां एखाद्याला इमारत बांधावयाची असते तेव्हां इमारतीचा नकाशा प्रथम त्याला तयार करावा लागतो. आणि मग तो साधनसामुग्रीची जमवाजमव करतो. स्वतंत्र हिंदुस्थानाचा आराखडा कसा असावा यासंबंधीं गेलीं कित्येक वर्षें आपल्या मनांत निरनिराळ्या योजना घोळत असतील; पण आतां आपण प्रत्यक्ष कार्याला लागलों असल्यामुळें आपल्यापुढें योजनेचें संपूर्ण चित्र उभें असलें पाहिजे. हें चित्र इतकें स्पष्ट, निःसंदिग्ध असलें पाहिजे कीं हिंदी जनतेला आणि जगालाहि त्याची पूर्ण कल्पना यावी. जो ठराव मी आपणांपुढें मांडणार आहे त्यांत आपलें उद्दिष्ट ग्रथित करण्यांत आलें असून योजनेची बाह्यरेषाहि दिग्दर्शित केली आहे. तसेंच आपणांला ज्या मार्गानें जावयाचें आहे त्या मार्गाचाहि थोडक्यांत निर्देश केला आहे.

आपणांपैकीं कित्येकांनीं ज्या प्रकारच्या घटना-परिषदेची अपेक्षा केली होती तशा प्रकारची ही परिषद नाहीं, हें तुम्हांला ठाऊकच आहे. विशिष्ट परिस्थितींत ही जन्माला आली. ब्रिटिश सरकारचाहि तिच्या निर्मितीशीं संबंध आहे. त्यांनीं तिच्याभोंवतीं कांहीं अटींचें कुंपण तयार केलें आहे.

बऱ्याच वादविवादानंतर आपण शाही खलिता (स्टेट पेपर) मान्य केला. तोच या घटना-परिषदेचा पाया आहे. या खलित्यांत घालून दिलेल्या नियमांच्या बाहेर शक्यतों न जाण्याचा आपण प्रयत्न करूं. पण ज्या गोष्टी-मुळें या परिषदेला सामर्थ्य प्राप्त झालें आहे ती गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. शाही खलित्यान्वयें राज्यें स्थापन होत नसतात. खरोखर पाहतां, सरकार हें जनतेच्या इच्छाशक्तीचें प्रतीक असतें. आपल्या मागें जनतेचें पाठबळ आहे म्हणून या ठिकाणीं आपण जमलों आहों आणि जनतेला जेथपर्यंत पल्ला मारण्याची इच्छा आहे तेथपर्यंत पोंचण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्याचबरोबर सर्वसामान्य हिंदी जनतेच्या अंतःकरणांत कोणत्या भावना वास करीत आहेत त्या आपण सदैव लक्षांत ठेवल्या पाहिजेत आणि त्या अमलांत आणण्यास झटलें पाहिजे.

या ठिकाणीं पुष्कळ सभासद गैरहजर आहेत याबद्दल मला खेद वाटतो. या सभागृहांत येऊन वादविवादांत भाग घेण्याचा ज्यांना हक्क आहे ते आज येथें उपस्थित झाले नाहींत. त्यामुळें एका दृष्टीनें आपली जबाबदारी वाढली आहे. ज्यामुळें इतरांच्या मनांत असंतोष उत्पन्न होईल किंवा जें आपल्या तत्त्वाच्या विरोधी होईल असें न करण्याची आपण काळजी घेतली पाहिजे. आज जे येथें अनुपस्थित आहेत ते आपल्याला लवकरच येऊन मिळतील व आपल्या कार्यांत सहभागी होतील अशी आपण आशा करूं या. कारण या परिषदेमागें जितकें जास्त पाठबळ असेल तितकी ती पुढें जाऊं शकेल. हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें ऐक्य व्हावें अशी आजपर्यंत आपली तीव्र इच्छा होती आणि अजूनहि आहे. कारण असें ऐक्य निर्माण झालें म्हणजे सबंध हिंदी जनतेला मान्य होईल अशा प्रकारची सर्वांगीण घटना आपल्याला बनवितां येईल. त्याबरोबर हेंहि स्पष्ट आहे कीं जेव्हां एखादा देश पुढें जाऊं इच्छितो तेव्हां कोणताहि पक्ष किंवा गट त्याला अडवूं शकत नाहीं. कांहीं सभासदांच्या गैरहजेरींत जरी ही परिषद सुरू झाली असली तरी ती चालूंच राहील व आपलें नियोजित कार्य करण्याचा प्रयत्न करील.

मी आपणांपुढें जो ठराव मांडणार आहे तो ठराव म्हणजे एक प्रकारची प्रतिज्ञा आहे. खोल विचार करून त्याचा मसुदा तयार केला आहे आणि



नवभारताचे निर्माते म गांधी

शक्यतों त्यांत मतभेद उत्पन्न होऊं नयेत असा प्रयत्न केला आहे. या मोठ्या देशांत अनेक वादग्रस्त विषय असणें संभवनीय आहे, पण आम्हीं शक्यतों विवाद्य प्रश्न टाळण्याची खटपट केली आहे. हा ठराव मुख्यत्वेंकरून सर्वांना समान व सर्वांना मान्य अशा मूलभूत प्रश्नांसंबंधींचा आहे. ब्रिटिश त्रिमंत्र्यांनीं घातलेल्या मर्यादांच्या बाहेर हा ठराव गेला आहे, किंवा देशांतील विशिष्ट पक्ष किंवा गट यांना अमान्य होईल, अशा प्रकारचा भाग त्यांत आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. दुर्दैवानें आपला देश म्हणजे मतभेदांचें साम्राज्य आहे, पण कदाचित् कांहीं जण वर्ज्य केल्यास या ठरावांतील मूलभूत प्रश्नासंबंधीं क्वचितच कोणाचा मतभेद होऊं शकेल. या ठरावांत असें दिग्दर्शित करण्यांत आलें आहे कीं, आपल्याला स्वतंत्र, सार्वभौम लोकराज्य पाहिजे असा आमचा दृढनिश्चय आहे. आजपर्यंत आपण 'लोकराज्य' हा शब्द उच्चारला नव्हता; पण स्वतंत्र हिंदुस्थान हें लोकसत्ताकच झालें पाहिजे, दुसऱ्या कशांतहि त्याचें रूपांतर होतां कामा नये, हें तुमच्या सहज लक्षांत येईल.

आज संस्थानांचे प्रतिनिधि हजर नाहींत, म्हणून ह्या ठरावाचा हिंदी संस्थानांवर काय परिणाम होईल यासंबंधीं मी थोडा खुलासा करूं इच्छितों. कांहीं जणांकडून असें सुचविण्यांत आलें आहे कीं ज्या अर्थीं बरेच घटक या सभागृहांत हजर नाहींत त्या अर्थीं या ठरावाचा विचार तहकूब करण्यांत यावा. कदाचित् या सूचनेचें रूपांतर तहकुबीच्या ठरावांतहि होईल. माझ्या मतें अशी उपसूचना आली तर ती आजच्या परिस्थितीला शोभून दिसणार नाहीं. कारण आपण जर आपल्यापुढें, आपल्या देशापुढें आणि जगापुढें आपलें उद्दिष्ट स्पष्टपणें मांडलें नाहीं आणि सर्वानुमतें मंजूर करून घेतलें नाहीं तर आपल्या परिषदेंतील कामकाज अर्थशून्य व निर्जीव ठरेल आणि आपल्या परिषदेबद्दल जनतेला उत्सुकताहि वाटणार नाहीं. संस्थानांसंबंधींचा आपला काय दृष्टिकोन आहे तो स्पष्टपणें समजावून घेतला पाहिजे. आपली अशी मनःपूर्वक इच्छा असणें स्वाभाविक आहे कीं हिंदुस्थानांतील सव गटांनीं व घटकांनीं 'संयुक्त हिंदी लोकराज्यां'त (इंडियन यूनियन) सामील व्हावें. पण त्यांनीं कोणत्या प्रकारें त्यांत यावें व त्यांच्या राज्यकारभाराचें स्वरूप कसें असावें हें त्यांचें त्यांनींच ठरवावें.

ह्या ठरावांत तपशील दिला नाहीं. त्यांत फक्त मूलभूत तत्त्वें दाखल केलीं आहेत. संस्थानांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर कांहींहि लादण्यांत येणार नाहीं. मुख्य मुद्दा असा आहे कीं, तीं आमच्यांत कशीं सामील होतील व त्यांचा राज्यकारभार कोणत्या पद्धतीनें चालेल, यासंबंधीं मी आपलें वैयक्तिक मत व्यक्त करूं इच्छित नाहीं. तथापि मला हें सांगितलें पाहिजे कीं आपल्या मूलभूत तत्त्वांना विरोधी अशी कोणत्याहि संस्थानाची राज्यव्यवस्था असतां कामा नये आणि हिंदुस्थानच्या इतर भागांपेक्षां तेथील प्रजाजनांच्या स्वातंत्र्याचा संकोच होतां कामा नये. संस्थानांनीं कोणती राज्यपद्धति स्वीकारावी याच्याशीं ठरावाचा कांहीं संबंध नाहीं, त्याचप्रमाणें हल्लींचे राजेमहाराजे व नबाब यांनीं गादीवर राहावें किंवा जावें याच्याशींहि आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. संस्थानी प्रजेचा तो प्रश्न आहे. प्रजेला आपला राजा हवा असेल असेंहि शक्य आहे. तें त्यांनीं ठरवावयाचें आहे. आपल्या लोकसत्ताक राज्यांत सबंध हिंदुस्थानचा समावेश झाला पाहिजे. आपली राज्यपद्धति विशिष्ट प्रकारची असावी असें जर एकाद्या घटकाला वाटलें तर तसें करण्याची त्याला पूर्ण मुभा आहे.

या ठरावांत नवीन कांहीं भर घालावी किंवा त्यांतला कांहीं भाग काढावा अशी माझी इच्छा नाहीं. या सभागृहानें अप्रस्तुत वादविवादांत वेळ घालविला असें लोकांनीं म्हणूं नये, याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. मी पुन्हां एकदां स्पष्टपणें सांगतों कीं या ठरावांत तपशील दिलेला नाहीं. ठरावांत ग्रथित केलेलें उद्दिष्ट आपण हिंदी राष्ट्राला कसें मिळवून देऊं हें ठरावांत सांगितलें आहे. या ठरावांतला प्रत्येक शब्द तुम्ही विचारांत घ्यावा आणि तुम्हांला तो स्वीकार्य वाटेल अशी आशा आहे. पण ठरावांतील शब्दांपेक्षां शब्दांच्या मागें जी भावना आहे ती अधिक महत्त्वाची आहे. कायदे हे शब्दांचेच बनविलेले असतात, पण हा ठराव कायद्यापेक्षां श्रेष्ठ आहे, शब्दातीत आहे. वकिली पद्धतीनें जर तुम्ही या ठरावांतील शब्दांचा कीस काढलात तर त्यांतून निर्जीव, निःसत्त्व चोथ्या-पलीकडे कांहीं निघणार नाहीं. आपण दोन कालखंडांच्या संधिकालांत उभे आहों. अशा वेळीं आपण जगाला कांहींतरी जिवंत किंवा ज्वलंत असा संदेश दिला पाहिजे. आपली घटना कोणत्या शब्दांत बनवावयाची हें

आपल्याला मागाहून ठरवितां येईल. आपण कांहीं तरी संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहों हें जगाला आज दिसलें पाहिजे. या ठरावाचें स्वरूप अखेर किती बदलेल तें आपणांला पुढें दिसेलच. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, हा ठराव म्हणजे एकादा कायदा नाहीं, तर मानवी अंतःकरणांतील जिवंत भावना त्यांत ओतप्रोत भरलेली आहे.

हा विशिष्ट ठराव सभागृह संमत करील अशी मला आशा आहे. या थोर देशांत राहणाऱ्या आपल्या लाखों बांधवांना आपण हें एक प्रकारचें अभिवचन देत आहों. हा ठराव जर संमत झाला तर ती एक तऱ्हेची प्रतिज्ञा समजली जाईल व ती अमलांत आणण्याची जबाबदारी आपल्यावर पडेल. या अपेक्षेनें हा मी ठराव तुमच्यापुढें मांडतों. या ठरावाचें हिंदुस्थानी भाषांतर तुमच्याजवळ आहे. तें मी पुन्हां वाचीत नाहीं, पण त्याचा इंग्रजी तर्जुमा वाचून दाखवितों आणि पुढें इंग्रजींतच भाषण करतों.

माझा ठराव पुढीलप्रमाणें आहे :

(१) हिंदुस्थान हें स्वतंत्र व सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र आहे अशी घोषणा करण्याचा आणि हिंदी राष्ट्राच्या भविष्यकालीन राज्यव्यवस्थेसाठीं राज्यघटना तयार करण्याचा आपला गंभीर दृढ निश्चय ही घटना-समिति जाहीर करीत आहे.

(२) ब्रिटिश हिंदुस्थानांत असलेले भूप्रदेश, हिंदी संस्थानें म्हणून ओळखले जाणारे प्रदेश, ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांच्या बाहेर असणारे प्रदेश आणि स्वतंत्र सार्वभौम लोकराज्यांत येऊं इच्छिणारे प्रदेश या सर्वांचें एक संघराज्य स्थापन व्हावें; आणि

(३) या वर निर्दिष्ट केलेल्या भूप्रदेशांना, आजच्या त्यांच्या भौगोलिक सरहद्दींसह अथवा घटना-समितीनें ठरविलेल्या किंवा घटना-कायद्यान्वयें ठरलेल्या सरहद्दींसह, संघराज्याचे स्वायत्त घटक असा दर्जा प्राप्त होईल; शिवाय त्यांना शेषाधिकारहि मिळतील; आणि संघराज्याकडे स्वभावतःच जे अधिकार आलेले असतील किंवा जे अधिकार संघराज्याकडे सोपविलेले असतील त्यांव्यतिरिक्त इतर सर्व बाबतींतले राज्यकारभाराचे सत्ताधिकार ह्या स्वायत्त घटकांच्या हातीं येतील.

(४) या स्वतंत्र, सार्वभौम हिंदी लोकराज्याची, तिच्या घटकांची आणि राज्ययंत्राची शक्ति आणि सत्ताधिकार यांचें उगमस्थान हिंदी जनता हेंच आहे.

(५) या संघराज्यांतील सर्व जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबतींत सारखाच न्याय मिळेल अशी हमी दिली जाईल; सर्वांना सारखाच दर्जा व समान संधि मिळेल, कायद्याच्या दृष्टीनेंहि सर्वांना सारखेंच लेखिलें जाईल; विचार, उच्चार, धर्म, धार्मिक आचार, पूजा, धंदा, संघटना आणि कृति या सर्व बाबतींत कायदा आणि सार्वजनिक नीतिमत्ता यांना अनुसरून सर्वांना पूर्ण स्वातंत्र्य मिळेल.

(६) या घटनेंत अल्पसंख्य व मागासलेले लोक, वन्य जातीचे प्रदेश आणि दलित वर्ग यांना योग्य तें संरक्षण देण्याची तरतूद केली जाईल; आणि—

(७) या लोकराज्यांतील प्रदेशाचे अखंडत्व राखलें जाईल आणि पुढारलेल्या राष्ट्रांच्या न्यायनियमानुसार भूमि, समुद्र आणि आकाश यांवरील लोकराज्याचे सार्वभौम अधिकार अविच्छिन्न ठेवण्यांत येतील; आणि

(८) या घटनेच्या द्वारें ह्या प्राचीन देशाला जगांतील राष्ट्रांच्या समूहांत मानाचें व हक्काचें स्थान मिळेल आणि जागतिक शांतता आणि मानवजातीचें कल्याण या बाबतींत हा देश मनःपूर्वक आणि जास्तींत जास्त भाग घेईल.

" आपल्या घटना-समितीचा हा पांचवा दिवस आहे आणि आतांपर्यंत आपण कामकाजाच्या मामुली पण महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला. आपण भूमि साफ करीत आहों, आपल्याला अजून पुष्कळ करावयाचें आहे. आपल्याला कामकाजाचे नियम ठरवावयाचे आहेत त्याप्रमाणें निरनिराळ्या समित्याहि नेमावयाच्या आहेत. आणि त्यानंतर आपल्याला ह्या घटना-समितीच्या नियुक्त कार्याकडे वळतां येईल. हें कार्य म्हणजे राष्ट्राच्या आशा-आकांक्षांना रंगरूप देऊन त्यांना छापील शब्दांच्या चौकटींत बसविणें हें आहे. हें एक मोठें घाडसच आहे. आणि आपण काय करणार आहों, आपण कोणतें उद्दिष्ट डोळ्यांपुढें ठेवलें आहे याची कल्पना या घटना समितीकडे उत्सुकतेनें

पाहणाऱ्या लाखों लोकांना आजच्या घटकेला देणें खरोखर जरूर आहे. आणि याच हेतूनें मी हा ठराव मांडला आहे. हा जरी एक ठराव असला तरी मामुली ठरावापेक्षां त्यांत कांहीं अधिक आहे. ती एक घोषणा आहे, तो एक दृढनिश्चय आहे, ती एक प्रतिज्ञा आहे आणि आत्मार्पणाची साधना आहे; म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं, सन्मान्य सभासदांनीं संकुचित शाब्दिक परिभाषेंत या ठरावाचा विचार न करतां त्या ठरावामागील उदात्त भावना लक्षांत घ्यावी. पुष्कळदां शब्द म्हणजे जादूचा खेळ आहे आणि शब्दांच्या जादूनें मानवी मनोभावनेची व राष्ट्राच्या अंतरंगाची जादू व्यक्त होऊं शकत नाहीं. म्हणून आजच्या हिंदी जनतेच्या मनांतील व हृदयांतील भावभावना या ठरावांत प्रदर्शित झाल्या असतील असें मला म्हणतां येणार नाहीं. इतकीं वर्षें हिंदुस्थानापुढें कोणतें सुखस्वप्न होतें, हिंदी राष्ट्र कोणत्या गोष्टीचा विचार करीत होतें हें या ठरावाच्या द्वारें जगापुढें मांडण्यांत येत आहे. ठरावाचा आवाज फार मोठा नाहीं, तो क्षीण असला तरी तो लांबपर्यंत जाऊन पोंचेल, याच भावनेनें मी हा ठराव तुमच्यापुढें मांडण्याचें धाडस करीत आहें आणि याच भावनेनें तुम्ही त्याचा स्वीकार करून तो मंजूर कराल अशी मला आशा वाटते. अध्यक्षमहाराज, मी आपणांला आणि सभाजनांना आदरपूर्वक सुचवूं इच्छितों कीं जेव्हां हा ठराव पास होण्याची वेळ येईल त्या वेळीं नुसते हात वर करून तो औपचारिकपणें पास होतां कामा नये, तर एक प्रकारची नवी प्रतिज्ञा घेतल्याप्रमाणें सर्वांनीं गंभीरपणानें उभे राहून त्याच्या मंजुरीला आपली संमति द्यावी.

या सभागृहांत पुष्कळ जण गैरहजर आहेत आणि ज्यांचा येथें वसण्याचा हक्क आहे ते आले नाहींत, या गोष्टीबद्दल आपणां सर्वांना खेदच वाटेल. निरनिराळ्या प्रांतांचे व निरनिराळ्या गटांचे जास्तींत जास्त प्रतिनिधी येथें यावे व त्यांच्याशीं आपण विचारविनिमय करावा अशी आपली स्वाभाविकच इच्छा असणार. आपण एक महान् कार्य हातीं घेतलें आहे आणि त्यांत सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. कारण हिंदी राष्ट्राचें जें भवितव्य आपल्या डोळ्यांपुढें आहे तें विशिष्ट गट, प्रांत किंवा विभाग यांच्यापुरतेंच मर्यादित नाहीं, तर हिंदुस्थानांतील चाळीस कोटि लोकांचा त्यांत समावेश आहे. आणि म्हणूनच सहकारी प्रतिनिधींच्या गैरहजेरीबद्दल आपल्याला खेद

वाटतो. मला असें मनापासून वाटतें आणि मी अशी आशा करतों कीं लवकरच पुढील बैठकीच्या वेळीं या गैरहजर सभासदांचें सहकार्य मिळेल; मात्र या मधल्या काळांत आपल्यावर एक मोठी जबाबदारी आहे. आपण या ठिकाणीं एक विशिष्ट पक्ष किंवा गट म्हणून जमलेलों नाहीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. तसेंच सबंध हिंदुस्थानासाठीं, चाळीस कोटी लोकांच्या कल्याणासाठीं आपण या कार्याला उद्युक्त झालों आहों, हें विसरतां कामा नये. आज आपण प्रत्येकजण विशिष्ट पक्षाचे व विशिष्ट गटाचे असलों तरी आतां अशी वेळ आली आहे कीं, आपण आपला पक्ष विसरून फक्त राष्ट्राचाच विचार केला पाहिजे. आणि या परिषदेच्या कार्याचा विचार केला म्हणजे मला असें वाटतें कीं, आतां आपण शक्यतों आपलें व्यक्तित्व व पक्षाभिनिवेश विसरला पाहिजे आणि पक्षातीत होऊन व्यापक दृष्टीनें व उदार वृत्तीनें आपल्यापुढील महान् कार्याचा विचार केला पाहिजे. तरच आपण जी घटना निर्माण करूं ती सबंध हिंदुस्थानला लागू करण्याच्या योग्यतेची होईल आणि जगालाहि ती मान्य होईल अशा प्रकारची होईल.

या सभागृहांत आणखी एक व्यक्ति गैरहजर आहे. तथापि ती पुष्कळांच्या डोळ्यापुढें असेल. आपल्या देशाचे सर्वांत थोर पुढारी, राष्ट्राचे जनक व कर्णधार आज येथें नाहींत; पण या घटना-परिषदेच्या घटनेचे तेच मूळ उत्पादक व शिल्पकार आहेत आणि भूतकालाप्रमाणें भावी काळाचेहि ते निर्माते आहेत. ते आज येथें नाहींत, कारण आपल्या ध्येयसिद्धीसाठीं ते हिंदुस्थानाच्या एका दूरच्या कोपऱ्यांत अविश्रांत कार्य करीत आहेत. पण त्यांची अदृश्य मूर्ति या सभागृहांत वावरत आहे व ती आपल्याला आशीर्वाद देत आहे याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं.

या ठिकाणीं उभा असतांना माझ्या मनांत अनेक तऱ्हेच्या विचारांची गर्दी झाली आहे व मी अगदीं दडपून गेलों आहे. जुन्या युगाचा अंत जवळ आला असून आपण लवकरच नव्या युगांत प्रवेश करूं. अशा वेळीं माझें मन ५००० वर्षांपूर्वीच्या उज्ज्वल भूतकालाकडे, हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाकडे धांव येत आहे आणि जगाच्या प्रारंभापासून आतांपर्यंतचा काळ माझ्या डोळ्यांपुढें तरळत आहे. हा भूतकाळ माझ्या मनांत कधीं कधीं आनंद उत्पन्न करतो तर कधीं कधीं मला अस्वस्थहि करतो. या


प्राचीन काळाचा मी योग्य वारस आहे काय ? मी जेव्हां भविष्यकाळाचा विचार करतों तेव्हां उज्ज्वल भूतकाल आणि महान् भविष्यकाळ त्यांच्या-मधील वर्तमानकाळरूपी तरवारीच्या धारेवर मी उभा आहे असें मला वाटतें व एक प्रकारें माझा थरकांप होतो. आपल्यापुढील प्रचंड कार्याच्या भारामुळें मी आधींच दडपून गेलों आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासांतील एका चमत्कारिक क्षणीं आपण येथें जमलों आहोंत. या संक्रमणाच्या क्षणांत एक प्रकारची जादू आहे असें मला वाटत आहे. तसें कां वाटत आहे हें मात्र सांगतां येत नाहीं. मात्र जुन्या-नव्याच्या संक्रमणकाळांत एक प्रकारची जादू आहे यांत शंका नाहीं. अंधाऱ्या रात्रीचें रूपांतर दिवसाच्या प्रकाशांत व्हावें व आकाश मेघांनीं भरून गेलेलें असलें तरी कालांतरानें ढग विरून जाऊन सूर्यप्रकाश यावा, त्या वेळीं जसें आपणांला वाटतें तसें आज मला वाटत आहे. अशा अनेक कारणांमुळें आपणांपुढें बोलतांना मला अडखळल्यासारखें होत आहे. गेल्या हजारों वर्षांच्या काळांत ज्या महान् व्यक्ति उदयास आल्या आणि अंतर्धान पावल्या त्या माझ्या डोळ्यांपुढें तरळत आहेत. त्याचप्रमाणें हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं जन्मभर परिश्रम केले त्यांचीहि प्रचंड मालिका मला दिसत आहे. आणि आज आपण बदलत्या काळाच्या उंबरठ्यावर उभे असून नव्या जगांत प्रवेश करण्यासाठीं धडपड करीत आहों. या क्षणाचें गांभीर्य व पावित्र्य या सभागृहालाहि प्रतीत होईल व त्याच भावनेनें या ठरावाकडे सभासद पहातील अशी मला खात्री वाटते. हा ठराव मांडण्याचा मान मिळाला याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. या ठरावावर अनेक उपसूचना येणार आहेत असें मी ऐकतों. त्यांपैकीं कित्येक मी पाहिल्याहि नसतील.

प्रत्येक सभासदाला वाटेल तितक्या उपसूचना मांडण्याचा हक्क आहे आणि त्या पास कराव्या कीं नापास कराव्या हें ठरविण्याचें काम सभागृहाचें आहे. पण मला सभागृहाला असें आदरपूर्वक सुचवावयाचें आहे कीं, आज आपल्यापुढें मोठे व महत्त्वाचे प्रश्न असल्यामुळें क्षुल्लक बाबतींत तांत्रिक कायद्याचा कीस काढण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सभागृहानें मोठ्या मनानें या ठरावाचा विचार करावा व शाब्दिक काथ्याकूट करण्यांत निष्कारण कालाप-व्यय करूं नये.

यापूर्वीं झालेल्या निरानिराळ्या घटना-समित्या माझ्या डोळ्यांपुढें आहेत. अमेरिकन जनतेनें आपल्या घटना-समितीच्या द्वारें राष्ट्राची घटना कशी तयार केली, ती आज दीडशें वर्षें कशी टिकून राहिली आणि या घटनेच्या पायावर आजचें मोठें राष्ट्र कसें निर्माण झालें या गोष्टीचा मी विचार करीत आहें. सुमारे दीडशें वर्षांपूर्वी फ्रान्समध्यें जी क्रांति घडून आली व अत्यंत सुंदर अशा पॅरिस शहरांत जी घटना-समिति भरली, त्याची मला आठवण होत आहे. या समितीला स्वातंत्र्यासाठीं केवढा खडतर लढा करावा लागला, तिच्या मार्गांत राजा आणि इतर अधिकारी आले असतांहि ती तशीच कशी चालूं राहिली या गोष्टी माझ्या डोळ्यांपुढें येत आहेत. या सभागृहाला हें कदाचित् आठवत असेल कीं जेव्हां त्या घटना-परिषदेच्या मार्गांत असंख्य अडचणी आल्या, सभेसाठीं जागाहि मिळेना, तेव्हां त्या सभासदांनीं उघड्या टेनिस कोर्टावर आपली सभा भरवली व शपथा घेतल्या, आणि राजा, अधिकारी किंवा इतर प्रतिपक्षी यांना न जुमानतां त्यांनीं आपलें उद्दिष्ट साध्य होईपर्यंत परिषद तशीच चालूं ठेवली. सभासदहो, मला असा विश्वास वाटतो कीं, याच दृढनिश्चयाच्या जोरावर आपण या ठिकाणीं जमलों आहों; आणि आपली बैठक या सभागृहांत भरो, उघड्यावर भरो किंवा मंडईंत भरो, आपण आपली परिषद तशीच चालूं ठेवली पाहिजे व हातीं घेतलेलें काम पुरें होईपर्यंत ती विसर्जन करतां कामा नये.

त्यानंतर माझें मन आधुनिक काळांत झालेल्या क्रांतीकडे धांव घेत आहे. रशियांत झालेल्या या क्रांतीनें एक नवीन राज्यघटना अस्तित्वांत आली आहे आणि तींतूनच पुढें सोव्हिएट सोशॅलिस्ट लोकसत्ताकांचें संघराज्य जन्म पावलें. आजच्या जगांत या राष्ट्रानें केलेली कामगिरी सर्व-विश्रुत आहेच. हें राष्ट्र नुसतें बलाढ्य नाहीं तर हिंदी राष्ट्राचें शेजारी राष्ट्र आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

या मागील इतिहासावरून व यशस्वी उदाहरणावरून आपण यश कसें मिळवावें व अपयश कसें टाळावें हें शिकलें पाहिजे. कदाचित् आपल्याला अपयश टाळतां येणार नाहीं. तथापि अडचणी आणि संकटें यांना न जुमानतां आपण इतकीं वर्षें जें ध्येय आपल्यापुढें ठेवलें आहे, ज्या दिवा-



स्वतंत्र भारताचे सूत्रधार पं. जवाहरलाल नेहरू

स्वप्नांत आपण रंगून गेलों आहों तें ध्येय आणि तें स्वप्न दृश्य स्वरूपांत आणण्यासाठीं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करूं.

या ठरावांत फक्त मूलभूत तत्त्वें ग्रथित केलीं आहेत आणि मला असा विश्वास वाटतो कीं, कोणत्याहि पक्षाला, गटाला अगर व्यक्तीला त्यांत वादग्रस्त असें कांहीं आढळणार नाहीं. आपल्याला स्वतंत्र सार्वभौम लोकराज्य पाहिजे असा आपला दृढनिश्चय आपण बोलून दाखवीत आहों. हिंदुस्थान हा सार्वभौम असला पाहिजे, तो स्वतंत्र असला पाहिजे आणि तो लोकसत्ताकहि असला पाहिजे. राजा असावा कीं नाहीं, या वादांत मी शिरत नाहीं, कारण शून्यांतून आपल्याला राजेशाही उत्पन्न करतां येणार नाहीं. कांहीं मित्रांनीं असा प्रश्न उपस्थित केला आहे कीं, या ठरावांत ' लोकशाही स्वरूपाचे ' हे शब्द कां घालण्यांत आले नाहींत ! मी त्यांना असें सांगितलें कीं, लोकराज्य हें कदाचित् लोकशाही स्वरूपाचें असणार नाहीं; पण आपला प्राचीन भारतीय काळ लक्षांत घेतला तर आपण लोकशाही पद्धतीनेंच चालत आलों आहों हें कळून येईल. अर्थात् लोकशाही हें आपलें ध्येय आहे हें निर्विवाद आहे. मात्र या लोकशाहीला कोणतें स्वरूप येईल हें आज सांगतां येणार नाहीं. हें स्वरूप कसें असावें तें या सभागृहानें ठरवावयाचें आहे. मूळ ठरावांत लोकशाही हा शब्द अंतर्भूत नसला तरी लोकराज्य या शब्दांत तो अभिप्रेत आहे हें स्पष्ट आहे. या ठरावांत ' लोकशाही ' नसली तरी लोकशाहीचा गाभा आहे, आर्थिक लोकशाहीचें सारसर्वस्व भरलेलें आहे.

कांहीं लोकांचा या ठरावाला असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, त्यांत ' सोशॅलिस्ट स्टेट ' (समाजवादी राष्ट्र) असे शब्द वापरले नाहींत. मी स्वतः सोशॅलिझमचा पुरस्कर्ता आहे आणि मला वाटतें, हिंदी राष्ट्रालाहि समाजवाद मान्य होईल, इतकेंच नव्हे तर सबंध जगालाहि याच मार्गानें जावें लागेल असा मला विश्वास वाटतो. मात्र या समाजसत्तावादाचें स्वरूप काय राहील हा प्रश्न तुम्ही ठरवावयाचा आहे. अशा प्रकारच्या ठरावांत विशिष्ट विचारसरणीचे तात्त्विक शब्दप्रयोग घालण्यापेक्षां त्या शब्दांमागील अर्थ आणि भावना व्यक्त होतील असे शब्द योजणें अधिक इष्ट असतें. म्हणून विशिष्ट शब्दांचा आग्रह धरण्यांत आलेला नाहीं.

कांहीं जणांनीं अशी शंका काढली आहे कीं, लोकराज्य या शब्दानें संस्थानिक बिचकण्याचा संभव आहे आणि तें खरेंहि आहे. पण माझ्यापुरतें मला हें स्पष्ट करून सांगितलें पाहिजे कीं, राजेशाहीला मी मानीत नाहीं आणि आजच्या जगांत राजेशाह्या धडाधड कोसळत आहेत व ही संस्था हळूहळू नामशेष होण्याच्या पंथाला लागली आहे. तथापि व्यक्तिशः माझें मत कांहींहि असलें तरी हिंदी संस्थानांबद्दल आपला असा दृष्टिकोन आहे कीं, जें स्वातंत्र्य येऊं घातलें आहे त्या स्वातंत्र्यांत संस्थानी प्रजेला भागीदार होतां आलें पाहिजे. संस्थानी प्रजेचें स्वातंत्र्य आणि संस्थानाबाहेरील जनतेचें स्वातंत्र्य यांत तफावत कां असावी हें मला समजत नाहीं. संस्थानांनीं या संघराज्यांत कोणत्या प्रकारें सामील व्हावें हें संस्थानी प्रतिनिधींच्या बरोबर या सभागृहानें ठरवावयाचें आहे. मात्र अंतिम घटना ठरवितांना या सभासदांबरोबर संस्थानी प्रजेचेच प्रतिनिधी बसले पाहिजेत.

संस्थानांनीं अमुकच राज्यपद्धति स्वीकारली पाहिजे, अशी घटना-समिति कोणावर सक्ती करूं इच्छिणार नाहीं. संस्थानी प्रजेला आपल्या संस्थानची राज्यपद्धति कोणती असावी हें ठरविण्याचा हक्क आहे. मग त्या राज्यपद्धतींत राजा असला तरी हरकत नाहीं. संस्थानांत कोणतीहि राज्यपद्धति असो, तेथील प्रजाजनांना स्वातंत्र्य असावें, त्यांच्या हातीं राज्यकारभार असावा एवढीच आपली अपेक्षा आहे. मला हें येथें स्पष्ट करून सांगावयाचें आहे कीं, घटना-समितींत यापुंढे जे विषय चर्चेला येतील त्यांच्या आड कोणत्याहि प्रकारें हा ठराव येणार नाहीं. या ठरावांत जे मूलभूत सिद्धान्त मांडले आहेत ते कोणत्याहि दृष्टीनें वादग्रस्त किंवा विवाद्य नाहींत.

आपण हिंदुस्थानासाठीं राज्यघटना बनविण्याच्या मार्गांत आहों आणि आपण जें कार्य करणार आहों त्याचा इतर जगावर फार मोठा परिणाम होणार आहे. हिंदुस्थान देश स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगाच्या आखाड्यांत उतरणार आहे, म्हणून जगांत त्याला स्थान मिळेल असें नाहीं तर हिंदुस्थानाचा प्रचंड विस्तार व लोकसंख्या, त्याचप्रमाणें प्रचंड नैसर्गिक साधन-संपत्ति यांच्यायोगें जागतिक राजकारणांत हिंदुस्थानाला महत्त्वाचा भाग घेतां येणें शक्य आहे. आजसुद्धां, आपण स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना देखील हिंदी राष्ट्र जागतिक घडामोडींत भाग घेऊं लागलें आहे. म्हणून

घटना बनविणाऱ्यांनीं हा व्यापक जागतिक दृष्टिकोन आपल्या अंगीं बाणला पाहिजे.

आपण जगाकडे मित्रत्वाच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे व जगांतील सर्व राष्ट्रांशीं मैत्री केली पाहिजे. गेलीं अनेक वर्षें इंग्लंडशीं आपला झगडा चालूं आहे; तरी देखील या देशाशीं आपण सख्य जोडलें पाहिजे. मी नुकताच इंग्लंडला जाऊन आलों हें सभासदांना माहीत आहे. मी जाण्यास कां नाखूष होतों हेंहि त्यांना ठाऊक आहे. पण ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान यांनीं खास विनंति केली म्हणून मी गेलों. प्रत्येक ठिकाणीं मला सौजन्याची वागवणूक मिळाली. पण हिंदुस्थानच्या इतिहासांतील या आणीबाणीच्या वेळीं जेव्हां आम्हांला बाहेरच्या जगाकडून उत्साहाचे, मैत्रीचे व सहकार्याचे संदेश यावे अशी अपेक्षा होती, त्या वेळीं निदान इंग्लंडकडून तरी असा संदेश यावा असें आपणाला वाटणें साहजिक होतें. इंग्लंडनें इतक्या वर्षांचा स्नेह-संबंध लक्षांत घेऊन आणि वैरभाव विसरून आपल्याला उत्साहवर्धक संदेश देणें जरूर होतें; पण इंग्लंडकडून परत येतांना मला असल्या उत्साहवर्धक संदेशाशिवायच यावें लागलें. त्यामुळें माझी फार फार निराशा झाली. आपण जेव्हां पुढें पाऊल टाकण्यास सज्ज झालों तेव्हां आपल्या मार्गांत अडचणी उत्पन्न करण्यांत आल्या आणि आयत्या वेळीं नवीन मर्यादा घालण्यांत आल्या. तसेंच कामकाजाची पद्धतहि नवीच सुचविण्यांत आली. या गोष्टीचें कायदेशीर स्वरूप कांहींहि असो, कित्येक वेळां कायदा हा गवताच्या काडीइतका निर्जीव व निराधार असतो.

आपणांपैकीं कित्येकांनीं गेल्या कांहीं वर्षांत हिंदी स्वातंत्र्याच्या झगड्यांत भाग घेतला आहे. आणि तशीच परिस्थिति उत्पन्न झाली तर पुन्हां सुद्धां आम्ही त्या दिव्यांतून जाऊं. कारण आम्हांला त्याची संवय झाली आहे. या दीर्घ काळांत आम्ही लढ्यासाठीं जसे उत्सुक होतों त्याचप्रमाणें विधायक कार्य करण्याची संधि शोधीत होतों. अखेर आम्हांला तशी संधि मिळाली; पण त्याच क्षणीं आमच्यापुढें अडचणींचे डोंगर उभे करण्यांत आले. आज इतकीं वर्षें झालीं; पण खरोखर हिंदुस्थानाचा प्रश्न काय आहे हें समजून घेण्याची राज्यकर्त्यांना बुद्धि झाली नाहीं. हिंदी राष्ट्राला दुसऱ्याच्या उपदेशाची किंवा सक्तीची जरूरी नाहीं. त्याच्याबद्दल जर आपुलकी निर्माण

व्हावयाची असेल तर ती सहकार्य, सहृद्भाव व सौजन्य या गुणांमुळेंच होईल. त्याच्यावर एकादी गोष्ट सक्तीनें लादण्याचा प्रयत्न केला तर त्याचा सर्वत्र निषेध केला जाईल व त्याला विरोधहि करण्यांत येईल, आमच्या मार्गांत कितीहि अडचणी आल्या तरी आम्हीं गेल्या कांहीं महिन्यांत सहकार्याचें वातावरण उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे असें मला प्रामाणिकपणें वाटतें. पण मला असें भय वाटतें कीं, दुसऱ्या पक्षाकडून योग्य प्रकारें त्याला साथ मिळाली नाहीं तर हें वातावरण बिघडून जाईल. तथापि यशप्राप्ति होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहणार. आमच्या देशबांधवांपैकीं कांहींनीं चुकीच्या मार्गाचा अंगीकार केला असला तरी त्यांच्या बाबतींतहि आम्ही आपले प्रयत्न चालूं ठेवणार. कारण कांहीं झालें तरी, आज ना उद्यां, किंवा कदाचित् परवां, आम्हांला एकत्र काम करण्यावांचून गत्यंतर नाहीं, म्हणून आमच्या देशबांधवांच्या बाबतींत त्यांचें जितकें जास्त सहकार्य मिळेल तितकें मिळविण्याचा जोराचा प्रयत्न केला पाहिजे. पण सहकार्य म्हणजे आपल्या मूलभूत उद्दिष्टांना झुगारून देणें नव्हे अगर ज्याच्यावर आपलें जीवन आधारलें आहे अशा जीवनसर्वस्वावर पाणी सोडणें नव्हे. आज एकमेकांविषयीं जरी कलुषित वातावरण आहे तरी इंग्लंडच्या सहकार्याची आम्हांला अपेक्षा आहे. हें सहकार्य जर नाकारण्यांत आलें तर हिंदुस्थानवर त्याचा जसा अनिष्ट परिणाम होईल तसा इंग्लंडवर होईल, आणि कांहीं प्रमाणांत जगालाहि त्याची झळ लागेल. आपण नुकतेंच एका युद्धांतून बाहेर पडलों आहों आणि कांहीं लोक आगामी युद्धाबद्दल हिरीरीनें बोलत आहेत. अशा वेळीं हिंदुस्थान पुनर्जन्म घेत आहे व तो निर्भय, सामर्थ्यवान् व नवजीवनसंपन्न होत आहे. आपण या वेळीं साफ दृष्टीनें पाहिलें पाहिजे. कारण आपल्याला घटना बनविण्याचें महत्कार्य हातीं घ्यावयाचें आहे. या घटना-समितीकडे सबंध जगाचे डोळे लागले आहेत आणि आपल्या गौरवशाली भूतकाळाची नजरहि आपल्यावर आहेच. भविष्यकाळहि आपणांकडे पहात असेल. म्हणून सभासदांना अशी विनंति आहे कीं, त्यांनीं उज्ज्वल भूतकाळ, संकटमय वर्तमानकाळ व लवकरच येणारा भविष्यकाळ या गोष्टींच्या प्रकाशांत माझ्या ठरावाचा विचार करावा. मी आपला ठराव सभागृहापुढें मांडतों."



भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. अंबेडकर

डॉ. आंबेडकरांचें भाषण

घटनेच्या मसुदा-समितीचे अध्यक्ष डॉ. भी. रा. आंबेडकर यांनीं २६ नोहेंबर १९४९ रोजीं घटनेच्या संपूर्ण चर्चेनंतर पुढीलप्रमाणें उत्तरादाखल सविस्तर भाषण केलें:—

" घटना-परिषदेच्या कामाचें जर आपण सिंहावलोकन केलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, ९ डिसेंबर १९४६ रोजीं घटना-परिषद सुरू झाल्यापासून २ वर्षें, ११ महिने व १७ दिवस लोटले आहेत. या अवधींत घटना-परिषदेच्या ११ बैठकी झाल्या.

११ बैठकींपैकीं पहिल्या ६ बैठकी 'उद्दिष्टा'चा ठराव पास करण्यांत, आणि मूलभूत हक्क, संघराज्याची घटना, संघराज्याचे सत्ताधिकार, राज्यांची घटना, अल्पसंख्य, अनुसूचित जनजाति व प्रदेश यांच्यासंबंधीं नेमलेल्या समित्यांच्या अहवालांचा विचार करण्यांत खर्च झाल्या. पुढच्या पांच बैठकींत घटनेच्या मसुद्याची चर्चा करण्यांत आली. घटनेच्या या ११ बैठकींना एकूण १६५ दिवस लागले. त्यांपैकीं केवळ घटनेच्या मसुद्याचा विचार करण्यांत ११४ दिवस खर्च झाले.

घटना तयार करण्यासाठीं घटनापरिषदेनें २९ ऑगस्ट १९४७ रोजीं मसुदा-समिती नेमली. तिची पहिली सभा ३० ऑगस्ट रोजीं झाली. तेव्हांपासून घटना तयार करण्याचें काम करण्यासाठीं तिनें १४१ दिवस घेतले. मसुदा-समितीसाठीं घटना सल्लागारानें तयार केलेल्या घटनेच्या मूळ आराखड्यांत २४३ कलमें व १३ परिशिष्टें होतीं.

या मसुदा-समितीनें प्रथम घटनेचा जो मसुदा घटनासमितीला सादर केला त्यांत ३१५ कलमें व ८ परिशिष्टें होतीं. बऱ्याच विचारचर्चेनंतर मसुद्यांतील कलमांची संख्या ३८६ पर्यंत वाढली, आणि घटनेच्या शेवटच्या मसुद्यांत ३९५ कलमें व ८ परिशिष्टें दाखल झालीं, मसुद्याची चर्चा चालूं असतांना

एकंदर ७६३५ उपसूचना दाखल करण्यांत आल्या तथापि प्रत्यक्ष अशा २४७३ च सभागृहांत मांडल्या गेल्या.

मी या गोष्टी अशासाठीं येथें निवेदन करीत आहे कीं, घटना बनविण्याचें काम चालूं असतां असे आक्षेप घेण्यांत येत असत कीं घटना परिषद जरूरीपेक्षां अधिक वेळ घेऊन आपलें काम रेंगाळत करीत आहे व जनतेचा पैसा निष्कारण उधळीत आहे. रोम जळत असतां नेरोनें फिडल् वाजविण्यासारखें हें आहे, असें म्हटलें जात होतें. पण या आक्षेपांत कांहीं तथ्य आहे काय ! इतर देशांतील घटनापरिषदांना आपली घटना बनविण्यासाठीं किती काळ लागला तो आपण पाहूं.

उदाहरणादाखल आपण अमेरिकेच्या घटनेचा काळ लक्षांत घेऊं. अमेरिकेन कन्व्हेन्शन्नें २५ मे १७८७ रोजीं घटनेसाठीं आपली पहिली बैठक भरविली व १७ सप्टेंबर १७८७ रोजीं म्हणजे अवघ्या चार महिन्यांत घटना पुरी केली. कॅनडाची घटना परिषद १० ऑक्टोबर १८६४ रोजीं भरली व घटनेचा कायदा मार्च १८६७ मध्यें म्हणजे २ वर्षें ५ महिन्यांनीं पास झाला. ऑस्ट्रेलियाच्या घटना परिषदेस मार्च १८९१ मध्यें प्रारंभ झाला व ९ वर्षांनंतर म्हणजे ९ जुलै १९०० रोजीं या घटनेचें कायद्यांत रूपांतर झालें. दक्षिण आफ्रिकेच्या घटना परिषदेनें आपलें काम एक वर्षांतच पुरें केलें. तिच्या कामास १९०८ च्या ऑक्टोबरमध्यें सुरुवात झाली व २० सप्टेंबर १९०९ मध्यें घटना मंजूर झाली.

अमेरिका किंवा दक्षिण आफ्रिका यांच्या घटना-परिषदांपेक्षां आम्हीं अधिक काळ घेतला हें खरें आहे. पण कॅनडापेक्षां जास्त काळ घेतला नाहीं व ऑस्ट्रेलियाच्या मानानें आम्ही कितीतरी लवकर आटोपलें. घटना तयार करावयास किती काळ लागला याची तुलना करतांना दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया यांच्या घटना आपल्यापेक्षां किती तरी लहान आहेत. आपल्या घटनेंत ३९५ कलमें आहेत तर अमेरिकेन घटना फक्त ७ कलमांची व २१ पोटकलमांची आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका या देशांच्या घटनेंत अनुक्रमें १४७, १२८ व १४७ कलमें आहेत.

दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका या देशांच्या घटना परिषदांना उपसूचनांना तोंड द्यावें लागलें नाहीं. त्या घटना जशा मांडल्या गेल्या तशाच पास झाल्या. पण त्याच्या उलट या घटनापरिषदेला २४७३ इतक्या प्रचंड उपसूचना विचारांत घ्याव्या लागल्या ! या सत्यस्थितीचा विचार करतां, आम्ही आपलें काम दिरंगाईनें व रेंगाळत केलें हा आक्षेप माझ्या मतें अत्यंत निराधार आहे आणि इतकें त्रिकट कार्य एवढ्या थोड्या काळांत घटना परिषदेनें पार पाडलें याबद्दल उलट घटना परिषदेचेंच अभिनंदन केलें पाहिजे.

मसुदासमितीनें केलेल्या कामाबद्दल श्री. नझिरुद्दिन अहंमद यांचा असा निःसंदिग्ध अभिप्राय आहे कीं हें काम अगदीं सामान्य दर्जाचें आहे, इतकेंच नव्हें तर तें विचारांत घेण्याजोगेंही नाहीं. प्रत्येकाला आपलें मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि त्याच दृष्टीनें श्री. नझिरुद्दिन यांच्या उद्गारांचें आम्ही स्वागत करतों.

[1]मसुदा-समितीला आपल्या ज्या उपसूचना सदोष वाटल्या त्या मागें घेण्यांत किंवा त्यांच्या जागीं दुसऱ्या घालण्यांत तिनें जर धैर्य व प्रामाणिकपणा दाखविला नसता तर मसुदा-समिति आपल्या कर्तव्याला जागली नाहीं व खोट्या अहंकारानें तिला पछाडलें आहे, असें तिला दूषण देतां आलें असतें. जेथें चुका आढळल्या तेथें तेथें त्या कबूल करण्यांत व दुरुस्त करण्यांत मसुदा-समितीनें कमीपणा मानला नाहीं.

मसुदा-समितीनें केलेल्या कामाची, फक्त एक अपवाद वगळून, घटना-परिषदेच्या सर्व सभासदांनीं एकमुखानें प्रशंसा केली आहे, हें पाहून मला अत्यंत आनंद वाटतो. मसुदा समितीनें घेतलेल्या परिश्रमांचें इतक्या औदार्यानें व मनःपूर्वक गुणग्रहण होत आहे, याबद्दल मसुदा-समितीला धन्यता वाटेल अशी माझी खात्री आहे. घटनापरिषदेच्या सभासदांनीं व मसुदा-समितींतील माझ्या सहकाऱ्यांनीं माझ्यावर जो स्तुतीचा वर्षाव केला आहे त्यामुळें मी इतका दडपून गेलों आहे कीं त्यांच्यासंबंधीं योग्य शब्दांत व पूर्णपणें कृतज्ञता व्यक्त करतां येणें मला अशक्य वाटतें.

फक्त अनुसूचित जातींच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याची आकांक्षा धरून मी घटनापरिषदेंत आलों, त्यावेळीं जास्त जबाबदारीचीं कार्यें माझ्यावर

सोंपविलीं जातील अशी मला यत्किंचितही कल्पना नव्हती. म्हणून घटना-परिषदेनें मसुदा-समितीवर जेव्हां मला निवडलें तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें आणि मसुदा-समितीच्या सभासदांनीं समितीचा अध्यक्ष म्हणून माझी जेव्हां योजना केली तेव्हां माझ्या आश्चर्यास पारावार राहिला नाहीं.

आमच्या मसुदा-समितींत श्री. अल्लादि कृष्णस्वामी अय्यर यांच्यासारखे माझ्यापेक्षां अधिक मोठे, अधिक तोलाचे व अधिक लायक लोक होते; असें असतांना घटना-परिषदेनें व मसुदा-समितीनें माझ्यावर जो विश्वास टाकला व माझ्याकडून हें काम करवून घेऊन देशाची सेवा करण्याची मला जी संधि दिली त्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

मला हें जें श्रेय देण्यांत येत आहे तें खरोखर माझें नव्हे. त्याचा बराच अंश घटनापरिषदेचे घटना-सल्लागार श्री. बी. एन्. राव यांच्याकडे जातो. मसुदा-समितीसाठीं त्यांनीं घटनेचा कच्चा खर्डा तयार केला. श्री. राव यांच्या-प्रमाणेंच मसुदा-समितीचे सभासदही या श्रेयास पात्र आहेत. त्यांनीं सतत १४१ दिवस बसून ही घटना तयार करण्यास हातभार लावला आणि त्यांनीं जर आपल्या बुद्धिकौशल्यानें नवे सिद्धान्त शोधून काढले नसते व अन्य दृष्टि-कोणाबद्दल सहिष्णुता दाखविली नसती तर हें कार्य अशा प्रकारें यशस्वी झालें नसतें.

याशिवाय श्री. एस्. एन्. मुकर्जी हेही बऱ्याच प्रमाणांत या श्रेयाचे वांटेकरी आहेत. मसुदा तयार करणारे ते मुख्य घटनाकार होत. अत्यंत बिकट व क्लिष्ट विषय अतिशय सुलभपणें पण कायदेशीर भाषेंत मांडण्याचें त्यांचें बुद्धिसामर्थ्य अद्वितीय आहे. मुकर्जी ही घटनापरिषदेला लाभलेली मोठी देणगी आहे. त्यांचें साहाय्य जर मिळालें नसतें तर ही घटना तयार करावयाला घटना-परिषदेला अनेक वर्षें लागलीं असतीं. त्याचप्रमाणें मुकर्जी यांच्या हाता-खालील नोकरांचाही मला या ठिकाणीं उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं दिवस-रात्र खपून जें काम केलें त्याबद्दल मला त्यांचे आभार मानणें जरूर वाटतें.

ही घटनापरिषद जर अनेक स्वतंत्र, स्वयंभू व विसंवादी घटकांची बनली असती, तर घटना तयार करण्याचें काम अत्यंत दुष्कर झालें असतें. इतकेंच नव्हे तर सर्वत्र गोंधळ व अराजक माजलें असतें. पण घटनापरिषदेंत काँग्रेस पक्ष आल्यामुळें हें अराजक टळलें. कारण काँग्रेस पक्षामुळें सभागृहाच्या काम-

काज़ांत एक प्रकारें शिस्त व सुव्यवस्था आली. कॉंग्रेसपक्षांत ही शिस्त होती म्हणून व कोणत्या उपसूचनेचें काय भवितव्य होईल हें नक्की कळल्यामुळें मसुदा-समितीला आपला मसुदा घटनापरिषदेंत यशस्वीपणें पुढें ढकलतां आला. घटनापरिषदेंत मसुद्याचें तारूं सुरक्षितपणें जें पैलतीरीं पोंचलें त्याचें श्रेय कॉंग्रेस-पक्षाला मिळणें वाजवी आहे.

घटना परिषदेचे सर्वच सभासद जर पक्षाच्या कडक शिस्तीनें बांधले गेले असते तर परिषदेचें कामकाज अत्यंत रूक्ष व कंटाळवाणें झालें असतें. पण सुदैवानें कांहीं सभासदांनीं पक्षाची शिस्त मोडून बंडखोरी केली, त्यामुळें चर्चेला थोडाबहुत रंग आला. श्री. कामत, डॉ. पी. एस्. देशमुख, श्री. सिध्वा, प्रो. सक्सेना आणि पं. ठाकूरदास भार्गव या बंडखोरांप्रमाणें प्रो. के. टी. शहा व पं. हृदयनाथ कुंझरू यांच्यामुळें सभागृहांत सदैव चैतन्य खेळत राहिलें.

त्यांनीं उपस्थित केलेले मुद्दे बहुतेक वैचारिक स्वरूपाचे होते. मला त्यांच्या सूचना स्वीकारतां आल्या नाहींत म्हणून त्या सूचनांची किंमत कमी होते असें नव्हे; तसेंच सभागृहांत उत्साही वातावरण निर्माण करण्याची जी सेवा त्यांनीं केली ती कमी लेखली गेली असेंहि समजण्याचें कारण नाहीं. मला त्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. कारण त्यांनीं जर आपलें अस्तित्व प्रगट केलें नसतें तर घटनेसंबंधींचीं कांहीं पायाभूत मूलतत्त्वें सभा-गृहापुढें मांडण्याची मला संधि मिळाली नसती. घटना यांत्रिक रीतीनें पास करून घेण्यापेक्षां हें तत्त्वविवेचन माझ्या दृष्टीनें अधिक महत्वाचें होतें.

शेवटीं मला अध्यक्षमहाराजांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनीं सभा-सदांशीं जी अत्यंत सौजन्याची व समजूतदारपणाची वागणूक ठेवली ती कोणीहि विसरणें शक्य नाहीं. कित्येक वेळां या सभागृहांत असे प्रसंग आले कीं, मसुदा-समितीच्या उपसूचना केवळ तांत्रिक भूमिकेवरून फेंटाळल्या जातात कीं काय असें वाटूं लागलें. माझ्या दृष्टीनें ते फार चिंतेचे क्षण होते. पण अध्यक्षांनीं घटना बनविण्याच्या कार्यांत कायद्याचा अडसर येऊं दिला नाहीं याबद्दल मी त्यांचा फार कृतज्ञ आहे.

मी या ठिकाणीं घटनेच्या गुणवर्णनांत शिरत नाहीं. घटना कितीहि चांगली व निर्दोष असली तरी ती जर अमलांत आणणारे नालायक व

निरुपयोगी असले तर तीच घटना वाईट ठरेल. त्याचप्रमाणें घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल. राज्यघटनेच्या स्वरूपावर तिची अंमलबजावणी अवलंबून नसते. कायदेमंडळ, मंत्रिमंडळ व न्यायाधीश अशांसारखीं राज्याचीं प्रमुख अंगें पुरविण्याचें काम राज्यघटना करीत असते. या राज्याच्या अंगांची अंमलबजावणी ज्या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे जनता व देशांतील राजकीय पक्षोपपक्ष हे होत.

भारतांतील लोक व त्यांचे पक्ष कसे वागतील हें कोण सांगूं शकेल ! आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं ते सनदशीर मार्गांनीं जातील कीं क्रांतिकारक पद्धतीचा अवलंब करतील ? त्यांनीं जर क्रांतिमार्गाचा अवलंब केला तर, घटना कितीहि चांगली असली तरी, ती यशस्वी होणें शक्य नाहीं, हें सांगावयास कोणी भविष्यवेत्ता नको. म्हणून भारतीय जनता व देशांतील पक्ष कोणत्या मार्गाची कास करतात हें कळल्याशिवाय घटनेसंबंधीं मत देणें निरर्थक ठरेल.

या घटनेचा निषेध करण्याचें काम मुख्यत्वेंकरून कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट करतात. ते या घटनेवर कां टीका करतात ? ही घटना खरोखरच वाईट आहे म्हणून कीं काय ? छे छे; त्यापैकीं कोणतेंहि कारण नाहीं. कम्युनिस्ट पक्षाला अशी घटना पाहिजे कीं जी 'कामगारांची सर्वाधिकारशाही' या तत्त्वावर आधारलेली असेल. ही घटना सनदशीर लोकशाहीच्या तत्त्वावर अधिष्ठित आहे म्हणून कम्युनिस्टांचा तिला विरोध आहे.

सोशॅलिस्टांना दोन गोष्टी हव्या आहेत; पहिली गोष्ट म्हणजे ते जर अधिकारपदावर आले तर नुकसानभरपाई न देतां सर्व खाजगी मालमत्तेचें राष्ट्रीयीकरण करण्याचें स्वातंत्र्य त्यांना घटनेनें दिलें पाहिजे. सोशॅलिस्टांना हवी असलेली दुसरी गोष्ट म्हणजे घटनेंत निर्दिष्ट केलेले नागरिकत्वाचे मूलभूत हक्क संपूर्णपणें अनिर्बंध व अमर्याद असले पाहिजेत. म्हणजे जर यदाकदाचित् या पक्षाला अधिकारपदावर येतां आलें नाहीं तर त्यांना नुसतें टीका करण्याचेंच नव्हें, तर राज्य उलथून पाडण्याचें अनिर्बंध स्वातंत्र्य मिळेल.

मुख्यतः याच दोन मुद्द्यांवर घटनेवर टीका केली जाते. सनदशीर लोकशाहीचें तत्त्व हेंच राजकीय लोकशाहीचें आदर्श स्वरूप होय असें मी

म्हणत नाहीं. नुकसानभरपाईखेरीज खाजगी मालमत्ता जप्त न करण्याचें तत्त्व हें इतकें पवित्र आहे कीं त्याचें उल्लंघन करतां येणार नाहीं, असें मी मानीत नाहीं. मूलभूत हक्क हे कधींच अनिर्बंध असूं शकणार नाहींत व त्यांच्यावरील बंधनें केव्हांही उठवितां येणार नाहींत, असें भी म्हणत नाहीं. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, या घटनेंत जीं तत्त्वें अंतर्भूत आहेत तीं सध्यांच्या पिढीच्या विचारांचीं निदर्शक आहेत. माझें हें म्हणणें जर तुम्हांला अतिव्याप्त वाटत असेल तर घटनापरिषदेच्या सभासदांचीं हीं मतें आहेत असें मी म्हणेन. मग हीं मतें घटनेंत अंतर्भूत केल्याबद्दल मसुदा-समितीला कां दोष देतां ? मी म्हणतों घटनापरिषदेच्या सभासदांना तरी कां दोष देतां ?

अमेरिकेची घटना तयार करण्यांत ज्यानें महत्त्वाचा भाग घेतला अशा जेफर्सन नामक अमेरिकन मुत्सद्द्यानें घटनेसंबंधीं फार मोंहत्त्वाचे असे विचार व्यक्त केले आहेत. घटनाकारांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. तो एके ठिकाणीं म्हणतो—

" प्रत्येक पिढी हें एक स्वतंत्र राष्ट्रच आहे असें आपण समजावें. प्रत्येक पिढीला बहुमतानें स्वतःला बांधून घेण्याचा तेवढा हक्क आहे. दुसऱ्या देशांतील रहिवाश्यांवर बंधनें लादण्यांचा तिला जसा हक्क नाहीं, तसा आपल्यामागून येणाऱ्या पिढीवरही तिला बंधनें घालून ठेवण्याचा हक्क नाहीं."

दुसऱ्या ठिकाणीं जेफर्सन म्हणतो—" राष्ट्राच्या उपयोगासाठीं स्थापन केलेल्या संस्थांना, त्यांचें उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं सुद्धां हात लावूं नये अगर त्यांची सुधारणा करूं नये; कारण तो अधिकार जनतेचे विश्वस्त या नात्यानें संस्थांच्या चालकांना आपोआपच प्राप्त झालेला असतो. ही कल्पना राजेशाहीच्या बेबंदपणाला आळा घालण्याच्या दृष्टीनें कितीही चांगली असली तरी ती राष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत घातुक आहे. असें असूनही आमचे कायदेपंडित आणि धर्मगुरु तें तत्त्व प्रतिपादीत असतात. त्यांना वाटतें कीं आमच्यापेक्षां पूर्वीच्या पिढ्यांना पृथ्वीवर जास्त स्वामित्व होतें. आणि आमच्यावर कायद्यांचीं बंधनें लादावयाचा जणूं कांहीं त्यांना हक्कच होता; हीं बंधनें आम्हांला बदलण्याचा अधिकार नाहीं, पण आमच्या

पूर्वजांप्रमाणें आम्हांला आमच्या वंशजावर कायद्याचीं तशींच बंधनें लादण्याचा हक्क आहे. तीं बंधनें आमच्या पुढील पिढ्यांना बदलतां येणार नाहींत. सारांश, या पृथ्वीवर राज्य करण्याचा हक्क फक्त मृतांना आहे, जिवंत माणसांना नाहीं !"

जेफर्सननें काढलेले हे उद्गार केवळ खरे आहेत असें नाहीं, तर त्यांत शाश्वत सत्य भरलेलें आहे, हें मी कबूल करतों आणि त्यांत मुळींच शंका नाहीं. घटना-परिषद जर या तत्त्वापासून च्युत झाली असती तर ती दोषास्पद ठरली असती, इतकेंच नव्हें तर निषेधार्ह ठरली असती. पण मी विचारतों ती खरोखरच तशी ठरली काय ? छे छे, मुळींच नाहीं. घटनेच्या दुरुस्तीसंबंधीं काय तजवीज आहे ती लक्षपूर्वक पाहिली असतां असें दिसून येईल कीं, घटनापरिषदेनें या घटनेवर परिपूर्णत्वाचा, अमोघपणाचा किंवा बिनचुकपणाचा शिक्का मारण्याचा मुळींच विचार केला नाहीं. कारण तसें केलें असतें तर कॅनडाप्रमाणें घटना दुरुस्त करण्याचा जनतेचा हक्क हिरावून घेतला गेला असता; अथवा घटना-दुरुस्तीच्या बाबतींत अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया यांनीं जशा लोकविलक्षण अटी घातल्या आहेत तशा घातल्या असत्या तर तेंही अयोग्य झालें असतें. पण तसें न करतां घटनेंत दुरुस्त्या करणें शक्य व्हावें अशा तऱ्हेच्या सोप्या कामकाजपद्धतीचा अवलंब करण्यांत आला आहे.

या घटनेच्या टीकाकारांना मी असें जाहीर आव्हान देतों कीं, या देशाप्रमाणें परिस्थिति असलेल्या जगांतल्या कोणत्या देशाच्या घटनापरिषदेनें आमच्या घटनेप्रमाणें घटना-दुरुस्तीची सोय करून ठेवली आहे हें त्यांनीं सिद्ध करून द्यावें. ही घटना ज्यांना अमान्य आहे त्यांना जर प्रौढ मतदानपद्धतीनें निवडलेल्या लोकसभागृहांत दोन-तृतीयांश बहुमत मिळवितां आलें नाहीं तर घटनेसंबंधींचा त्यांचा असंतोष हा सर्वसामान्य जनतेचा आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

घटनात्मक दृष्टीनें जो एक महत्त्वाचा मुद्दा आहे त्याकडे मी आतां वळतों. आपल्या घटनेंत फारच केंद्रीकरण झालें असून घटकराज्यांची स्थिति केवळ म्युनिसिपालिट्यांसारखी करून टाकण्यांत आलेली आहे या समजुतीनें गंभीर स्वरूपाची तक्रार करण्यांत येत आहे. परंतु ही समजूत अतिरंजित

आहे एवढेंच नव्हे तर घटनेचें उद्दिष्ट काय या संबंधींच्या गैरसमजुतीवर आधारलेली आहे हें उघड आहे.

केंद्र सरकार व घटक राज्यें यांचेमधील संबंधाचा विचार करतांना हे संबंध कोणत्या मूलभूत तत्त्वावर ठरतात हें आधीं लक्षांत घेतलें पाहिजे. कायदे करण्याचे व अंमलबजावणीचे अधिकार केंद्र सरकार व घटक राज्यें यांमध्यें विभागलेले असतात. हें संयुक्त राज्यपद्धतीचें मूलतत्त्व आहे. ही विभागणी देखील केंद्र सरकारनें केलेल्या कायद्यानें नव्हे तर मूळ घटनेंतील कलमानेंच केलेली असते. हीच गोष्ट या घटनेनेंही साध्य केली आहे. घटक राज्यें त्यांच्या कायदे करण्याच्या वा अंमलबजावणीच्या अधिकाराचे बाबतींत केंद्र सरकारवर मुळींच अवलंबून नाहींत. या बाबतींत केंद्र सरकार व घटक राज्यें समान पातळीवरच आहेत.

अशा प्रकारची घटना केंद्राधिष्ठित आहे असें कां म्हटलें जातें हें कळणें कठीण आहे. कदाचित् असें असेल कीं कायदे करण्याच्या व त्यांच्या अंमलबजावणीच्या अधिकारांचें बरेंच मोठें क्षेत्र इतर कोणत्याही संयुक्त पद्धतीच्या घटनेंतल्यापेक्षां या घटनेंत केंद्र सरकारला देण्यांत आलें आहे. परंतु ही गोष्ट म्हणजे कांहीं संयुक्त राज्यपद्धतीचा गाभा नव्हे.

केंद्र सरकार व घटक-राज्यें यांमध्यें कायदे करण्याच्या व त्यांच्या अंमलबजावणीच्या अधिकारांची घटनेअन्वयें करण्यांत आलेली विभागणी हें संयुक्त राज्यपद्धतीचें मुख्य लक्षण आहे. आमच्या घटनेंत हेंच तत्त्व आहे. त्या बाबतींत कांहींही चूक केलेली नाहीं. आणि म्हणून घटक राज्यांना केंद्र सरकारच्या हाताखालीं बसविण्यांत आलें आहे असें म्हणणें बरोबर नाहीं. केंद्र सरकारही आपल्या मनास वाटेल त्याप्रमाणें या विभागणीच्या मर्यादा ओलांडूं शकणार नाहीं. तसेंच न्यायखातेंही मर्यादातिक्रमण करूं शकणार नाहीं; कारण पुढील सुप्रसिद्ध उक्तीनुसारः—

'न्यायालयें दुरुस्ती करूं शकतील, बदल करूं शकणार नाहींत. नवे मुद्दे, नवे दृष्टिकोन पुढें मांडण्यांत आले तर आधीं लावलेल्या अर्थामध्यें तीं सुधारणा करूं शकतील आणि क्वचित कांहीं आत्यंतिक प्रकरणीं फेरफार करूं शकतील. परंतु त्यांनाही अनुल्लंघनीय असे दंडक आहेत. स्पष्टपणें विभागणी केलेल्या अधिकारांची फेरवांटणी त्यांना करतां येणार नाहीं. दिलेल्या अधि-

कारांस तीं व्यापक अर्थ देऊं शकतील, परंतु स्पष्टपणें एकाला दिलेले अधिकार दुसऱ्याला देऊं शकणार नाहींत. '

यावरून संयुक्त राज्यपद्धतीविरुद्ध या घटनेंत सत्तेचें केंद्रीकरण झालें आहे हा आरोप आपोआपच गळून पडतो.

केंद्र सरकारला घटक राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याचा अधिकार दिलेला आहे असा दुसरा आरोप करण्यांत येतो. हा आरोप मात्र मान्य केला पाहिजे. परंतु घटनेमध्यें अशा प्रकारें जादा अधिकारांची तरतूद केल्याबद्दल दोष देण्याआधीं कांहीं गोष्टी ध्यानांत घेणें जरूर आहे.

पहिली गोष्ट ही कीं हे जादा अधिकार हें कांहीं घटनेचें सर्वसामान्य अंग नव्हे. दुसरा प्रश्न असा कीं, अगदीं आणीबाणीची वेळ उद्भवली तरी केंद्र सरकारला जादा अधिकार देण्याचें टाळणें आपणांस शक्य आहे का? आणीबाणीच्या काळांतदेखील केंद्र सरकारला असे अतिक्रमणाचे अधिकार देण्याची गोष्ट ज्यांना मान्य होत नाहीं त्यांना या गोष्टीच्या मुळाशीं असलेल्या प्रश्नाची स्पष्ट कल्पना आलेली दिसत नाहीं असें म्हटलें पाहिजे.

' राउण्ड टेबल ' या सुप्रसिद्ध नियतकालिकाच्या डिसेंबर, १९३५ च्या अंकांत एका लेखकानें हा प्रश्न इतक्या सुस्पष्टपणें मांडला आहे कीं त्यांतील एक उतारा वाचून दाखविण्यास मला प्रत्यवाय वाटत नाहीं. लेखक असें म्हणतो:—

" राज्यपद्धति म्हणजे नागरिकांची निष्ठा कोणत्या सत्तेशीं असावी यावर सरतेशेवटीं येऊन भिडणारा हक्क व कर्तव्यें यांचा मिश्र समूह आहे. सर्वसामान्य काळीं हा प्रश्न उपस्थित होत नाहीं. कारण कायद्याचें पालन सहजपणें होत असतें आणि अशा वेळीं सामान्य मनुष्य कांहीं बाबतींत एका तर कांहीं बाबतींत दुसऱ्या सत्तेचें आज्ञापालन करीत आपला व्यवसाय करीत असतो. परंतु आणीबाणीच्या प्रसंगीं जेव्हां वाद उपस्थित होतात तेव्हां एक गोष्ट स्पष्ट असली पाहिजे कीं अंतिम निष्ठा विभागतां येत नाहीं. अशा वेळीं निष्ठेचा प्रश्न कायद्यांतील कांटेकोर अर्थानें निकालांत काढून भागत नाहीं. कायद्यानें वस्तुस्थितीला जोड दिली पाहिजे; नाहींतर त्याच्याइतकी वाईट गोष्ट दुसरी नाहीं. सर्व प्रकारचे औपचारिक प्रकार जेव्हां निष्फळ होतात तेव्हां नागरिकांची शेषनिष्ठा कोणाला असावी हाच प्रश्न

राहतो. ही निष्ठा संयुक्त राज्याशीं राहणार कीं तो ज्या घटक राज्यांत असेल त्याच्याशीं ? ”

या मुद्द्याचा गाभा असलेल्या या प्रश्नाला ज्याचें त्याचें जें उत्तर असेल त्यावरच हा वाद सुटणार आहे. आणीबाणीच्या काळांत नागरिकाची शेष-निष्ठा केंद्र सरकारशींच असली पाहिजे; त्या त्या घटकराज्याशीं नव्हे. हें बहुसंख्य जनतेचें मत असेल, ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण अशा वेळीं केवळ केंद्र सरकारच देशाच्या एकंदर हिताच्या व उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीनें कार्य करूं शकेल. आणीबाणीच्या काळांत केंद्र सरकारला अतिक्रमणाचे अधिकार कां देण्यांत आले आहेत याचें उत्तर यांत आहे. आणि या अधि-कारांनीं देखील घटक राज्यांवर असें कोणतें बंधन पडतें ? तर तें एवढेंच कीं आणीबाणीच्या वेळीं घटक राज्यांनीं आपापल्या स्थानिक हितसंबंधांचे बरोबरच अखिल राष्ट्राच्या हितसंबंधांचाही विचार करावा. ज्यांना मुख्य प्रश्न समजला नाहीं तेच त्याविरुद्ध तक्रार करूं शकतात.

माझें भाषण मला येथेंच संपवितां आलें असतें; परंतु आपल्या देशाच्या भवितव्याविषयीं माझें मन इतकें व्याप्त झालें आहे कीं, आपले विचार व्यक्त करण्याची ही संधि साधलीच पाहिजे असें मला वाटतें. २६ जानेवारी रोजीं भारत हा एक स्वतंत्र देश होईल. त्याच्या स्वातंत्र्याचें पुढें काय होईल, तें तसेंच अबाधित राहील कीं पुन्हां तें त्याच्या हातून नष्ट होईल ? माझ्या मनांत पहिल्याप्रथम हा विचार येत असतो. हिंदुस्थान हा कधींकाळीं स्वतंत्र देश नव्हता असें नव्हें, पण मुख्य मुद्दा असा कीं जो देश एके काळीं स्वतंत्र होता तो आपलें स्वातंत्र्य गमावून बसला. पुन्हां दुसऱ्यांदा तो आपलें स्वातंत्र्य नष्ट होऊं देईल काय ? याच विचारानें हिंदी राष्ट्राच्या भवितव्याविषयीं मला चिंता वाटत आहे.

हिंदी राष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें याबद्दल मला दुःख वाटतेंच, पण त्याहीपेक्षां आपल्याच लोकांच्या विश्वासघातामुळें आपण स्वातंत्र्याला मुकलों याचें मला अत्यंत दुःख वाटतें. महंमद बिन कासिमनें जेव्हां सिंध प्रांतावर स्वारी केली तेव्हां दाहिर राजाच्या सेनापतीनें महंमद बिन कासीमकडून लांच घेतली व दाहिर राजाच्या बाजूनें लढण्याचें नाकारलें. महंमद घोरीला हिंदुस्थानावर स्वारी करण्यास व पृथ्वीराजाविरुद्ध लढण्यास जयचंदानें खास आमंत्रण देऊन

बोलावलें व त्यासाठीं त्यानें आपलें स्वतःचें व सोळंकी राजांचें सहाय्य देऊं केलें. हिंदूंच्या स्वातंत्र्यासाठीं जेव्हां शिवाजी लढाया करीत होता तेव्हां इतर मराठे सरदार व रजपूत राजे मोंगल सम्राटांच्या वतीनें लढत होते. जेव्हां ब्रिटिश लोक शीख राजे नष्ट करण्याचा प्रयत्न करीत होते तेव्हां त्यांचा प्रमुख सेनापति गुलाबचंद स्वस्थ बसून राहिला आणि शीखांचें राज्य टिकविण्यासाठीं त्यानें यत्किंचितही हालचाल केली नाहीं. १८५७ सालीं जेव्हां हिंदुस्थानाच्या बऱ्याच मोठ्या भागानें ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें होतें, तेव्हां शीख कांहीं न करतां तटस्थपणें स्वस्थ बसून राहिले.

इतिहासाची पुनरावृत्ति होईल काय ? याच विचारानें माझें मन चिंताग्रस्त झालें आहे. या चिंतेंत आणखी एका चिंतेनें भर पडली आहे. आपल्याभोंवतीं जाति आणि पंथ या रूपानें जे आपले जुने शत्रू वावरत होते त्यांत आतां परस्परविरोधी व विसंवादी राजकीय ध्येयें असलेल्या अनेक राजकीय पक्षांची भर पडणार आहे. हिंदी जनता आपल्या पंथांपेक्षां देशाला अधिक महत्त्व देईल काय ? कीं देशापेक्षां आपला पंथच श्रेष्ठ समजतील ? मला कांहीं सांगतां येणार नाहीं. पण ही गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, देशांतल्या पक्षापक्षांनीं देशहितापेक्षां आपल्या पंथाला प्राधान्य दिलें तर देश पुन्हां एकदां संकटांत सांपडल्यावांचून रहाणार नाहीं आणि मग आपलें सर्वस्व कायमचेंच नष्ट होईल. या आपत्तीपासून आपण दृढनिश्चयपूर्वक आपल्या देशाचें रक्षण केलें पाहिजे. रक्ताचा शेवटचा बिंदु असेपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्याचें प्राणपणानें संरक्षण केलें पाहिजे.

२६ जानेवारीपासून भारत हें लोकशाही प्रजासत्ताक होईल, म्हणजे त्या दिवसापासून जनतेसाठीं जनतेनें केलेल्या, जनतेचें राज्य सुरू होईल. माझ्या मनांत नेमका हाच विचार येत आहे. मग भारताच्या लोकसत्ताक राज्यघटनेचें काय होईल ? ती घटना त्याला टिकवितां येईल कीं त्याच्या हातून पुन्हां एकदां नष्ट होईल ? हा दुसरा विचार पहिल्या विचाराप्रमाणेंच मला अस्वस्थ करीत आहे.

हिंदुस्थानाला पूर्वी लोकशाही म्हणजे काय हें माहीत नव्हतें असें नाहीं. एक काळ असा होता कीं हिंदुस्थानांत अनेक प्रजासत्ताक राज्यें होतीं आणि कांहीं ठिकाणीं जरी राजे असले तरी त्यांची निवडणूक होत असे

अगर त्यांची सत्ता मर्यादित होती. हिंदुस्थानाला प्रातिनिधिक राज्यपद्धती अगर प्रतिनिधि सभा माहीत नव्हती, असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. बौद्ध भिक्षु संघाचा इतिहास पाहिला तर त्यावेळीं भिक्षु संघाच्या प्रतिनिधि-सभा होत्या व आजची प्रातिनिधिक कार्यपद्धति त्यांना ठाऊक होती असें दिसून येईल.

आपल्याला जर खरोखर लोकशाहीचें स्वरूप आणि तिचा गाभा हवा असेल तर आपण काय केलें पाहिजे ? तर पहिल्याप्रथम आपण आपलीं सामाजिक व आर्थिक उद्दिष्टें साधण्यासाठीं सनदशीर मार्गांनाच घट्ट चिकटून बसलें पाहिजे. याचा अर्थ आपण क्रांतीचे हिंसात्मक मार्ग कटाक्षानें टाळले पाहिजेत. याचा अर्थ आपण कायदेभंग, असहकारिता व सत्याग्रह या मार्गांचा त्याग केला पाहिजे. जेव्हां आर्थिक व सामाजिक ध्येयें साध्य करण्यासाठीं घटनात्मक मार्गहि बंद झाले होते त्यावेळीं बेसनदशीर मार्गांचा अवलंब करणें थोडेंतरी समर्थनीय होतें. पण ज्या ठिकाणीं सनदशीर मार्ग सर्वतोपरी खुले आहेत त्या ठिकाणच्या बेसनदशीर मार्गांचें कोणत्याही प्रकारें समर्थन करतां येणार नाहीं. हे मार्ग म्हणजे ' अराजकतेचें व्याकरण 'च होत व जितक्या लवकर आपण त्यांचा त्याग करूं तितकें चांगलें.

आपण करावयाची दुसरी गोष्ट म्हणजे लोकशाहीचें रक्षण करूं इच्छिणाऱ्यांना जॉन स्टुअर्टनें जो इषारा दिला आहे तो आपण अमलांत आणला पाहिजे. तो इषारा असा आहे : " कोणत्याही मोठ्या माणसाच्या चरणीं आपलें स्वातंत्र्य अर्पण न करणें व आपली संघटना उलथून टाकतां येईल अशा प्रकारची सत्ता त्याच्या हातीं न सोपविणें." ज्या थोर पुरुषांनीं देशाची आमरण सेवा केली त्या थोर पुरुषांबद्दल कृतज्ञ असणें हें मुळींच चुकीचें नाहीं. पण कृतज्ञतेलाही मर्यादा आहेत.

आयरिश देशभक्त डॅनिअल ओकोनेलनें म्हटल्याप्रमाणें आपल्या मानाच्या मोबदल्यांत, आपल्या शीलाच्या मोबदल्यांत व राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याच्या मोबदल्यांत कृतज्ञ असूं शकणार नाहीं. इतर देशांपेक्षां हिंदुस्थानाच्या बाबतींत हा इषारा अधिक आवश्यक आहे. कारण या देशाच्या राजकारणांत भक्ति किंवा विभूतिपूजा जितकी आढळते तितकी जगांतल्या

कुठल्याही देशाच्या राजकारणांत आढळणार नाहीं. धर्मांतील भक्तिमार्ग हा आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असेल, पण राजकारणांतील भक्ति किंवा विभूतिपूजा हा अधोगतीचा व अंतीं हुकुमशाहीचा निश्चित मार्ग आहे यांत संशय नाहीं.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहतां कामा नये. आपण आपली राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहींत रूपांतरित केली पाहिजे. राजकीय लोकशाहीचा पाया जर सामाजिक लोकशाहीनें भरला नसेल तर ती टिकूं शकणार नाहीं. पण सामाजिक लोकशाही म्हणजे तरी काय ? या लोकशाहीचा असा अर्थ आहे कीं, स्वातंत्र्य, समता व बंधुता हीं तत्त्वें ज्या जीवनांत अंतर्भूत झालीं आहेत तें जीवन.

स्वातंत्र्य, समता व बंधुता हीं तीन तत्त्वें वेगवेगळीं नाहींत. त्या तिघांचा मिळून एक संच आहे. त्या तिघांचीं एक त्रिगुणात्मक मूर्ति आहे; तीं एकमेकांपासून अलग करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतु नष्ट होऊन जाईल. स्वातंत्र्य समतेपासून वेगळें करतां येणार नाहीं, व समतेची स्वातंत्र्यापासून फारकत होऊं शकणार नाहीं किंवा स्वातंत्र्य व समता यांची बंधुतेपासून ताटातूट करतां येणार नाहीं. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्यांकांवर अल्पसंख्यांचें प्रभुत्व होय. स्वातंत्र्याशिवाय जर नुसतीच समता असेल तर ती वैयक्तिक कर्तृत्वशक्ति नाहींशी करूं शकेल. आणि बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य व समता यांचा नैसर्गिक विकास होऊं शकणार नाहीं.

हिंदी समाजांत दोन गोष्टींचा संपूर्ण अभाव आहे हें आपण प्रारंभींच कबूल केलें पाहिजे. यांपैकीं समता ही एक आहे. सामाजिक दृष्ट्या आपला समाज क्रमशील विषमतेच्या तत्त्वावर उभारलेला आहे; म्हणजे कांहींना उच्चस्थान मिळालें आहे व इतरांना हीन अवस्था प्राप्त झाली आहे. आर्थिक क्षेत्रांतही अशीच विषमता आहे. ज्यांच्याजवळ शिगोशिग संपत्ति आहे असे कांहीं लोक आहेत तर हजारों लोक भयंकर दारिद्र्यांत खितपत पडले आहेत.

२६ जानेवारी रोजीं आपण ज्या जीवनाला प्रारंभ करणार आहों तें विरोधानें भरलेलें आहे. राजकारणांत आपल्याला समता मिळाली आहे, पण सामाजिक आणि आर्थिक जीवनांत विषमताच दिसेल. राजकारणांत दर डोईं

एक मत आणि एका मताचें एक मूल्य हें तत्त्व आपण मान्य करीत आहों. पण सामाजिक आणि आर्थिक जीवनांत, आपल्या विशिष्ट सामाजिक आणि आर्थिक समाजरचनेमुळें, व्यक्तिमूल्याचें हें तत्त्व पूर्वीप्रमाणेंच नाकारलें जाणार आहे.

हें विरोधात्मक जीवन आपण आणखी किती दिवस असेंच घालवणार आहों ? आर्थिक व सामाजिक जीवनांत आपण आणखी किती काळ समतेला थोपवून धरणार आहों ? आपण जर अधिक काळपर्यंत या समतेला विरोध करीत राहिलों तर त्यायोगें आपली राजकीय लोकशाही संकटांत आल्यावांचून राहणार नाहीं. आपण ही विषमता शक्य तितक्या लवकर नाहींशी केली पाहिजे, नाहींतर विषमतेनें गांजलेले लोक या घटना-परिषदेनें मोठ्या परिश्रमानें उभें केलेलें हें राजकीय लोकशाहीचें मंदिर उध्वस्त केल्या-वांचून राहणार नाहींत.

दुसरी एक गोष्ट आपल्याजवळ नाहीं. ती म्हणजे बंधुता किंवा भ्रातृभाव. बंधुता म्हणजे हिंदी राष्ट्रांतले सर्व हिंदी लोक हे आपले बांधव आहेत, आपण हिंदी लोक भाऊ भाऊ आहोंत, ही भावना. या तत्त्वामुळेंच सामाजिक जीवनाला एकजिनसीपणा व बळकटी येते. ही गोष्ट घडवून आणणें फार कठीण आहे. ती किती कठीण आहे, हें जेम्स ब्राइसनें ' अमेरिकन कॉमन-वेल्थ ' या आपल्या ग्रंथांत सांगितलेल्या गोष्टीवरून कळून येईल. आपण एक राष्ट्र आहों हें मान्य करावयास अमेरिकन लोक जेथें तयार नव्हते तसें आपण हिंदी लोक एका राष्ट्राचे घटक आहों असें समजणें किती दुर्घट आहे, हें सांगण्याची जरूरी नाहीं. आपण एक राष्ट्र आहों असें मानणें ही माझ्या मतें एक प्रकारची फसवणूक आहे. शेंकडों हजारों जातींनीं विभागलेले लोक एक राष्ट्र कसें होऊं शकतील ? सामाजिकदृष्ट्या व मानस-शास्त्रीय दृष्ट्या आपण एक राष्ट्र नाहीं हें जितक्या लवकर आपणांस उमजेल तितकें बरें. कारण मगच एक राष्ट्र होण्याची जरूरी आपल्याला पटेल आणि हें ध्येय साध्य करण्यासाठीं उपाययोजना करण्याचा आपण मनःपूर्वक विचार करूं. हें ध्येय साध्य करणें अत्यंत दुर्घट होणार आहे. अमेरिकेंत तें जितकें दुर्घट होतें त्याहूनही तें येथें अधिक कठीण आहे.

अमेरिकेंत जातिभेदाचा प्रश्न नव्हता. हिंदुस्थानांत हजारों जाती आहेत. या जाती राष्ट्रविरोधी आहेत, इतकेंच नव्हे तर त्यायोगें सामाजिक जीवनांत विघटना निर्माण होते. तसेच त्यामुळें जातींजातींत कलह व असूया उत्पन्न होते. आपणांला एक राष्ट्र व्हावयाचें असेल तर आपण या अडचणीवर विजय मिळविला पाहिजे. जेव्हां एक राष्ट्र असेल तेव्हांच बंधुत्वाच्या भावनेला खराखुरा अर्थ येईल.

आपणांपुढें जे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांसंबंधीचे माझे हे विचार कदाचित् आपणांस रुचणारही नाहींत; तथापि हें पुन्हां म्हणण्याची जरूरी नाहीं कीं, या देशांतील राजकीय सत्ता ही अनेक वर्षें कांहीं थोड्या लोकांचीच मिरास होती. या मिरासदारीमुळें जे लोक नुसते ओझ्याचे पशु समजले जात होते त्यांची कधींच सुधारणा होऊं शकली नाहीं. आपणांवर दुसऱ्यांनीं राज्य करावें हें या पददलितांना यापुढें मुळींच मान्य होणार नाहीं. आपण स्वतः केव्हां सत्ता हातीं घेऊं असें त्यांना आतां तीव्रतेनें वाटूं लागलें आहे.

सभागृहाचा आतां जास्त वेळ मी घेऊं इच्छित नाहीं. स्वातंत्र्य ही आनंदाची गोष्ट आहे यांत मुळींच संशय नाहीं. पण आपण हें विसरतां कामा नये कीं, या स्वातंत्र्यानें आपणांवर अनेक मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. आतां यापुढें कांहीं चुका झाल्या तर त्याचे धनी आपणच आहों व त्याचा दोष आपणच घेतला पाहिजे.

ज्या घटनेंत आपण 'जनतेसाठीं, जनतेचें व जनतेनें चालविलेल्या' राज्याचें तत्त्व अंतर्भूत केलें आहे ती घटना जर दीर्घकाळपर्यंत टिकावी अशी आपणांस इच्छा असेल तर आपणांपुढें जीं संकटें वाढून ठेवलेलीं आहेत तीं समजून घेण्यास आपण विलंब लावतां कामा नये. तसेंच त्यांचें निराकरण करण्यास असमर्थ राहतां कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच मार्ग आहे."

• • •



घटना-समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद

डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें भाषण

घटना-परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं घटनेच्या तिसऱ्या वाचनानंतर समारोपाचें भाषण करतांना घटनेचा व घटनाकार्याचा पुढीलप्रमाणें विस्तृत परामर्श घेतला:—

"घटना-निर्मितीचें महाप्रचंड कार्य तडीस नेल्याबद्दल या समितीचें मी अभिनंदन करितों. सुमारें तीन वर्षांपूर्वी सुरू झालेलें हें कार्य खरोखरच प्रचंड आहे. रशियाविरहित युरोपखंडाची लोकसंख्या ३१ कोटि ७० लक्ष आहे. पण या समितीला ३१ कोटी ९० लक्ष जनतेच्या भवितव्याचा विचार करावयाचा होता. युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं एकत्र येऊन संघराज्याचा कधीं विचार केला नाहीं, पण आपल्याला तो करावयाचा होता.

राष्ट्राचा अफाट विस्तार आणि प्रचंड लोकसंख्या याशिवाय दुसऱ्याही कांहीं अडचणी ओलांडून आपण भारत देशासाठीं एक घटना घडवूं शकलों. या देशांत जाती किती आणि भाषा तरी किती? देशाचे कांहीं विभाग शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेले तर कांहीं आर्थिक दृष्ट्या भरभराटलेले. याच्या उलट वन्य जातींचे मागासलेले प्रदेशही अनेक; यामुळें या राष्ट्राचें राजकारण फारच संमिश्र स्वरूपाचें झालें आहे. जातिभेदाचा प्रश्न तर कैक वर्षे कठिण होऊन बसला आहे. त्याच खडकावर दुसरी गोलमेज परिषद फुटली. याच जातीयतेमुळें राष्ट्राचीं दोन शकलेंही झालीं.

तसाच दुसरा बिकट प्रश्न म्हणजे संस्थानांचा. सुमारें सहाशें संस्थानांत भारताचा $\frac{1}{3}$ भूप्रदेश व $\frac{1}{4}$ लोकवस्ती सामावलेली होती. यांतील लहानमोठ्या सर्व संस्थानांना सार्वभौमत्व बहाल करून ब्रिटिश राज्यकर्ते येथून निघून गेले. त्यामुळें कोणत्याही संस्थानिकाला आपलें स्वातंत्र्य पुकारण्यास, किंबहुना परराष्ट्रांशीं संधान बांधण्यास मोकळीक मिळाली; माल भौगोलिक, आर्थिक अशा विविध कारणांनीं संस्थानिकांना या सार्वभौमत्वाचा उपभोग घेणें दुरापास्त होतें. अशा संस्थानांशीं वाटाघाटी करून त्यांचे प्रतिनिधी घटना-समितींत आणविणें हें प्रारंभींचें कार्य होतें. त्यांत आरंभींच बरेंच यश आलें. १९४७ च्या ऑगस्टमध्यें स्वातंत्र्याच्या स्थापनेच्या सुमारास काश्मीर

व हैदराबाद यांविरहित याकांचीं बहुतेक सारीं संस्थानें भारताशीं जोडलीं गेलीं. आतां बहुतेक संस्थानांचा दर्जा प्रांतांबरोबरीचा आहे. आणि म्हणून या घटनेंत प्रांत व संस्थानें या दोन्हींचाही निर्देश 'राज्य' या एकाच संज्ञेनें करण्यांत आलेला आहे. याचें श्रेय जसें संस्थानिक व संस्थानी प्रजा यांना आहे, तसेंच सरदार पटेल यांच्या समंजस व दूरदर्शी नेतृत्वाखालीं काम करणाऱ्या 'संस्थानी खात्या'लाही आहे.

जातिभेद व संस्थानें हे दोन दुस्तर खंदक ओलांडून आपण यशा-समीप आलों. आपल्या राजकीय जीवनांत जातिभेदाचें विष कालविणाऱ्या विभक्त मतदारसंघाला या घटनेनें मूठमाती दिली आहे. मात्र कांहीं जमातीं-साठीं राखीव जागा ठेवाव्या लागल्या आहेत. या राखीव जागा लोक-संख्येच्या आधारानें दिलेल्या आहेत. १९१९ च्या व १९३५ च्या कायद्यांप्रमाणें त्या जमातींचा ऐतिहासिक मोठेपणा ध्यानांत घेऊन दिलेल्या नाहींत. कांहीं जमातींनीं आपल्याला मिळालेल्या राखीव जागाही सोडून दिल्या. त्यामुळें आतां अस्पृश्य आणि वन्य या मागासलेल्या दोन जातीं-साठींच राखीव जागा घटनेंत ठेवलेल्या आहेत. घटना तयार होण्याला विलंब लागला त्याचा हा एक फायदाच झाला म्हणावयाचा.

ता. २२ नोव्हेंबर १९४९ पर्यंत ही घटना तयार होण्यासाठीं ६३,९६,७२९ रुपये खर्च झाला. हा खर्च फार आहे असें म्हणतां येणार नाहीं. या घटनेला ७६३५ उपसूचना आल्या होत्या व त्यांपैकीं २४७३ मांडल्या गेल्या; यावरून समितीचे सभासद किती जागरूक व चिकित्सक होते हें दिसून येतें. घटनेचें प्रत्येक कलम किंबहुना प्रत्येक कलमांतील एकेक वाक्य व वाक्यांतील एकेक शब्दसुद्धां तोलून जोखून घेतला आहे. साहजिकच घटनेचा आकार वाढला आहे. तिचीं कलमें ३९५ असून परिशिष्टें आठ आहेत. घटनेचा विस्तार वाढल्याबद्दल तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

या घटनेचा प्रकार कोणता असा प्रश्न प्रथमच उभा राहतो; पण ह्या प्रश्नाला माझ्या दृष्टीनें फारसें महत्त्व नाहीं. नांव कोणतेंही असलें तरी घटना कार्यक्षम आहे कीं नाहीं हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. आपल्या राष्ट्राच्या इतिहासांतील महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत घेऊन घटना घडवावयाची असते. १९३० सालच्या गोलमेज परिषदेपर्यंत हिंद सरकार एकसंध (Unitary)

होतें. त्यावेळीं प्रांतांना जी कांहीं सत्ता असे ती हिंद सरकारकडून मिळालेली असे. त्या गोलमेज परिषदेमध्यें भारतीय संघराज्याचा भव्य मूर्त स्वरूपांत प्रथम उभा राहिला. प्रांत आणि संस्थानें या सर्वांचा समावेश करणारें संघराज्य निर्मित्यांची योजना त्या परिषदेपुढें आली. १९३५ च्या कायद्यामध्यें संस्थानें व प्रांत यांच्या संघराज्याची योजना केलेली आहे. पण संस्थानिकांशीं व संस्थानिकांच्या अटी ठरविण्यास फार वेळ गेला आणि नंतर महायुद्ध पेटलें. त्यामुळें त्या राज्यघटनेंतील संघराज्याचा विभाग अमलांत येऊं शकला नाहीं.

प्रस्तुत राज्यघटनेंत सर्व संस्थानांचा समावेश करण्यांत आला आहे. एवढेंच नव्हें तर त्यांतील बहुतेक संस्थानें भारताला जोडलीं गेलीं आहेत. सत्ता देण्याच्या बाबतींत या घटनेनें प्रांत, संस्थानें असा भेद फारसा कोठेंच केलेला नाहीं. आणि जो थोडाफार भेद करणें अवश्य होतें तोही कालांतरानें पार नाहींसा होईल आणि समान भूमिकेवर प्रांत व संस्थानें नांदूं लागतील.

या घटनेचें मोठें आकर्षण म्हणजे प्रजाराज्याची प्राणप्रतिष्ठा. दोन हजार वर्षांपूर्वीं या भारतवर्षांत प्रजाराज्यें होतीं पण तीं छोटीं छोटीं होतीं. आतां आपल्यापुढें जें प्रजाराज्य अवतीर्ण होत आहे तसें पूर्वीं केव्हांच नव्हतें. या प्रजाराज्याचा अध्यक्ष लोकनियुक्त असेल. भारताच्या एवढ्या विशाल विभागावर लोकनियुक्त प्रमुखानें कधींच शासन केलें नाहीं. जगांतील महाप्रबल राष्ट्रांपैकीं एक असें या भारतीय प्रजाराज्याचें स्वरूप आहे. त्यांतही विशेष हें कीं भारतांतील गरिबांतील गरिब आणि हलक्यांतील हलक्या नागरिकालासुद्धां अध्यक्ष होण्याची संधि प्रथमच लाभत आहे.

अध्यक्षाप्रमाणेंच लोकसभाही लोकनियुक्तच राहणार आहे. या लोकसत्तेला सर्वांत श्रेष्ठ असे अधिकार देण्यांत आलेले आहेत. अमेरिकेमध्यें अध्यक्ष व लोकसभा हीं दोन्हीही लोकनियुक्त असतात आणि दोघांनाही आपापल्या क्षेत्रांत समान अधिकार असतात. अंमलबजावणीच्या क्षेत्रांत अध्यक्षाला आणि कायदेविषयक लोकसभेला तेथें निर्णायक अधिकार असतात. इंग्लंडमध्यें अनुवंशिक राजपद आहे. सर्व सत्तेचें व मानाचें तें उगमस्थान असलें तरी राजा प्रत्यक्ष सत्ता कांहींच वापरीत नाहीं. सर्व सत्ता लोकसभेमध्यें योजिली आहे. मंत्रि या लोकसभेला जबाबदार असतात. आम्हीं

आमच्या लोकनियुक्त अध्यक्षाला जवळजवळ ब्रिटिश राजासारखें बनविलें आहे. यानें कोणाचें समाधान होईल वा न होईल. कांहीं लोकांच्या मतें या अध्यक्षाला वाजवीपेक्षां जास्त सत्ता देण्यांत आली आहे तर कांहींच्या मतें याहून अधिक सत्ता द्यावयास हवी होती. लोकसभेची निवडणूक करण्याचा अधिकार देशांतील अखिल प्रौढ जनतेला आहे. या लोकसभेंतील सभासद आणि निरनिराळ्या राज्यांतील विधिमंडळाचे सभासद हे सर्व मिळून अध्यक्षाची निवडणूक करणार आहेत. अशाप्रकारें प्रौढ मतदारांनीं विधिमंडळांत व पार्लमेंटांत दुहेरी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत अध्यक्षाची निवडणूक होणार.

मंत्री विधिमंडळाला जबाबदार रहातील आणि अध्यक्षाला सल्ला देतील. त्या सल्ल्याप्रमाणें अध्यक्षानें चाललेंच पाहिजे. अर्थात अशी अध्यक्षावर सक्ति या घटनेनें प्रत्यक्षपणें कोठें केलेली नाहीं; पण इंग्लंडमध्यें राजा जसा मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेंच चालतो तोच संकेत येथील अध्यक्षही पाळील. आणि त्यामुळें तो सर्व बाबतींत सनदशीर ठरेल.

मध्यसरकारांत लोकसभा व वरिष्ठ कौन्सिल अशीं दोन विधिमंडळें असतील. त्या दोहोंचें मिळून भारताचें पार्लमेंट बनेल. प्रत्येक राज्यांत एक विधिमंडळ असेल. कांहीं राज्यांत मात्र विधिमंडळाच्या जोडीला कौन्सिलही ठेवलेलें आहे. ज्या राज्यांना हीं कौन्सिलें नको असतील त्यांना विधिमंडळाच्या $\frac{2}{3}$ मतांनीं तीं रद्द करतां येतील. तसेंच ज्या राज्यांत अशीं कौन्सिलें नाहींत तेथील विधिमंडळांनीं $\frac{2}{3}$ मतांनीं मागणी केली तर त्यांना अशीं कौन्सिलें स्थापन करतां येतील.

या घटनेंत आम्हीं मोठी उडी मारली ती म्हणजे प्रौढाधिकाराची. सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मताचा अधिकार देण्यांत आला आहे. सध्याचे मतदानाचे अधिकार मर्यादित आहेत आणि ते मुख्यतः श्रीमंतीच्या पात्रतेवर आधारलेले आहेत. सध्यां भारताची लोकसंख्या सुमारें ३२ कोटि आहे. यांतील अदमासें शेंकडा ५० टक्के प्रजा प्रौढ असेल. म्हणजे १६ कोटि नागरिकांना यापुढें मताचा अधिकार मिळणार. इतक्या मतदारांनीं निवडणूक केल्याचें उदाहरण पृथ्वीच्या पाठीवर दुसरीकडे कोठेंही नाहीं. राज्यांतील विधिमंडळासाठीं ३८०० हून अधिक प्रतिनिधी निवडले जातील, त्यासाठीं

जवळजवळ तितकेच मतदारसंघ निर्माण केले जातील. त्याचप्रमाणें लोकसभेचे ५०० व वरिष्ठ कौन्सिलचे अंदाजी २२० प्रतिनिधी निवडले जातील. याचा अर्थ असा कीं, १६ कोटि प्रौढ मतदाराचे ४००० मतदारसंघ निर्माण होतील आणि त्यांतून ४५०० प्रतिनिधी निवडले जातील.

या निवडणुकीची आंकडेमोड परवां मी सहज गमतीनें करीत बसलों होतों. फूल-स्कॅप आकाराच्या एका कागदावर ४० नांवें छापतां येतील. या हिशेबानें सर्व मतदारांचीं नांवें छापण्यासाठीं २० लाख फूल-स्कॅप कागद लागतील ! ते सर्व कागद एका ठिकाणीं बांधले तर त्यांची जाडी २०० यार्ड होईल ! यावरून मतदारांच्या याद्या तयार करणें, त्यांचे मतदारसंघ पाडणें, मतदानाचीं केंद्रें उभारणें इ. कामें किती प्रचंड आहेत हें कोणालाही कळून येण्यासारखें आहे. हीं सारीं कामें १९५० च्या हिवाळ्याचे आंत उरकलीं पाहिजेत; कारण त्या सुमारास नव्या निवडणुकी होणार आहेत.

हा प्रौढाधिकार शहाणपणाचा आहे कीं नाहीं याविषयीं कांहीं लोकांना शंका आहे. पण मला त्याबद्दल कांहीं खेद वाटत नाहीं. हा एक प्रयोग आहे. आणि त्याचे परिणाम आज कोणीच सांगूं शकणार नाहीं असें मी मानतों. मी एक खेडवळ मनुष्य आहे. माझ्या आयुष्यांतील बराचसा काळ कामानिमित्त शहरांत गेला असला तरी माझ्या मनाचीं मुळें खेड्यांतच पसरलीं आहेत. त्यामुळें मला खेड्यांतील लोक चांगले माहित आहेत. आणि तेच उद्यांच्या मतदारांमध्यें मोठ्या प्रमाणांत असणार. या खेडुतांना चांगलें व्यवहारज्ञान व बुद्धिमत्ता असतें असें माझें मत आहे. त्यांची एक बलिष्ठ संस्कृतीही आहे. शहरी पंडितांना ती जरी मान्य नसली तरी त्यांच्यांत पुष्कळ गुण आहेत. या खेडुतांना लिहिण्यावाचण्याची कला येत नसली तरी त्यांना साऱ्या गोष्टी नीट समजावून दिल्या तर आपल्या हिताचें काय व राष्ट्राच्या हिताचें काय याचा अचूक निर्णय ते घेऊं शकतात, याची मला बालंघाल खात्री आहे. शहरांतील कामगारांपेक्षांही खेड्यांतील शेतकरी कांहीं कांहीं वेळां अधिक शहाणा दिसतो याचें कारण कारखान्यांतील मजूर तो चालवीत असलेल्या यंत्राचाच एक भाग बनतो आणि त्यामुळें स्वत्व विसरतो. म्हणून माझी अशी खात्री आहे कीं, जर खेडुतांना साऱ्या गोष्टी समजावून सांगितल्या तर निवडणुकीचें तंत्र ते आपलेसें करतील; येवढेंच

नव्हे तर आपलीं मतें शहाणपणानें देतील. त्यांच्यामुळें आपल्या भवितव्याला कांहीं धोका आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. मात्र कांहीं लोक निरानिराळ्या घोषणा करून आणि अव्यवहार्य कार्यक्रमाचीं सुंदर चित्रें रेखाटून त्यांचीं मनें बिघडविण्याचा संभव आहे. तरी सुद्धां आपल्या खंबीर व्यवहारचातुर्यानें ते खेडुत योग्य काय तेवढें ते बरोबर ओळखतील. यामुळें आपण अशी साधार आशा बाळगूं शकतों कीं आपल्या विधिमंडळांतील प्रतिनिधींना जनतेचा खरा पाठिंबा असेल आणि देशाची वस्तुस्थिति माहीत असेल.

मध्यवर्ती सरकारांत आणि कांहीं राज्यांत कौन्सिलांची तरतूद केलेली असली तरी लोकसभेचाच अधिकार श्रेष्ठ राहणार.

आर्थिक बाबतींत तर लोकसभेचा सर्वाधिकार स्पष्ट शब्दांत मांडलेला आहेच; पण ज्या बाबतींत बिलें आणून कायदे करण्याचे समान हक्क कौन्सिलला दिले आहेत तेथेंही लोकसभेचा वरिष्ठ अधिकार निश्चित केलेला आहे. पार्लमेंटच्या या दोन्ही विधिमंडळांत विरोध उत्पन्न झाला तर संयुक्त अधिवेशन बोलावलें जाईल. पण लोकसभेंतिल प्रतिनिधींच्या शेंकडा ५० पेक्षां अधिक प्रतिनिधी कौन्सिलांत नसावेत असें कलम ' घटनें 'त आहे. त्यामुळें दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनांतही लोकसभेचेंच मत प्रवाही ठरेल. अर्थात एखाद्या बिलाला लोकसभेंतील पाठिंबा अल्पशा बहुमतानें मिळालेला असेल तर मात्र लोकसभेचा निर्णय संयुक्त अधिवेशनांत प्रवाही ठरणार नाहीं.

राज्याच्या विधिमंडळांत लोकसभेनें दोनदां केलेला निर्णय हा कायम बनतो. कौन्सिल हें फारतर एकादें बिल मंजूर होणें लांबणीवर टाकूं शकतें पण त्याला प्रतिबंध करूं शकत नाहीं. राष्ट्रपतीची किंवा राज्यपाल यांची संमति कायद्याला लागेल; पण ती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणें दिली जाईल आणि तें मंत्रिमंडळ अखेरीस लोकसभेसच जबाबदार राहील. याचा अर्थ असा कीं, राज्यकारभारांतील सर्व गोष्टींचा निकाल विधिमंडळांतील प्रतिनिधींच्या द्वारे प्रगट होणाऱ्या लोकमताप्रमाणेंच केला जाईल. कौन्सिल किंवा राज्यपाल अथवा राष्ट्रपति हे फक्त फेरविचार करण्यास सांगतील, आणि कांहीं काळ बिल थोपवून धरूं शकतील. पण लोकसभेनें निर्धारच केलेला असेल तर या घटनेप्रमाणें तो निर्धार तडीस जाण्यास कांहींही आडकाठी नाहीं.

राज्यांत व मध्यवर्ति सरकारांत जनतेची इच्छा हीच प्रभावी ठरेल. ती इच्छा विधिमंडळांतील प्रतिनिधींच्या मार्फत नेहमींचें प्रगट होत राहील आणि निवडणुकीच्या वेळीं जनतेला स्वतःची इच्छा स्वतःच प्रगट करतां येईल.

न्यायखातें स्वतंत्र राहावें अशी तरतूद आम्हीं 'घटनें'त केली आहे. सुप्रीम कोर्ट व हायकोर्टें यांना सरकारी दडपणापासून याहून अधिक मुक्त ठेवणें कठिण आहे. खालच्या न्यायमंदिरांनाही बाहेरच्या दडपणापासून मुक्तता मिळावी अशीही योजना घटनेंत आहे. न्यायखातें व अंमलबजावणी-खातें यांची फारकत करण्याचा अधिकार राज्यांच्या सरकारांना दिलेला आहे. फौजदारी गुन्ह्यांचा निकाल करणाऱ्या मॅजिस्ट्रेटचा दर्जा दिवाणी कोर्टांतील न्यायाधीशाइतका ठेवतां येणें शक्य आहे. ही सुधारणा यापूर्वीच व्हावयास हवी होती. ती यापुढें राज्यसरकारांकडून ताबडतोब अमलांत येईल अशी मला आशा आहे.

राज्य व मध्यवर्ति अशा सरकारांत नोकरांची भरती करण्यासाठीं पब्लिक सर्व्हिस कमिशनची सोय केली आहे. हीं कमिशनें पूर्णपणें स्वतंत्र असतील. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांचा दाब पडणार नाहीं. वशिलेबाजी व पक्षपात यांना अजिबात स्थान मिळूं नये असा आम्हीं शक्यतों प्रयत्न केला आहे.

सर्व हिशेब व्यवस्थित ठेवण्याचें आणि योग्य अधिकाराशिवाय कोणताही खर्च होऊं न देण्याचें काम कॉम्ट्रोलर आणि ऑडिटर जनरल यांच्याकडे सोंपविलें आहे. त्यांनाही पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें आहे. आपल्या सरकारांना शेंकडों कोटि रुपयांची उलाढाल करावी लागेल; तेव्हां हें खातें किती महत्त्वाचें आहे हें कोणालाही दिसून येईल.

विधिमंडळाच्या निवडणुकी घडवून आणणें आणि त्यांवर देखरेख ठेवणें हीं कामें करण्यासाठीं इलेक्शन कमिशनरची जागा निर्माण करण्यांत आली आहे. निवडणुकींतील मुख्य संकट म्हणजे उमेदवारांनीं, पक्षांनीं किंवा सरकारनें लांचलुचपत देणें हें होय. आपल्याला पुष्कळ वर्षें लोकशाहींतील निवडणुकींचा अनुभव नाहीं. अलीकडे कांहीं वर्षेंच तो मिळत आलेला आहे. आतां आपल्या हातांत भरीव सत्ता आलेली आहे. लांचलुचपतीचें संकट

केवळ काल्पनिक नाहीं. म्हणून मतदारांनीं सरळ व प्रामाणिक पद्धतीनें निवडणूक करावी अशी व्यवस्था या घटनेनें केली आहे.

अवशिष्ट विभाग आणि अवशिष्ट जाती यांच्या कारभारासाठीं घटनेंत स्वतंत्र सोय केली आहे. मध्यवर्ति व राज्य या सरकारांच्या अधिकारांची व कर्तव्यांची वांटणी करण्यासाठीं घटनेनें पुष्कळ तपशील आंखून दिलेला आहे. मध्यवर्ति सरकारला अधिकार फार आहेत आणि व्यापक आहेत असें कांहींजण म्हणतात. त्यांच्या मतें जे अधिकार खरोखर राज्यांना असावयास पाहिजे होते ते त्यांच्यापासून हिरावून घेतले आहेत. या टीकेवर मी माझा निर्णय देत नाहीं. पण असें म्हणूं इच्छितों कीं, आपल्या राष्ट्राचा अनेक शतकांचा इतिहास ध्यानीं घेतला तर भविष्यकाळांत आपण जितके जपून बागूं तितकें थोडेंच आहे.

राज्याच्या अधिकारक्षेत्रांतील जी सत्ता मध्यवर्ति सरकारला दिलेली आहे ती फक्त आणीबाणीच्या वेळींच वापरावयाची आहे. राजकीय किंवा आर्थिक परिस्थिति जेव्हां बिकट होईल तेव्हांच मध्यवर्ती सरकार हस्तक्षेप करील. सर्व राष्ट्राच्या सुव्यवस्थेंत शासनासाठीं जरूर असेल त्यापेक्षां अधिक सत्ता बळकाविण्याची प्रवृत्ती मध्यवर्ती सरकारांत राहील असें मला वाटत नाहीं. मध्यवर्ति विधिमंडळांत राज्यांतील प्रतिनिधीच येणार. त्यांना हस्तक्षेप करण्याची जरूरी वाटल्याशिवाय ते मध्यवर्ती सरकारला हे आणीबाणीचे अधिकार वापरूं देणार नाहीं.

अवशिष्ट सत्ता मध्यवर्ति सरकारकडे सोपविली आहे या तक्रारीला मी कांहीं महत्त्व देत नाहीं. कारण अवशिष्ट सत्ता फार संकुचित क्षेत्रापुरतीच आहे.

राज्यकारभाराची भाषा कोणती असावी याचा विचार करण्यासाठीं समितीनें बराच वेळ खर्च केला. आपल्या देशांत अनेक भाषा आहेत. त्यामुळें एक भाषा ठरविणें कठिण होतें; तथापि देशांतील जास्तींत जास्त लोकांना समजणारी " हिंदी " ही राज्यकारभाराची भाषा करण्यांत आली आहे. या या निर्णयाला मी फारच महत्त्व देतों. कारण स्वित्सर्लंडसारख्या चिमुकल्या देशांत तीन दरबारी भाषा चालूं आहेत. आणि आफ्रिकेंत दोन भाषांतून सरकारी व्यवहार चालतो. येथें ज्यांची मातृभाषा हिंदी नाहीं अशा प्रति-

निर्धींनींही हिंदी हींच राज्यकाभाराची भाषा ठरविण्यास स्वेच्छेनें संमति दिली. यावरून एकराष्ट्रीयत्वाची प्रवृत्ति वाढीस लागल्याचेंच दिसून येतें. मुसलमानांच्या राज्यांत पर्शियन आणि ब्रिटिशांच्या राज्यांत इंग्रजी या भाषा कोर्टकचेऱ्यांत चालूं होत्या; पण त्या भाषांचा स्वीकार जनतेनें आपखुषीनें केला असें नाहीं. आतां कोणी कोणावर भाषा लादण्याचा प्रश्नच नाहीं.

सर्व देशाच्या कारभारांत एकच एक भाषा असावी असें आपण प्रथमच ठरवीत आहोंत. तींच राष्ट्रभाषा व्हावी, आणि तिजबद्दल सर्वांना समान अभिमान वाटावा अशी माझी इच्छा आहे. राज्यभाषा व राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा विकास झाला तरी प्रत्येक विभागाला आपली संस्कृति आणि आपली परंपरा प्रतिबिंबित करणारी आपली विशिष्ट भाषा वाढीस लावण्याचें स्वातंत्र्य राहील, किंबहुना त्या कामीं उत्तेजनही मिळेल.

संक्रमण कालांत नड म्हणून इंग्रजी चालूं ठेवणें अटळ होतें. त्यामुळें कोणी हिरमुष्टी होण्याचें कारण नाहीं. आतां भारताची संमिश्र संस्कृति पूर्णपणानें आणि उदात्ततेनें व्यक्त करण्यास हिंदी भाषा समर्थ बनविणें हें सबंध राष्ट्राचें कर्तव्यच आहे. त्यांतल्या त्यांत हिंदी मातृभाषा असणारांचें तर पवित्रतर कर्तव्य आहे.

राज्यघटनेंत विशेष प्रयासाशिवाय दुरुस्ती करणें या घटनेनें शक्य करून ठेवलें आहे. खुद्द राज्यघटनेंत दुरुस्ती करणें सुद्धां इतर कांहीं देशांतल्याप्रमाणें येथें कांहीं अवघड नाहीं. घटनेंतील पुष्कळ कलमें पार्लमेंटच्या साध्या कायद्यानें बदलतां येतील. प्रत्यक्ष घटनेंतील दुरुस्तीसाठीं मात्र विशिष्ट पद्धत घालून दिलेली आहे. ही घटना अमलांत आल्यापासून पहिल्या पांच वर्षांत अशा दुरुस्त्या करणें याहूनही सोपें ठेवावें अशी तरतूद एकदां केलेली होती; पण तिची कांहीं आवश्यकता नाहीं असेंच ठरलें. एकंदरीनें पाहतां आपल्या राष्ट्राच्या उपयोगी चांगल्या तऱ्हेनें पडेल अशी ही 'घटना' तयार करण्यांत आली आहे.

आम्हीं केवळ आमच्या जनतेच्या कल्याणाचीच काळजी केलेली नाहीं, तर एका मार्गदर्शक सूत्रांत आम्हीं असें नमूद केलेलें आहे कीं, इतर राष्ट्रांशीं न्यायाचें व सन्मानाचें नातें आमचें सरकार जोडील. आंतरराष्ट्रीय कायद्यांचा आणि करारांचा आदर वाढवील आणि आंतरराष्ट्रीय कलह

लवादानें सोडाविण्यास प्रोत्साहन देईल. या सूत्राप्रमाणें जर आपण चाललों आणि आपल्या राष्ट्रपित्याच्या शिकवणीशीं आपण इमान राखलें तर दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसानंतरही शस्त्रबळानें शांतता स्थापूं पाहणाऱ्या व कलहांनीं भग्न झालेल्या जगाला आपण रास्त मार्ग दाखवूं शकूं. आपल्या वाटेंत मोठ्या अडचणी आहेत आणि आपल्या भोंवतालचें वातावरण आपल्याला गुदमरून टाकणारें आहे. तरीसुद्धां जगत्शांतीचा हा मार्ग दाखविण्याचें सामर्थ्य व शहाणपण परमेश्वरानें आम्हांस द्यावें अशी माझी प्रार्थना आहे. माझी आपणां स्वतःवर निष्ठा आहे, तशीच माझ्या डोक्यावर ज्यांची प्रतिमा ठेवलेली आहे त्या गुरूच्या शिकवणीवर माझी श्रद्धा आहे. आपल्या मातृभूमीच्याच नव्हे तर अखिल जगताच्या आकांक्षा आपण पूर्ण करूं आणि सर्वांचें कल्याण साधूं.

दोन उणीवांबद्दल मला खेदानें बोलणें भाग आहे. विधिमंडळाच्या सभासदांना पात्रतेची विशिष्ट अट असावी असें माझें मत आहे. जे कायद्याची अंमलबजावणी करतात किंवा त्या कामीं मदत करतात त्यांची पात्रता मोठी असावी असें आपण म्हणतों; पण तो कायदा जे घडाविणार त्यांची पात्रता मात्र निवडून येण्यापलीकडे मात्र कांहींहि नसावी ही विसंगती नव्हे काय ? कायदे घडाविणारा माणूस बुद्धिसंपन्न तर असलाच पाहिजे पण त्याशिवाय समतोल स्वतंत्र विचार करणारा आणि जीवननिष्ठा धारण करणारा, म्हणजे चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. अर्थात चारित्र्याचें मोजमाप करण्याचें कांहीं साधन नाहीं. त्यामुळें आपल्या घटनेंत ही उणीव राहणारच.

स्वतंत्र भारताची आपली पहिली घटना आपण हिंदी भाषेंत तयार करूं शकलों नाहीं ही दुसरी खेदाची गोष्ट होय. या दोन्ही बाबतींत व्यावहारिक अडचणी होत्या आणि त्या ओलांडून जाणें आम्हांस शक्य झालें नाहीं.

आम्हीं ही लोकशाहीची राज्यघटना तयार केली आहे. ती यशस्वी होण्यासाठीं लोकांमध्यें परमताविषयीं आदर व समेटाची तयारी हे गुण आले पाहिजेत. ज्या गोष्टी घटनेंत लिहितां येत नाहींत त्या परंपरेनें निश्चित होत जातात. ते गुण आणि तशी परंपरा आपल्या राष्ट्रामध्यें निर्माण होईल अशी मी आशा बाळगितों.

ही घटना तयार करतांना मतविभागणी करण्याचा प्रसंग आला नाहीं, यावरून ही माझी आशा सफळ होण्याचा संभव आहे. या घटनेंत जे दोष आहेत त्यांचें बीज आपल्या राष्ट्राच्या परिस्थितींतच आहे. जसें राष्ट्र असतें तशी त्याची राज्यघटना बनते. सचोटीचे, दानतीचे आणि लायकीचे प्रतिनिधी जर निवडून आले तर ते सदोष घटनासुद्धां यशस्वी करून दाखवितील. पण प्रतिनिधी तसे नसतील तर नुसती घटना राष्ट्राला तारूं शकणार नाहीं. घटना म्हणजे काय ? तर एक यंत्र, एक निर्जीव वस्तु; तिच्यांत जीव येतो तो ती चालविणाऱ्यांमुळें. आज भारताला कशाची गरज असेल तर राष्ट्रहिताचें कंकण बांधलेल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची आहे . देशांत फुटिर वृत्ति सर्वत्र दिसत आहे. जातिभेद आहेत; भाषाभेद आहेत; प्रांतभेद आहेत; या सर्वांच्यावर दृष्टि ठेवून राष्ट्राचा व्यापकपणें विचार करणारीं शीलसंपन्न माणसें आज हवीं आहेत. तीं भरपूर प्रमाणांत मिळतील अशी आपण आशा करूं या. आपल्या स्वातंत्र्य-युद्धाचा इतिहास हेंच सांगत आहे कीं नवे प्रसंग आले कीं, नवे कार्यकर्ते पुढें येतात.

ज्यांनीं भूतकाळांत राष्ट्राची सेवा केली त्यांनीं आतां आपलें काम संपलें, आतां फक्त आपल्या श्रमाचीं फळें चाखण्याचा काळ आलेला आहे असें म्हणून स्वस्थ बसूं नये. पूर्वीच्या स्वातंत्र्य-युद्धापेक्षांही अधिकच बिकट कार्य आपल्यापुढें उभें आहे. पूर्वी सत्तेसाठीं भांडणें नव्हतीं, आतां मोहाचीं व कलहाचीं स्थानें विपुल आहेत. तीं टाळून आपण आपल्या स्वतंत्र मायभूमीची सेवा करण्यास पात्र ठरूं या.

स्वातंत्र्य-संपादनाचे कामीं साधनांची शुद्धता ठेवण्यावर महात्मा गांधींनीं भर दिला होता. साधनशुद्धीचें महत्त्व पूर्वीइतकेंच आतांही आहे. आपल्या प्रजाराज्याचा कारभार आपण निष्ठेनें, सत्यानें, अहिंसेनें, आत्मविश्वासानें आणि ईश्वरावरील श्रद्धेनें चालवूं या. —जयहिंद ”

या पुस्तकांत वापरलेल्या
पारिभाषिक शब्दांची सूचि

Administration	:	अनुशासन
Adult Suffrage	:	प्रौढ मताधिकार
Advocate General	:	महाधिवक्ता
Amendment	:	दुरुस्ती
Article	:	कलम
Auditor-General	:	महालेखापरीक्षक
Capitation Tax	:	डोईपट्टी
Chairman	:	सभापति
Chief Justice	:	सरन्यायाधीश
Chief Minister	:	मुख्य मंत्रि
Clause	:	उपकलम
Committee	:	समिति
Commission	:	मंडळ
Consolidated Fund	:	संचितं निधि
Consul		व्यापारी वकील
Corporation Tax	:	मंडळ कर
Corresponding	:	अनुबद्ध
Council of States	:	राज्य परिषद
Court (High)	:	उच्च न्यायालय
Court (Supreme)	:	उच्चतम न्यायालय
Deputy Chairman	:	उपसभापति
Deputy President	:	उपराष्ट्रपति
Deputy Speaker	:	उपाध्यक्ष
Discretion	:	विवेचक बुद्धि

Emoluments	:	प्राप्ति
Foreign Exchange	:	परदेशी हुंडणावळ
Future Market	:	वायदे बाजार
Governor	:	राज्यपाल
House of the People	:	लोकसभा
Immunities	:	संरक्षणें
Jurisdiction	:	अधिकारक्षेत्र
Legislative Assembly	:	विधानसभा
Legislative Council	:	विधान-परिषद
Legislature	:	कायदे-मंडळ
List (Union)	:	संघसूचि
List (State)	:	राज्यसूचि
List (Concurrent)	:	समवर्ति सूचि
Paragraph	:	परिच्छेद
Preamble	:	सरनामा, आमुख
President	:	राष्ट्रपति
Preventive detention	:	गुन्हाप्रतिबंधक अटक
Prime Minister	:	प्रधानमंत्री
Proportional Representation	:	प्रमाणशीर प्रतिनिधित्व
Quorum	:	गणपूर्ति
Retrospective	:	गतकालसापेक्ष
Schedule	:	परिशिष्ट
Scheduled Castes	:	अनुसूचित जाति
Scheduled Tribes	:	अनुसूचित जनजाति
Section	:	विभाग
Speaker	:	अध्यक्ष
State	:	राज्य

Sub-paragraph	:	उपपरिच्छेद
Subject to	:	के अनुसरण
Territorial Waters	:	जल प्रांगण
Territory	:	राज्यक्षेत्र
Transfer	:	हस्तांतर
Treasure Trove	:	निखात निधि
Tribe	:	जनजाति
Tribal Areas	:	जनजाति-क्षेत्र
Trust	:	विश्वस्तनिधि
Union	:	संघ
Validity	:	मान्यता
Vice-President	:	उपराष्ट्रपति
Visas	:	प्रवासनामे
Vote (Casting)	:	निर्णायक मत

भारतीय राज्यघटना

90 ele 2

भारतीय राज्यघटना सरनामा

संग्रहालय कार्ये
७४७०

आम्ही, भारताची जनता, भारताचें एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक (गण) राज्य निर्माण करण्याचें ठरवून, आणि भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय **न्याय**; विचार, उच्चार, समजुती, श्रद्धा आणि पूजा, यांचें **स्वातंत्र्य**; दर्जा आणि संधि यांची **समानता**; हीं प्राप्त व्हावींत म्हणून, आणि राष्ट्राचें ऐक्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यासंबंधीं भरंवसा देऊन त्यांच्या-मध्यें **भ्रातृभाव** वाढावा याकरितां आमच्या या घटना-परिषदेमध्यें सन १९४९ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २६ तारखेस ही घटना मान्य करीत आहों, व तत्संबंधीं कायदा करून आपली म्हणून तिचा स्वीकार करीत आहोंत.

भाग १ ला : संघ आणि त्याचे प्रदेश

१. (१) भारत [India] हा राज्यांचा एक संघ होईल.

(२) या संघाचीं राज्यें आणि प्रदेश हे पहिल्या परिशिष्टांतील भाग अ, ब आणि क यांत निर्दिष्ट केलेलीं राज्यें आणि प्रदेश असतील.

(३) भारताचें क्षेत्र पुढीलप्रमाणें असेल:—

(अ) राज्यांचे प्रदेश; (ब) पहिल्या परिशिष्टांतील भाग 'ड'मध्यें निर्दिष्ट केलेले प्रदेश; आणि (क) जे प्रदेश संपादन केले जातील ते.

२. भारतीय पार्लमेंटनें कायदा करून आपल्याला योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर आपल्या संघांत नवीं राज्यें प्रविष्ट करावीं किंवा त्यांची स्थापना करावी.

३. पार्लमेंटनें कायद्यानें (अ) एकाद्या राज्यांतील प्रदेश विभक्त करून किंवा दोन अगर अधिक राज्यें किंवा राज्यांचे विभाग एकत्र करून, अगर राज्याच्या विभागाला एकादा प्रदेश जोडून नवीन राज्य बनवावें; (ब) कोणत्याहि राज्याचें क्षेत्र वाढवावें; (क) कोणत्याहि राज्याचें क्षेत्र कमी करावें; (ड) कोणत्याहि राज्याच्या सरहद्दी बदलाव्या व (इ) कोणत्याहि राज्याचें नांव बदलावें.

मात्र वरील उद्दिष्टासंबंधीं कोणतेंहि बिल राष्ट्रपतीच्या शिफारसीशिवाय पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहामध्यें आणतां येणार नाहीं; आणि जेथें बिलांतील सूचना पहिल्या परिशिष्टांतील भाग अ किंवा ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या एका किंवा अनेक राज्यांच्या सरहद्दीशीं संबंधित असेल, किंवा जेथें अशा एका किंवा अनेक राज्यांच्या नांवांबद्दल संबंध येत असेल तेथें त्या राज्याच्या कायदेमंडळाचे किंवा परिस्थितीप्रमाणें राज्याच्या प्रत्येक कायदे-मंडळाचें मत—तें बिल आणण्याची सूचना आणि त्या बिलांतील तरतूदी, या दोन्हींसंबंधीं—अध्यक्षांनीं आजमावल्याशिवाय, आणतां येणार नाहीं.

४. (१) कलम २ किंवा ३ या संबंधीं करावयाच्या कोणत्याहि कायद्यामध्यें त्यांतील कलमें अंमलांत आणण्याच्या आवश्यकतेनुसार, परिशिष्ट

पहिलें व चौथें यांत कारवयाच्या दुरुस्त्यांची तरतूद असावी. त्याचप्रमाणें त्यांत पार्लमेंटला आवश्यक वाटतील अशा पुरवणीदाखल, प्रासंगिक आणि अनुषंगिक तरतुदी असाव्यात. [अशा कायद्यानें राज्याच्या किंवा राज्यांच्या कायदेमंडळांतील आणि पार्लमेंटांतील प्रतिनिधित्वामध्यें जे बदल होतील त्यासंबंधीं तरतुदीचाहि अंतर्भाव व्हावा.]

(२) वर निर्दिष्ट केलेला असा कायदा हा ३६८ कलमाखालील घटनेच्या दुरुस्तीचा आहे असें समजलें जाणार नाहीं.

भाग २ रा : नागरिकत्व

५. ह्या घटनेच्या प्रारंभीं ज्याचें भारतांत वास्तव्य असेल आणि (अ) जो भारतांत जन्मास आला असेल, किंवा (ब) ज्याच्या आईबापांपैकीं एक जण भारतांत जन्मास आला असेल, किंवा (क) ही घटना सुरु होण्याचे पूर्वी निदान पांच वर्षें तरी जो सामान्यतः भारताचा रहिवासी असेल तो भारताचा नागरिक म्हणून समजला जाईल.

६. कलम ५ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी जर एकादी व्यक्ति आतां पाकिस्तानांत समाविष्ट झालेल्या प्रदेशांतून भारतांत आली असेल, तर ती या घटनेच्या सुरुवातीला भारताची नागरिक म्हणून समजली जाईल. मात्र (अ) ती व्यक्ति, किंवा त्याच्या आईबापांपैकीं एकजण किंवा त्याच्या आजाआजी यांपैकीं कोणीहि एक सन १९३५ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया'च्या कायद्यांत वर्णन केलेल्या हिंदुस्थानांत जन्मलेली असली पाहिजे; आणि (ब) (१) जेथें अशा व्यक्तीनें १९ जुलै १९४८ पूर्वीं स्थानांतर केलें असेल आणि जी तेव्हांपासून सामान्यतः भारतांत राहत असेल; किंवा (२) जी व्यक्ति १९ जुलै १९४८ रोजीं अगर त्यानंतर स्थानांतरित झाली असेल आणि ज्या व्यक्तीचें नांव हिंदी वसाहत सरकारनें त्या करतां नेमलेल्या अधिकाऱ्यांकडे त्या सरकारनें ठरविलेल्या विशिष्ट पद्धतीच्या व नमुन्याच्या बरहुकूम केलेल्या अर्जानुसार त्या अधिकाऱ्यानें नोंदविलें असेल तर ती भारताचा नागरिक समजली जाईल.

७. कलम ५ व ६ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी जी व्यक्ति ता. १ मार्च १९४७ नंतर हिंदुस्थानांतून आतांच्या पाकिस्तानांत गेली असेल ती भारताची नागरिक म्हणून समजली जाणार नाहीं :

मात्र या कलमांतील कोणतीहि बाब, जी व्यक्ति आतां पाकिस्तानांत समाविष्ट झालेल्या प्रदेशांत गेल्यानंतर पुनर्वसाहतीच्या किंवा कायमच्या वास्तव्यासाठीं कायद्यान्वयें किंवा कायद्याच्या अधिकारान्वयें दिलेल्या परवान्यानुसार पुन्हां भारतांत परत आली असेल त्या व्यक्तीला लागू केली जाणार नाहीं. आणि अशी प्रत्येक व्यक्ति कलम ६, पोट-कलम (ब) मधील उद्दिष्टांकरतां १९ जुलै १९४८ नंतर भारतांत आली असें मानण्यांत येईल.

८. कलम ५ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, जर १९३५ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' (मूळ) कायद्यान्वयें वर्णित केलेल्या हिंदुस्थानांत जर एकादी व्यक्ति किंवा त्या व्यक्तीच्या आई-बापांपैकीं एकजण किंवा तिच्या आजा-आजीपैकीं कोणीहि हिंदुस्थानांत जन्माला आली असेल आणि जी सामान्यतः भारताच्या बाहेर कोठल्याहि देशांत राहात असेल तर ती व्यक्ती—ही घटना सुरू होण्यापूर्वी अगर नंतर त्यावेळीं ती व्यक्ति ज्या देशांत राहत असेल तेथील परराष्ट्रीय वकिलातीच्या प्रतिनिधीकडे वसाहत सरकारनें किंवा भारतीय सरकारनें ठरविलेल्या पद्धतीनुसार व नमुन्याबरहुकुम तिनें त्याकरतां अर्ज केला असेल व त्या प्रतिनिधीनें त्यावरून तिचें नांव हिंदुस्थानचा नागरिक म्हणून नोंदविलें असेल तर—भारताचा नागरिक म्हणून समजली जाईल.

९. कलम ५, ६ किंवा ८ याच्या आधारानें कोणाहि व्यक्तीला जर तिनें आपखुषीनें कोठल्याहि परकीय राष्ट्राचें नागरिकत्व संपादन केलें असेल तर तिला भारताचें नागरिकत्व प्राप्त होणार नाहीं किंवा तसें मानलें जाणार नाहीं.

१०. या भागांत वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि तरतुदीनुसार जी प्रत्येक व्यक्ति भारताची नागरिक आहे किंवा मानली जात आहे ती पुढेंहि भारताची नागरिक म्हणून समजली जाईल; मात्र भारतीय पार्लमेंटकडून केले जाणारे कायदे तिच्यावर बंधनकारक राहतील.

११. नागरिकत्व प्राप्त करून देण्याचीं अगर काढून घेण्याची अगर नागरिकत्वासंबंधीं इतर सर्व गोष्टींबद्दल तरतूद करण्याची भारतीय पार्लमेंटची सत्ता या भागांत निर्दिष्ट केलेल्या कोठल्याहि बाबींमुळें कमी होणार नाहीं.

सर्वसामान्य

१२. या भागांत संदर्भाचा दुसरा कांहीं अर्थ अभिप्रेत नसल्यास 'राज्य' या शब्दांत भारताचें सरकार व पार्लमेंट आणि प्रत्येक राज्याचें सरकार व कायदेमंडळ आणि भारतांतील किंवा भारत सरकारच्या ताब्यांतील सर्व स्थानिक किंवा इतर अधिकृत संस्था यांचा समावेश होतो.

१३. (१) या घटनेचा अंमल सुरू होण्याचे पूर्वीं जे कायदे भारताच्या प्रदेशांत अंमलांत होते ते जर या भागांतील योजनांना विसंगत असतील, तर ते त्या विसंगतीपुरते निरर्थक ठरतील.

(२) राज्याला असा कोणताहि कायदा करतां येणार नाहीं, कीं जो या भागांत नमूद केलेले हक्क हिरावून घेईल किंवा मर्यादित करील; आणि या कलमाला विरोधी असणारा कायदा करण्यांत आला तर तो तेवढ्या विरोधापुरता निरर्थक ठरेल.

(३) या कलमांतील संदर्भाचें निराळें प्रतिपादन नसल्यास, (अ) 'कायदा' या शब्दांत वटहुकूम, कोणताहि हुकुम, नियम, पोटकायदा, जाहीरनामा, आणि रूढि व रिवाज—जे कायद्याइतके प्रभावी मानले जातात या सर्वांचा समावेश होतो; (ब) 'अमलांत असलेले कायदे' यांचा अर्थ जे कायदे भारताच्या प्रदेशांतील कायदेमंडळांनीं किंवा दुसऱ्या अधिकृत संस्थांनीं ह्या घटनेपूर्वीं पास केले असतील आणि जे पूर्वीं रद्द झाले नसतील त्यांचा अंतर्भाव होतो. असा एकादा कायदा किंवा त्याचा भाग हा जरी विशिष्ट विभागांत तेव्हां अमलांत आला नसेल किंवा कोठेंच अमलांत आला नसेल तरी त्याचा अंतर्भाव 'अमलांत असलेल्या कायद्यां'त होतो.

समानतेचे हक्क

१४. भारताच्या प्रदेशांत 'राज्य' कोणाहि व्यक्तीला कायद्याच्या बाबतींत समानता किंवा कायद्यांचें समान संरक्षण नाकारूं शकणार नाहीं.

१५. (१) धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणासाठीं केवळ किंवा त्यांतील एकाहिसाठीं 'राज्य' कोणाहि नागरिकाच्या बाबतींत भेदाभेद करणार नाहीं.

(२) धर्माच्या, वंशाच्या, जातीच्या, लिंगाच्या, जन्मस्थानाच्या कारणासाठीं केवळ अगर त्यांपैकीं एकाहिसाठीं कोणाहि नागरिकावर पुढील बाबतींत न्यूनता, जबाबदारी, नियंत्रण किंवा शर्त लादतां येणार नाहीं—

(अ) दुकानें, सार्वजनिक उपहारगृहें, भोजनालयें आणि सार्वजनिक करमणुकीचीं ठिकाणें यांत प्रवेश; किंवा (ब) विहिरी, तलाव, स्नानाकरितां बांधलेले घाट, रस्ते व सार्वजनिक विश्रांतीचीं ठिकाणें, ज्यांची व्यवस्था पूर्णतया अगर अंशतः सरकारी खर्चानें केली जाते किंवा जीं सार्वजनिक उपयोगाकरितां दिलीं आहेत त्यांचा उपयोग.

(३) स्त्रिया अगर मुलें यांच्याकरतां खास व्यवस्था करण्यास सरकारला या कलमान्वयें आडकाठी येणार नाहीं.

१६. (१) राज्याच्या ताब्यांतील कोणत्याहि जागेवर नेमले अगर घेतले जाण्यास सर्व नागरिकांना समान संधि मिळेल.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, वास्तव्य या कारणांसाठीं किंवा त्यांपैकीं एकाहि कारणासाठीं कोणीहि नागरिक राज्यांतील कोणत्याहि नोकरीला किंवा जागेला नालायक ठरणार नाहीं, किंवा त्याचे बाबतींत कांहीं भेदाभेद केला जाणार नाहीं.

(३) पहिल्या परिशिष्टांतील राज्यांत अगर त्या राज्यांतल्या स्थानिक किंवा अन्य अधिकृत सत्तेंत असलेल्या एखाद्या जागीं एकाद्या नोकरीच्या किंवा नेमणुकीच्या वर्गासंबंधीं अगर अनेक वर्गांसंबंधीं नेमणुकीपूर्वीं अगर नोकरीपूर्वीं त्या राज्यांतील अवश्यक वास्तव्याबद्दल पार्लमेंटला कायदे करावयाचे असतील तर त्याला या कलमानें बाध येत नाहीं.

(४) जर एकाद्या राज्याला असें वाटलें कीं, आपल्या राज्यांतील नोकऱ्यांत मागासलेल्या वर्गाचें पुरेसें प्रतिनिधित्व नाहीं, तर त्या राज्याला त्या वर्गाकरतां नोकऱ्या अगर जागा राखून ठेवण्यासंबंधीं तरतूद करण्यास यां कलमानें प्रतिबंध नाहीं.

(५) एकाद्या धर्माच्या अगर पंथाच्या संस्थेची व्यवस्था विशिष्ट धर्माच्या अगर पंथाच्या व्यक्तीकडून व्हावी असें जर एकाद्या कायद्यांत निर्दिष्ट केलें असेल तर ती जागा अगर संस्थेच्या नियामक मंडळांतील जागा त्यांना देण्यास हें कलम बाधक होणार नाहीं.

१७. अस्पृश्यता ही नष्ट करण्यांत आली आहे; आणि कोणत्याहि स्वरूपाची अस्पृश्यता पाळण्याला मनाई करण्यांत आली आहे. अस्पृश्यतेमुळें जर एकाद्यावर नालायकी लादली गेली तर तो कायद्याप्रमाणें शिक्षेला पात्र होणारा गुन्हा मानण्यांत येईल.

१८. (१) राज्य, लष्करी अगर विद्वत्तानिदर्शक पदव्यांव्यतिरिक्त कोणतीहि पदवी बहाल करणार नाहीं.

(२) भारताच्या कोणत्याहि नागरिकाला परराष्ट्राकडून पदवी स्वीकारतां येणार नाहीं.

(३) भारताचा नागरिक नसणारा कोणी जर राज्यांतील एकाद्या प्राप्तीच्या किंवा विश्वस्ताच्या हुद्द्यावर असेल तर त्याला तो त्या हुद्द्यावर असेपर्यंत राष्ट्रपतीच्या संमतिवांचून परराष्ट्राची कोणतीहि पदवी स्वीकारतां येणार नाहीं.

(४) राज्यांत प्राप्तीच्या किंवा विश्वस्ताच्या हुद्द्यावर असलेल्या कोणाहि व्यक्तीला राष्ट्रपतीच्या परवानगीवांचून कोणतेंहि पारितोषिक, मेहनताना अगर कोणत्याहि प्रकारचें अधिकारपद परराष्ट्रापासून घेतां येणार नाहीं.

स्वातंत्र्याचे हक्क

१९. (१) भारताच्या सर्व नागरिकांना पुढें नमूद केलेले हक्क असतील—

(अ) भाषणाचें व मतप्रदर्शनाचें स्वातंत्र्य; (ब) शांततेनें व शस्त्राशिवाय एकत्र जमणें; (क) संस्था व संघ बनविणें; (ड) भारताच्या प्रदेशांत पूर्ण मोकळिकीनें संचार करणें; (ई) भारताच्या प्रदेशांत कोठेंहि राहणें अगर कायम वास्तव्य करणें; (फ) संपत्ति संपादन करणें, धारण करणें, व तिची वासलात लावणें; आणि (ग) कोणताहि व्यवसाय करणें किंवा रोजगार, व्यापार अगर धंदा करणें.

(२) उप-कलम १ (अ) यांत निर्दिष्ट केलेल्या हक्कांमुळें बदनामी, निंदा, अब्रू-नुकसानी, कोर्टाची बेअब्रू, किंवा सभ्यता अगर नीतिमत्ता यांच्यावर आघात करणारी एखादी गोष्ट किंवा ज्यामुळें राज्याच्या सुरक्षिततेला धोका पोहोंचेल किंवा राज्य उलथून टाकण्याची प्रवृत्ति ज्यांत असेल अशा

कोणत्याहि बाबीविरुद्ध कायदा करण्याच्या राज्याच्या अधिकाराला प्रतिबंध होणार नाहीं; अथवा विद्यमान कायद्याच्या अंमलबजाणीला बाध येणार नाहीं.

(३) वरील उप-कलम १ (ब) यांत निर्दिष्ट केलेल्या हक्कांमुळें सार्वजनिक सुव्यवस्थेसाठीं वरील पोट-कलमांतील हक्काच्या अंमलबजावणीकरितां वाजवी बंधनें घालण्याच्या दृष्टीनें राज्याच्या कायदे करण्याच्या हक्काला प्रतिबंध होणार नाहीं किंवा सदर नियंत्रणें घालण्याच्या बाबतींत विद्यमान कायद्याच्या अंमलबजावणीला बाध येणार नाहीं.

(४) उप-कलम १ (क) मध्यें निर्दिष्ट केलेल्या हक्कांमुळें सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्ता यासाठीं वरील पोट-कलमांतील हक्काच्या अंमलबजावणीकरितां वाजवी बंधनें घालण्याच्या दृष्टीनें राज्याच्या कायदे करण्याच्या हक्काला प्रतिबंध होणार नाहीं किंवा सदर नियंत्रणें घालण्याच्या बाबतींत विद्यमान कायद्याच्या अंमलबजाणीला बाध येणार नाहीं.

(५) उप-कलम १ (ड), (इ), (फ) मध्यें निर्दिष्ट केलेल्या हक्कांमुळें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें किंवा एखाद्या वर्गीकृत जातीच्या हितरक्षणार्थ वरील पोट-कलमांतील हक्कांच्या अंबलबजावणीकरितां वाजवी बंधनें चालण्याच्या दृष्टीनें राज्याच्या कायदे करण्याच्या हक्काला प्रतिबंध होणार नाहीं, किंवा सदर नियंत्रणें घालण्याच्या बाबतींत विद्यमान कायद्याच्या अंमलबजावणीला बाध येणार नाहीं.

(६) वरील उप-कलम १ (ग) मध्यें निर्दिष्ट केलेल्या हक्कांमुळें सार्वजनिक हितासाठीं वरील पोट-कलमांतील हक्काच्या अंमलबजावणीकरितां वाजवी बंधनें घालण्याच्या दृष्टीनें राज्याच्या कायदे करण्याच्या हक्काला प्रतिबंध होणार नाहीं; किंवा विद्यमान कायद्याच्या अंमलबजावणीला बाध येणार नाहीं. विशेषतः कुठलाही व्यवसाय करण्याकरितां किंवा एकादा उद्योगधंदा अगर व्यापार चालविण्याकरितां जर व्यावसायिक किंवा तांत्रिक लायकी लागत असेल तर ती ठरविण्याचा किंवा ती ठरविण्यास अधिकार देण्याचा कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाहीं. त्याचप्रमाणें विद्यमान कायद्यामध्यें ती लायकी टरविण्याची किंवा ती लायकी ठरविण्याचा अधिकार देण्याची सत्ता असेल तर या कलमांतील हक्कानें त्याला बाध येणार नाहीं.

२०. (१) कोणाही मनुष्याला त्यानें केलेलें कृत्य त्यावेळीं अमलात असलेल्या कायद्याविरुद्ध असून तें गुन्हा ठरविलें गेलें असेल तरच त्याला शिक्षा होईल व तो गुन्हा घडण्याच्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्यांत जी शिक्षा सांगितली असेल ती त्यापेक्षां अधिक असणार नाहीं.

(२) कोणत्याही व्यक्तीवर एकाच गुन्ह्याबद्दल एकापेक्षां अधिक वेळां खटला होणार नाहीं, किंवा शिक्षा होणार नाहीं.

(३) एखाद्या गुन्ह्याबद्दल आरोप लादलेल्या कोणाही व्यक्तीला स्वतःच्या विरुद्ध साक्षीदार होण्यास सक्ति केली जाणार नाहीं.

२१. कायद्यानें स्थापित केलेल्या कार्यपद्धतीला सोडून कोणत्याही व्यक्तीचें जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतलें जाणार नाहीं.

२२. (१) जर एखाद्या व्यक्तीला अटक केली तर त्या व्यक्तीला शक्य तितक्या लवकर अटकेचीं कारणें कळविल्याशिवाय अटकेंत ठेवलें जाणार नाहीं; तसेंच त्या व्यक्तीला त्याच्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा अगर बचाव करण्याचा हक्क नाकारतां येणार नाहीं.

(२) अटक केलेल्या आणि अटकेंत ठेवलेल्या, प्रत्येक व्यक्तीला अटक केलेल्या जागेपासून मॅजिस्ट्रेटच्या कोर्टापर्यंत जाण्याला लागणारा वेळ वगळून चोवीस तासांच्या आंत अगदीं नजीकच्या मॅजिस्ट्रेटपुढें उभें केलें पाहिजे. आणि मॅजिस्ट्रेटच्या हुकुमाशिवाय कोणत्याहि अटक केलेल्या व्यक्तीला त्या मुदतीबाहेर अटकेंत ठेवतां येणार नाहीं.

(३) उपकलम (१) आणि (२) मध्यें सांगितलेल्या बाबी या—(अ) जो त्यावेळीं परकीय शत्रु म्हणून गणला गेला असेल; (ब) किंवा जो प्रतिबंधक अटकेच्या कायद्यान्वयें पकडला गेला असेल अगर अटकेंत ठेवला गेला असेल, त्याचे बाबतींत लागू नाहींत.

(४) प्रतिबंधक अटकेसंबंधीं केलेला कोणताहि कायदा कोणाही व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षां जास्त अटकेंत ठेवण्यास अधिकार देणार नाहीं.

अपवाद—(अ) जर हायकोर्टाच्या विद्यमान किंवा पूर्वीच्या न्यायाधीशांच्या किंवा ज्यांची लायकी हायकोर्टाचे न्यायाधीश होण्याची आहे अशा व्यक्तींच्या बनलेल्या सल्लागार मंडळानें वरील तीन महिन्यांच्या मुदतीच्या आंत त्यांच्या मतानें अशा अटकेला पुरेसें कारण आहे असा अहवाल सादर

केला तर; किंवा (ब) पार्लमेंटनें उप-कलम ७ अन्वयें केलेल्या कायद्यान्वयें जर ही अटक केलेली असेल तर वरील मुदतीपेक्षां अधिक काल त्याला अटकेंत ठेवतां येईल. पण ती मुदत त्या कायद्यांत सांगितलेल्या कमाल मुदतीपेक्षां जास्त नसेल.

(५) प्रतिबंधक अटकेच्या कायद्यान्वयें काढलेल्या हुकुमानुसार जेव्हां एखाद्या व्यक्तीला अटक केली असेल तेव्हां तो हुकुम काढणाऱ्या अधिकाऱ्यानें शक्य तितक्या लवकर तो हुकूम कोणत्या कारणामुळें काढला हें त्या अटक केलेल्या व्यक्तीला कळविलें पाहिजे, आणि त्या हुकुमाविरुद्ध जर कांहीं निवेदन करावयाचें असेल तर त्या व्यक्तीला शक्य तितकी लवकर संधि दिली पाहिजे.

(६) उपकलम ५ मध्यें ज्या हुकुमाचा निर्देश केला आहे तो हुकुम काढणाऱ्या अधिकाऱ्याला जर सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें कांहीं गोष्टी उघड करूं नयेत असें वाटलें तर त्या उघड करण्यास या कलमान्वयें त्याला भाग पाडतां येणार नाहीं.

(७) प्रतिबंधक अटकेच्या कायद्याखालीं जर एखाद्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षां अधिक काल अटकेंत ठेवावयाचें असेल तर तसें करण्याला कोठली परिस्थिति असावी व कोठल्या जातीचे किंवा जातींचे ते खटले असावेत हें पार्लमेंटनें कायदा करून ठरवावें. त्याचप्रमाणें अशा कायद्याखालीं अटकेची जास्तींत जास्त कालमर्यादा किती असावी हेंही ठरवावें आणि उपकलम ४ (अ) मध्यें सांगितलेल्या सल्लागार मंडळानें चौकशीकरितां कोणती पद्धती अनुसरावी हेंही पार्लमेंटनें कायद्यानें ठरवून द्यावें.

पिळवणुकी विरुद्ध हक्क

२३. (१) माणसांची विक्री आणि बिगार, तसेंच अन्य सक्तीच्या मजुरीचे प्रकार यांना मनाई आहे; या मनाईयोजनेचा भंग करणें हा कायद्याप्रमाणें शिक्षेला पात्र होणारा गुन्हा होईल.

(२) या कलमांत कांहींही सांगितलें असलें तरी राज्याला सार्वजनिक कार्याकरितां सक्तीची नोकरी लादण्यास प्रत्यवाय नाहीं; आणि अशी नोकरी लादतांना राज्य केवळ धर्म, वंश, जात अगर वर्ग किंवा यांपैकीं एकाही कारणाकरितां भेदाभेद करणार नाहीं.

२४. चौदा वर्षांच्या खालील कोठल्याही मुलाला एखाद्या कारखान्यांत अगर खाणींत अगर दुसऱ्या कोणत्याही जोखमीच्या नोकरीवर लावतां येणार नाहीं.

धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क

२५. (१) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता, स्वास्थ्य आणि या भागांतील इतर तजविजी यांना बाधक नसणाऱ्या बाबतींत सर्व व्यक्तींना आपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें वागण्याचे समान हक्क आहेत. आणि धर्माचा उच्चार, आचार आणि प्रचार अनिर्बंधपणें करण्याचा हक्क आहे.

(२) खालील बाबतींत राज्याला विद्यमान कायद्याचा अंमल करण्यास किंवा कायदा बनविण्यास या कलमानें प्रतिबंध होणार नाहीं--(अ) धार्मिक आचरणाशीं संलग्न असणारा असा कोणताही आर्थिक, द्रव्यविषयक, राजकीय किंवा अन्य लौकिक व्यवहार यांचें नियमन किंवा नियंत्रण करणें; (ब) सामाजिक सुखसोयी आणि सुधारणा किंवा हिंदुधर्मातील सर्व वर्गांना व जातींना सार्वजनिक स्वरूपाच्या धार्मिक संस्था खुल्या ठेवणें या संबंधीं योजना.

स्पष्टीकरण (१)--कृपाण धारण करणें व बाळगणें ही बाब शीख धर्मांत अंतर्भूत केली जाईल.

स्पष्टीकरण (२)--उपकलम २ (ब) मध्यें हिंदूंविषयीं जो उल्लेख आहे तो शीख, जैन, व बौद्ध धर्मीयांना लागू आहे असें समजावें; आणि हिंदू धार्मिक संस्थांच्या उल्लेखाचा त्याप्रमाणें अर्थ करावा.

२६. सार्वजनिक व्यवस्था, नीतिमत्ता व स्वास्थ्य यांना बाधक न होईल अशा रीतीनें प्रत्येक धार्मिक पंथाला अगर त्याच्या विभागाला पुढील हक्क असतील--

(अ) धार्मिक किंवा धर्मार्थ संस्था स्थापणें व चालविणें; (ब) धार्मिक बाबतींत स्वतःचा कारभार पहाणें; (क) स्थावर आणि जंगम मालमत्तेचें स्वामित्व मिळविणें आणि ती संपादन करणें; आणि (ड) कायद्याप्रमाणें सदर मिळकतीचा कारभार पहाणें.

२७. ज्या कराचें उत्पन्न एकाद्या विशिष्ट धर्माच्या अगर धर्मपंथाच्या प्रसाराकरितां व रक्षणाकरितां खर्चिलें जाण्याची विशिष्ट योजना असेल तर असा कर देण्याची कोणावरही सक्ती होणार नाहीं.

२८. (१) राज्याच्या निधींतून संपूर्णपणें चालविलेल्या कोणत्याही शिक्षणसंस्थेंत धार्मिक शिक्षणाची सोय केली जाणार नाहीं.

(२) जर एखादी शिक्षणसंस्था राज्याकडून चालविली जात असेल; पण जर ती अशा एखाद्या देणगींतून किंवा विश्वस्त निधींतून स्थापन झाली असेल कीं जिचा हेतु त्या संस्थेंत धार्मिक शिक्षण देणें हा असेल तर, तिला उपकलम (१) लागू होणार नाहीं.

(३) राज्यानें मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या निधींतून मदत मिळणाऱ्या कोणत्याही शिक्षण-संस्थेंत शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीला, जर अशा संस्थेंत धार्मिक शिक्षण दिलें जात असेल तर त्यांत भाग घेण्याची किंवा अशा संस्थेंत किंवा त्या संस्थेच्या लगत असणाऱ्या जागेंत जर धार्मिक पूजाअर्चा चालूं असेल तर हजर राहण्याची आवश्यकता नाहीं. मात्र त्या व्यक्तीची किंवा ती व्यक्ति अज्ञान असेल तर पालकाची संमति घेऊन तेथें हजर राहण्यास हरकत नाहीं.

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

२५. (१) भारताच्या प्रदेशांत अगर त्याच्या कोणत्याही विभागांत रहाणाऱ्या कोणत्याही नागरिक वर्गाला जर स्वतःची विशिष्ट भाषा, लिपी व संस्कृति असेल तर ती राखण्याचा हक्क राहील.

(२) सरकारी खर्चानें चालविलेल्या किंवा सरकारी निधींतून मदत मिळणाऱ्या कोणत्याही शिक्षण-संस्थेंत कोणाहि नागरिकाला केवळ धर्माच्या, वंशाच्या, जातीच्या, भाषेच्या, किंवा त्यापैकीं कोणत्याही एका कारणाकरितां शिक्षण-संस्थेंत प्रवेश नाकारतां येणार नाहीं.

३०. (१) धर्मावर किंवा भाषेवर आधारलेल्या अशा सर्व अल्पसंख्यांक वर्गांना स्वतःच्या पसंतीप्रमाणें शिक्षण-संस्था स्थापण्याचा आणि चालविण्याचा हक्क आहे.

(२) धर्मावर किंवा भाषेवर आधारलेल्या एकाद्या अल्पसंख्याक वर्गाच्या व्यवस्थेखालीं एकादी शिक्षणसंस्था आहे म्हणून त्याकरितां अशा शिक्षण-संस्थेला मदत करतांना राज्याला भेदाभेद करतां येणार नाहीं.

मिळकत हक्क

३१. (१) कायद्यानें प्राप्त झालेल्या अधिकाराशिवाय कोणतीही व्यक्ति आपल्या मिळकतीपासून वंचित केली जाणार नाहीं.

(२) कोणतीहि स्थावर किंवा जंगम, तिच्या हितसंबंधासह, मिळकत किंवा व्यापारधंदे मालकीचे असणाऱ्या कंपनीची मिळकत जेव्हां सार्वजनिक कामाकरतां ताब्यांत व्यावयाची असेल किंवा संपादन करावयाची असेल तेव्हां अशा ताब्याकरतां अगर संपादनाकरतां अधिकार प्राप्त करून देणारा जो कायदा असेल त्यांत ताब्यांत घेतल्या जाणाऱ्या अगर संपादन केल्या जाणाऱ्या मिळकतीच्या नुकसानभरपाईबद्दल तरतूद असेल आणि त्यांत एक तर नुकसानभरपाईची रक्कम ठरविलेली असली पाहिजे किंवा त्यांत ही नुकसानभरपाई कोणत्या तत्त्वावर व कोणत्या पद्धतीनें ठरवावी व द्यावी याची माहिती असली पाहिजे.

(३) उपकलम २ मध्यें सांगितल्यासारखा राज्याच्या कायदेमंडळानें केलेला कायदा राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवल्याखेरीज व त्याची संमति घेतल्याखेरीज अमलांत येणार नाहीं.

(४) या घटनेच्या आरंभाला प्रांतिक कायदेमंडळामध्यें असलेले व कायदेमंडळानें पास केलेलें एकादें बिल जर अध्यक्षाच्या विचाराकरतां ठेवलें असेल आणि त्याला त्याची संमति मिळालेली असेल तर या घटनेंत कांहींहि सांगितलें असलें तरी अशी संमति मिळालेल्या त्या कायद्यासंबंधीं तो जरी उप-कलम २ मधील तरतुदींना विरोधी असला तरी त्यासंबंधीं कोर्टांत आक्षेप घेतां येणार नाहीं.

(५) उप-कलम २ मधील कांहींहि खालील बाबींना बाधक होणार नाहीः (अ) पुढील उप-कलम (६) मधील ज्या तरतुदी कायद्याला लागू होतील त्यांखेरीज विद्यमान कायद्यांतील कोणत्याहि तरतुदी, किंवा (ब) यानंतर राज्यांनीं केलेल्या कोणत्याहि कायद्याच्या खालील बाबतींतल्या तरतुदी—(१) एकादा कर किंवा दंड लादणें अगर वसूल करणें; (२) सार्वजनिक आरोग्य सुधारणें किंवा जीवनाला किंवा मिळकतीला धोका टाळणें; (३) जी निर्वासिताची मिळकत म्हणून कायद्यानें जाहीर केली असेल तीसंबंधीं हिंदी

बसाहत सरकार अगर भारत सरकार व दुसऱ्या एकाद्या देशाचें सरकार यांच्यामध्यें जे कांहीं करारमदार झाले असतील त्यांअन्वयें अगर अन्य रीतीनें केलेले राज्यांचे कायदे (वरील उपकलम (२) ला बाधक होणार नाहींत.)

(६) ही घटना सुरू होण्यापूर्वी अठरा महिने जर एकाद्या संस्थाननें एकादा कायदा केला असेल तर तो ही घटना सुरू झाल्यापासून तीन महिन्यांचे आंत राष्ट्रपतीकडे मान्यतेकरतां पाठविला जावा-त्यानंतर जर राष्ट्रपतीनें जाहीरनामा काढून त्याला मान्यता दिली तर तो कायदा वरील उपकलम (२) ला विरोधी आहे म्हणून किंवा त्यानें सन १९३५च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील कलम २९९ च्या उपकलम २ ला विरोध केला आहे म्हणून त्यावर न्यायालयांत आक्षेप घेतां येणार नाहीं.

सनदशीर इलाजासंबंधीं हक्क

३२. (१) या भागान्वयें दिलेल्या हक्काच्या अंमलबजावणीकरतां योग्य पद्धतीनें उच्चत्तम न्यायालयाकडे दाद मागण्याच्या हक्काची ग्वाही देण्यांत येत आहे.

(२) या न्यायालयाला वरील हक्कांपैकीं कोणताहि हक्क अंमलांत आणण्यासाठीं योग्य त्या मनाई, बंदी, उपस्थिती वगैरेसाठीं सूचना, हुकूम अगर आदेश देण्याचा अधिकार असेल.

(३) वर उपकलमें (१) व (२) मध्यें दिलेल्या उच्चतम न्यायालयाच्या अधिकारांना बाध न आणतां पार्लमेंटला कायदा करून अन्य न्यायालयाला आपल्या अधिकारक्षेत्रांतील स्थानिक हद्दींत उपकलम (२) मधील उच्चतम न्यायालयाचे सर्व किंवा कांहीं अधिकार बजावण्याची सत्ता देतां येईल.

(४) या कलमांतील हमी दिलेले हक्क या घटनेनें तशी कांहीं अन्य योजना केल्याशिवाय स्थगित होणार नाहींत.

३३. सैन्यांतील सैनिकांकडून अगर ज्यांच्यावर सार्वजनिक सुरक्षितता सोंपविली आहे अशा सैनिकांकडून त्यांच्या कर्तव्याचें योग्य पालन व्हावें आणि त्यांच्यामध्यें शिस्त रहावी या दृष्टीनें या भागांत दिलेला कोणता हक्क

कोणत्या मर्यादेपर्यंत नियंत्रित अगर रद्द करावा हें पार्लमेंटनें कायदा करून ठरवावें.

३४. या भागांत वर कांहींहि योजना असल्या तरी पार्लमेंटला कायदा करून ज्या भारताच्या विभागांत लष्करी कायदा जारी केला होता तेथें जर संघ किंवा राज्याच्या नोकरानें किंवा दुसऱ्या कोणीहि शांतता राखण्याकरतां अगर स्थापण्याकरतां कोणतेंहि कृत्य केलें असेल तर त्याला दोषमुक्त करतां येईल. तसेंच त्या विभागांत लष्करी कायद्याखालीं झालेली एकादी शिक्षा अगर लादलेलें शासन, बजावलेली जप्ती, अगर केलेलें अन्य कृत्य यांना मान्यता देतां येईल.

३५. (अ) या घटनेंत कांहींहि असलें तरी पुढील प्रकारचे कायदे करण्याचे हक्क परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्यांच्या कायदे-मंडळांना नसून ते फक्त पार्लमेंटलाच आहेत—(१) कलम १६ (इ), कलम ३२ (३), कलम ३३ व ३४ मधील बाबीबाबत पार्लमेंटनें कायद्यानें योजनो केलेल्या कोणत्याहि बाबीबद्दल, (२) आणि या भागांत गुन्हा म्हणून सांगितलेल्या कृत्याबाबत शासन ठरविणें. ही घटना सुरू होतांच पार्लमेंटनें ते कायदे करावे व ती शिक्षा ठरवावी.

(२) वरील उपकलम (अ) (१) मध्यें उल्लेखिलेल्या कोणत्याहि बाबीबद्दल किंवा (२) मध्यें सांगितलेल्या शासनाची तरतूद करण्याबद्दल जर ही घटना अमलांत येण्याच्या पूर्वी एकादा कायदा भारतामध्यें अमलांत असेल तर त्या कायद्याच्या शर्तींखालीं आणि या घटनेच्या ३७२ कलमान्वयें त्या कायद्यांत फेरफार किंवा दुरुस्त केल्या जातील त्याप्रमाणें तो कायदा पार्लमेंटकडून बदल, रद्द किंवा दुरुस्त होईपर्यंत जारी राहील.

स्पष्टीकरण—या कलमांतील 'अमलांत असलेला कायदा' याचा अर्थ कलम ३७२ मधील अर्थासारखा समजावा.

भाग चौथा राज्याच्या धोरणासंबंधीं मार्गदर्शक तत्त्वें

३६. संदर्भावरून दुसरा अर्थ अभिप्रेत नसल्यास तिसऱ्या भागांत 'राज्य' या शब्दाला जो अर्थ आहे तोच येथें समजावा.

३७. या भागांत असलेलीं कलमें कोणत्याही न्यायालयाकडून जारी करण्यांत येणार नाहींत; पण त्यांत निर्दिष्ट केलेले सिद्धान्त हे देशाच्या अनुशासनाच्या दृष्टीनें मूलभूत आहेत. आणि कायदे करतांना हीं तत्वें लागू करणें हें राज्याचें कर्तव्य असेल.

३८. ज्या समाजव्यवस्थेमध्यें सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, राष्ट्रीय जीवनांतील सर्व संस्थांमध्यें संचरून राहील अशी समाजव्यवस्था संघटित करून व परिणामकारक रीतीनें तिचें संरक्षण करून राज्य, जनतेच्या सुखसंवर्धनासाठीं प्रयत्न करील.

३९. विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीनें राज्य आपलें धोरण ठरवील—(अ) स्त्री-पुरुष या दोघांही नागरिकांना उपजीविकेचीं पुरेशीं साधनें मिळण्याचा हक्क आहे; (आ) समाजांतील भौतिक साधनांची मालकी आणि नियंत्रण अशा तऱ्हेनें विभागलें जावें कीं ज्यायोगें सर्वांचें जास्तींत जास्त कल्याण होईल ; (इ) जिच्या योगें समाजाचें अनहित होईल अशाप्रकारें संपत्तीचें आणि उत्पादनाच्या साधनाचें केंद्रीकरण होईल अशी अर्थव्यवस्था अमलांत नसावी; (ई) स्त्री व पुरुष या दोघांनाही सारख्या कामाकरतां सारखा पगार मिळेल; (उ) स्त्री-पुरुष कामगारांचें आरोग्य आणि शक्ति व मुलांचें कोवळें वय यांचा दुरुपयोग केला जाणार नाहीं. आणि नागरिकांना अर्थिक अवश्यकतेमुळें त्यांच्या वयाला व शक्तीला सोईस्कर नसलेल्या धंद्यांत शिरण्यास भाग पाडलें जाणार नाहीं; (ऊ) बालपण व तारुण्य यांचे पिळवणुकीपासून आणि नैतिक व भौतिक परित्यक्ततेपासून रक्षण केलें जाईल.

४०. राज्य, ग्रामपंचायती स्थापण्याची योजना करील आणि त्यांना स्वराज्याचे घटक म्हणून काम करण्यास आवश्यक असे अधिकार आणि सत्ता देईल.

४१. राज्य आपली आर्थिक शक्ति आणि विकास यांच्या मर्यादेंत, काम मिळवून देण्याचा, शिक्षणाचा आणि बेकारी, वार्धक्य, आजारीपण, पंगुत्व व स्वतःचा दोष नसतांना प्राप्त झालेली हलाखी या बाबतींत सार्वजनिक मदतीचा हक्क संपादन करून देण्याची परिणामकारक योजना करील.

४२. कामधंद्याच्या बाबतींत न्याय आणि माणुसकीचें वातावरण, तसेंच बाळंतपणाच्या बाबतींत साहाय्य प्राप्त करून देण्याबाबत राज्य व्यवस्था करील.

४३. शेतीच्या, उद्योगधंद्यांच्या किंवा अन्य सर्व कामगारांना काम, जीवनवेतन, राहणीचा योग्य दर्जा असलेलें आणि विश्रांति व सामाजिक आणि सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपभोग घेतां येणारें अशा कामाच्या वातावरणाची शाश्वती, राज्य योग्य कायदे करून अगर आर्थिक संघटन किंवा अन्य रीतीनें उपलब्ध करून देईल; विशेषतः राज्य, ग्रामीण विभागांत वैयक्तिक किंवा सहकारी पद्धतीवरील ग्रामोद्योग वाढविण्याचा प्रयत्न करील.

४४. अखिल भारतांत एकच मुलकी कायदा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा राज्य प्रयत्न करील.

४५. वयाचीं चौदा वर्षें पुरीं होईपर्यंत सर्व मुलांना मोफत व सक्तीचें शिक्षण मिळावें म्हणून ही घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षांच्या आंत त्याची योजना करण्याचा राज्य प्रयत्न करील.

४६. जनतेंत जास्त दुर्बल असलेल्या वर्गाचे, विशेषतः अनुसूचित जाती आणि जनजाती यांचें शैक्षणिक व आर्थिक हितवर्धनाबद्दल राज्य विशेष काळजी घेईल; तसेंच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून त्यांचें संरक्षण करील.

४७. आहाराच्या पौष्टिकतेचें मान वाढविणें, जनतेच्या राहणीचा दर्जा वाढविणें आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणें या बाबी प्राथमिक कर्तव्यांपैकीं आहेत, असें राज्य मानील. विशेषतः राज्य आरोग्याला हानिकारक असणारीं मादक पेयें व अमली पदार्थ यांना औषधाच्या उपयोगाशिवाय सेवन करण्यास बंदी करण्याचा प्रयत्न करील.

४८. आधुनिक व शास्त्रीय पद्धतीवर शेतीचें व पशुधनाचें संघटन करण्याचा राज्य प्रयत्न करील. विशेषतः दुधाळ व शेतीच्या जनावरांची गाई व वांसरांसह वैदास सुधारण्याचा प्रयत्न करील आणि त्यांच्या कत्तलीला बंदी करील.

४९. पार्लमेंटनें कायद्यानें जीं कलेच्या किंवा इतिहासाच्या दृष्टीनें राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून स्मारकें, स्थळें किंवा वस्तू ठरविल्या असतील, त्यांचें मोडतोड, विकृति, नाश, उच्चाटन, वासलात किंवा निर्यात यांपासून रक्षण करणें ही राज्याची जबाबदारी राहील.

५०. राज्यकारभारांतील न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करण्याची योजना राज्य करील.

५१. राज्य पुढील बाबतींत प्रयत्न करील—(अ) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता वाढविणें; (ब) राष्ट्राराष्ट्रांत न्याय्य व सन्मानाचे संबंध स्थापणें; (क) संघटित राष्ट्रांतील व्यवहारांत परस्परांशीं वागतांना, आंतरराष्ट्रीय कायदा आणि तहनाम्यांतील जबाबदाऱ्या यांच्यासंबंधीं आदर वाढविणें; (ड) आंतरराष्ट्रीय कलहांचा निकाल लवादपद्धतीनें करण्यासंबंधीं उत्तेजन देणें.

भाग ५ वा — संघ

प्रकरण १ : कार्यकारी

राष्ट्रपति व उपराष्ट्रपति

५२. भारताचा एक राष्ट्रपति असेल.

५३. (१) संघाची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीला देण्यांत येईल. तो त्या सत्तेचा वापर या घटनेनुसार प्रत्यक्ष अगर त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत करील.

(२) वरील गोष्टीच्या सामान्यत्वाला बाध येऊं न देतां संघांतील संरक्षक फौजेची वरिष्ठ हुकमत राष्ट्रपतीलाच देण्यांत येईल, व तिच्या वापराचें नियमन कायद्यानें केलें जाईल.

(३) या कलमांतील कशानेंहि—(अ) विद्यमान कायद्यानें एकाद्या राज्याच्या सरकारला अगर शासनसंस्थेला कांहीं अधिकार दिले असतील तर ते राष्ट्रपतीकडे आले असें समजलें जाणार नाहीं; (ब) त्याचप्रमाणें राष्ट्रपतिव्यतिरिक्त अन्य अधिकाऱ्यांना कायदा करून अधिकार देण्यास पार्लमेंटला प्रतिबंध नाहीं.

५४. (अ) राष्ट्रपतीची निवडणूक पुढील निवडणूक मंडळाच्या सभासदांकडून होईल---(अ) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांचे निवडून आलेले सभासद, (ब) राज्यांच्या विधानसभेंतील (असेंब्लींतील) निवडून आलेले सभासद.

५५. (१) राष्ट्रपतीच्या निवडणुकीमध्यें निरनिराळ्या राज्यांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण शक्यतोंवर सारखें राहील.

(२) राज्याराज्यांमध्यें आणि सर्व राज्यें व संघ यांच्यामध्यें समानता रहावी या दृष्टीनें पार्लमेंटचा प्रत्येक निवडलेल्या सभासदाला आणि प्रत्येक राज्याच्या विधानसभेमधील निवडलेल्या सभासदांना अशा निवडणुकींत किती मतें देतां येईल हें पुढीलप्रमाणें ठरविलें जाईल—(अ) राज्यांच्या लोकसंख्येला विधानसभेंत निवडून आलेल्या सभासद-संख्येनें भागावयाचें. या भागाकाराला पुन्हां एक हजारानें भागावयाचें. आणि त्याचा जो भागाकार येईल तितकीं मतें विधानसभेच्या प्रत्येक सभासदाला असतील.

(ब) एका हजारानें भागल्यानंतर जी बाकी राहील ती ५०० पेक्षां कमी नसेल तर वरील पोटकलम (अ) मध्यें दिलेल्या मतसंख्येंत एका मताची भर पडेल; (क) वर (अ) व (ब) मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्यांतील विधानसभेंत असणाऱ्या सभासदांना जितकीं मतें ठरवून दिलीं असतील त्या सर्व मतांच्या संख्येला पार्लमेंटमधील दोन्ही सभागृहांच्या निवडून आलेल्या सभासद-संख्येनें भागावें आणि जो भागाकार येईल तितकीं मतें प्रत्येक निवडून आलेल्या सभासदाला असतील. जर भागाकारांतील अपूर्णांक निम्याहून अधिक असेल तर एक मत अधिक धरावें, व कमी असेल तर वगळावें.

(३) राष्ट्रपतीची निवडणूक प्रमाणशीर मतदानपद्धतीनें होईल व तींत क्रमदेय एक मतदान असेल आणि तें मतदान गुप्तमतदानपद्धतीनें होईल.

स्पष्टीकरण:—या कलमांत ' लोकसंख्या ' असा जो उलेख आहे त्याचा अर्थ मागील खाने-सुमारींत अजमाविलेली व प्रसिद्ध झालेली लोकसंख्या असा आहे.

५६. (१) राष्ट्रपतिपदाची मुदत अधिकार-स्वीकारापासून पांच वर्षें असेल; मात्र (अ) राष्ट्रपतीला स्वतःच्या सहीनें उपराष्ट्रपतीला कळवून आपल्या जागेचा राजीनामा देतां येईल; (ब) राष्ट्रपतीनें घटनेचा भंग

केला तर त्याच्यावर कलम ६१ मध्यें सांगितलेल्या पद्धतीनुसार काम चालवून त्याला काढून टाकतां येईल; (क) आपली मुदत संपली असली तरी राष्ट्रपतीला आपली रिकामी जागा घेणारा नवा राष्ट्रपति अधिकार-स्वीकार करीपर्यंत आपल्या जागेवर रहावें लागेल.

(२) वरील उपकलम १ (अ) मधें सांगितल्याप्रमाणें उपराष्ट्रपतीकडे राष्ट्रपतीचा राजीनामा आल्यावर त्यानें ताबडतोब त्याबाबत लोकसभागृहाच्या अध्यक्षाला कळविलें पाहिजे.

५७. जी व्यक्ति राष्ट्रपतिपदावर असेल किंवा होती तिला घटनेचीं अन्य बंधनें पाळून राष्ट्रपतिपदाच्या फेर निवडणुकीला उभें रहातां येईल.

५८. (१) राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीकरतां उभ्या राहणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीला पुढील लायकी नसेल तर तिला त्या निवडणुकीस उभें राहतां येणार नाहीं—(अ) ती व्यक्ति भारताची नागरिक असली पाहिजे; (ब) तिच्या वयाला ३५ वर्षें पुरीं झालीं असलीं पाहिजेत; व (क) लोकसभेंत निवडून येण्यास ती व्यक्ति लायक असली पाहिजे.

(२) भारत सरकार, राज्य सरकार यांमध्यें किंवा वरील सरकारांच्या नियंत्रणाखालील स्थानिक अगर अन्य शासनसंस्था यांमध्यें एकादी व्यक्ति प्राप्तीचा हुद्दा धारण करीत असेल तर ती राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीकरतां लायक म्हणून समजली जाणार नाहीं.

मात्र संघाचा राष्ट्रपति, उपराष्ट्रपति, राज्याचा राज्यपाल, राजप्रमुख किंवा उपराजप्रमुख, संघांतील किंवा राज्यांतील मंत्री हे या कलमापुरते प्राप्तीच्या हुद्द्यावर आहेत असें मानलें जाणार नाहीं.

५९. (१) राष्ट्रपति हा पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाचा सभासद असणार नाहीं किंवा कोणत्याहि राज्याच्या कायदेमंडळाचा सभासद असणार नाहीं. आणि असा एकादा सभासद राष्ट्रपति म्हणून निवडून आला तर तो ज्या दिवशीं राष्ट्रपतिपदावर येईल त्या दिवशीं त्याची त्या सभागृहांतील जागा खाली झाली असें समजण्यांत येईल.

(२) राष्ट्रपति इतर कोठलीहि प्राप्तीची जागा स्वीकारणार नाहीं.

(३) राष्ट्रपतीला सरकारी निवासस्थानाचा उपयोग भाडें न देतां करण्याचा अधिकार असेल आणि पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्याप्रमाणें

राष्ट्रपतीला प्राप्ती, भत्ते व सवलती मिळण्याचा हक्क असेल व अशी व्यवस्था होईपर्यंत परिशिष्ट दोनमध्यें निर्दिष्ट केलेल्या प्राप्ती, भत्ते व सवलती मिळतील.

(४) राष्ट्रपतीची प्राप्ती आणि भत्ते हे तो अधिकारावर असेपर्यंत कमी केले जाणार नाहींत.

६०. प्रत्येक राष्ट्रपतीला, आणि जो कोणी राष्ट्रपतिपदावर येईल किंवा राष्ट्रपति म्हणून काम करीत असेल त्याला अधिकारग्रहण करण्यापूर्वी पुढील-प्रमाणें शपथ, किंवा प्रतिज्ञा भारताच्या मुख्य न्यायाधीशासमोर किंवा त्याचे गैरहजेरींत उच्चतम न्यायालयाच्या ज्येष्ठ न्यायाधीशासमोर घ्यावी लागेल किंवा करावी लागेल—

" मी, ' अ. ब. ' $\frac{\text{ईश्वरसाक्ष शपथ घेतों कीं,}}{\text{गंभीरपणें प्रतिज्ञा करतों कीं,}}$ भारताच्या राष्ट्रपतिपदाचें काम (किंवा राष्ट्रपतीचें काम) प्रामाणिकपणें करीन आणि माझ्या जास्तींत जास्त शक्तिनुसार मी भारताची घटना आणि कायदा यांचें जतन, संरक्षण, आणि संमर्थन करीन आणि भारतीय जनतेचें कल्याण व सेवा यांना वाहून घेईन."

६१. (१) राष्ट्रपतिविरुद्ध घटनाभंगाबद्दल जेव्हां कांहीं काम चालवावयाचें असेल, तेव्हां त्याबाबतचे आरोपपत्र पार्लमेंटच्या कोणत्याहि एका सभागृहानें सादर केलें पाहिजे.

(२) पुढील शर्तीं पुऱ्या केल्याशिवाय असें आरोपपत्र सादर करतां येणार नाहीं—(अ) सभागृहाच्या एकूण संख्येच्या एक चतुर्थांशापेक्षां कमी नसलेल्या सभासदांनीं कमींत कमी चौदा दिवसांची लेखी सूचना देऊन व सदर ठराव आणण्याचा उद्देश स्पष्ट करून वरील आरोप असलेला ठराव मांडावयास हवा; (ब) तसेंच सदर ठराव सभागृहापुढें मांडल्यावर सभागृहाच्या एकुण संख्येच्या दोन-तृतीयांशापेक्षां कमी नसलेल्या बहुमतानें तो ठराव पास झाला पाहिजे.

(३) जेव्हां एकादें सभागृह असा आरोप करणारा ठराव सादर करील तेव्हां दुसरें सभागृह त्या ठरावांतील आरोपांची चौकशी करील अगर करवील;

आणि राष्ट्रपतीला अशा चौकशीच्या वेळीं स्वतः हजर राहण्याचा व योग्य ५
प्रतिनिधीमार्फत आपलें म्हणणें मांडण्याचा हक्क असेल.

(४) ज्या सभागृहानें अशी चौकशी केली अगर करविली असेल त्या सभागृहानें एकंदर सभासद संख्येपैकीं दोन-तृतीयांशापेक्षां कमी नसलेल्या बहुमतानें आरोप शाबीत झाल्याचा ठराव चौकशीअंतीं पसार केला असेल तर तो ठराव पास झाल्या दिवसापासून राष्ट्रपतीची पदच्युति अमलांत येईल.

६२. (१) राष्ट्रपतिपदाची मुदत संपल्यानें रिकामी होणारी जागा ती मुदत संपण्यापूर्वी निवडणुकीनें भरली जाईल.

(२) राष्ट्रपतिपदाची जागा मृत्यूमुळें, राजीनाम्यामुळें, पदच्युतीमुळें अगर अन्य कारणामुळें जर रिकामी झाली असेल, तर ती भरून काढण्याकरितां करावयाची निवडणूक ही, ती जागा रिकामी झाल्याच्या तारखेनंतर शक्य तितक्या लवकर केली जाईल आणि केव्हांही त्याकरितां सहा महिन्यांपेक्षां जास्त काळ लागणार नाहीं. आणि जी व्यक्ति सदर रिकाम्या जागेवर निवडून आली असेल त्या व्यक्तीला ५६ व्या कलमांतील शर्तींप्रमाणें अधिकार-स्वीकारापासून संपूर्ण पांच वर्षें राष्ट्रपतिपदावर राहण्याचा हक्क राहील.

६३. भारताचा एक उपराष्ट्रपति असेल.

६४. उपराष्ट्रपति हा राज्यपरिषदे (कौन्सिल ऑफ स्टेट) चा पदसिद्ध सभापति असेल आणि आणि त्याला दुसरी कोणतीही प्राप्तीची जागा स्वीकारतां येणार नाहीं.

तथापि, ज्या वेळीं उपराष्ट्रपति हा ६५ व्या कलमान्वयें राष्ट्रपतिपदावर असेल किंवा राष्ट्रपतीचें काम करीत असेल त्या वेळीं तो राज्यपरिषदेच्या सभापतीचें काम करणार नाहीं आणि ५७ व्या कलमान्वयें त्याला त्या जागेच्या कसल्याही पगारावर अगर भत्त्यावर हक्क सांगतां येणार नाहीं.

६५. (१) मृत्यु, राजीनामा, अगर पदच्युति यामुळें किंवा अन्य कारणानें रिकाम्या झालेल्या राष्ट्रपतिपदावर उपराष्ट्रपति हा, ह्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नवीन राष्ट्रपतीची निवडणूक होऊन तो अधिकारप्रविष्ट होईपर्यंत राष्ट्रपति म्हणून काम करील.

(२) गैरहजेरी, आजारीपण अगर अन्य कारणानें, जर राष्ट्रपति आपलें काम करण्यास असमर्थ झाला तर तो कामावर येईपर्यंत उपराष्ट्रपति त्याचें काम करील.

(३) उपराष्ट्रपति हा जेव्हां राष्ट्रपतिपदावर असेल किंवा राष्ट्रपति म्हणून काम करीत असेल तेव्हां त्या मुदतींत व त्यासंबंधीं त्याला राष्ट्रपतीचे सर्व अधिकार व संरक्षणें मिळतील. तसेंच पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्या प्राप्ती, सवलती व भत्ते त्याला मिळतील आणि जोंपर्यंत अशी योजना झाली नाहीं तोंपर्यंत दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेल्या प्राप्ती, सवलती व भत्ते त्याला मिळत राहतील.

६६. (१) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकींत उपराष्ट्रपतीची निवडणूक प्रमाणशीर मतदानपद्धतीनें, क्रमदेय एकमतानें आणि गुप्त रीतीनें केली जाईल.

(२) उपराष्ट्रपति हा पार्लमेंटच्या कोणत्याही सभागृहाचा किंवा राज्याच्या कायदेमंडळाचा सभासद असणार नाहीं. आणि जर एकादा पार्लमेंटचा किंवा राज्याच्या कायदेमंडळाचा सभासद उपराष्ट्रपति म्हणून निवडून आला तर तो ज्या दिवशीं उपराष्ट्रपतिपदावर येईल त्या दिवशीं त्याची पार्लमेंट अगर कायदेमंडळांतील जागा खाली झाली असें समजलें जाईल.

(३) उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीकरितां उभे राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला पुढील लायकी नसेल तर तिला उभे रहातां येणार नाहीं—(अ) ती व्यक्ति हिंदुस्थानची नागरिक असली पाहिजे; (ब) तिच्या वयाला ३५ वर्षें पुरीं झालीं असली पाहिजेत; (क) राज्यपरिषदे (कौन्सिल ऑफ स्टेट्स) मध्यें निवडून येण्यास ती पात्र असली पाहिजे.

(४) भारत सरकार अगर राज्य सरकार यांमध्यें किंवा वरील सरकारांच्या नियंत्रणाखालील स्थानिक अगर अन्य शासनसंस्थायांमध्यें एखादी व्यक्ति प्राप्तीचा हुद्दा धारण करीत असेल तर उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीकरितां ती पात्र ठरणार नाहीं.

मात्र जर एखादी व्यक्ति संघाचा राष्ट्रपति, उपराष्ट्रपति, राज्याचा राज्यपाल, राजप्रमुख किंवा उपराजप्रमुख, अगर संघाच्या किंवा राज्याच्या मंत्रि-

मंडळांतील मंत्री असेल तर ती या कलमापुरती प्राप्तीच्या हुद्द्यावर आहे असें मानलें जाणार नाहीं.

६७. (१) उपराष्ट्रपति अधिकारग्रहण केल्यापासून पांच वर्षेंपर्यंत आपल्या अधिकारावर राहील.

मात्र (अ) उपराष्ट्रपतीला आपल्या सहीनें राष्ट्रपतीला कळवून आपल्या जागेचा राजीनामा देतां येईल; (ब) कौन्सिल ऑफ स्टेट्सच्या त्यावेळीं असलेल्या सर्व सभासदांच्या बहुमतानें आणि लोकसभागृहाच्या संमतीनें उपराष्ट्रपतीला त्याचे जागेवरून काढून टाकतां येईल; पण असा ठराव आणण्याचा उद्देश चौदा दिवस अगोदर कळविल्याशिवाय तसा ठराव आणतां येणार नाहीं; (क) उपराष्ट्रपतिपदाची मुदत संपली असली तरी त्याची जागा घेणारा दुसरा उपराष्ट्रपति अधिकारप्रविष्ट होईपर्यंत तो आपल्या जागेवर राहील.

६८. (१) उपराष्ट्रपतिपदाची मुदत संपल्यानें रिकाम्या होणाऱ्या जागेची ती मुदत संपण्यापूर्वी निवडणुक होईल.

(२) उपराष्ट्रपतिपदाची जागा जर मृत्यूमुळें, राजीनाम्यामुळें, पदच्युतीमुळें किंवा अन्य कारणामुळें रिकामी झाली असेल तर ती जागा भरून काढण्याकरितां करावयाची निवडणूक ही ती जागा रिकामी झाल्यापासून शक्य तितक्या लवकर करावी, आणि जी व्यक्ति सदर रिकाम्या जागेवर निवडून आली असेल तर त्या व्यक्तीला ६७ व्या कलमांतील तरतुदीनुसार अधिकारस्वीकारापासून पांच वर्षांचे संपूर्ण मुदतीपर्यंत उपराष्ट्रपतिपदावर राहण्याचा हक्क राहील.

६९. प्रत्येक उपराष्ट्रपतीनें आपल्या जागेवर येण्यापूर्वी राष्ट्रपतिसमोर किंवा त्या करितां राष्ट्रपतीनें नेमलेल्या व्यक्तीसमोर येऊन पुढील प्रकारची शपथ घेतली पाहिजे अगर प्रतिज्ञा केली पाहिजे—

' मी, क्ष. ज्ञ. $\frac{\text{ईश्वरसाक्ष शपथ घेतों}}{\text{गंभीरपणें प्रतिज्ञा करतों}}$ कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारताच्या घटनेला सत्यनिष्ठ आणि राजनिष्ठ राहीन आणि ज्या अधिकाराचें मी ग्रहण करीत आहें त्या अधिकाराची निष्ठापूर्वक बजावणी करीन. '

७०. या प्रकरणांत सांगितलेल्या परिस्थितिव्यतिरिक्त अन्य परिस्थिति निर्माण झाल्यास त्या वेळीं राष्ट्रपतीचीं कामें कशीं केलीं जावींत यासंबंधीं पार्लमेंटनें योग्य वाटेल ती तजवीज करावी.

७१. राष्ट्रपतिच्या किंवा उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीबाबतींत कांहीं शंका अगर तंटे उपस्थित झाल्यास त्यांची चौकशी उच्चतम न्यायालयानें करावी व निकाल द्यावा. तो निकाल अखेरचा म्हणून समजला जाईल.

(२) जर एखाद्या व्यक्तीची राष्ट्रपति किंवा उपराष्ट्रपति म्हणून झालेली निवडणूक उच्चतम न्यायालयानें रद्द ठरविली तर त्या न्यायालयाच्या निकालाच्या तारखेला किंवा तारखेपूर्वी राष्ट्रपति किंवा उपराष्ट्रपति यांनीं आपल्या अधिकाराच्या व कर्तव्याच्या बजावणीसंबंधीं ज्या गोष्टी केल्या असतील त्या अशा निकालामुळें बेकायदा ठरणार नाहींत.

(३) या घटनेंतील व्यवस्थेनुसार राष्ट्रपति अथवा उपराष्ट्रपति यांच्या निवडणुकीसंबंधीं किंवा निवडणुकीविषयीं पार्लमेंट कोणत्याही गोष्टीचें कायद्यानें नियमन करील.

७२. (१) राष्ट्रपतीला दंडाची माफी, तहकुबी किंवा सूट देण्याचा किंवा पुढील कोणत्याही गुन्ह्याबद्दल एखाद्या इसमाला झालेल्या शिक्षेची अंमलबजावणी तहकूब करण्याचा, सूट देण्याचा किंवा बदल करण्याचा अधिकार असेल—(अ) लष्करी कोर्टानें केलेल्या दंडाच्या अगर दिलेल्या शिक्षेच्या बाबतींत; (ब) संघाच्या कार्यकारी सत्तेच्या कक्षेंत येणाऱ्या अशा कोणत्याही कायद्याविरुद्ध घडलेल्या गुन्ह्याबाबत दंड अगर शिक्षा झाली असेल, त्या बाबतींत; (क) जेथें शिक्षा ही फांशीचीच असेल, त्या सर्व बाबतींत.

(२) वरील उपकलम १ (अ) मध्यें कांहींहि असलें तरी भारतीय संघाच्या फौजेच्या कोणाहि अधिकाऱ्याला लष्करी कोर्टानें दिलेली शिक्षा तहकूब करण्याचा, कमी करण्याचा किंवा तिच्यांत बदल करण्याचा कायद्यानें जो अधिकार दिला आहे त्याला बाध येणार नाहीं.

(३) राज्यपाल किंवा राजप्रमुख यांना त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या कायद्यान्वयें फांशीची शिक्षा तहकूब करण्याचा, कमी करण्याचा किंवा

बदलण्याचा असलेला अधिकार वरील उपकलम १ (क) यायोगें बाधित होणार नाहीं.

७३. (१) या घटनेंतील तजविर्जीना अनुसरून संघाची कार्यकारी सत्ता पुढील मर्यादेपर्यंत विस्तारलेली असेल,—

(अ) पार्लमेंटला ज्या बाबतींत कायदे करण्याचे अधिकार आहेत त्या बाबतींत, आणि (ब) कोणत्याही करारान्वयें अगर तहनाम्यामुळें जे हक्क, अधिकार आणि अधिकारक्षेत्र भारत सरकारला मिळालीं असतील त्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतींत.

तथापि राज्याच्या कायदे मंडळालाहि तसेंच कायदे करण्याची ज्या बाबतींत सत्ता आहे अशा बाबतींत या घटनेंत स्पष्टपणें अधिकार दिला नसेल अगर पार्लमेंटनें कायदे करून अधिकार दिला नसेल तर तेथें वरील उपकलम (अ) मध्यें निर्दिष्ट केलेली संघाची कार्यकारी सत्ता परिशिष्ट १ भाग अ किंवा ब मधील राज्याला लागू होणार नाहीं.

(२) या कलमांत कांहींहि असलें तरी ही घटना अमलांत येण्यापूर्वी जर एखादें राज्य किंवा त्याचा अधिकारी अगर अधिकारी संस्था त्या राज्याकरितां ज्या बाबतींत पार्लमेंटला कायदे करण्याचा अधिकार आहे, त्या बाबतींत ही कार्यकारी सत्ता चालवीत असतील तर पार्लमेंटनें अन्य व्यवस्था करीपर्यंत ती तशीच चालवीत ठेवतील.

मंत्रिमंडळ

७४. (१) राष्ट्रपतीला त्याच्या कार्यांत मदत करण्यासाठीं आणि सल्ला देण्यासाठीं मुख्य प्रधानाच्या नेतृत्वाखालीं एक मंत्रि-मंडळ असेल.

(२) मंत्रि-मंडळानें राष्ट्रपतीला एकादा सल्ला दिला कीं नाहीं किंवा दिला असल्यास काय दिला याबाबतींत कोणत्याही न्यायालयांत चौकशी केली जाणार नाहीं.

७५. (१) मुख्य प्रधानाची नेमणूक राष्ट्रपति करील आणि इतर मंत्र्यांची नेमणूक मुख्य प्रधानाच्या सल्ल्यानें राष्ट्रपति करील.

(२) राष्ट्रपतीची मर्जी असेतोंपर्यंत हे मंत्री अधिकारपदावर राहतील.

(३) मंत्रिमंडळ हें संयुक्तपणें लोकसभागृहाला जबाबदार राहील.

(४) राष्ट्रपति हा प्रत्येक मंत्र्याला मंत्र्यानें अधिकार स्वीकारण्यापूर्वी, तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें अधिकारपदाची व गौप्यगोपनाची शपथ द्यावयास लावील.

(५) जर एखादा मंत्री सतत सहा महिनेपर्यंत पार्लमेंटच्या कोणत्याही सभागृहाचा सभासद नसेल तर ती मुदत संपतांच तो मंत्री म्हणून राहणार नाहीं.

(६) मंत्र्यांचें वेतन व भत्ते हे पार्लमेंटकडून वेळोवेळीं कायद्याप्रमाणें ठरविले जातील. आणि ते असे ठरविले जाईपर्यंत परिशिष्ट २ मध्यें निर्दिष्ट केल्याप्रमाणें रहातील.

७६. (१) जी व्यक्ति उच्चतम न्यायालयांत न्यायाधीश होण्याच्या योग्यतेची असेल त्या व्यक्तीला राष्ट्रपति भारताचा महान्यायवादी (ॲटर्नी जनरल) म्हणून नेमील.

(२) राष्ट्रपतिकडून वेळोवेळीं जीं कामें सोंपवलीं जातील अगर ज्या-बाबत सल्ला विचारला जाईल अशीं कायद्याच्या स्वरूपाचीं कामें करणें आणि भारत सरकारला त्याबाबतींत कायदेशीर सल्ला देणें हें त्या सल्लागाराचें कर्तव्य असेल. त्याचप्रमाणें या घटनेनुसार किंवा त्यावेळीं अमलांत असलेल्या कायद्यानुसार त्याच्यावर जीं कामें सोपविलीं जातील तींही त्यानें करावयाचीं आहेत.

(३) आपलीं कर्तव्यें बजावीत असतांना भारतांतील कोठल्याही कोर्टांत त्याचें म्हणणें ऐकलें जाण्याचा या सल्लागाराला हक्क आहे.

(४) हा सल्लागार राष्ट्रपतीची मर्जी असेल तोंपर्यंत अधिकारावर राहील व त्याला राष्ट्रपति ठरवील तो मोबदला मिळेल.

सरकारची कामकाजपद्धति

७७. भारत सरकारची सर्व अंमलबजावणी राष्ट्रपतीच्या नांवें केली आहे, असें स्पष्टपणें नमूद केलें जाईल.

(२) राष्ट्रपतीच्या नांवें काढलेले आणि अमलांत आणलेले हुकुम आणि पत्रक हे राष्ट्रपति करील त्या नियमांनुसार व त्या पद्धतीनें प्रमाणित मानले जातील. आणि अशा प्रकारें प्रमाणित केलेला एकादा हुकुम अगर पत्रक

हा राष्ट्रपतीनें केलेला अगर बजावलेला हुकुम अगर पत्रक नाहीं या सबबीवर त्याच्या कायदेशीरपणाबद्दल प्रश्न उपस्थित करतां येणार नाहीं.

(३) भारत सरकारचा कारभार अधिक सोईस्कर रीतीनें चालविण्याकरितां आणि त्या कारभाराची वांटणी मंत्र्यांमध्यें करून देण्याकरितां राष्ट्रपति नियम करील.

७८. मुख्य प्रधानाचें कर्तव्य पुढीलप्रमाणें असेल—

(अ) संघाच्या कारभाराबाबत आणि नवीन कायद्याच्या सूचनेसंबंधीं मंत्रीमंडळाचे सर्व निर्णय राष्ट्रपतीस कळविणें. (ब) संघाच्या कारभाराबाबत आणि सूचित कायद्याबाबत राष्ट्रपति मागेल ती माहिती पुरविणें.

(क) एखाद्या मंत्र्यानें एखाद्या गोष्टीबाबत निर्णय घेतला असेल आणि त्याचा जर मंत्रिमंडळानें विचार केला नसेल तर राष्ट्रपतीनें सांगितल्यास तो मंत्रिमंडळापुढें विचारार्थ ठेवणें.

प्रकरण २ पार्लमेंट

सर्वसामान्य

७९. संघाला एक पार्लमेंट असेल. त्यांत राष्ट्रपति आणि राज्यपरिषद (कौन्सिल ऑफ स्टेट्स्) व लोकसभा (हाउस ऑफ दि पीपल) या नांवांनीं संबोधलेलीं अनुक्रमें दोन सभागृहें असतील.

८०. (१) राज्यपरिषद पुढील सभासदांची असेल—(अ) पुढील उप-कलम ३ प्रमाणें राष्ट्रपतीनें नेमलेले बारा सभासद; (ब) २३८ पेक्षां जास्त नसलेले राज्यांचे प्रतिनिधी.

(२) चौथ्या परिशिष्टांतील त्या संबंधींच्या योजनेनुसार राज्यांच्या प्रतिनिधींकडून भरावयाच्या राज्यपरिषदेंतील जागांची वांटणी असेल.

(३) वरील उपकलम १ (अ) मध्यें सांगितल्याप्रमाणें राष्ट्रपतिकडून नेमले जाणारे सभासद हे साहित्य, विज्ञान, कला व समाजसेवा यांत विशेष ज्ञान असलेले किंवा व्यावहारिक अनुभव असलेले असतील.

(४) पहिल्या परिशिष्टाच्या भाग अ किंवा ब मध्यें नमूद केलेल्या प्रत्येक राज्यांचे राज्यपरिषदेंतील प्रतिनिधी प्रमाणशीर मतदानपद्धतीनें क्रमदेय एक

मतदानानें त्या राज्यांतील निवडून आलेल्या विधानसभेंतील सभासदांकडून निवडले जातील.

(५) पहिलें परिशिष्ट, भाग क मधील राज्यांचे राज्यपरिषदेंतील प्रतिनिधी हे पार्लमेंट ठरवील त्या कायद्यानुसार निवडले जातील.

८१. (१) (अ) कलम ८२ आणि कलम ३३१ मधील तजविजींना अनुसरून लोकसमागृहामध्यें राज्यांतील मतदारांनीं प्रत्यक्ष निवडलेले सभासद ५०० पेक्षां जास्त असणार नाहींत; (ब) पोटकलम (अ) करतां राज्यांची प्रादेशिक मतदार संघांत विभागणी केली जाईल, गट केले जातील किंवा स्थापले जातील; आणि अशा प्रत्येक मतदार-संघाला जी सभासद-संख्या वांटून द्यावयाची ती अशा रीतीनें ठरविली जाईल कीं प्रत्येक ७,५०,००० लोकसंख्येला एकापेक्षां कमी सभासद असणार नाहीं आणि प्रत्येक ५,००,००० लोकसंख्येला एकापेक्षां अधिक सभासद असणार नाहींत, (क) प्रत्येक प्रादेशिक मतदार संघाला जी सभासद संख्या वांटून दिली असेल तिचें त्या मतदार संघांतील लोकसंख्येचें जें प्रमाण असेल तें सर्व भारतांत शक्यतोंवर सारखेंच असेल. अगोदरच्या खानेसुमारींत प्रसिद्ध झालेले लोकसंख्येचे जे आंकडे असतील तेच शक्यतोवर या लोकसंख्येकरतां म्हणून धरले जातील.

(२) जे विभाग भारताच्या प्रदेशांत असतील पण जे कोठल्याहि राज्यांत समाविष्ट झाले नसतील त्यांना द्यावयाचें प्रतिनिधित्व पार्लमेंट कायद्यानें ठरवील.

(३) प्रत्येक खानेसुमारी पुरी झाल्यावर लोकसभागृहांतील निरनिराळ्या प्रादेशिक मतदार संघाच्या प्रतिनिधित्वाची पुनर्घटना पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्या अधिकाऱ्यामार्फत, त्या रीतीनें व त्या तारखेपासून होईल. मात्र ही पुनर्घटना विद्यमान सभागृह विसर्जित झालें नाहीं तोंपर्यंत त्या लोकसभागृहांतील प्रतिनिधित्वाला बाधक होणार नाहीं.

८२. कलम ८१ (१) मध्यें कांहींहि असलें तरी पहिलें परिशिष्ट, भाग क मधील कोणत्याहि राज्याला किंवा जे प्रदेश भारतांत आहेत पण ज्यांचा अंतर्भाव कोणत्याहि राज्यांत झाला नाहीं, त्यांच्या प्रतिनिधित्वाकरतां त्या

कलमांत सांगितलेला प्रकार किंवा तत्त्व यापेक्षां अन्य रीतीनें पार्लमेंटला कायदा करून योजना करतां येईल.

८३. (१) राज्य-परिषद बरखास्त होणार नाहीं; पण त्या गृहाचे जवळ जवळ $\frac{1}{3}$ इतके सभासद दर दोन वर्षांचे शेवटीं पार्लमेंट कायदा करून ठरवील त्याप्रमाणें निवृत्त होतील.

(२) अगोदर बरखास्त झालें नाहीं तर लोकसभागृह आपल्या पहिल्या बैठकीकरतां ठरविलेल्या तारखेपासून पांच वर्षांपेक्षां अधिक काळ चालूं राहणार नाहीं. ही पांच वर्षांची मुदत संपतांच तें सभागृह बरखास्त झालें असें समजण्यांत येईल.

तथापि आणीबाणीच्या परिस्थितीचा जाहिरनामा अमलांत असेपर्यंत ही मुदत पार्लमेंटला कायदा करून एक वर्षापेक्षां एका वेळीं अधिक वाढवितां येणार नाहीं; आणि आणीबाणीचा जाहिरनामा रद्द झाल्यानंतर सहा महिन्यांपेक्षां जास्त काळ ही मुदत केव्हांहि वाढवितां येणार नाहीं.

८४. पार्लमेंटमधील जागा भरून काढण्याकरतां एकादी व्यक्ति पुढील अटी पुऱ्या करीत नसेल तर निवडून येण्याकरतां ती लायक समजली जाणार नाहीं—(अ) भारताचा नागरिक असणें. (ब) राज्यपरिषदेकरतां तीस वर्षांपेक्षां कमी वय नसणें व लोकसभेकरतां पंचवीस वर्षांपेक्षां कमी वय नसणें, आणि (क) यासंबंधीं पार्लमेंट एकाद्या कायद्यानें किंवा कायद्याखालीं जी अन्य लायकी ठरवील ती असणें.

८५. (१) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या प्रत्येक वर्षीं दोनदां तरी बैठकी बोलाविल्या जातील. मागील अधिवेशनांतील शेवटच्या बैठकीची तारीख व पुढील अधिवेशनाच्या सुरुवातीची तारीख यामध्यें सहा महिन्यांपेक्षां जास्त काळ जातां कामा नये.

(२) वरील उपकलम (१) ला अनुसरून राष्ट्रपतीला वेळोवेळीं (अ) त्याला योग्य वाटेल त्या वेळीं व स्थळीं दोन्ही किंवा एका सभागृहाची बैठक बोलावितां येईल; (ब) सभागृहें स्थगित करतां येतील; (क) लोकसभागृह बरखास्त करतां येईल.

८६. (१) राष्ट्रपतीला एका सभागृहापुढें किंवा दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक घेऊन त्यांच्यापुढें भाषण करतां येईल. आणि त्याकरतां तो सभासदांना हजर राहण्यास सांगेल.

(२) पार्लमेंटमध्यें विचाराकरतां आलेल्या एकाद्या बिलाबद्दल किंवा अन्य प्रश्नाबद्दल राष्ट्रपतीला कोणत्याहि सभागृहाकडे संदेश पाठवितां येईल आणि ज्या सभागृहाकडे ज्या बाबींच्या विचारांकरतां हा संदेश आला असेल तें सभागृह शक्य तितक्या सोयीस्कर तांतडीनें त्या संदेशांतील बाबींचा विचार करील.

८७. (१) प्रत्येक अधिवेशनाच्या प्रारंभीं पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकींत राष्ट्रपति भाषण करील आणि ती बैठक बोलावण्याचीं कारणें पार्लमेंटला निवेदन करील.

(२) राष्ट्रपतीनें आपल्या भाषणांत ज्या बाबींचा उल्लेख केला असेल त्या बाबींना सभागृहापुढें असलेल्या इतर बाबींपेक्षां चर्चेकरतां वेळ व वेळेचा अग्रक्रम दिला जावा अशा संबंधीची तजवीज सभागृहांच्या कार्यप्रणालीच्या नियमांत असेल.

८८. प्रत्येक मंत्र्यास आणि महान्यायवादीस (ॲटर्नी जनरल) कोणत्याहि सभागृहांत, त्यांच्या संयुक्त बैठकींत आणि पार्लमेंटच्या एकाद्या कमिटींत जर त्याला सभासद म्हणून घेतलें असलें तर तेथें भाषण करण्याचा व अन्य रीतीनें भाग घेण्याचा हक्क असेल. मात्र या कलमाच्या आधारावर त्याला मतदानाचा हक्क असणार नाहीं.

पार्लमेंटचे अधिकारी

८९. (१) भारताचा उपराष्ट्रपति हा राज्यपरिषदेचा पदासिद्ध सभापति असेल.

(२) राज्यपरिषद शक्य तितक्या लौकर आपल्या सभासदांतून उपसभापतीची निवड करील आणि पुढेंहि ज्या ज्या वेळीं ही उपसभापतीची जागा रिकामी होईल त्या त्या वेळीं दुसऱ्या उपसभापतीची आपल्यांतून निवड करील.

९०. राज्यपरिषदेच्या उपसभापतिपदावर असलेला सभासद—(अ) जर त्याचें राज्यपरिषदेंतील सभासदत्व संपलें तर आपली जागा खाली करील; (ब) सभापति स्वतःच्या सहीनें पत्र लिहून केव्हांहि राजीनामा देऊं शकेल; (क) राज्यपरिषदेच्या त्या वेळच्या सभासदांनीं बहुमतानें ठराव केल्यास तो अधिकारावरून काढून टाकला जाऊं शकेल. मात्र या पोटकलम (क)-करितां कोणताहि ठराव, ठरावाचा हेतु व्यक्त करणारी चौदा दिवसांची नोटिस दिल्याशिवाय पुढें आणतां येणार नाहीं.

९१. (१) सभापतीची जागा रिकामी असतांना किंवा उपराष्ट्रपति हा राष्ट्रपति म्हणून काम करीत असतांना सभापतीच्या जागेचें काम उपसभापति करील; अथवा तीहि जागा रिकामी असल्यास राष्ट्रपति त्या जागीं राज्यपरिषदेंतील ज्या सभासदाला नेमील तो करील.

(२) राज्यपरिषदेच्या एकाद्या बैठकीला सभापति गैरहजर असेल तर उपसभापति किंवा तोहि गैरहजर असेल तर राज्यपरिषद कामकाजाकरतां ठरवील त्या नियमान्वयें असणारी व्यक्ति आणि तीहि व्यक्ति हजर नसेल तर परिषद ठरवील ती व्यक्ति सभापति म्हणून काम करील.

५२. (१) राज्यपरिषदेच्या ज्या बैठकींत उपराष्ट्रपतीला त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव विचाराकरतां असेल त्या बैठकींत सभापति हजर असूनहि त्या बैठकीचा सभापति होणार नाहीं. त्याचप्रमाणें उपसभापतीला त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव विचारांकरतां आला असेल तर उपसभापति हजर असूनहि त्या बैठकीचा सभापति होणार नाहीं. उपकलम ९१ (२) मधील तरतुदी ह्या, ज्या बैठकीला सभापति अगर उपसभापति गैरहजर असतील त्या, अशा बैठकीला लागू होतील.

(२) उपराष्ट्रपतीला त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव ज्या वेळीं राज्यपरिषदेंत विचाराकरतां असेल वेळीं सभापतीला तेथें भाषण करण्याचा आणि अन्य रीतीनें कामकाजांत भाग घेण्याचा हक्क असेल; पण कलम १०० मध्यें कांहींहि असलें तरी त्याला त्या ठरावावर अगर त्या वेळच्या तसल्या कामकाजांतील एकाद्या बाबीवर मत देण्याचा बिलकुल हक्क नसेल.

९३. लोकसभागृह, शक्य तितक्या लौकर त्या सभागृहांतील दोन सभासद अध्यक्ष (स्पीकर) व उपाध्यक्ष (डेप्युटी स्पीकर) म्हणून निवडील. ज्या ज्या वेळीं अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची जागा रिकामी होईल त्या त्या वेळीं तें सभागृह दुसरे सभासद त्या त्या जागेकरतां निवडील.

९४. लोकसभागृहाच्या अध्यक्ष किंवा उपाध्यक्षपदावर असलेला सभासद—(अ) जर त्याचें लोकसभागृहांतील सभासदत्व संपेल तर आपली जागा रिकामी करील; (ब) अध्यक्षानें उपाध्यक्षाला किंवा उपाध्यक्षानें अध्यक्षाला स्वदस्तुरचें पत्र पाठवून केव्हांहि राजीनामा देऊं शकेल; (क) त्यांना त्यांच्या जागेवरून त्यावेळीं असलेल्या सभासदांच्या बहुमतानें काढून टाकतां येईल. मात्र पोटकलम (क) करतां कोणताहि ठराव १४ दिवसांची ठरावाचा हेतु व्यक्त करणारी नोटीस दिल्याशिवाय आणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्या ज्या वेळीं लोकसभागृह बरखास्त केलें जाईल त्या त्या वेळीं त्या बरखास्तीनंतर त्या सभागृहाच्या पहिल्या बैठकीपूर्वीं अध्यक्षानें आपली जागा रिकामी करावयाची नाहीं.

९५. (१) अध्यक्षाची जागा रिकामी असेल तेव्हां उपाध्यक्ष त्याचीं कामें करील आणि जर उपाध्यक्षाची जागा रिकामी असेल तर त्याकरतां राष्ट्रपति लोकसभागृहांतील ज्या सभादाची नेमणूक करील तो सभासद तीं कामें करील.

(२) लोकसभागृहाच्या एकाद्या बैठकींतील अध्यक्षाच्या गैरहजेरींत उपाध्यक्ष आणि तोहि गैरहजर असल्यास सभागृहाच्या कामाच्या नियमांप्रमाणें जी व्यक्ति ठरविली जाईल ती किंवा तीहि व्यक्ति हजर नसेल तर सभागृह ठरवील ती व्यक्ति अध्यक्ष म्हणून काम करील.

९६. (१) लोकसभागृहाच्या ज्या बैठकींत अध्यक्षाला त्याच्या जागेवर काढून टाकण्याचा ठराव विचाराकरतां आला असेल त्या बैठकींत अध्यक्ष हजर असूनहि तो त्या बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम करणार नाहीं. त्याचप्रमाणें उपाध्यक्षाला त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव विचाराकरितां असेल तर उपाध्यक्ष सदर सभेला हजर असूनहि अध्यक्ष होऊं शकणार

नाहीं. कलम ९५ (२) मधील तजविजी ज्या बैठकीला अध्यक्ष अगर उपाध्यक्ष गैरहजर असतील त्या अशा बैठकीला लागू होईल.

(२) अध्यक्षाला त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव ज्यावेळीं लोकसभागृहामध्यें विचाराकरतां आला असेल त्यावेळीं त्याला त्या ठरावावर बोलण्याचा व अन्य रीतीनें कामकाजांत भाग घेण्याचा हक्क असेल. आणि कलम १०० मध्यें कांहींहि असलें तरी त्याला तशा ठरावावर किंवा त्या वेळच्या त्या कामकाजांतील अन्य बाबींवर एकदांच मत देण्याचा हक्क असेल. पण जर मतदान समसमान झालें असेल तर त्याला मताचा अधिकार असणार नाहीं.

९७. राज्यपरिषदेचा सभापति व उपसभापति व लोकसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना पार्लमेंट कायद्यानें ठरवील तें वेतन व भत्ते अनुक्रमें मिळतील. अशी योजना होईपर्यंत त्यांना दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेलें वेतन व भत्ते मिळतील.

९८. (१) पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहाला स्वतंत्र कारभारी मंडळ (सेक्रेटॅरिअल स्टाफ) असेल. या कलमामुळें पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांना समान असणाऱ्या जागा निर्माण करण्याला प्रत्यवाय येतो असा याचा अर्थ केला जाणार नाहीं.

(२) पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाचें जें कारभारीमंडळ नेमावयाचें असेल, त्यांतील व्यक्तींच्या भरतीचें व नोकरीच्या शर्तींचें पार्लमेंट कायद्यानें नियमन करील.

(३) वरील उपकलम (२) प्रमाणें पार्लमेंटकडून ती व्यवस्था होईपर्यंत राष्ट्रपति, राज्यपरिषदेचे सभापति व लोकसभेचे अध्यक्ष यांच्या सल्ल्यानें ती व्यवस्था नियम करून करूं शकतील. आणि ते नियम या उपकलमाप्रमाणें केलेल्या कायद्याच्या तरतुदींना अनुसरून परिणामकारक होतील.

कार्यपद्धति

९९. कोणत्याहि सभागृहाच्या प्रत्येक सभासदानें स्थानापन्न होण्यापूर्वी राष्ट्रपतीसमोर अगर त्यानें नेमलेल्या व्यक्तीसमोर तिसऱ्या परिशिष्टांत त्या-

साठीं दिलेल्या नमुन्यानुसार शपथ अगर प्रतिज्ञा घेतली पाहिजे किंवा केली पाहिजे.

१००. (१) या घटनेंत केलेल्या अन्य व्यवस्थेव्यतिरिक्त सर्व प्रश्नांचा निर्णय कोणत्याहि सभागृहाच्या बैठकींत अगर दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकींत हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांच्या बहुमतानें होईल. मात्र ह्या मतदानांत सभापतीला अगर अध्यक्ष म्हणून काम करीत असेल त्या व्यक्तीला मत देतां येणार नाहीं.

सभापति अगर अध्यक्ष अगर त्या जागीं काम करणारी व्यक्ति पहिल्यांदां मत देणार नाहीं; पण जर मतमोजणीनंतर मतें समसमान पडलेलीं दिसलीं तरच त्यांना निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल व तो ते बजावतील.

(२) एकाद्या सभागृहांत एकादी जागा रिकामी असली तर त्या सभागृहाला काम चालविण्याचा अधिकार राहील. तसेंच एकादी व्यक्ति अनधिकारानें सभागृहांत बसली, तिनें मत दिलें किंवा अन्य रीतीनें, तिनें कामकाजांत भाग घेतला असें मागाहून निदर्शनास आलें, तरी पार्लमेंटचें काम-काज कायद्यानुरूप झालें नाहीं असें ठरणार नाहीं.

(३) पार्लमेंट कायदा करून निराळी योजना करीपर्यंत कोणत्याहि सभागृहांतील एकूण सभासदांच्या एक-दशांश इतकी गणपूर्ति असेल.

(४) सभागृहाची बैठक चालूं असतांना केव्हांहि गणपूर्ति नसेल तर सभापति किंवा अध्यक्ष किंवा जो तें काम करीत असेल त्याचें कर्तव्य बैठक पुढें ढकलण्याचें अगर गणपूर्ति होईपर्यंत सभा तहकूब ठेवण्याचें आहे.

सभासदांची अपात्रता

१०१. (१) कोणत्याहि एका व्यक्तीला पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांचें सभासद होतां येणार नाहीं. जो दोन्ही सभागृहांचा सभासद म्हणून निवडून येईल त्यानें एका अगर दुसऱ्या सभागृहांतील जागा रिकामी करावी याबद्दल पार्लमेंट कायद्यानें योजना करील.

(२) कोणतीहि व्यक्ति पार्लमेंटची व पहिल्या परिशिष्टांतील भाग अ किंवा ब मध्यें सांगितलेल्या राज्यांच्या कायदेमंडळांची, सभासद असणार नाहीं. आणि जर एकादी व्यक्ति या दोहोंची सभासद म्हणून निवडून आली

असेल व राष्ट्रपतीनें नियम करून ठरविलेल्या मुदतीअखेर त्या व्यक्तीनें जर पूर्वीच आपल्या राज्याच्या कायदेमंडळांतील जागेचा राजीनामा दिला नसेल तर, त्या व्यक्तीची पार्लमेंटमधील जागा रिकामी होईल.

(३) उभय सभागृहांचा एकादा सभासद जर (अ) कलम १०२ (१) यांत सांगितलेल्या अपात्रतेंत येत असेल, किंवा (ब) तो स्वतःच्या सहीनें सभापति किंवा अध्यक्ष यांना आपण आपल्या जागेचा राजीनामा दिल्याचें कळवील, तर त्याची जागा रिकामी होईल.

(४) जर पार्लमेंटच्या उभय सभागृहांपैकीं कोणत्याहि सभागृहांत एकादा सभासद गृहाची परवानगी न घेतां साठ दिवस सर्व सभांना गैरहजर असेल तर गृह त्याची जागा रिकामी झाल्याचें जाहीर करील. मात्र ही साठ दिवसांची मुदत मोजतांना जर सभागृह लागोपाठ चार दिवस स्थगित झालें असेल किंवा तें अधिवेशन समाप्त झालें असेल तर तो काळ हिशेबांत धरला जाणार नाहीं.

१०२. (१) पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाची सभासद होण्यास अगर निवडून येण्यास एकादी व्यक्ति—(अ) जर भारत सरकारच्या किंवा राज्यसरकारच्या अधिकाराखालीं प्राप्ती असणाऱ्या जागेवर असेल आणि सदर जागा पार्लमेंटनें कायद्यानें अपात्रता आणणारी नाहीं असें ठरविलें नसेल तर; (ब) जर ती व्यक्ति वेडी असेल आणि योग्य कोर्टानें तशी ठरविली गेली असेल तर; (क) जर ती व्यक्ति मुक्त न झालेली नादार असेल तर; (ड) जर ती व्यक्ति भारताची नागरिक नसेल किंवा जर तिनें स्वेच्छेनें परक्या राष्ट्राचें नागरिकत्व संपादन केलें असेल किंवा जर ती व्यक्ति परक्या राष्ट्राशीं निष्ठेनें बांधली असेल किंवा संबंधित असेल तर; (ई) पार्लमेंटनें केलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें किंवा कायद्याखालीं जर ती व्यक्ति अपात्र ठरविली गेली असेल तर;

ती व्यक्ति अपात्र होईल.

(२) जर एकादी व्यक्ति भारत सरकार किंवा राज्य सरकार यांच्यामध्यें संघाच्या किंवा राज्याच्या मंत्रिपदावर असेल तर ती व्यक्ति या कलमाखालीं प्राप्तीच्या अधिकारावर आहे असें समजलें जाणार नाहीं.

१०३. (१) पार्लमेंटच्या एकाद्या सभागृहाचा सभासद हा कलम १०२ (१) याअन्वयें अपात्र आहे किंवा नाहीं असा प्रश्न निर्माण झाल्यास तो प्रश्न राष्ट्रपतीकडे निकालाकरितां सोंपविला जाईल आणि तो निकाल अखेरचा असेल.

(२) अशा प्रश्नाचा निर्णय देण्यापूर्वी राष्ट्रपति निवडणूक मंडळाचें मत मिळवील आणि त्या मताप्रमाणें तो चालेल.

१०४. जर एकादी व्यक्ति ९९ कलमांतील अटी पूर्ण न करतां पार्लमेंटच्या सभागृहांचा सभासद म्हणून बसेल अगर मत देईल किंवा आपण लायक नाहीं असें तिला ठाऊक असेल किंवा त्या सभासदत्वाकारितां ती अपात्र ठरविली गेली असेल अगर पार्लमेंटनें कायदा करून तसें करण्यास (सभागृहांत बसण्यास व मत देण्यास) तिला मनाई केली असेल तर ती व्यक्ति ज्या प्रत्येक दिवशीं पार्लमेंटमध्यें बसेल व मत देईल त्या प्रत्येक दिवशीं तिला रु. ५०० दंड द्यावा लागेल. हा दंड संघाचें देणें म्हणून त्या व्यक्तीकडून वसूल केला जाईल.

पार्लमेंटच्या सभासदांचे अधिकार, सवलती व संरक्षणें

१०५. (१) या घटनेंतील तरतुदी आणि पार्लमेंटच्या कामकाजाच्या नियमनाकरतां केलेले नियम आणि स्थायी आदेश यांना अनुसरून पार्लमेंटमध्यें भाषणस्वातंत्र्य राहील.

(२) पार्लमेंटच्या एकाद्या सभासदानें पार्लमेंटमध्यें किंवा पार्लमेंटच्या एकाद्या कमिटीमध्यें कांहीं भाषण केलें किंवा मत दिलें असलें तरी त्याबद्दल कोर्टांत त्याच्याविरुद्ध काम चालवितां येणार नाहीं. पार्लमेंटच्या कोणत्याहि सभासदांतील वृत्तान्त, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजाची नोंद ही पार्लमेंटनें किंवा पार्लमेंटच्या हुकमानें प्रसिद्ध केली असेल तर त्या व्यक्तीविरुद्ध कोर्टांत काम चालवितां येणार नाहीं.

(३) इतर बाबतींत पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहाचें आणि त्याच्या सभासदांचे तसेंच प्रत्येक सभागृहाच्या कमिट्यांचे हक्क, सवलती, संरक्षणें, पार्लमेंट वेळोवेळीं कायदा करून ठरवील तशीं असतील आणि तोंपर्यंत

युनायटेट किंग्डमचें कॉमन्स सभागृह, सभासद आणि कमिट्या यांना जे हक्क या घटनेच्या सुरुवातीस असतील ते येथेंहि लागू होतील.

(४) ज्यांना या घटनेप्रमाणें पार्लमेंट किंवा कोणतीहि कमिटी यांच्यापुढें भाषण करण्याचा आणि अन्य रीतीनें कामांत भाग घेण्याचा अधिकार दिला आहे त्यांनाहि पार्लमेंटच्या सभासदांना उपकलम (१), (२) व (३) मध्यें दिलेले हक्क प्राप्त होतील.

१०६. पार्लमेंटच्या उभय सभागृहांतील सभासदांना पार्लमेंट वेळोवेळीं कायदा करून ठरवील तें वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क आहे; आणि तशी व्यवस्था होईपर्यंत हिंदी घटनापरिषदेंतील सभासदांना ही घटना सुरू होण्यापूर्वी ज्या प्रमाणांत आणि ज्या शर्तींवर भत्ते मिळत होते ते तसेच मिळूं शकतील.

कायदेमंडळांतलि कार्यपद्धति

१०७. (१) पैशांच्या व इतर अर्थबिलासंबंधीं कलम १०९ व कलम ११७ मध्यें जी तरतूद केली आहे तिला अनुसरून कोणतेंहि बिल कोणत्याहि सभागृहांत आणतां येईल.

(२) कलम १०८ व १०९ यांतील तजविजीनुरूप एकादें बिल जर तें दोन्ही सभागृहांनीं उपसूचनेशिवाय किंवा दोन्ही सभागृहांनीं संमति दिलेल्या उपसूचनांसह मान्य केलें नसेल तर तें पार्लमेंटच्या सभागृहांनीं पास केलें असें मानलें जाणार नाहीं.

(३) पार्लमेंटपुढें विचाराकरतां असलेलें बिल पार्लमेंटचें अधिवेशन स्थगित झालें तरी तें रद्द होणार नाहीं.

(४) राज्यपरिषदेपुढें असलेलें आणि लोकसभागृहानें पास न केलेलें बिल लोकभागृह जरी बरखास्त झालें तरी रद्द होणार नाहीं.

(५) लोकसभागृहापुढें असलेलें किंवा लोकसभागृहानें पास केलेले व राज्यपरिषदेपुढें चालू असलेलें बिल १०८ कलमांतील व्यवस्थेनुसार लोकसभागृह विसर्जित झाल्यानंतर रद्द होईल.

१०८. (१) एका गृहानें पास केलेलें बिल दुसऱ्या गृहाकडे पाठविल्यानंतर जर तें (अ) दुसऱ्या गृहानें फेटाळून लावलें; किंवा (ब) त्या बिलांत

करावयाच्या दुरुस्त्यासंबंधीं उभय सभागृहांत अखेरचा मतभेद झाला; किंवा (क) दुसऱ्या सभागृहाकडे आलेल्या बिलाला सहा महिन्यांपेक्षां अधिक काळ लोटला असूनहि त्या सभागृहानें तें बिल पास केलें नाहीं;

आणि जर तें बिल लोकसभागृहाच्या विसर्जनामुळें रद्द झालें नसेल तर, राष्ट्रपति सभागृहांच्या बैठका चालू असल्यास संदेश पाठवून किंवा त्या चालू नसल्यास तसें जाहीर निवेदन करून त्या बिलावर संयुक्त बैठकींत चर्चा व मतदान व्हावें म्हणून ती बैठक बोलावण्याचा आपला उद्देश कळवूं शकेल:

मात्र या कलमांतील कोणतीहि बाब पैशांच्या बिलांना लागू नाहीं.

(२) उपकलम (१) मधील सहा महिन्यांचा काळ मोजतांना ज्या सभागृहाचा पोटकलम (क) उल्लेख केला आहे तें सभागृह लागोपाठ चार दिवस स्थगित झालें असेल किंवा त्याचें अधिवेशन स्थगित झालें असेल तर तो काळ विचारांत घेतला जाणार नाहीं.

(३) उपकलम (१) प्रमाणें जर राष्ट्रपतीनें सभागृहांना एकत्र बोलाव-ण्याचा आपला उद्देश जाहीर केला असेल तर कोणतेहि सभागृह त्या बिलाची पुढील चर्चा चालूं ठेवणार नाहीं. पण राष्ट्रपति आपल्या जाहीर-नाम्याच्या तारखेनंतर केव्हांहि सभागृहांना जाहीरनाम्यांत व्यक्त केलेल्या कारणांसाठीं एकत्र बैठकीकरतां बोलावतील व त्यांनीं तसें बोलावलें तर सभागृहाची तशी बैठक होईल.

(४) दोन सभागृहांच्या संयुक्त बैठकींत जर तें बिल आलेल्या व मान्यता मिळालेल्या उपसूचनासह दोन्ही सभागृहांच्या एकूण हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांच्या बहुमतानें पास झालें तर तें उभय सभा-गृहांनीं पास केलें असें या घटनेनुसार समजलें जाईल.

तथापि (अ) जर एका सभागृहानें पास केलेलें बिल दुसऱ्या सभागृहानें उपसूचनांसह पास न करतां मूळ बिलच त्या सभागृहाकडे परत पाठविलेलें असेल तर त्यावर या जोड बैठकींत विलंबामुळें कांहीं आवश्यक झालेल्या उपसूचनाव्यतिरिक्त अन्य उपसूचना आणतां येणार नाहींत. (ब) जर तें बिल अशा रीतीनें पास होऊन परत आलें असेल तर त्या बिलाला फक्त वर सांगितलेल्या उपसूचना संयुक्त सभेंत आणतां येतील. त्याचप्रमाणें ज्या बाबीवर उभय सभागृहांत एकमत झालें नसेल अशा समर्पक बाबीवर संयुक्त

सभेंत उपसूचना आणतां येतील. जी व्यक्ति त्या सभेंत अध्यक्ष असेल त्या व्यक्तीचा या उपसूचनांना या कलमान्वयें परवानगी देण्याचा निर्णय अखेरचा मानला जाईल.

(५) राष्ट्रपतीनें संयुक्त बैठक बोलावावयाचा आपला हेतू जाहीर केल्यानंतर जरी लोकसभागृह बरखास्त झालेले असलें तरी या कलमान्वयें संयुक्त बैठक भरूं शकेल व तींत तें बिल पास होऊं शकेल.

१०९. (१) पैशाचें बिल राज्यपरिषदेंत आणलें जाणार नाहीं.

(२) पैशासंबंधीचें बिल लोकसभागृहानें पास केल्यानंतर राज्यपरिषदेकडे शिफारशीकरतां पाठविलें जाईल. तें सभागृह सदर बिल पोंहोंचलेल्या तारखेपासून चौदा दिवसांचे आंत आपल्या शिफारशींसह तें बिल लोकसभागृहाकडे परत पाठवील व लोकसभागृह त्यांच्या सर्व अगर कांहीं शिफारशी मान्य अगर अमान्य करील.

(३) जर लोक सभागृहानें राज्यपरिषदेच्या शिफारशींपैकीं कांहीं मान्य केल्या तर तें पैशाचें बिल शिफारस केलेल्या व लोकसभागृहानें मान्यता दिलेल्या उपसूचनांसह उभय सभागृहांनीं मान्य केले असें समजलें जाईल.

(४) जर लोकसभागृहानें राज्यपरिषदेची कोणतीच शिफारस मान्य केली नाहीं तर पैशासंबंधीचें तें बिल शिफारस केलेल्या कोणत्याहि उपसूचनेशिवाय ज्या स्वरूपांत लोकसभागृहांनीं पास केलें असेल त्या स्वरूपांत तें दोन्ही सभासदांनीं पास केलें असें समजलें जाईल.

(५) जर पैशासंबंधीचें लोकसभागृहानें पास केलेलें व राज्यपरिषदेच्या शिफारशीकरतां पाठविलेले बिल वरील १४ दिवसांच्या आंत लोकसभागृहाकडे परत आलें नाहीं तर लोकसभागृहानें तें ज्या स्वरुपांत पास केलें असेल त्या स्वरुपांत तें दोन्ही सभागृहांनीं पास केलें असें सदर मुदत संपतांच समजले जाईल.

११०. (१) ज्या बिलांत खालील एका किंवा सर्व बाबींचा अंतर्भाव असेल तें या प्रकरणापुरतें पैशाचें बिल समजलें जाईल—(अ) कोणताहि कर बसविणें, रद्द करणें, कमी करणें, बदलणें अगर त्याचें नियमन करणें; (ब) कर्ज उभारण्याच्या बाबतींत नियमन करणें किंवा भारत सरकारनें एकादी हमी देणें किंवा त्या सरकारनें घेतलेल्या किंवा व्यावयाच्या जाबाबदाऱ्यांच्या

बाबत कायद्यांत दुरुस्ती करणें; (क) भारताच्या संचित निधीचें (कन्सॉलिडेटेड फंड) अगर सादिलवार निधीचे (कॉंटिंजन्सी फंड) रक्षण, असल्या निधींत पैशाचा भरणा करणें किंवा ते काढणें; (ड) संचित निधींतून पैशांचा विनियोग करणें; (ई) कोणताहि खर्च भारताच्या संचित निधीतून लादलेला खर्च आहे असें जाहीर करणें किंवा अशा खर्चाची रक्कम वाढविणें; (फ) भारताच्या संचित निधीचे खातीं किंवा सार्वजनिक हिशेबाच्या (कन्सॉलिडेटेड फंड व पब्लिक अकौंट) खातीं रक्कम स्वीकारणें किंवा अशा पैशाचे रक्षण करणें किंवा खर्च करणें किंवा संघाच्या अगर राज्यांच्या हिशेबाची तपासणी करणें; किंवा (ग) पोट-कलम (अ) ते (फ) पर्यंतच्या बाबींसंबंधीं इतर प्रासंगिक गोष्टी करणे.

(२) एकाद्या बिलांत दंड बसविण्याची किंवा आर्थिक शासनाची तरतूद आहे किंवा केलेल्या कामाबद्दल किंवा परवान्याबद्दल पैशाची मागणी किंवा भरणा आहे किंवा त्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांना किंवा मंडळांना स्थानिक कामाकरतां कर बसविण्याची, रद्द करण्याची, कमी करण्याची, बदलण्याची किंवा नियमन करण्याची तरतूद केली आहे एवढ्याकरतां तें पैशाचें बिल आहे असें मानले जाणार नाहीं.

(३) एकादें बिल पैशाचें आहे किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाल्यास लोकसभागृहाच्या अध्यक्षांचा त्यावरील निर्णय अखेरचा असेल.

(४) जेव्हां एकादें पैशाचें बिल कलम १०९ प्रमाणें राज्यपरिषदेकडे पाठविलें जाईल आणि कलम १११ प्रमाणें राष्ट्रपतीच्या संमतीकरतां सादर केलें जाईल त्यावेळीं तशा प्रत्येक बिलावर लोकसभागृहाच्या अध्यक्षाच्या, हें पैशाचें बिल आहे, असा त्याच्या सहीचा शेरा असेल.

१११. जेव्हां एकादें बिल दोन्ही सभागृहें पास करतील तेव्हां तें राष्ट्रपतीपुढें सादर करण्यांत येईल आणि राष्ट्रपति त्या बिलाला 'मान्यता देतों अगर देत नाहीं' असें जाहीर करतील.

मान्यतेकरतां आलेलें बिल जर पैशाचें बिल नसेल तर तें आल्यापासून शक्य तितक्या लौकर आपल्या संदेशांत सर्व बिलाचा किंवा त्यांतील निर्दिष्ट योजनांचा सभागृहांना फेरविचार करण्याबद्दल राष्ट्रपति विनंति करतील; आणि विशेषतः त्या संदेशांत ज्या शिफारशी असतील त्यांचा सभागृहांनीं

योग्य त्या उपसूचना आणवून बिलांत अंतर्भाव करण्याची इष्टता विचारांत घ्यावी असें सांगतील; अध्यक्षांकडून अशा प्रकारें परत आलेल्या बिलांचा त्या दृष्टीनें सभागृहें फेरविचार करतील. त्यानंतर तें बिल जर उपसूचनांसह अगर उपसूचनाशिवाय सभागृहांनीं पास केलें व अध्यक्षांकडे मान्यतेकरतां पाठविलें तर अध्यक्ष आपली मान्यता नाकारणार नाहींत.

अर्थविषयक कार्यपद्धति

११२. (१) प्रत्येक अर्थवर्षासाठीं त्या सालाचें भारत सरकारचें अंदाजी जमाखर्च पत्रक दोन्ही सभागृहापुढें ठेवण्यास अध्यक्ष सांगतील. त्याला या भागांत वार्षिक अंदाजपत्रक म्हटलें आहे.

(२) या अंदाजपत्रकांत अंतर्भूत खर्चांच्या अंदाजाच्या पुढील बाबी स्वतंत्रपणें दाखविल्या जातील—(अ) या घटनेंत भारताच्या संचित निधीवर (कन्सॉलिडेटेड फंड) लादलेला खर्च असें ज्याला म्हटलें आहे तो भागविण्याकरतां लागणाऱ्या रकमा; आणि (ब) त्या निधींतून जो इतर खर्च करावयाचें योजिलें असेल तो भागविण्याकरतां लागणाऱ्या रकमा;

तसेंच उत्पन्नांतील (रेव्हेन्यू) हिशेबाचा खर्च इतर खर्चापासून निराळा दाखविला जाईल.

(३) खालील खर्च हा संचित निधीवर लादलेला खर्च असेल—(अ) राष्ट्रपतीची प्राप्ती व भत्ते आणि त्यांच्या कार्यासंबंधीं लागणारा इतर खर्च; (ब) राज्यपरिषदेच्या सभापतींचा व उपसभापतीचा आणि लोकसभेच्या अध्यक्ष–उपाध्याक्षांचा पगार व भत्ता (क) ज्या कर्जांना भारत सरकार जबाबदार आहे त्यांचें निक्षेपनिधी (सिंकिंग फंड) फेडीचा बोजा यासह व्याज, आणि कर्ज उभारणें, फेडणें, आणि त्या संबंधीं व्यवस्थेचा खर्च करणें; (ड) (१) उच्चतम न्यायालयाच्या न्यायाधीशांचे किंवा संबंधीचे वेतनभत्ते व पेन्शनें. (२) फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांचे किंवा संबंधीचीं पेन्शनें. (३) भारताच्या प्रदेशांत समाविष्ट झालेल्या कोणत्याहि क्षेत्रांत ज्या हायकोर्टाचे अधिकारक्षेत्र असेल त्या कोर्टाच्या न्यायाधीशांचे किंवा संबंधीचे पेन्शन्स किंवा परिशिष्ट पहिले भाग अ मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्यांशीं अनुबद्ध असलेल्या प्रांतांत समाविष्ट झालेल्या क्षेत्रांत जीं हायकोर्टें ह्या

घटनेच्या पूर्वी अधिकार चालवीत होतीं त्या हायकोर्टाच्या न्यायाधीशांचे किंवा संबंधींचीं पेन्शन्स; (ई) मुख्य हिशेबतपासनीस (कॉम्ट्रोलर ॲण्ड ऑडिटर जनरल) यांचें किंवा त्याच्या संबंधीचें वेतन भत्ते व पेन्शन्स; (फ) कोणत्याहि कोर्टाचा किंवा लवाद-मंडळाचा निवाडा, हुकुमनामा किंवा लवादनामा यांची भरपाई करण्याकरतां लागणारी रक्कम; आणि (ग) या घटनेनें किंवा पार्लमेंटनें कायद्यानें ज्या खर्चाचा बोजा अशाप्रकारें लादावा असें जाहीर केलें असेल तर तो इतर खर्च.

११३. (१) भारताच्या संचित निधीवर जितका अंदाजी खर्चाचा बोजा टाकला असेल तितका पार्लमेंटपुढें मताकरतां टाकला जाणार नाहीं. पण पार्लमेंटच्या उभय सभागृहांत त्या अंदाजपत्रकाची चर्चा करण्यास प्रतिबंध आहे असा या कलमाचा अर्थ केला जाणार नाहीं.

(२) अंदाजपत्रकांतील इतर खर्चांना लागू असणारा भाग लोकसभेपुढें मान्यतेकरतां मांडण्याच्या स्वरूपांत मांडण्यांत येईल आणि लोकसभेला त्या मागण्यांपैकीं कोणत्याहि मागणीला मान्यता देण्याचा अगर नाकारण्याचा किंवा निर्दिष्ट केलेली रक्कम कमी करून मान्यता देण्याचा अधिकार असेल.

(३) राष्ट्रपतीच्या शिफारशीशिवाय कोणत्याहि रकमेकरतां मागणी केली जाणार नाहीं.

११४. (१) लोकसभेनें कलम ११३ प्रमाणें मान्यता दिल्यावर शक्य तितक्या लवकर पुढील लागणारा सर्व पैसा संचितनिधींतून उपलब्ध व्हावा म्हणून एक बिल मांडलें जाईल—(अ) लोकसभागृहानें तसा मान्यता दिलेला; आणि (ब) संचितनिधीवर लादलेली पण पार्लमेंटपुढें पूर्वी सादर केलेल्या अंदाजी खर्चापेक्षां अधिक नसलेली रक्कम.

(२) परिणामीं ज्यामुळें रकमेंत बदल होईल किंवा मान्यता दिलेल्या खर्चाच्या रकमेचें संकेतस्थान बदलेल किंवा संचित निधीवर लादलेल्या खर्चाच्या रकमेंत बदल होईल अशी कोणतीहि उपसूचना बिलावर पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहापुढें आणतां येणार नाहीं. या कलमाखालीं कोणती उपसूचना ग्राह्य धरावी हें ठरविण्याचा निर्णायक अधिकार त्या सभेच्या अध्यक्षाला असेल.

(३) ११५ व ११६ कलमांतील योजनांना अनुसरून संचित निधींतून कोणताहि पैसा जर या कलमांतील तरतुदीप्रमाणें कायद्यानें उपलब्ध केला नसेल तर काढतां येणार नाहीं.

११५. (१) (अ) कलम ११४ मधील तजविजींना अनुसरून केलेल्या कायद्यानें विशिष्ट कामाकरतां चालूं अर्थवर्षांत खर्चाकरतां अधिकृत ठरवलेली रक्कम त्या सालांतील कामाकरतां अपुरी वाटत असेल किंवा त्या सालच्या वार्षिक अंदाजपत्रकांत न धरलेल्या कोणत्या तरी नव्या कामाकरतां अधिक किंवा पुरवणी रकमेची जरूरी निर्माण झाली असेल; किंवा (ब) त्या सालाकरतां आणि त्या कामाकरतां मान्यता मिळालेल्या रकमेपेक्षां अधिक रक्कम त्या कामांत खर्च झाली असेल, तर

राष्ट्रपति उभय सभागृहांपुढें परिस्थित्यनुरूप तो खर्च दाखवलेलें दुसरें अंदाजपत्रक ठेवावयास लावील किंवा लोकसभागृहापुढें अधिक झालेल्या खर्चाची मागणी मांडण्यास लावील.

(२) वार्षिक अंदाजपत्रकाला, त्यांत दर्शविलेल्या खर्चाला किंवा रकमेच्या मागणीला आणि ती मागणी व खर्च भारताच्या संचितनिधींतून भागविण्याकरतां, पैशाच्या विनियोगाला अधिकार देण्याकरतां जो कायदा करावा लागेल त्याला कलमें ११२, ११३ व ११४ मधील तजविजी जशा लागू होतील तशाच त्या वरील पत्रकाला आणि खर्चाला किंवा मागणीला आणि ती मागणींतील रक्कम किंवा खर्च संचित निधींतून भागवण्याकरतां पैशांच्या विनियोगाला अधिकार देण्याचा जो कायदा करावा लागेल त्याला लागू होतील.

११६. (१) या प्रकरणांत वरील तजविजी कांहींहि असल्या तरी लोकसभेला पुढील अधिकार असतील.—(अ) कलम ११३ मध्यें सांगितलेली मतदानानें रकमेला मंजुरी देण्याची पद्धत पुरी होण्यापूर्वी, आणि कलम ११४ मधील योजनांनुरूप त्या खर्चासाठीं करावयाचा कायदा पास होण्यापूर्वीं कोठल्याहि अर्थवर्षांतील कालखंडाच्या अंदाजी खर्चाकरतां आगाऊ रक्कम देणें; (ब) जेव्हां भारत सरकारच्या कामाच्या व्यापकतेमुळें किंवा अनिश्चित स्वरूपामुळें वार्षिक अंदाजपत्रकांत सामान्यपणें दिल्या जाणाऱ्या तपशिलांत नसलेली भारताच्या उत्पन्नावर एकादी अनपेक्षित

मागणी आली तर त्या मागणीची रक्कम मंजूर करणें; आणि (क) कोणत्याहि अर्थवर्षाच्या चालू कामाचा भाग नसणारी अपवादात्मक रक्कम मंजूर करणें.

पार्लमेंटला संदर कामाकरतां मंजूर केलेला पैसा भारताच्या संचित निधींतून कायद्यानें अधिकार देऊन काढण्याची सत्ता असेल.

(२) वार्षिक अंदाजपत्रकांत दर्शविलेल्या खर्चाकरतां रक्कम देण्याला आणि भारताच्या संचित निधींतून तो खर्च भागविण्याला पैशाच्या विनियोगास अधिकार देण्याचा जो कायदा करावा लागेल त्याला कलम ११३ व ११४ मधील तजविजी जशा लागू आहेत तशाच त्या उपकलम (१) मधील रक्कम देण्याला आणि त्या उपकलमाखालीं कोणताहि कायदा करण्याला लागू होतील.

११७. (१) कलम ११० (१) मधील (अ) ते (फ) पर्यंत पोट-कलमांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि बाबीसंबंधीं तरतूद करावयाचें बिल किंवा उपसूचना राष्ट्रपतीच्या शिफारशीशिवाय प्रविष्ट करतां येणार नाहींत किंवा मांडता येणार नाहींत; आणि असें तरतुदीचें बिल राज्यपरिषदेंत प्रविष्ट करतां येणार नाहीं.

तथापि एखादा कर कमी करण्याची किंवा रद्द करण्याची उपसूचना मांडावयाची असेल तर या उपकलमाखालीं त्याला शिफारस लागणार नाहीं.

(२) एखाद्या बिलांत किंवा उपसूचनेंत दंडाची किंवा इतर आर्थिक शासनाची किंवा परवान्याच्या किंवा अन्य कामाच्या फीची मागणी किंवा भरणा असेल किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला किंवा तें काम करीत असलेल्या स्थानिक मंडळाला स्थानिक कारणासाठीं एखादा कर बसविण्याचा, रद्द करण्याचा, कमी करण्याचा, बदल करण्याचा किंवा नियमित करण्याचा, अधिकार असेल तर तें बिल किंवा उपसूचना वर सांगितलेल्या बाबींच्या तरतुदी करणाऱ्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं,

(३) एकाद्या पास होणाऱ्या आणि अमलांत आणल्या जाणाऱ्या बिलां-मुळें भारताच्या संचित निधींतून खर्च होणार असेल तर तें विचाराकरतां घ्यावें अशी राष्ट्रपतीनें शिफारस केल्याशिवाय पार्लमेंटचें कोणतेंहि सभागृह पास करणार नाहीं.

सामान्य कार्यपद्धत

११८. (१) या घटनेंतील व्यवस्थेला बाध येऊं न देतां प्रत्येक सभागृहानें आपल्या कार्यपद्धतीचें व कामकाजाचें नियमन करण्याकरतां नियम करावेत.

(२) उपकलम (१) प्रमाणें नियम तयार केले जाईपर्यंत ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वी भारत वसाहत कायदेमंडळाचे कामकाजाचे अमलांत असलेले नियम व स्थायी आदेश, राज्यपरिषदेचा सभापति किंवा लोकसभेचा अध्यक्ष अनुक्रमें ज्या दुरुस्त्या किंवा कमीजास्त बदल करील त्यासह पार्लमेंटला लागू होतील.

(३) राज्यपरिषदेचा सभापति व लोकसभेचा अध्यक्ष यांचा सल्ला घेऊन राष्ट्रपति संयुक्त बैठकीचे किंवा उभय सभागृहांतील व्यवहारासंबंधीच्या कामकाजाच्या पद्धतीचे नियम करील.

(४) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकींत लोकसभेचा अध्यक्ष किंवा गैरहजेरींत त्याच्या कलम ३ ला अनुसरून कामकाजाचे जे नियम होतील त्यांप्रमाणें ती व्यक्ति त्या बैठकीचा अध्यक्ष होईल.

११९. अर्थविषयक कामकाज योग्य वेळांत पुरें होण्याकरतां अर्थविषयक बाबींसंबंधींच्या किंवा भारताच्या संचित निधींतून पैशाच्या विनियोगासंबंधींच्या बिलाबद्दल प्रत्येक सभागृहानें कोणती कार्यपद्धति अनुसरावी व कसें कामकाज करावें यासंबंधीं पार्लमेंटनें कायद्यानें नियमन करावें, तसेंच जर आणि जेथवर अशा केलेल्या कोणत्याहि कायद्यांतील कोणतीहि तजवीज ११८ कलमाखालील नियम किंवा त्या कलमांतील (२) च्या उपकलमांत सांगितलेले पार्लमेंटला लागू असणारे पार्लमेंटनें केलेले नियम किंवा स्थायी आदेश यांना विसंगत असतील तर ह्या कायद्यांतील तजवीज प्रभावी ठरेल.

१२०. (१) १७ व्या भागांत कांहींहि म्हटलें असलें तरी पार्लमेंटचें कामकाज ३४८ कलमानुसार हिंदींत किंवा इंग्रजींत चालेल.

तथापि जर एखाद्या सभासदाला आपलें म्हणणें हिंदींत किंवा इंग्रजींत नीटपणें मांडतां येत नसेल, तर सभापतीला किंवा अध्यक्षाला किंवा त्या

जागीं असलेल्या व्यक्तीला त्या सभासदाला मातृभाषेंत बोलण्याची परवानगी देतां येईल.

(२) पार्लमेंटनें कायदा करून अन्य व्यवस्था न केल्यास या कलमांत असलेला ' किंवा इंग्रजींत ' हे शब्द ही घटना अमलांत आल्यापासून पंधरा वर्षांनंतर त्या कलमांतून जणूं वगळले गेले आहेत असें समजण्यांत येईल.

१२१. उच्चतम न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याहि न्यायाधिशांच्या तें काम करीत असतांना केलेल्या वर्तनाबद्दल पार्लमेंटमध्यें चर्चा केली जाणार नाहीं :

मात्र अन्यत्र पुढें सांगितल्याप्रमाणें एखाद्या न्यायाधीशाला काढून टाकण्यासंबंधीं राष्ट्रपतीला विनंतीपूर्वक अर्ज करण्याचा ठराव आणला असेल तरच ती चर्चा होऊं शकेल.

१२२. (१) पार्लमेंटमधील कामकाजाची मान्यता, (व्हॅलिडिटी), ते नियमबाह्य होते या सबबीखालीं, आक्षेपाचा विषय होणार नाहीं.

(२) या घटनेनें किंवा घटनेखालीं ज्या अधिकाऱ्याला किंवा पार्लमेंटच्या सभासदाला पार्लमेंटमधील कार्यपद्धतीचें किंवा कार्याचें नियमन करण्याकरतां किंवा शांतता राखण्याकरतां अधिकार दिले असतील, ती अधिकार बजावणारी व्यक्ति कोणत्याहि न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रांत येणार नाहीं.

प्रकरण ३ रें

राष्ट्रपतीचे कायदेविषयक अधिकार

१२३. (१) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांची बैठक चालूं नसतांना जर कोणत्याहि वेळीं राष्ट्रपतीला असें वाटलें कीं, विद्यमान परिस्थितीमुळें तांतडीचे उपाय योजणें आवश्यक आहे तर त्यानें परिस्थितीच्या जरूरीप्रमाणें योग्य ते वटहुकूम काढावेत.

(२) या कलमान्वयें काढलेले वटहुकुम पार्लमेंटच्या कायद्याइतकेंच प्रभावी व परिणामकारण असतील. पण प्रत्येक वटहुकुम—

(अ) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांपुढें ठेवला जाईल आणि तो पार्लमेंटची पुनः बैठक भरल्यापासून सहा आठवडे संपतांच रद्द होईल किंवा हे

सहा आठवडे पुरे होण्यापूर्वीच, जर त्या वटहुकुमाच्या नापसंतीचा ठराव दोन्ही सभागृहांनीं पास केला, तर तो दुसरा ठराव पास होतांच रद्द होईल;
(ब) राष्ट्रपतीकडून तो केव्हांहि परत घेतला जाईल.

स्पष्टीकरण:—जेथें पार्लमेंट सभागृहाच्या बैठका निरनिराळ्या तारखांना भराविण्यांत येतील, तेथें जें सभागृह उशीरा बोलावलें असेल, तेथून सहा आठवडे, या कलमाच्या उद्देशापुरते, मोजावेत.

(३) जी गोष्ट पार्लमेंटला या घटनेनें करावयाचा अधिकार नाहीं, ती जर वटहुकुमानें केली तर तो वटहुकुम तेवढ्यापुरता रद्द समजला जाईल.

प्रकरण ४ थें

संघाचें न्यायखातें

१२४. (१) भारताचें एक उच्चतम न्यायालय असेल. त्यांत मुख्य न्यायाधीश आणि पार्लमेंटनें अधिक संख्या ठरवीपर्यंत सातांपेक्षां जास्त इतर न्यायाधीश नसतील.

(२) राष्ट्रपति स्वतःच्या सहीशिक्क्याच्या हुकुमान्वयें उच्चतम न्यायालयांतील प्रत्येक न्यायाधीशाची नेमणूक करील. तसें करण्यापूर्वी राष्ट्रपति उच्चतम किंवा उच्च न्यायालयांतील ज्या कोणा न्यायाधीशांचा सल्ला घेणें त्याला अवश्य वाटेल त्यांचा सल्ला घेऊन ह्या नेमणुका करील. ते न्यायाधीश वयाला ६५ वर्षें होईपर्यंत अधिकारावर राहतील.

मात्र मुख्य न्यायाधीशाशिवाय अन्य न्यायाधीशांची नेमणूक करण्यापूर्वी तें मुख्य न्यायाधीशाचा नेहमींच सल्ला घेतील. आणखी—

(अ) कोणाहि न्यायाधीशाला आपल्या सहीनें आपल्या जागेचा राजीनामा देतां येईल; (ब) उपकलम (४) मध्यें सांगितल्याप्रमाणें न्यायाधीशाला पदभ्रष्ट करतां येईल.

(३) जो भारताचा नागरिक नसेल अशा कोणाहि इसमाला उच्चतम न्यायालयाचे न्यायाधीश नेमलें जाणार नाहीं, आणि—

(अ) तो कमींत कमी पांच वर्षें उच्च न्यायालयाचा (हायकोर्ट) किंवा अशा दोन किंवा अधिक न्यायालयांचा लागोपाठ न्यायाधीश असला पाहिजे; किंवा (ब) तो कमींत कमी १० वर्षें उच्च न्यायालयांत किंवा दोन किंवा

अधिक अशा न्यायालयांत लागोपाठ वकिली करीत असला पाहिजे; किंवा (क) तो राष्ट्रपतीच्या मतानें सुप्रासिद्ध कायदेपंडित (ज्यूरिस्ट) असला पाहिजे.

स्पष्टीकरण १.—'उच्च न्यायालय' (हायकोर्ट) याचा अर्थ जें न्यायालय हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत तो अधिकार चालविणारे किंवा या घटनेच्या अमलापूर्वी तो अधिकार चालवीत असलेलें न्यायालय.

स्पष्टीकरण २.—वकिलीचा जो दहा वर्षांचा काळ मोजावयाचा त्यांत त्यानें जिल्हा न्यायाधीशापेक्षां कमी हुद्द्यावरील काम केलें नसेल तर तोहि न्यायाधीश असण्याचा काळ धरण्यांत येईल.

(४) शाबीत झालेल्या दुर्वर्तनामुळें किंवा अपालतेमुळें उच्चतम न्यायालयांतील न्यायाधीशाला काढून टाकावें असा एकाच अधिवेशनांत जर विनंतिवजा ठराव प्रत्येक पार्लमेंटच्या सभागृहानें आणला आणि तो जर त्या सभागृहांतील एकूण सभासदसंख्येच्या बहुमतानें आणि हजर असलेल्या व मतदान करणाऱ्यांचा $\frac{2}{3}$ बहुमतानें पास करून राष्ट्रपतीकडे धाडला, तर तो हुकूम काढून त्या न्यायाधीशाला कामावरून काढून टाकील.

(५) उपकलम (४) मधील दुर्वर्तन किंवा अपालता याची चौकशी व पुरावा आणि विनंतिवजा करावयाच्या ठरावाची पद्धति यासंबंधीं पार्लमेंट कायद्यानें व्यवस्था करील.

(६) तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम नेमलेला प्रत्येक उच्चतम न्यायालयांतील न्यायाधीश अधिकारग्रहणापूर्वी राष्ट्रपतीसमोर अगर त्याकरतां त्यानें नेमलेल्या अधिकाऱ्यासमोर शपथ घेईल अगर प्रतिज्ञा करील.

(७) ज्यानें उच्चतम न्यायालयांत न्यायाधीशाचें काम केलें असेल, तो कोणत्याहि कोर्टापुढें अगर अधिकाऱ्यापुढें भारतांत वकिली करणार नाहीं अगर काम चालविणार नाहीं.

१२५. (१) दुसऱ्या परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें उच्चतम न्यायालयांतील न्यायाधीशांना पगार मिळतील.

(२) प्रत्येक न्यायाधीशाला पार्लमेंटनें कायद्यानें किंवा कायद्याखालीं वेळोवेळीं ठरविलेल्या सवलती, भत्ते व रजेसंबंधीं व पेन्शनसंबंधीं हक्क

मिळतील, आणि पार्लमेंट कायद्यानें तें ठरवीपर्यन्त दुसऱ्या परिशिष्टांत दिल्याप्रमाणें ते मिळत राहतील. मात्र त्याची नेमणूक झाल्यानंतर त्याला नुकसानकारक होईल असे पगार वगैरेंत बदल केले जाणार नाहींत.

१२६. भारताच्या मुख्य न्यायाधीशाची जागा जेव्हां रिकामी असेल किंवा तो गैरहजेरीमुळें किंवा अन्य कारणामुळें आपलें काम करूं शकत नसेल तेव्हां त्याचीं कामें राष्ट्रपति त्या कोर्टांतील ज्या न्यायाधीशाची त्या कामाकरितां नेमणुक करील तो तें काम करील.

१२७. (१) जर उच्चतम न्यायालयांत एकाद्या वेळीं न्यायालयाची बैठक भरविण्याला किंवा चालू ठेवण्याला न्यायाधीशांची गणपूर्ति नसेल तर भारताचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीची आगाऊ संमति घेऊन आणि संबंधित उच्च न्यायालयांतील मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घेऊन जो उच्चतम न्यायालयाचा न्यायाधीश नेमला जाण्यास लायक असेल अशा उच्च न्यायालयांतील सत्ता न्यायाधीशाला लेखी विनंति करून अवश्य त्या मुदतीपर्यंत तात्पुरता न्यायाधीश म्हणून नियुक्त करील.

(२) अशा प्रकारें नियुक्त केलेल्या न्यायाधीशानें आपल्या नेहमीच्या जागेचीं कामें दुय्यम समजून उच्चतम न्यायालयाच्या बैठकीला ज्या ठराविक वेळीं व ज्या ठराविक काळपर्यंत त्याची हजेरी आवश्यक आहे, तोंपर्यंत हजर रहावें. त्या हजेरीच्या मुदतींत त्याला उच्चतम न्यायालयीन अधिकारक्षेत्र, आणि सवलती मिळतील व तो उच्चतम न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून आपलीं कामें करील.

१२८. ह्या प्रकरणांत कांहींहि म्हटलें असलें तरी भारताचा मुख्य न्यायाधीश केव्हांहि, राष्ट्रपतीच्या आगाऊ संमतीनें, जो पूर्वी उच्चतम कोर्टाचा किंवा फेडरल कोर्टाचा न्यायाधीश होता, अशा इसमाला, उच्चतम कोर्टाचा न्यायाधीश म्हणून बसण्यास व काम करावयास सांगण्यास विनंति करूं शकेल. अशी विनंति केला गेलेला न्यायाधीश जोंपर्यंत त्या जागेवर आहे व काम करीत आहे तोंपर्यंत त्याला राष्ट्रपति हुकूम काढून ठरवितील ते भत्ते मिळतील आणि त्याला सर्व अधिकारक्षेत्र, सत्ता व सवलती मिळतील; पण अन्यथा तो त्या न्यायालयाचा न्यायाधीश आहे असें मानण्यांत येणार नाहीः

मात्र या कलमान्वयें कोणाहि अशा न्यायाधीशाला त्याच्या संमतीशिवाय त्या कोर्टांत न्यायाधीश म्हणून बसण्यास वे काम पहाण्यास सांगतां येणार नाहीं.

१२९. उच्च न्यायालय हें अभिलेखाचें (Record) न्यायालय असेल आणि त्याला त्या न्यायालयाच्या बेअब्रूकरतां शिक्षा करण्यासह सर्व अधिकार असतील.

१३०. हें उच्चतम न्यायालय दिल्लींत अगर भारताचे मुख्य न्यायाधीश राष्ट्रपतीच्या संमतीनें ज्या एक अगर अनेक ठिकाणीं वेळोवेळीं ठरवील तेथे असेल.

१३१. या घटनेंतील तजविजींना अनुसरून उच्चतम न्यायालयाखेरीज अन्य कोणत्याहि न्यायालयाचें खालील तंट्याबाबत प्राथमिक चौकशी करण्याचें अधिकारक्षेत्र नाहीं—

(अ) भारत सरकार आणि एक किंवा अनेक राज्यें; किंवा (ब) भारत सरकार आणि एक किंवा अनेक राज्यें एका बाजूला आणि एक किंवा अनेक राज्यें दुसऱ्या बाजूला; किंवा (क) दोन किंवा अधिक राज्यें यांच्यामधील;

मात्र त्या तंट्यांत कायद्याचा किंवा वस्तुस्थितीचा असा मुद्दा समाविष्ट झालेला असला पाहिजे कीं ज्यावर कायदेशीर हक्काचें अस्तित्व किंवा विस्तार अवलंबून आहे. मात्र तें प्राथमिक अधिकारक्षेत्र पुढील बाबींना लागू नाहीं—

(१) ज्या तंट्यांत परिशिष्ट पाहिलें, भाग (ब) मध्यें निर्दिष्ट केलेलें राज्य पक्षकार असेल आणि जो तंटा एखाद्या तह, करार, करारनामा, ठराव, सनद किंवा अन्य लिखाणामुळें उद्भवला असेल आणि जो या घटनेच्या सुरुवातीपूर्वी केला किंवा अमलांत आला असेल आणि त्या नंतरहि जो तसांच अमलांत राहिला असेल;

(२) एकादें राज्य पक्षकार असलेला जो तंटा असेल आणि जो तंटा तह, करार, करारनामा, ठराव, सनद किंवा अन्य लिखाणामुळें उद्भवला असेल आणि ज्या करार वगैरेंत तें अधिकार-क्षेत्र तशा तंट्यांना लागू नाहीं असें म्हटलें असेल.

१३२. (१) हिंदुस्थानांतील उच्च न्यायालयाच्या दिवाणी, फौजदारी किंवा अन्य बाबतींतला निवाडा, हुकुमनामा किंवा अखेरचा हुकुम याविरुद्ध उच्चतम न्यायालयाकडे अपील करतां येईल. मात्र उच्च न्यायालयानें घटनेच्या अर्थासंबंधीं महत्त्वाचा कायद्याचा प्रश्न त्यांत अंतर्भूत झाला आहे, असा शेरा दिला पाहिजे.

(२) जेथें उच्च न्यायालयानें असा शेरा नाकारला असेल तेथें उच्चतम न्यायालयाला त्यांत घटनेच्या अर्थासंबंधीं कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत झाला आहे अशी खात्री पटल्यास त्या निवाड्या वगैरेविरुद्ध अपील करण्याची खास परवानगी देतां येईल.

(३) जेथें असा शेरा दिला असेल किंवा परवानगी मिळाली असेल तेथें त्या तंट्यांतील कोणत्याहि पक्षाला वर सांगितलेल्या मुद्द्यांचा निकाल चुकीचा आहे या भूमिकेवरून किंवा उच्चतम न्यायालयाच्या परवानगीनें दुसऱ्याहि भूमिकेवरून अपील करतां येईल.

स्पष्टीकरण.—या कलमापुरता 'अखेरचा हुकुम' यांत ज्या हुकुमामुळें त्या मुद्द्याचा निकाल दिला असेल आणि जो निकाल अपील करणाराच्या बाजूनें झाला असतां त्या खटल्याचा अखेर निर्णय लावण्यास पुरेसा होईल तो समाविष्ट होतो.

१३३. (१) उच्च न्यायालयानें मुलकी मुकादम्यांत दिलेला निकाल, हुकुमनामा, किंवा अखेरचा हुकुम याविरुद्ध पुढील बाबतींत उच्च न्यायालयानें शिफारस केल्यास अपील उच्चतम न्यायालयाकडे करतां येईल—

(अ) पहिल्या दाव्यांतील तंट्यांची आणि अपीलांतहि तंट्याच्या स्वरूपांत राहिलेली रक्कम किंवा मूल्य वीस हजार रुपयांपेक्षां किंवा पार्लमेंट कायदा करून ठरवील त्यापेक्षां कमी नव्हतें अगर नाहीं; किंवा (ब) तितक्या रकमेच्या किंवा मूल्याच्या मिळकतीचा प्रश्न किंवा हक्क प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष त्या निकालांत, हुकुमनाम्यांत किंवा अखेरच्या हुकुमांत अंतर्भूत होत असेल; किंवा (क) उच्चतम न्यायालयांत एखादा खटला अपील करण्यासारखा असेल तर;

आणि ज्या कोर्टातून अपील आलें असेल त्या कोर्टानें त्याच्या खालच्या कोर्टाचा निवाडा, हुकुमनामा किंवा अखेरचा हुकुम पक्का केला असेल अशा पोट-कलम (क) मध्यें निर्दिष्ट केलेल्या खटल्याशिवाय खटला असेल

आणि ज्या अपिलांत उच्च न्यायालय त्यांत कायद्यांचा महत्त्वाचा मुद्दा अंतर्भूत झाला आहे अशी आणखी शिफारस करील तेथें.

(२) १३२ कलमांत कांहींही म्हटलें असलें तरी उच्च न्यायालयाकडे उपकलम (१) प्रमाणें अपील करणाऱ्या कोणत्याहि पक्षकाराला त्या अपिलांत घटनेच्या अर्थासंबंधींच्या महत्त्वाच्या कायद्याचा प्रश्न चुकीचा निर्णित केला आहे, हाहि एक मुद्दा अपिलाकरतां मांडतां येईल.

(३) पार्लमेंटनें कायदा केल्याशिवाय उच्च न्यायालयाच्या एकट्याच न्यायाधीशानें दिलेला निकाल, हुकुमनामा किंवा अखेरचा हुकुम यावर उच्चतम न्यायालयांत अपील करतां येणार नाहीं.

१३४. (१) उच्च न्यायालयानें फौजदारी मुकादम्यांत दिलेला निकाल, अखेरचा हुकुम, किंवा शिक्षा यांविरुद्ध उच्चतम न्यायालयाकडे अपील करतां येईल, पण त्या करतां उच्च न्यायालयानें—

(अ) एखाद्या आरोपीला निर्दोषी म्हणून सोडून दिलेला हुकुम बदलला असेल व त्याला फांशीची शिक्षा दिली असेल; किंवा (ब) आपल्या हुकमतीखालील कोर्टाकडील कोणताहि खटला स्वतःकडे चालविण्याकरतां घेतला असेल आणि अशा खटल्यांत आरोपीला फांशीची शिक्षा दिली असेल; किंवा (क) सदर खटला उच्चतम कोर्टांत अपील करण्यालायक आहे अशी शिफारस केली असेल :

मात्र पोटकलम (क) प्रमाणें अपील करण्यास १४५ (१) कलमाखालीं जी तजवीज केली असेल आणि ज्या अटी हायकोर्टास अवश्य वाटतील किंवा तें स्थापित करील त्या अटींवरच अपील करतां येईल.

(२) उच्च न्यायालयाच्या कोणत्याहि फौजदारी मुकादम्यांतील निकाल, अखेर हुकूम किंवा शिक्षा यांविरुद्ध अपिलें दाखल करून घेण्याचा व ऐकण्याचा पार्लमेंट कायदा करून उच्चतम न्यायालयाला आणखी अधिकार देईल आणि त्या कायद्यांत ज्या अटींचा व मर्यादेचा उल्लेख करील त्याला अनुसरून अपील घेतां येईल.

१३५. ही घटना सुरू होण्याच्या अगोदर जें अधिकारक्षेत्र व सत्ता कोणत्याहि विद्यमान कायद्याखालीं फेडरल कोर्टाला ज्या बाबतींत चालवितां येत असत त्या कलमें १३३ व १३४ ला लागू होत नसल्या तरी पार्लमेंट

कायदा करून अन्य व्यवस्था करीपर्यंत त्याहि बाबतींत उच्चतम न्यायालयाला अधिकारक्षेत्र व सत्ता असेल.

१३६. (१) या प्रकरणांत कांहींहि म्हटलें असलें तरी भारतांत कोणत्याहि कोर्टानें अगर न्यायसभेनें दिलेला कोणत्याहि खटल्याचा अगर मुद्द्याचा निकाल, हुकुमनामा, ठराव, शिक्षा किंवा हुकुम यांविरुद्ध उच्चतम न्यायालयाला आपल्या निर्णायक बुद्धीनुसार अपिलाला खास परवानगी देण्याचा अधिकार असूं शकेल.

(२) वरील उपकलम (१) मधील तजवीजी लष्करी फौजेला लागू नाहींत.

१३७. पार्लमेंटनें केलेल्या कायद्याला धरून किंवा १४५ कलमाखालीं केलेल्या नियमांना अनुसरून उच्चतम न्यायालयाला त्यानें दिलेल्या निकालाची किंवा हुकुमाची फेरतपासणी करण्याचा अधिकार असेल.

१३८. (१) पार्लमेंट कायदा करून उच्चतम न्यायालयाला संघसूचीं-(यूनियन लिस्ट) तील कोणत्याहि बाबतींत आणखी अधिकारक्षेत्र व सत्ता देऊं शकेल.

(२) जर भारत सरकार आणि राज्य सरकार यांनीं खास करार करून एखाद्या गोष्टीबद्दल उच्चतम न्यायालयाला सत्ता व अधिकारक्षेत्र दिलें आणि जर उच्चतम न्यायालयानें त्या अधिकारक्षेत्राची व सत्तेची बजावणी करावी असें पार्लमेंटनें कायदा करून ठरविलें तर उच्चतम न्यायालयाला तें अधिकारक्षेत्र व सत्ता आणखी मिळेल.

१३९. कलम ३२ (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य कारणाकरतां पार्लमेंट कायदा करून उच्चतम न्यायालयाला एखाद्या नागरिकास हजर करणें, मनाई करणें, एखादी गोष्ट करावयास भाग पाडणें वगैरेचा अंतर्भाव असलेले हुकूम अगर आदेश काढण्याचे अधिकार देईल.

१४०. या घटनेनें अगर घटनेखालीं दिलेलें अधिकार जास्त परिणाम-कारक रीतीनें अमलांत आणले जावे म्हणून उच्चतम न्यायालयाला समर्थ करण्याच्या हेतूनें जे या घटनेच्या कोणत्याहि योजनेला विसंगत नसतील असे पुरवणी अधिकार उच्चतम न्यायालयाला दिले जावेत म्हणून पार्लमेंट कायद्यानें तजवीज करूं शकेल.

१४१. उच्चतम न्यायालयानें पुकारलेला कायदा हा साऱ्या भारतांतील कोर्टांना बंधनकारक असेल.

१४२. (१) आपल्यासमोर असलेल्या कोणत्याहि खटल्यांत अगर बाबींत जरूर तो संपूर्ण न्याय मिळण्याकरतां उच्चतम न्यायालयानें आपल्या अधिकारान्वयें कोणताहि हुकुमनामा करावा किंवा हुकुम द्यावा. हा हुकुम-नामा अगर हुकुम पार्लमेंट कायद्यानें ठरवील तसा किंवा त्याखालीं साऱ्या भारतांत जारी राहील. तशा प्रकारची व्यवस्था पार्लमेंट करीपर्यंत राष्ट्रपति हुकूम काढून ठरवील त्याप्रमाणें तो जारी राहील.

(२) एखाद्या व्यक्तीला हजर करण्याबद्दल, एखाद्या दस्तऐवजांचा शोध किंवा ते दाखल करण्याबाबत किंवा त्या न्यायालयाच्या बेअदबीची चौकशी किंवा त्याबद्दल शिक्षा करण्याबाबत उच्चतम न्यायालयाला पार्लमेंटनें त्यासंबंधीं केलेल्या कायद्यानुसार, साऱ्या भारतांत सर्व व प्रत्येक अधिकार असेल.

१४३. ज्यावेळीं राष्ट्रपतीला असें वाटेल कीं, एखादा कायद्याचा किंवा वस्तुस्थितीचा प्रश्न उपस्थित झाला आहे किंवा होण्याचा संभव आहे आणि त्यावर उच्चतम न्यायालयाचें मत घेण्याइतका तो सार्वजनिक महत्त्वाचा आहे त्यावेळीं राष्ट्रपति तो प्रश्न त्या न्यायालयाकडे त्याच्या अभिप्रायाकरतां धाडील आणि तें न्यायालय आपल्याला जरूर वाटेल तें म्हणणें ऐकून घेऊन तें मत राष्ट्रपतीकडे पाठवील.

(२) कलम १३१ च्या अपवाद (१) मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी त्या कलमांत निर्दिष्ट केलेला तंटा राष्ट्रपति उच्चतम न्यायालयाकडे अभिप्रायाकरतां पाठवूं शकेल आणि तें न्यायालय त्याला योग्य वाटेल तें म्हणणें ऐकून घेऊन, आपलें मत राष्ट्रपतीकडे धाडील.

१४४. भारतांतील सर्व मुलकी व न्यायालयीन अधिकारी उच्चतम न्यायालयाला मदत होईल असे वागतील.

१४५. (१) पार्लमेंटनें केलेल्या एखाद्या कायद्याला अनुसरून उच्च-तम न्यायालय राष्ट्रपतीच्या संमतीनें, वेळोवेळीं कोर्टांतील कामकाजाच्या

पद्धतीचें नियमन करण्याकरतां नियम करील. त्यांत पुढील बाबींचे नियम येतील,—

(अ) त्या कोर्टांत कोणाला वकिली काम करतां येईल; (ब) अपिलें ऐकण्याच्या आणि त्या अपिलासंबंधींच्या इतर बाबी यांच्या कार्यपद्धतीचे नियम. त्यांत कोणत्या मुदतींत अपिलें दाखल केलीं पाहिजेत हेंहि असेल; (क) भाग ३ मध्यें दिलेल्या कोणत्याहि हक्कांच्या बजावणीबाबत कसें काम चालवावें याबद्दल नियम; (ड) १३४ (१), पोटकलम (क) प्रमाणें अपिलें दाखल करून घेण्याचे नियम; (इ) कोणत्या अर्टींना अनुसरून कोर्टानें दिलेल्या निकालाची किंवा हुकमाची फेरपहाणी करावी, त्या पाहणीची रीत कोणती असावी, आणि किती मुदतीपर्यन्त सदर अर्ज दाखल केले जावेत याचे नियम; (फ) कोर्टापुढील खटल्यांच्या खर्चाचे आणि प्रासंगिक खर्चाचे नियम; तसेंच त्या खटल्यांतील कामाकरतां आकारावयाच्या फी-बाबतींत नियम; (ग) जामीन देण्याबाबत; (ह) खटल्याचे काम-तहकुबी-बाबत; (आय) जें अपील कोर्टाच्या दृष्टीनें क्षुल्लक, किंवा त्रास देण्याच्या हेतूनें किंवा विलंब करण्याकरतां केलें असेल त्याचा तडकाफडकी निकाल करण्याबाबत; (जे) २१७ (१) कलमांतील चौकशी-पद्धतीबाबत.

(२) उपकलम (३) ला अनुसरून, या कलमामध्यें करावयाच्या नियमांत कोठल्याहि कामाकरितां कमींतकमी किती न्यायाधीशांनीं बसावें हें निश्चित करावें. आणि त्याचप्रमाणें एकट्या न्यायाधीशाचे व विभाग न्याया-लयांचे अधिकार निश्चित करावे.

(३) १४३ कलमाखालीं पाठविल्या जाणाऱ्या अभिप्रायाच्या सुना-वणीकरतां किंवा घटनेच्या अर्थासंबंधीं महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा अंतर्भूत असलेल्या खटल्याचा निर्णय देण्याकरतां बसणाऱ्या न्यायाधीशांची संख्या कमींत कमी पांच असेल :

तथापि जर १३२ कलमांतील बाबींव्यतिरिक्त या प्रकरणांतील कोणत्याहि इतर बाबतींत अपील ऐकणारें कोर्ट पांचांपेक्षां कमी न्यायाधीशांचें असेल आणि तें अपील ऐकतांना जर कोर्टाला वाटलें कीं, या अपिलांत घटनेच्या अर्थासंबंधीं महत्त्वाचा प्रश्न असून त्या अपिलाचा निकाल लावण्याकरतां त्याचा अर्थ निश्चित करणें जरूरीचें आहे, तर तें कोर्ट ह्या कलमाप्रमाणें

तशा प्रश्नांचा निकाल लावण्याकरतां बनविलेल्या कोर्टाकडे तो प्रश्न मताकरतां पाठवून देईल; आणि तें मत आल्यावर त्याला अनुसरून अपिलाचा निकाल लावील.

(४) उच्चतम न्यायालय कोणताहि निवाडा खुल्या कोर्टाशिवाय अन्यत्र देणार नाहीं आणि १४३ कलमाखालीं सादर करावयाचा अहवाल हाहि खुल्या कोर्टांत मत व्यक्त करूनच केला जाईल.

(५) कोणताहि निवाडा किंवा मत खटल्याची चौकशी चालू असतांना हजर असलेल्या बहुसंख्य न्यायाधीशांच्या संमतीनें उच्चतम न्यायालय देईल; पण जर एखाद्या न्यायाधीशाला त्या संमत निवाड्यापेक्षां भिन्न निवाडा किंवा मत द्यायचें असेल तर त्या कलमानें त्याला प्रतिबंध होणार नाहीं.

१४६. (१) उच्चतम न्यायालयांतील अधिकाऱ्यांच्या आणि नोकरांच्या नेमणुका भारताचा मुख्य न्यायाधीश किंवा तो फर्मावील तो न्यायाधीश किंवा कोर्टाचा अधिकारी करील :

तथापि राष्ट्रपति नियमांत निर्दिष्ट करील त्या बाबतींत, कोर्टाशीं पूर्वी संबंधित नसलेला इसम, कोर्टांतील अधिकारी म्हणून संघाच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सल्ल्याशिवाय नेमला जाणार नाहीं असें ते नियमान्वयें सांगूं शकेल.

(२) पार्लमेंट करील त्या कायद्यानुसार उच्चतम न्यायालयांतील अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्या नोकरीच्या शर्ती, मुख्य न्यायाधीश किंवा मुख्य न्यायाधीशानें अधिकार दिलेला दुसरा न्यायाधीश किंवा न्यायालयाचा अधिकारी नियम करून ठरवील :

माल पगार, भत्ते, रजा व पेन्शन्स याकरतां या कलमाखालीं केलेल्या नियमांना राष्ट्रपतीची संमति लागेल.

(३) उच्चतम न्यायालयाच्या कारभाराकरतां, अधिकारी व नोकरांच्या पगार, भत्ते व पेन्शन्ससह लागणारा खर्च भारताच्या संचित निधीवर आकारला जाईल आणि जी फी व इतर पैसा कोर्ट घेईल तो त्या फंडांतच जमा होईल.

१४७. या प्रकरणांत व प्रकरण ५, भाग ६ मध्यें घटनेच्या अर्थांतील महत्त्वाच्या कायद्याचा जो उल्लेख आहे तो १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ

इंडियाचा कायदा, कौंसिल ऑर्डर, व त्या खालीं केलेला हुकुम किंवा १९४७ चा स्वातंत्र्याचा कायदा वगैरेनाहि लागू आहे.

प्रकरण ५

भारताचा महालेखा परीक्षक (कॉम्ट्रोलर आणि ऑडिटर जनरल)

१४८. (१) भारताचा एक महालेखा परीक्षक (ऑडिटर जनरल) असेल. त्याची नेमणूक राष्ट्रपति आपल्या सही-शिक्क्याच्या हुकुमान्वयें करील. आणि उच्चतम न्यायालयाच्या न्यायाधीशाला ज्या कारणासाठीं व ज्या रीतीनें कामावरून दूर करतां येतें त्याचप्रमाणें यालाहि दूर करतां येईल.

(२) या अधिकाऱ्यानें अधिकारप्रविष्ट होण्यापूर्वी तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम राष्ट्रपतीपुढें किंवा त्यांनीं त्याकरतां नेमलेल्या व्यक्तीपुढें शपथ किंवा प्रतिज्ञा केली पाहिजे.

(३) त्या अधिकाऱ्याचा पगार व इतर नोकरीच्या अटी पार्लमेंट कायद्यानें ठरवील आणि त्या तशा ठरवीपर्यंत दुसऱ्या परिशिष्टांतल्या अटीं-प्रमाणें त्या रहातील :

मात्र त्या अधिकाऱ्याच्या नेमणुकीनंतर त्याचा पगार किंवा गैरहजेरीची रजा, पेन्शन, व सेवानिवृत्तीचें वय वगैरेसंबंधीचे हक्कांत त्याला नुकसानकारक होईल अशा रीतीनें बदल केला जाणार नाहीं.

(४) तो अधिकारी सेवानिवृत्त झाल्यावर भारत सरकारांत किंवा राज्यसरकारांत आणखी नोकरीकरतां लायक मानला जाणार नाहीं.

(५) या घटनेच्या तरतुदींना आणि पार्लमेंट करील त्या कायद्याला अनुसरून ऑडिट व अकौंट खात्यांत काम करणाऱ्यांच्या नोकरीच्या शर्ती आणि महालेखा परीक्षकाचे शासनविषयक अधिकार हे त्या अधिकाऱ्याचा सल्ला घेऊन राष्ट्रपति नियम करून ठरवील ते असतील.

(६) या खात्याचा पगार वगैरेसह सर्व कारभाराचा खर्च भारताच्या संचित निधीवर आकारला जाईल.

१४९. पार्लमेंटकडून केलेल्या कायद्यानें किंवा कोणत्याहि कायद्याखालीं ठरविलें जाईल त्याप्रमाणें महालेखा परीक्षक संघाचे व राज्यांचे आणि इतर संस्थांचे व मंडळांचे हिशेबासंबंधीं कामें करील व अधिकार बजावील,

आणि ती तरतूद होईपर्यंत ही घटना सुरू होण्यापूर्वी भारताचा ऑडिटर जनरल हिंदुस्थान वसाहतीचे व प्रांतिक सरकारच्चे हिशेबांसंबंधीं जीं कामें व जे अधिकार बजावीत असे, ते त्यासंबंधीं बजावीत राहील.

१५०. राष्ट्रपतीच्या संमतीनें महालेखा परीक्षक ठरवील त्या पद्धतीनें संघाचे व राज्याचे हिशेब ठेवले जातील.

१५१. (१) संघाच्या हिशेबांचे अहवाल तो अधिकारी राष्ट्रपतीला सादर करील आणि राष्ट्रपति ते पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेववील.

(२) त्याच अधिकाऱ्यानें केलेले राज्याच्या हिशेबाचे अहवाल राज्यपालाला (Governor) किंवा राजप्रमुखांना सादर केले जातील व ते अहवाल ते आपापल्या कायदेमंडळापुढें ठेवावयास लावतील.

भाग ६ वा पहिल्या परिशिष्टांतील भाग 'अ.' मधील राज्यें

प्रकरण १—सर्वसाधारण

१५२. संदर्भावरून निराळा अर्थ केला जात नसल्यास "राज्य" याचा अर्थ पहिल्या परिशिष्टांत भाग अ मध्यें सांगितलेलें राज्य.

प्रकरण २—कार्यकारी मंडळ

राज्यपाल (गव्हर्नर)

१५३. प्रत्येक राज्याला एक राज्यपाल असेल.

१५४. (१) राज्याची कार्यकारी सत्ता राज्यपालाला दिलेली असेल व या सत्तेचा उपयोग तो या घटनेनुसार प्रत्यक्ष किंवा त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यामार्फत करील.

(२) या कलमांतील कोणत्याहि गोष्टीनें—

(अ) विद्यमान कायद्यान्वयें एखाद्या दुसऱ्या अधिकाऱ्याला दिलेली सत्ता राज्यपालाकडे बदलून येते असें समजण्यांत येणार नाहीं; किंवा (ब) पार्लमेंटला किंवा राज्याच्या कायदेमंडळाला राज्यपालाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यावर, कायदा करून कामें सोंपाविण्यास प्रतिबंध असणार नाहीं.

१५५. राज्याच्या राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपति स्वतःच्या सही-शिक्क्याचा हुकूम काढून करील.

१५६. (१) राज्यपाल राष्ट्रपतीच्या मर्जीपर्यंत अधिकारावर राहील.

(२) राज्यपालाला आपल्या जागेचा राजीनामा स्वतःच्या सहीनें राष्ट्रपतीकडे देतां येईल.

(३) या कलमांतील वरील तरतुदींना अनुसरून राज्यपाल हा अधिकारावर आलेल्या तारखेपासून पांच वर्षें अधिकारावर राहील :

तथापि राज्यपाल हा आपली मुदत संपली तरी नवा राज्यपाल येईपर्यंत अधिकार धारण करीत राहील.

१५७. भारताचा नागरिक असल्याशिवाय व वयाला ३५ वर्षें पुरीं झालेलीं असल्याशिवाय कोणाचीहि राज्यपाल म्हणून नेमणूक केली जाणार नाहीं.

१५८. (१) राज्यपाल हा पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाचा किंवा परिशिष्ट १ मध्यें सांगितलेल्या राज्यांतील कायदेमंडळाचा सभासद असणार नाहीं. आणि जर अशा सभासद असणाऱ्याची राज्यपाल म्हणून नेमणूक केली तर तो ज्या दिवशीं अधिकारग्रहण करील, त्या दिवशीं त्यांनें आपली सभासदाची त्या सभागृहांतील जागा रिकामी केली असें समजलें जाईल.

(२) राज्यपालाला दुसरी कोणतीहि प्राप्तीची जागा स्वीकारतां येणार नाहीं.

(३) राज्यपालाला भाडें न देतां सरकारी जागेंत राहण्याचा हक्क असेल आणि त्याला पार्लमेंट कायदा करून ठरवील ती प्राप्ति, भत्ते व सवलती मिळण्याचा हक्क असेल; आणि त्या संबंधींची तरतूद होईपर्यंत परिशिष्ट २ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्राप्ति, भत्ते व सवलती त्याला मिळतील.

(४) राज्यपालाची प्राप्ति व भत्ते त्याच्या अधिकाराच्या मुदतींत कमी केले जाणार नाहींत.

१५९. प्रत्येक राज्यपाल आणि राज्यपालाचीं कामें करणारी प्रत्येक व्यक्ति, अधिकारस्वीकार करण्यापूर्वी त्या राज्यांतील सत्ताधिकारी असणाऱ्या उच्च न्यायालयांतील (हायकोर्ट) मुख्य न्यायाधीशासमोर किंवा त्याच्या

गैरहजिरीत सर्वांत ज्येष्ठ उपलब्ध असणाऱ्या न्यायाधीशासमोर पुढील नमुन्याबरहुकूम शपथ घेईल अगर प्रतिज्ञा करील—

" मी, अ.ब., $\frac{\text{ईश्वराला स्मरून शपथ घेतों}}{\text{गंभीर प्रतिज्ञा करतों}}$कीं, मी.....

(राज्याचें नांव) राज्यपालाच्या जागेचें काम प्रामाणिकपणें करीन (अगर राज्यपालाचीं कामें करीन) आणि माझ्या जास्तींत जास्त शक्त्यनुसार या घटनेचें व कायद्याचें पालन, संरक्षण आणि समर्थन करीन; आणि .....(राज्याचें नांव) लोकांच्या सेवेला व कल्याणाला वाहून घेईन.

१६०. या प्रकरणांत योजना न केलेल्या अशा कोणत्याहि आकस्मिक प्रसंगीं राज्यपालाकडून केल्या जाणाऱ्या कार्यासंबंधीं योग्य ती तरतूद राष्ट्रपति करूं शकेल.

१६१. ज्या बाबींत कार्यकारीची सत्ता पोहोंचते अशा बाबींसंबंधीं असलेल्या कोणत्याहि कायद्याविरुद्ध कोणताहि गुन्हा केलेल्या इसमास झालेली शिक्षा थांबविण्याचा, कमी करण्याचा व बदलण्याचा आणि शासनाला माफी देण्याचा, प्रविलंबन, विराम किंवा परिहार करण्याचा अधिकार राज्यपालाला असेल.

१६२. या घटनेंतील योजनांना अनुसरून एखाद्या राज्याची कार्यकारी सत्ता, ज्या बाबतींत कायदेमंडळाला कायदे करण्याचे अधिकार आहेत तेथपर्यंत पोहोंचेल :

तथापि ज्या एखाद्या बाबीसंबंधीं राज्याचें कायदेमंडळ आणि पार्लमेंट यांना कायदे करण्याचे अधिकार आहेत अशा बाबतींत राज्याची कार्यकारी सत्ता ही, या घटनेनें किंवा पार्लमेंटनें केलेल्या कायद्यान्वयें जी कार्यकारी सत्ता संघ किंवा त्यांचे अधिकाऱ्यांना निःसंदिग्धपणें दिलेली असेल, तिनें मर्यादित होईल किंवा तिला अनुसरून असेल.

मंत्रिमंडळ

१६३. (१) मुख्य मंत्र्याच्या नेतृत्वाखालीं एक मंत्रिमंडळ, राज्यपालाला त्याचे कार्यांत मदत करण्याला व सल्ला देण्याला असेल. फक्त या

घटनेनें अगर या घटनेखालीं कार्य अगर जीं कार्यें स्वतःच्या विवेचक बुद्धीनें त्याला करावयाचीं असतील त्यांपुरता हा सल्ला व मदत घेतली जाणार नाहीं.

(२) अमुक एका बाबतींत राज्यपालानें या घटनेप्रमाणें किंवा घटनेखालीं विवेचक बुद्धीनें चालावयाचें कीं नाहीं असा प्रश्न उपस्थित झाल्यास राज्यपालानें स्वतःच्या विवेचक बुद्धीनें त्या प्रश्नाचा निर्णय द्यावा व तो अखेरचा मानला जाईल; आणि राज्यपालानें केलेल्या एखाद्या गोष्टीच्या मान्यतेसंबंधीं (व्हॅलिडिटी) ती त्यानें विवेचक बुद्धीनें करावयास पाहिजे होती अगर नको होती या संबंधीं प्रश्न उपस्थित केला जाणार नाहीं.

(३) कोणत्याहि न्यायालयांत मंत्र्यांनीं राज्यपालाला सल्ला दिला होता कीं नाहीं व काय दिला होता याची चौकशी केली जाणार नाहीं.

१६४. (१) मुख्य मंत्र्याची नेमणूक राज्यपाल करील आणि इतर मंत्र्यांची नेमणूक मुख्य मंत्र्याच्या सल्ल्यानें राज्यपाल करील. ते मंत्री राज्यपालाची मर्जी असेपर्यंत अधिकारावर राहतील :

तथापि बिहार, कोशलविदर्भ आणि ओरिसा या राज्यांत एक मंत्री असा असेल कीं, ज्याच्याकडे जनजातींच्या कल्याणाचें काम असेल आणि तो अनुसूचित व मागासलेल्या जातींच्या कल्याणाचें किंवा अन्य काम वरील कामांशिवायहि करील.

(२) मंत्रिमंडळ हें सामुदायिकरीत्या त्या राज्यांतल्या त्या विधानसभेला जबाबदार राहील.

(३) तिसऱ्या परिशिष्टांतील नमुन्याप्रमाणें अधिकारग्रहणापूर्वीं मंत्र्यांना राज्यपाल अधिकारासंबंधीं व गुप्ततेसंबंधीं शपथ व्यावयास सांगेल.

(४) जो मंत्री लागोपाठ सहा महिनेपर्यंत कायदेमंडळाचा सभासद नसेल तो ही मुदत संपतांच मंत्री म्हणून राहणार नाहीं.

(५) मंत्र्यांचे पगार व भत्ते त्या राज्यांतलें कायदेमंडळ वेळोवेळीं कायदे करून ठरवील; तसेंच त्या कायदेमंडळानें ठरवीपर्यंत दुसऱ्या परिशिष्टांत दिलेला पगार व भत्ते त्यांना मिळतील.

राज्याचा महाधिवक्ता (ॲड्व्होकेट जनरल)

१६५. (१) प्रत्येक प्रांताचा राज्यपाल उच्च न्यायालयांत न्यायाधीश

नेमला जाण्याच्या योग्यतेच्या असलेल्या इसमाची त्या राज्यांत महाधिवक्ता (ॲडव्होकेट जनरल) म्हणून नेमणूक करील.

(२) तो महाधिवक्ता राज्यपाल वेळोवेळीं सांगेल व सोंपवील त्या कायद्याच्या बाबतींत त्या राज्यांतील सरकारला सल्ला देईल, व कायद्याच्या स्वरूपाचीं कामें करील. त्याचप्रमाणें तो महाधिवक्ता या घटनेनें किंवा घटनेखालीं किंवा त्यावेळीं जारी असलेल्या कायद्याप्रमाणें जीं कामें त्याच्यावर सोंपवलेलीं असतील तीं करील.

(३) राज्यपालाची मर्जी असेपर्यंत महाधिवक्ता अधिकारावर राहील आणि राज्यपाल ठरवील तें वेतन त्याला मिळेल.

सरकारी कामकाजाची पद्धत

१६६. (१) राज्याचें सर्व कार्यकारी काम राज्यपालाच्या नांवानें चालल्याचा निर्देश केला जाईल.

(२) राज्यपालाच्या नांवानें काढलेले व अमलांत आणलेले हुकूम व इतर आज्ञापत्रें हीं राज्यपाल नियम करून त्या नियमांत निर्देश करील त्या प्रमाणें प्रमाणित केलीं जातील आणि अशाप्रकारें प्रमाणित केलेल्या व अमलांत आणलेल्या हुकमांच्या व आज्ञापत्रांच्या मान्यतेबद्दल, तीं राज्यपालाचा हुकुम अगर आज्ञा नाहींत अगर त्यानें तीं बजावलेलीं नाहींत या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला जाणार नाहीं.

(३) राज्याचा कारभार अधिक सोईस्कर चालावा म्हणून आणि त्या कारभाराची वांटणी मंत्र्यांमध्यें करावी म्हणून राज्यपाल नियम करील. पण या घटनेनें किंवा घटनेखालीं राज्यपालाला विवेचक बुद्धीनें काम करावयास सांगितलेल्या कामासंबंधीं तो नियम करणार नाहीं.

१६७. राज्याच्या मुख्य मंत्र्याचीं कामें—

(अ) राज्यांतील कारभारासंबंधीं राज्यपालाला मंत्रिमंडळाचे निर्णय व नव्या कायद्याच्या सूचना कळविणें; (ब) राज्याच्या कारभारासंबंधीं किंवा नव्या कायद्याच्या सूचनांसंबंधीं राज्यपाल मागवील ती माहिती त्याला पुरविणें; (क) एखाद्या मंत्र्यानें निर्णय घेतलेली, पण मंत्रिमंडळानें विचार न केलेली

एखादी राज्यपालाला आवश्यक वाटणारी बाब, मंत्रिमंडळाच्या विचाराकरितां ठेवणें.

प्रकरण ३—राज्याचें कायदेमंडळ

सर्वसामान्य

१६८. (१) प्रत्येक राज्याला कायदेमंडळ असेल. त्यांत गव्हर्नर आणि

(अ) प. बंगाल, बिहार, मुंबई, मद्रास, पंजाब आणि संयुक्तप्रांत या राज्यांमध्यें दोन सभागृहें; व (ब) इतर राज्यांत एक सभागृह असेल.

(२) ज्या राज्यांतील कायदेमंडळाला दोन सभागृहें असतील, त्यांतील एकाला (लेजिस्लेटिव्ह कौंसिल) विधान परिषद व दुसऱ्याला (लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) विधान सभा म्हणण्यांत येईल. जेथें एकच सभागृह असेल तेथें त्याला विधान सभा म्हणण्यांत येईल.

१६९. (१) १६८ कलमांत कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंटला कायदा करून जेथें विधान परिषद आहे ती रद्द करण्याची व जेथें नसेल तेथें निर्माण करण्याची तजवीज करतां येईल; मात्र असें करण्यापूर्वी तेथील विधान सभेनें आपल्या एकूण सभासदसंख्येच्या बहुमतानें आणि हजर असलेल्या व मतदान करणाऱ्यांच्या $\frac{2}{3}$ बहुमतानें तसा ठराव पास केला पाहिजे.

(२) वर उपकलम (१) संबंधीं पार्लमेंटनें करावयाच्या कायद्यांत अशा जरूर त्या घटना दुरुस्तीच्या तरतुदी असाव्यात कीं, ज्यामुळें कायद्याची अंमलबजावणी करतां येईल. तसेंच त्या तरतुदींत पार्लमेंटला वाटतील त्या पुरवणीच्या, प्रासंगिक किंवा अनुषंगिक तरतुदीहि असूं शकतील.

(३) वर उल्लेखिलेला कायदा हा ३६८ कलमाकरतां घटना-दुरुस्तीचा कायदा आहे असें मानलें जाणार नाहीं.

१७०. (१) ३३३ कलमांतील तजविजींना अनुसरून प्रत्येक राज्यांतील विधानसभा ही प्रत्यक्ष निवडलेल्या सभासदांची बनेल.

(२) राज्याच्या विधान सभेंतील प्रत्येक प्रादेशिक मतदार संघाचें प्रतिनिधित्व हें, मागील खानेसुमारींत जी अजमावलेली लोकसंख्या असेल व

ज्याचे त्या संबंधीचे आंकडे प्रसिद्ध झाले असतील त्या ७५,००० लोक-संख्येला एक या प्रमाणावर असतील. आसाममधील स्वयंशासित जिल्हे आणि शिलॉंगचा लष्कर विभाग व म्युनिसिपॉलिटी यांचा मतदार संघ याला हें कलम लागू नाहीं :

मात्र कोणत्याहि राज्यांतील विधानसभेंत ५०० पेक्षां जास्त किंवा ६० पेक्षां कमी सभासद असणार नाहींत.

(३) प्रत्येक प्रादेशिक मतदार संघाला द्यावयाची सभासद-संख्या व त्या मतदार संघांतील लोकसंख्या (वर उल्लेखिलेल्या पद्धतीनें अजमावलेली) यांचें प्रमाण शक्यतोंवर सर्व राज्यांत सारखेंच राहील.

(४) प्रत्येक खानेसुमारी संपल्यावर निरनिराळ्या प्रादेशिक मतदार-संघांचे त्या राज्यांतील विधान सभेंतील प्रतिनिधित्व हें पार्लमेंट कायदा करून ठरवील त्या रीतीनें व त्या तारखेपासून तशा अधिकाऱ्यांकडून फेरफारानें निश्चित केलें जाईल :

मात्र हा फेरफार त्यावेळीं अस्तित्वांत असलेली विधान सभा बरखास्त झाली नाहीं तोंपर्यंत तिच्या प्रतिनिधित्वाला बाधक होणार नाहीं.

१७१. (१) ज्या राज्यांत विधान परिषद असेल त्या विधान परिषदें-तील एकूण सभासदांची संख्या विधान सभेंतील सभासद संख्येच्या $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त असणार नाहीं :

तथापि कोणत्याहि विधान परिषदेंतील एकूण सभासद संख्या चाळीसपेक्षां कमी असणार नाहीं :

(२) पार्लमेंट कायदा करून अन्यथा ठरवीपर्यंत विधान परिषद उप-कलम (३) मध्यें सांगितल्याप्रमाणें बनविली जाईल.

(३) विधान परिषदेंतील एकूण सभासद संख्येच्या—

(अ) पार्लमेंट कायदा करून निर्दिष्ट करील त्याप्रमाणें जवळजवळ $\frac{5}{6}$ सभासद हे राज्यांतील म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्डे व अन्य स्थानिक संस्थांतील सभासदांच्या बनलेल्या मतदार संघामार्फत निवडले जातील; (ब) जे त्या राज्यांत राहणारे; भारतांतील कोणत्याहि विद्यापीठाचे तीन वर्षे पदवीधर असतील किंवा पार्लमेंट कायदा करून किंवा कायद्यानें ज्याला वरील विद्या-

पीठांच्या पदवीधरांइतकीं तीन वर्षें लायकी आहे असें ठरवील, त्यांच्या मतदार संघामार्फत जवळ जवळ $\frac{1}{12}$ सभासद निवडले जातील; (क) पार्लमेंट कायदा करून किंवा कायद्यानें ठरवील त्या दुय्यम शाळांपेक्षां कमी दर्जाच्या नसणाऱ्या त्या राज्यांतील शिक्षण संस्थांत कमींत कमी तीन वर्षें शिक्षण देण्याचें काम करीत असलेल्या व्यक्तींच्या मतदार संघांमार्फत जवळजवळ $\frac{1}{12}$ सभासद निवडले जातील; (ड) विधान सभेचे सभासद नसलेले जवळ जवळ $\frac{1}{3}$ सभासद विधानसभेच्या सभासदांकडून निवडले जातील; (ई) उरलेले सभासद राज्यपाल उपकलम (५) मधील तजविजींनुसार नेमील.

(४) उपकलम (३), पोटकलम (अ), (ब) व (क) प्रमाणें निवडावयाचे सभासद हे पार्लमेंट कायद्यानें किंवा कायदा करून ठरवील तशा मतदार संघांमार्फत निवडले जातील आणि त्या व (ड) पोटकलमाखालील निवडणुका क्रमदेय एक मतदानपद्धतीनें प्रमाणशीर मतदानपद्धतीनुसार होतील.

(५) उपकलम (३), पोटकलम (ई) प्रमाणें राज्यपालानें नेमावयाचे सभासद हे साहित्य, शास्त्र, कला, सहकारी चळवळ व समाजसेवा यांत विशेष ज्ञान असलेल्या किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्यांपैकीं असतील.

१७२. (१) प्रत्येक राज्यांतील प्रत्येक विधान सभा जर अगोदर बरखास्त झाली नसेल तर तिच्या पहिल्या बैठकीच्या ठरविलेल्या तारखेपासून पांच वर्षें चालूं राहील, अधिक काळ चालू राहणार नाहीं. हा पांच वर्षांचा काळ संपला म्हणजे ती सभा बरखास्त होईल :

तथापि ही मुदत आणीबाणीचा जाहिरनामा चालू असल्यास पार्लमेंटला कायदा करून एका वेळीं एक वर्षापर्यंत वाढवितां येईल आणि त्या जाहिरनाम्याचा अंमल संपल्यावर ती मुदत कोठल्याहि परिस्थितींत सहा माहिन्यांपेक्षां जास्त वाढवितां येणार नाहीं.

(२) राज्याची विधान परिषद बरखास्त होणार नाहीं; पण तींतील $\frac{1}{3}$ सभासद दर दुसरें वर्ष संपतांच पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्याप्रमाणें निवृत्त होतील.

१७३. राज्याच्या कायदेमंडळांतील जागेवर निवड होण्याकरतां कोणीहि व्यक्ति पुढील अटी पुरी करीत नसेल तर लायक असणार नाहीं—

(अ) भारताचा नागरिक असणें; (ब) विधान सभेकरतां पंचवीस वर्षांपेक्षां कमी वय नसणें आणि विधान परिषदेकरतां तीस वर्षांपेक्षां कमी वय नसणें; आणि (क) पार्लमेंट कायद्यानें किंवा कायद्याखालीं ठरवील ती अन्य लायकी असणें.

१७४. (१) राज्यांतील सभागृह किंवा सभागृहें हीं वर्षांत निदान दोनदां तरी बैठकीकरतां बोलावलीं जातील. आणि त्यांच्या मागील अधिवेशनांतील शेवटची बैठक आणि पुढील अधिवेशनांतील पाहिली बैठक यांत सहा महिन्यांचा काल लोटणार नाहीं.

(२) वरील उपकलम (१) याला अनुसरून राज्यपाल वेळोवेळीं—

(अ) एखादें किंवा कोणतेंहि सभागृह त्याला योग्य वाटेल तेथें, व त्या वेळीं बोलावील; (ब) सभागृह किंवा सभागृहें स्थगित करील; (क) विधान सभा बरखास्त करील.

१७५. (१) राज्यपाल विधान सभेपुढें भाषण करील किंवा जेथें विधान परिषद असेल तेथें कोणत्याहि सभागृहापुढें किंवा दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीपुढें भाषण करील आणि त्याकरतां सभासदांना हजर रहाण्यास सांगेल.

(२) राज्यपाल हा कायदेमंडळापुढें चालूं असलेल्या बिलासंबंधीं किंवा अन्यथा एका किंवा दोन्ही सभागृहांना संदेश पाठवूं शकेल आणि ज्या गृहाकडे हा संदेश आला असेल तें सभागृह शक्य तितक्या तांतडीनें त्या संदेशांत जी गोष्ट विचारांत घ्यावी असें म्हटलें असेल ती विचाराकरतां घेईल.

१७६. (१) प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीला राज्यपाल विधान-सभेपुढें किंवा जेथें विधानपरिषद असेल तेथें दोन्ही सभांना एकत्र बोलावून त्यांच्यापुढें भाषण करील आणि त्यांना एकत्र बोलावण्याचें प्रयोजन सांगेल.

(२) सभागृहाच्या किंवा कोणत्याहि सभागृहाच्या कामकाजाचें नियमन करण्याकरतां जे नियम केले जातील त्यांत वरील भाषणांतील बाबींच्या चर्चे-

करतां वेळ देण्याची व त्या चर्चेला इतर कामापेक्षां अग्रक्रम देण्याची तरतूद केली जाईल.

१७७. राज्याच्या प्रत्येक मंत्र्याला आणि महाधिवक्त्याला विधान सभेंत किंवा जेथें विधान परिषद असेल तेथें दोन्ही गृहांत बोलण्याचा व अन्य रीतीनें कामकाजांत भाग घेण्याचा हक्क असेल; त्याचप्रमाणें कायदेमंडळाच्या ज्या कमिटीचा त्याला सभासद नेमला असेल त्या कमिटीपुढें बोलण्याचा व कामकाजांत भाग घेण्याचा त्याला हक्क असेल; पण या कलमाच्या आधारानें त्याला मत देण्याचा अधिकार प्राप्त होणार नाहीं.

राज्यांतील कायदेमंडळाचे अधिकारी

१७८. राज्याची प्रत्येक विधानसभा शक्य तितक्या लवकर आपल्या सभासदांपैकीं दोघांची अध्यक्ष व उपाध्यक्षपदाकरतां निवडणुक करील आणि जेव्हां जेव्हां अध्यक्ष किंवा उपाध्यक्षाची जागा रिकामी होईल तेव्हां तेव्हां ती ती जागा भरून काढण्याकरता दुसऱ्या सभासदांची निवडणूक करील.

१७९. विधानसभेच्या अध्यक्ष किंवा उपाध्यक्षपदावर असलेला सभासद—

(अ) जर त्यांचें विधानसभेचें सभासदत्व संपलें तर आपली जागा रिकामी करील; (ब) केव्हांहि स्वदस्तुरचें पत्र तो अध्यक्ष असल्यास उपाध्यक्षाकडे व उपाध्यक्ष असल्यास अध्यक्षाकडे पाठवून राजीनामा देऊं शकेल; (क) विधानसभेंतील त्या वेळच्या सभासदांनीं बहुमतानें ठराव केल्यास अधिकारावरून तो दूर केला जाईल:

मात्र (क) पोटकलमाखालीं आणावयाचा ठराव निदान १४ दिवसांची, ठराव आणण्याची हेतू व्यक्त करणारी सूचना दिल्याशिवाय आणतां येणार येणार नाहीं. तसेंच ज्या वेळीं विधानसभा बरखास्त होईल, त्या त्या वेळीं अध्यक्ष हा सभाबरखास्तीनंतर पहिली बैठक भरण्यापूर्वी आपली जागा सोडणार नाहीं.

१८०. (१) अध्यक्षाची जागा रिकामी असेपर्यन्त त्या जागेचीं कामें उपाध्यक्ष करील, आणि जर उपाध्यक्षाचीहि जागा रिकामी असेल तर राज्यपाल त्यांकरतां नेमील तो विधान सभेचा सभासद करील.

(२) विधान सभेच्या बैठकीला अध्यक्ष हजर नसला तर उपाध्यक्ष किंवा तोहि गैरहजर असला तर त्या सभेच्या कामकाजाच्या नियमांप्रमाणें ठरविलेला इसम किंवा तोहि इसम हजर नसला तर सभा ठरवील तो इसम, अध्यक्ष म्हणून काम करील.

१८१. (१) विधान सभेची बैठक चालूं असतांना जर केव्हांहि अध्यक्षाला कामावरून दूर करण्याचा ठराव तेथें विचाराकरतां आला असेल तर अध्यक्ष आणि उपाध्यक्षाला दूर करण्याचा ठराव आला असतां उपाध्यक्ष, हजर असला तरी, अध्यक्षस्थानीं बसणार नाहीं; आणि ज्या सभेंत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष गैरहजर असेल त्या कलम १८० (२) मधील तजविजी अशा प्रत्येक सभेला लागू होतील.

(२) ज्यावेळीं अध्यक्षाला अधिकारावरून दूर करण्याचा एखादा ठराव विचाराकरतां विधान सभेपुढें असेल त्यावेळीं अध्यक्षाला भाषण करण्याचा आणि अन्य रीतीनें कामकाजांत भाग घेण्याचा हक्क आहे; आणि १८९ कलमांत कांहींहि सांगितलें असलें तरी त्याला तसल्या ठरावावर किंवा त्या कामकाजांतील दुसऱ्या बाबीवर फक्त एकदांच मत देण्याचाहि हक्क आहे, पण जर समसमान मतें पडलीं तर मात्र त्याला मत देतां येणार नाहीं.

१८२. ज्या राज्यांत विधान परिषद असेल तेथें प्रत्येक परिषदेनें शक्य तितक्या लवकर आपल्यापैकीं सभापति व उपसभापतीच्या जागेकरतां दोघांची निवड करावी. आणि जेव्हां जेव्हां सभापति व उपसभापतींच्या जागा रिकाम्या होतील, तेव्हां तेव्हां दुसरा सभासद त्या त्या जागेकरतां निवडावा.

१८३. विधान परिषदेच्या सभापति किंवा उपसभापतीच्या जागेवर असलेला सभासद—

(अ) जर त्याचें विधान परिषदेचें सभासदत्व संपलें तर आपली जागा रिकामी करील; (ब) आपल्या स्वदस्तुरच्या लेखानें तो सभापति असल्यास उपसभापतीकडे व उपसभापति असल्यास सभापतीकडे आपल्या जागेचा राजीनामा देऊं शकेल; (क) विधान परिषदेच्या त्या वेळच्या सभासदांच्या बहुमतानें पास झालेल्या ठरावानें अधिकारावरून दूर केला जाईल :

मात्र पोटकलम (क) मधील हेतू कळविलेला ठराव निदान १४ दिवसांच्या पूर्वसूचनेशिवाय आणतां येणार नाहीं.

१८४. (१) सभापतीची जागा रिकामी असतांना उपसभापति त्या जागेचें काम करील; आणि उपसभापतीचीहि जागा रिकामी असेल तर राज्यपाल परिषदेच्या ज्या सभासदाची त्याकरतां नेमणूक करील तो पाहील.

(२) विधान परिषदेच्या बैठकीला सभापति गैरहजर असेल त्या वेळीं उपसभापति आणि तोहि गैरहजर असल्यास विधान परिषदेच्या कामकाजासंबंधीं नियमानें ठरविला असेल तो किंवा तोहि हजर नसल्यास विधान परिषद ठरवील तो, सभापति म्हणून काम करील.

१८५. (१) राज्याच्या विधान परिषदेची बैठक चालूं असतांना जर केव्हांहि सभापतीला कामावरून दूर करण्याचा ठराव तेथें विचाराकरतां आला असेल तर सभापति आणि उपसभापतीला दूर करण्याचा ठराव आला असतांना उपसभापति हजर असला तरी अध्यक्षस्थानीं बसणार नाहीं; आणि ज्या परिषदेंत सभापति किंवा उपसभापति गैरहजर असेल त्या १८४ (२) कलमामधील तजविजी अशा प्रत्येक सभेला लागू होतील.

(२) ज्या वेळीं सभापतीला अधिकारावरून दूर करण्याचा एखादा ठराव विधान परिषदेपुढें विचाराकरतां असेल त्या वेळीं सभापतीला भाषण करण्याचा आणि अन्य रीतीनें कामकाजांत भाग घेण्याचा हक्क आहे. आणि १८९ कलमांत कांहींहि सांगितलें असलें तरी त्याला तसल्या ठरावावर किंवा त्या कामकाजांतील दुसऱ्या बाबीवर फक्त एकदांच मत देण्याचा हक्क आहे; पण जर समसमान मतें पडलीं तर मात्र त्याला मत देतां येणार नाहीं.

१८६. विधान सभेच्या अध्यक्ष-उपाध्यक्षाला आणि विधान परिषदेच्या सभापति व उपसभापतीला, तें तें कायदेमंडळ कायद्यानें ठरवील तो पगार व भत्ते मिळतील आणि ती व्यवस्था होईपर्यंत दुसऱ्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेला पगार व भत्ते त्याला मिळतील.

१८७. (१) राज्याच्या सभागृहाला किंवा प्रत्येक सभागृहाला निरनिराळें कारभारी मंडळ (सेक्रेटरियल स्टाफ) असेल :

या कलमानें ज्या राज्यांत विधान परिषद असेल तेथें दोन्ही सभागृहांना समान अशा जागा निर्माण करण्यास प्रतिबंध आहे असें समजलें जाणार नाहीं.

(२) कायदेमंडळाच्या सभागृहाचे किंवा सभागृहांचें जें कारभारी मंडळ नेमावयाचें त्यांतील इसमांच्या नोकरीच्या शर्तींचें व भरतीचें नियमन कायदे-मंडळ कायद्यानें करूं शकेल.

(३) राज्याच्या कायदे-मंडळाकडून उपकलम (२) प्रमाणें ही व्यवस्था होईपर्यंत राज्यपाल हा, विधान सभेच्या अध्यक्षाचा किंवा विधान परिषदेच्या सभापतीचा सल्ला घेऊन विधान सभा किंवा परिषदेच्या कारभारी मंडळांत नेमलेल्या इसमांच्या नोकरीच्या शर्तींचे व भरतीचें नियमन करण्याकरतां नियम करील आणि अशाप्रकारें केलेले नियम या कलमाखालीं केलेल्या कायद्यांतील तजविजींना अनुसरून अमलांत राहतील.

कामकाजाची पद्धत

१८८. राज्याच्या विधान सभेंतील किंवा विधान परिषदेंतील प्रत्येक सभासद आपल्या जागेवर बसण्यापूर्वी राज्यपालासमोर अगर त्याकरतां त्यानें नेमलेल्या व्यक्तीसमोर तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम शपथ घेईल किंवा प्रतिज्ञा करील.

१८९. या घटनेंत जी अन्य व्यवस्था केली आहे, ती सोडून, राज्याच्या कायदे-मंडळांतील गृहाच्या बैठकीपुढें आलेले सर्व प्रश्न (अध्यक्ष किंवा सभापति किंवा त्या जागीं काम करीत असलेल्या व्यक्तीशिवाय) हजर असलेल्या व मतें देणाऱ्या सभासदांच्या बहुमतानें ठरविले जातील. अध्यक्ष किंवा सभापति किंवा त्या जागीं काम करीत असणारी कोणतीक्ति व्यक्ति पहिल्यांदा मत देणार नाहीं; पण तिला समसमान मतें पडल्यास जादा मताचा व तें देण्याचा हक्क आहे.

(२) राज्याच्या कायदे-मंडळाच्या कोणत्याहि गृहाला एखादी सभासद-त्वाची जागा रिकामी असली तरी काम करण्याचा अधिकार असेल; आणि एखादी अनधिकृत व्यक्ति बसली किंवा, तिनें मत दिलें, किंवा तिनें अन्य-प्रकारें कामकाजांत भाग घेतला असें मागाहून आढळून आलें तरी राज्याच्या कायदे मंडळाचें कामकाज त्यामुळें गैरकायदा ठरणार नाहीं.

(३) राज्याचें कायदेमंडळ अन्यथा कायद्यानें ठरवीपर्यंत कायदे-मंडळाची गणपूर्ति संख्या १० किंवा गृहांतील एकूण सभासदांच्या $\frac{1}{6}$ यापैकीं जी कोणती अधिक असेल ती असेल.

(४) राज्याच्या विधान सभेची किंवा परिषदेची बैठक चालूं असतां गणपूर्ति नसेल तर अध्यक्ष किंवा सभापति अगर त्या जागेवर असलेल्या व्यक्तीनें एकतर सभा स्थगित करावी किंवा गणपूर्ति होईपर्यंत सभा थांबवावी.

सभासदांची नालायकी

१९०. (१) राज्यांतील कायदे-मंडळाच्या दोन्ही सभागृहांचा सभासद कोणालाहि होतां येणार नाहीं; जो दोन्ही सभागृहांचा सभासद निवडला गेला असेल त्यानें एका किंवा दुसऱ्या सभागृहांतील आपली जागा रिकामी करण्याबद्दल राज्याचें कायदेमंडळ कायद्यानें तजवीज करील.

(२) पहिल्या परिशिष्टांतील दोन किंवा अधिक राज्यांच्या कायदे-मंडळांचे सभासद कोणाहि व्यक्तीला होतां येणार नाहीं. आणि जर एखादी व्यक्ति तशा दोन किंवा अधिक कायदे-मंडळांची सभासद म्हणून निवडून आली तर राष्ट्रपति जे नियम करील त्या नियमांत निर्दिष्ट केलेली मुदत संपतांच त्या सभासदाची सर्व राज्यांतील कायदे-मंडळांची जागा रिकामी होईल; पण जर त्यानें एका कायदे-मंडळांतील जागेशिवाय अन्य कायदे-मंडळांतील जागांचा पूर्वीच राजीनामा दिला असेल तर सर्व जागा रिकाम्या होणार नाहींत.

(३) जर राज्याच्या कायदे-मंडळांतील कोणताहि सभासद—

(अ) १९१ (अ) कलमांत दिलेल्या अपात्रतेंत येत असेल; किंवा (ब) त्यानें स्वदस्तुरानें आपल्या जागेचा राजीनामा अध्यक्ष किंवा सभापती-कडे पाठविला असेल, तर त्याची जागा रिकामी होईल.

(४) जर राज्याच्या कायदे-मंडळगृहाचा एखादा सभासद सभागृहाच्या परवानगीशिवाय साठ दिवस सभेच्या बैठकींना गैरहजर असेल तर त्याची जागा रिकामी झाली असें गृहानें जाहीर करावें :

मात्र ही साठ दिवसांची मुदत मोजतांना ज्या मुदतींत सभागृह स्थगित झालें असेल किंवा लागोपाठ चार दिवसांपेक्षां अधिक तहकूब झालें असेल ती मुदत हिशेबांत धरूं नये.

१९१. (१) एखादी व्यक्ति विधान सभा किंवा विधान परिषदेचा सभासद निवडून येण्यास किंवा होण्यास—

(अ) जर तो भारत सरकार व पहिल्या परिशिष्टांत दिलेल्या राज्यांतील एखाद्या सरकारांत प्राप्तीच्या जागेवर असेल व ती जागा राज्याच्या कायदे-मंडळानें कायदा करून प्राप्तीची जागा नाहीं असें जाहीर केलें नसेल; (ब) जर तो वेडा असेल आणि तो तसा असल्याचें योग्य कोर्टानें ठरविलें असेल; (क) जर तो नादार असेल व तो त्यांतून मुक्त झाला नसेल; (ड) जर तो भारताचा नागरिक नसेल किंवा त्यानें स्वेच्छेनें परराष्ट्रांतील राज्याचें नागरिकत्व संपादन केलें असेल किंवा त्यानें परराष्ट्रनिष्ठा मान्य केली असेल किंवा परराष्ट्रांशीं तो निष्ठाबद्ध असेल; (इ) जर तो पार्लमेंटनें केलेल्या कायद्यानें किंवा कायद्यान्वयें तसा अपात्र असेल;

तर नालायक ठरेल.

(२) एखादी व्यक्ति संघ-राज्यांत किंवा राज्यांत मंत्र्याच्या जागेवर आहे एवढ्याकरतां ती व्यक्ति भारत सरकार किंवा पहिल्या परिशिष्टांत दिलेल्या राज्यांतील सरकारांत प्राप्तीच्या जागेवर आहे असें मानलें जाणार नाहीं.

१९२. (१) राज्याच्या कायदे-मंडळाचा एखादा सभासद १९१ (१) कलमांत सांगितलेल्या अपात्रतेंत बसतो का नाहीं या संबंधीं प्रश्न उपस्थित झाल्यास राज्यपालाकडे तो प्रश्न निर्णयाकरतां सोंपविला जाईल व त्याचा निर्णय अखेरचा ठरेल.

(२) अशा कोणत्याहि प्रश्नावर निर्णय देण्यापूर्वी राज्यपाल निवडणूक-मंडळाचें मत मागवील व तो त्या मताप्रमाणें चालेल.

१९३. जर एखादा सभासद विधान सभेंत किंवा विधान परिषदेंत कलम १८८ मधील अटी पुऱ्या न करतां बसेल अगर मत देईल किंवा आपण सभासदत्वाला पात्र नाहीं किंवा अपात्र ठरविले गेलों आहों हें त्याला ठाऊक असेल किंवा त्याला पार्लमेंटनें किंवा राज्याच्या कायदे-मंडळानें केलेल्या कायद्यानुसार तसें करण्यास मनाई केली असेल, तर तो ज्या प्रत्येक दिवशीं कायदे-मंडळांत असा बसेल अगर मत देईल त्या प्रत्येक दिवसाला ५०० रुपये दंडास पात्र होईल, व तो दंड राज्याचें कर्ज म्हणून वसूल केला जाईल.

कायदे-मंडळें व त्यांच्या सभासदांच्या सत्ता, सवलती व संरक्षणें, (Immunities)

१९४. या घटनेच्या तरतुदींना अनुसरून आणि कायदेमंडळाचें काम-काज नियमन करण्याचे नियम व स्थायी आदेश यांना अनुसरून प्रत्येक राज्यांतील कायदे-मंडळांत भाषणस्वातंत्र राहील.

(२) एखाद्या कायदे-मंडळाच्या सभासदानें, कायदे-मंडळामध्यें किंवा त्या मंडळाच्या कमिटीमध्यें कांहीं भाषण केलें असलें किंवा मत दिलें असलें तरी त्याबद्दल कोर्टांत त्याच्याविरुद्ध काम चालवितां येणार नाहीं. आणि कायदे-मंडळाचा कोणताहि वृत्तान्त, कागदपत्र, मतदान, किंवा कामकाजाची नोंद ही कायदेमंडळानें किंवा त्याच्या हुकुमानें प्रसिद्ध केली असेल तर त्या-बद्दल कोणत्याहि व्यक्तीविरुद्ध कोर्टांत काम चालवितां येणार नाहीं.

(३) इतर बाबतींत कायदे-मंडळाच्या सभागृहाचें, त्याच्या सभासदांचें आणि त्या मंडळाच्या सभागृह कमिट्यांचे हक्क, सवलती व संरक्षणें कायदे-मंडळ वेळोवेळीं कायदा करून ठरवील ते असतील; आणि असें ठरवीपर्यंत युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटचें कॉमन्स सभागृह, सभासद आणि कमिट्या यांना जे हक्क या घटनेच्या सुरुवातीला असतील ते येथेंहि लागू होतील.

(४) ज्यांना या घटनेप्रमाणें कायदे-मंडळाचें सभागृह व त्याची कोणतीहि कमिटी यांच्यापुढें भाषण करण्याचा आणि अन्य रीतीनें कामांत भाग घेण्याचा अधिकार दिला आहे त्यांनाहि कायदे-मंडळाच्या सभासदांचे उपकलमें (१), (२) व (३) मध्यें दिलेलें हक्क प्राप्त होतील.

१९५. विधान सभा व विधान परिषदेच्या सभासदांना राज्याचें कायदे-मंडळ वेळोवेळीं कायदा करून ठरवील तें वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क आहे. आणि तशी व्यवस्था होईपर्यंत त्या सभासदांना ही घटना सुरू होण्यापूर्वी अनुबद्ध प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली सभासदांना ज्या प्रमाणांत व ज्या शर्तींवर वेतन व भत्ते मिळत होते ते मिळतील.

कायदे-मंडळाची कार्यपद्धति

१९६. (१) पैशाच्या व इतर अर्थ बिलासंबंधीं कलमें १९८ व २०७ मध्यें जी तरतूद केली आहे तिला अनुसरून, कोणतेंहि बिल, कायदे-मंडळाला विधान परिषद असेल तर, कोणत्याहि सभागृहामध्यें आणतां येईल.

(२) कलमें १९७ व १९८ यांतील तजविजींनुसार एखादें बिल विधान परिषद असलेल्या राज्याच्या कायदे-मंडळ गृहांनीं उपसूचनांशिवाय किंवा तशा संमत उपसूचनांसह उभय सभागृहांनीं संमत केलें नसेल तर तें कायदे-मंडळाच्या गृहांनीं पास केलें आहे असें मानलें जाणार नाहीं.

(३) कायदे मंडळापुढें विचाराकरतां असलेलें बिल एक किंवा दोन्ही सभागृहें स्थगित झालीं तरी रद्द होणार नाहीं.

(४) विधान परिषदेपुढें असलेलें व विधान सभेनें पास न केलेलें बिल विधानसभा बरखास्त झाली तरी रद्द होणार नाहीं.

(५) विधान सभेपुढें असलेलें किंवा विधान सभेनें पास केलेलें व विधान परिषदेपुढें चालू असलेलें बिल, विधान सभा विसर्जित झाल्यानंतर रद्द होईल.

१९७. (१) विधान परिषद असलेल्या राज्यांत विधान सभेनें पास केलेलें आणि विधान परिषदेकडे पाठविलेलें बिल जर—

(अ) विधान परिषदेनें फेंटाळलें; किंवा (ब) तें विधान परिषदेपुढें ठेवलेल्या तारखेपासून तें पास न होतां तीन महिन्यांपेक्षां अधिक काळ गेला असेल; किंवा (क) विधान परिषदेनें तें उपसूचनांसह पास केलें असेल व त्याला विधान सभेची संमति नसेल; तर

विधानसभा आपल्या कार्यनियमनाकरतां केलेल्या नियमांनुसार तें बिल त्याच किंवा पुढल्या कोणत्याहि अधिवेशनांत विधान परिषदेनें केलेल्या, सुचविलेल्या किंवा मान्य केलेल्या तसल्या उपसूचनांसह—किंवा उपसूचनांशिवाय तें बिल पुन्हा पास करूं शकेल, आणि नंतर तें पास केलेलें बिल विधान परिषदेकडे पाठवूं शकेल.

(२) अशा प्रकारें विधानसभेनें दुसऱ्यांदा पास केलेलें व विधान परिषदेकडे पाठविलेलें बिल जर—

(अ) विधान परिषदेनें फेंटाळलें; किंवा (ब) विधान परिषदेपुढें तें बिल ठेवलेल्याला व पास न होण्याला जर एक महिन्यापेक्षां जास्त काळ झाला असेल; किंवा (क) विधान सभेला संमत न होणाऱ्या उपसूचनांसह विधान परिषदेनें तें बिल पास केलें असेल;

तर तें बिल, विधान परिषदेंनें केलेल्या किंवा सुचविलेल्या आणि विधान सभेनें मान्य केलेल्या उपसूचनांसह, असल्याच तर, जर तें दुसऱ्यांदा विधान-सभा पास करील तर त्या स्वरूपांतलें तें बिल दोन्ही सभागृहांनीं पास केलें असें समजलें जाईल.

(३) पैशाच्या बिलास या कलमांतलें कांहींहि लागू नाहीं.

१९.. (१) पैशाचें बिल विधान परिषदेंत आणतां येणार नाहीं.

(२) पैशासंबंधींचें बिल विधान परिषद असलेल्या विधानसभेनें पास केल्यानंतर तें विधान परिषदेकडे शिफारशीकरतां पाठविलें जाईल. तें सभा-गृह सदर बिल पोहोंचलेल्या तारखेपासून चौदा दिवसांचे आंत आपल्या शिफारशींसह तें विधान सभेकडे पाठवील व विधानसभा त्या परिषदेच्या सर्व अगर कांहीं शिफारशी मान्य अगर अमान्य करील.

(३) जर विधानसभेनें विधान परिषदेच्या शिफारशींपैकीं कांहीं मान्य केल्या तर तें बिल विधान परिषदेनें शिफारस केलेल्या व विधानसभेनें स्वीकारलेल्या उपसूचनांसह उभय सभागृहांनीं पास केलें असें समजलें जाईल.

(४) जर विधानसभेनें, विधान परिषदेची कोणतीहि शिफारस मान्य केली नाहीं, तर पैशासंबंधीचें तें बिल विधान परिषदेनें शिफारस केलेल्या कोणत्याहि उपसूचनेशिवाय ज्या स्वरूपांत विधान सभेनें पास केलें असेल त्या स्वरूपांत तें दोन्ही सभागृहांनीं पास केलें असें समजलें जाईल.

(५) जर पैशासंबंधीचें, विधान सभेनें पास केलेलें व विधान परिषदेच्या शिफारशींकरतां पाठविलेलें बिल वरील चौदा दिवसांच्यां आंत विधानसभेकडे परत आलें नाहीं तर विधानसभेनें तें ज्या स्वरूपांत पास केलें असेल त्या स्वरूपांत तें दोन्ही सभागृहांनीं पास केलें असें सदर मुदत संपतांच समजलें जाईल.

१९९. (१) ज्या बिलांत खालील एका किंवा सर्व बाबींचा अंतर्भाव असेल तें या प्रकरणापुरतें पैशाचें बिल समजलें जाईल—

(अ) कोणताहि कर बसविणें, रद्द करणें, कमी करणें, बदलणें अगर त्याचें नियमन करणें; (ब) कर्ज उभारण्याच्या बाबतींत नियमन करणें किंवा राज्यानें एखादी हमी देणें किंवा राज्यानें पैशासंबंधीं घेतलेल्या किंवा द्यावयाच्या जबाबदाऱ्यांच्याबाबत कायद्यांत दुरुस्ती करणें; (क) राज्याच्या

संचित निधींचें (कन्सॉलिडेटेड फंड) किंवा सादिलवार निधींचें रक्षण, असल्या निधींत पैशाचा भरणा करणें किंवा काढणें; (ड) राज्याच्या संचित निधीच्या पैशाचा विनियोग करणें; (इ) कोणताहि खर्च राज्याच्या संचित निधीवर लादलेला खर्च आहे असें जाहिर करणें अगर अशा खर्चाची रक्कम वाढविणें; (फ) राज्याच्या संचित निधीखातीं किंवा सार्वजनिक हिशेबखातीं रक्कम स्वीकारणें किंवा अशा पैशाचें रक्षण करणें किंवा तो देणें; किंवा (ग) पोटकलम (अ) ते (फ) पर्यन्तच्या बाबींसंबंधीं प्रासंगिक गोष्टी करणें.

(२) एखाद्या बिलांत दंड बसविण्याची किंवा इतर आर्थिक शासनाची तरतूद आहे किंवा केलेल्या कामाबद्दल किंवा परवान्याबद्दल पैशाची मागणी करण्याचा किंवा देण्याचा (अधिकार आहे) किंवा त्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किंवा मंडळीकडून स्थानिक कामाकरतां कर बसविण्याची, रद्द करण्याची, कमी करण्याची, बदलण्याची किंवा नियमन करण्याची तरतूद केली आहे एवढ्यावरून तें पैशाचें बिल आहे असें मानलें जाणार नाहीं.

(३) विधान परिषद असलेल्या कायदे मंडळांत एखादें आणलेलें बिल पैशाचें बिल आहे किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाल्यास त्या राज्यांतल्या विधान सभेच्या अध्यक्षाचा त्यावरील निर्णय अखेरचा असेल.

(४) जेव्हां एखादें पैशाचें बिल कलम १९८ प्रमाणें विधान परिषदेकडे पाठविलें जाईल आणि कलम २०० प्रमाणें राज्यपालाकडे संमतीकरतां सादर केलें जाईल, त्यावेळीं तशा प्रत्येक बिलावर हें पैशाचें बिल आहे असा विधान सभेच्या अध्यक्षाच्या सहीचा शेरा असेल.

२००. (१) जेव्हां एखादें बिल विधान सभेनें पास केलें असेल आणि विधान परिषद असल्यास दोन्ही सभागृहांनीं पास केलें असेल तेव्हां तें राज्यपालाकडे सादर केलें जाईल. राज्यपाल आपण त्या बिलाला मान्यता देतों किंवा देत नाहीं किंवा तें राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवतों असें जाहीर करील :

मात्र राज्यपालाकडे मान्यतेकरतां आलेलें बिल जर पैशाचें बिल नसेल तर, तें आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्यपाल तें संदेशासह सर्व बिलाचा किंवा त्यांतील निर्दिष्ट योजनांचा गृहाला किंवा गृहांना फेरविचार

करण्याची विनंति करील; आणि गृहानें अगर गृहांनीं त्या संदेशांत ज्या शिफारशी असतील त्याचा उपसूचना आणून बिलांत अंतर्भाव करण्याची इष्टता विचारांत घ्यावी असें सांगतील. अध्यक्षाकडून अशाप्रकारें परत आलेल्या बिलांचा गृह अगर गृहें त्या दृष्टीनें फेरविचार करतील. त्यानंतर तें बिल जर उपसूचनांसह अगर शिवाय गृहानें अगर गृहांनीं पास केलें व राज्यपालाकडे मान्यतेकरतां पाठविलें तर राज्यपाल आपली मान्यता नाकारणार नाहीं.

त्याचप्रमाणें एखाद्या बिलाचा कायदा झाल्यास तो या घटनेनें उच्च न्यायालयाकडून जें स्थान भरून काढण्याची योजना केली आहे, तें धोक्यांत आणण्याइतकी उच्च न्यायालयाची सत्ता कमी होणार आहे असें त्याला वाटल्यास राज्यपाल त्याला मान्यता न देतां राष्ट्रपतीच्या विचाराकरितां तें राखून ठेवील.

२०१. जेव्हां राज्यपालानें राष्ट्रपतीच्या विचाराकरतां एखादें बिल राखून ठेवलें असेल तेव्हां राष्ट्रपति एकतर त्याला मान्यता देतों अगर देत नाहीं असें जाहीर करील :

मात्र ज्यावेळीं तें पैशाचें बिल नसेल त्यावेळीं राष्ट्रपति कलम २०० च्या पहिल्या शर्तींत सांगितल्याप्रमाणें राज्यपालाला संदेशासह तें बिल सभागृह किंवा सभागृहाकडे परत पाठवण्यास सांगूं शकेल. अशा प्रकारें परत आलेल्या बिलाचा सभागृह अगर गृहें संदेश आलेल्या तारखेपासून सहा महिन्यांत फेरविचार करतील आणि जर तें पुनः उपसूचनांसह अगर शिवाय एका किंवा दोन्ही सभागृहांनीं पास केलें तर पुन्हा तें राष्ट्रपतीकडे विचाराकरतां पाठविलें जाईल.

अर्थविषयक बाबींची कार्यपद्धति

२०२. प्रत्येक अर्थवर्षासाठीं राज्याचें अंदाजी जमाखर्च पत्रक राज्याच्या कायदे-मंडळाच्या सभागृह किंवा सभागृहांपुढें ठेवावयास राज्यपाल सांगेल. त्याला या भागांत " वार्षिक अंदाजपत्रक " म्हटलें आहे.

(२) या अंदाजपत्रकांत धरलेल्या खर्चाच्या अंदाजाच्या पुढील बाबी स्वतंत्रपणें दाखविल्या जातील—

(अ) राज्याच्या संचित निधीवर जो खर्च या घटनेनें लादला असेल

सो भागविण्याच्या खर्चाच्या रकमा; आणि (ब) राज्याच्या संचित निधींतून जो इतर खर्च करावयाचें योजलें असेल तो भागविण्याकरतां लागणाऱ्या रकमा;

आणि उत्पन्नाच्या हिशेबाचा खर्च इतर खर्चांपासून निराळा दाखविला जाईल.

(३) खालील खर्च हा प्रत्येक राज्याच्या संचित निधीवर लादलेला खर्च असेल—

(अ) राज्यपालाची प्राप्ती व भत्ते आणि त्याच्या कामकाजासंबंधी इतर खर्च (ब) विधान सभेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षाचा आणि विधान परिषद असल्यास त्याच्या सभापतीचा व उपसभापतीचा पगार व भत्ते; (क) ज्या कर्जांना राज्य जबाबदार आहे तें व्याज, निक्षेप निधि (सिंकिंग फंड), फेडीचा बोजा यासह आणि कर्ज उभारणें, आणि त्याची व्यवस्था लावणें आणि फेड करणें याचा खर्च; (ड) कोणत्याहि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार व भत्ते यांचा खर्च; (इ) कोणत्याहि कोर्टाचा किंवा लवाद-मंडळाचा निवाडा, हुकुमनामा, किंवा लवादनामा याची भरपाई करण्याकरतां लागणारी रक्कम; (फ) या घटनेनें किंवा राज्याच्या कायदे-मंडळानें कायद्यानें जो अशा प्रकारें लादावा असें सांगितलें असेल तो इतर खर्च.

२०३. राज्याच्या संचित निधीवर जितका अंदाजी खर्चाचा बोजा टाकला असेल तितका विधान सभेपुढें मताकरतां टाकला जाणार नाहीं; पण कायदे-मंडळांत त्या अंदाजपत्रकाची चर्चा करण्यास प्रतिबंध आहे असा या उपकलमाचा अर्थ केला जाणार नाहीं.

(२) इतर खर्चासंबंधींचा अंदाजपत्रकांतील भाग विधानसभेपुढें मागण्याच्या स्वरूपांत मान्यतेकरतां मांडण्यात येईल; आणि विधानसभेला त्या मागण्यांपैकीं कोणत्याहि मागणीला मान्यता देण्याचा अगर नाकारण्याचा किंवा मागण्यांतील रक्कम कमी करून मान्यता देण्याचा अधिकार असेल.

(३) राज्यपालाच्या शिफारशीशिवाय कोणतीही मागणी मान्यतेकरतां केली जाणार नाहीं.

२०४. (१) विधान सभेनें कलम २०३ प्रमाणें मान्यता दिल्यावर, शक्य तितक्या लवकर, पुढील लागणारा पैसा राज्याच्या संचित निधींतून उपलब्ध व्हावा म्हणून एक बिल आणलें जाईल—

(अ) विधान सभेनें तशा मान्यता दिलेल्या; आणि :(ब) राज्याच्या संचित निधीवर लादलेली पण गृहापुढें किंवा गृहांपुढें पूर्वी सादर केलेल्या अंदाजी खर्चापेक्षां अधिक नसलेली खर्चाची रक्कम.

(२) परिणामीं ज्यामुळें रकमेंत बदल होईल किंवा मान्यता दिलेल्या रकमेचें संकेतस्थान बदलेल किंवा राज्याच्या संचित निधीवर लादलेल्या खर्चाच्या रकमेंत बदल होईल अशी कोणतीहि उपसूचना कायदेमंडळाच्या गृहापुढें किंवा कोणत्याहि एका गृहापुढें असलेल्या बिलाला आणतां येणार नाहीं. या उपकलमाखालीं उपसूचना नाकारण्यासारखी आहे का नाहीं हें ठरविण्याचा निर्णायक अधिकार त्या सभेच्या त्या वेळच्या अध्यक्षाला असेल.

(३) २०५ व २०६ कलमांतील योजनांना अनुसरून राज्याच्या संचित निधींतून कोणताही पैसा जर या उपकलमांतील तरतुदीप्रमाणें कायद्यानें उपलब्ध केला नसेल तर काढतां येणार नाहीं.

२०५. (१) (अ) २०४ कलमांतील तजविजींना अनुसरून केलेल्या एखाद्या कायद्यानें विशिष्ट कामाकरितां चालूं अर्थवर्षांत खर्चाकरितां अधिकृत ठरवलेली रक्कम त्या सालांतील कामाकरितां अपुरी वाटत असेल किंवा त्या सालाच्या वार्षिक अंदाजपत्रकांत न कल्पिलेली कोणत्या तरी नव्या कामाकरितां अधिक किंवा पुरवणी रकमेची जरूरी निर्माण झाली असेल; किंवा (ब) त्या सालाकरतां आणि त्या कामाकरतां मान्यता मिळालेल्या रकमेपेक्षां अधिक रक्कम एखाद्या कामांत खर्च झाली असेल, तर राज्यपाल, परिस्थित्यनुरूप कायदेमंडळाच्या सभागृहापुढें किंवा सभागृहांपुढें तो खर्च दाखविलेलें दुसरें अंदाज पत्रक ठेवावयास लावील किंवा विधानसभेपुढें अधिक झालेल्या खर्चाची मागणी मांडण्यास लावील.

(२) वार्षिक अंदाजपत्रकाला व त्यांत दर्शविलेल्या खर्चाला किंवा रकमेच्या मागणीला आणि ती मागणी व खर्च राज्याच्या संचित निधींतून भागवण्याकरतां जो पैशाच्या विनियोगाला अधिकार देण्याचा कायदा करावा

लागेल त्याला कलमें २०२, २०३, २०४ मधील तजविजी जशा लागू होतील तशाच त्या (वरील २०५ मधील) तशा पत्रकाला आणि खर्चाला किंवा मागणीला आणि ती मागणींतील रक्कम किंवा खर्च राज्याच्या संचित निधींतून भागविण्याकरतां पैशाच्या विनियोगाला अधिकार देण्याचा जो कायदा करावा लागेल, त्याला लागू होतील.

२०६. (१) या प्रकरणांत वरील तजविजी कांहींहि असल्या तरी राज्याच्या विधानसभेला पुढील अधिकार असतील—

(अ) २०३ कलमांत सांगितलेली मतदानानें रकमेला मान्यता देण्याची प्रक्रिया पुरी होण्यापूर्वी आणि २०४ कलमांतील योजनानुरूप त्या खर्चासाठीं करावयाचा कायदा पास होण्यापूर्वी कोठल्याहि अर्थ-वर्षांतील कालखंडाच्या अंदाजी खर्चाकरितां आगाऊ रक्कम देणें; (ब) जेव्हां राज्याच्या कामाच्या भव्यतेमुळें किंवा अनिश्चित स्वरूपामुळें वार्षिक अंदाजपत्रकांत सामान्यपणें दिल्या जाणाऱ्या तपशीलांत नसलेली राज्याच्या उत्पन्नावर एखादी मागणी आली तर त्याकरतां रक्कम मंजूर करणें; (क) कोणत्याहि अर्थ-वर्षाच्या चालूं कामाचा भाग नसणारी अपवादात्मक रक्कम मंजूर करणें;

आणि राज्याच्या कायदेमंडळाला सदर कामाकरतां मंजूर केलेला पैसा राज्याच्या संचित निधींतून कायद्यानें अधिकार देऊन काढण्याची सत्ता असेल.

(२) वार्षिक अंदाजपत्रकांत दर्शविलेल्या खर्चाकरतां रक्कम देण्याला आणि राज्याच्या संचित निधींतून तो खर्च भागविण्याला जो पैशाच्या विनियोगाला अधिकार देण्याचा कायदा करावा लागेल त्याला कलमें २०३ व २०४ मधील तजविजी जशा लागू आहेत तशाच त्या उपकलम (१) मधील रक्कम देण्याला आणि त्या कलमाखालीं कोणताहि कायदा करण्याला लागू होतील.

२०७. (१) कलम १९९ (१) मधील (अ) ते (फ) पर्यंतच्या पोटकलमांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि बाबींसंबंधीं तरतूद करावयाचें बिल किंवा उपसूचना राज्यपालाच्या शिफारशीशिवाय प्रविष्ट करतां किंवा मांडतां

यावयाचें नाहीं आणि असें तरतुदीचें बिल विधानपरिषदेंत प्रविष्ट करतां येणार नाहीः

तथापि एखादा कर कमी करण्याची किंवा रद्द करण्याची उपसूचना मांडावयाची असेल तर या उपकलमाप्रमाणें त्याला शिफारस लागणार नाहीं.

(२) एकाद्या बिलांत किंवा उपसूचनेंत दंडाची किंवा इतर आर्थिक शासनाची किंवा परवान्याच्या किंवा अन्य कामाच्या फीची मागणी किंवा भरणा असेल किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला किंवा तें काम करीत असलेल्या स्थानिक मंडळाला एखादा कर बसविण्याचा, रद्द करण्याचा, कमी करण्याचा, बदल करण्याचा किंवा नियमित करण्याचा अधिकार असेल तर तें बिल किंवा उपसूचना वर सांगितलेल्या बाबींच्या तरतुदी करणाऱ्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं.

(३) एकाद्या पास होणाऱ्या आणि अमलांत आणल्या जाणाऱ्या बिलामुळें राज्याच्या संचित निधींतून खर्च होणार असेल तर राज्यपालानें तें बिल विचाराकरतां व्यावें अशी कायदेमंडळाच्या सभागृहाला शिफारस केल्याशिवाय तें सभागृह तें बिल पास करणार नाहीं.

कामाची सामान्य पद्धत

२०८. (१) राज्याच्या कायदेमंडळाच्या सभागृहानें या घटनेंतील व्यवस्थेला बाध येऊं न देतां, आपल्या कार्यपद्धतीचें व कामकाजाचें नियमन करण्याकरतां नियम करावेत.

(२) उपकलम (१) मधील नियम केले जाईपर्यन्त, ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वी जे अमलांत असलेले कामकाजाचे नियम व स्थायी आदेश त्या त्या प्रांताच्या कायदेमंडळासंबंधीं होते, तेच विधानसभेचा अध्यक्ष किंवा विधान परिषदेचा सभापति त्यांत ज्या दुरुस्त्या किंवा फेरफार करील त्यांसह राज्याच्या त्या कायदेमंडळाला लागू होतील.

(३) जेथें विधान परिषद असेल तेथें, राज्यपाल हा विधानसभेच्या अध्यक्षाचा आणि विधानपरिषदेच्या सभापतीचा सल्ला घेऊन, दोन्ही सभागृहांच्या व्यवहारासंबंधीचे कामकाजाच्या पद्धतीचे नियम करील.

२०९. अर्थविषयक कामकाज योग्य वेळांत पुरें होण्याकरतां, अर्थ-विषयक बाबीसंबंधीच्या किंवा राज्याच्या संचित निधींतून पैशाच्या विनियोगा-संबंधींच्या बिलाबद्दल कायदेमंडळाच्या सभागृहानें किंवा सभागृहांनीं कोणती पद्धति अनुसरावी व कसें कामकाज करावें यासंबंधीं राज्याच्या कायदे-मंडळानें कायद्यानें नियमन करावें, आणि जर आणि जेथवर अशा केलेल्या कोणत्याहि कायद्यांतील कोणतीहि तजवीज ह्या कायदे-मंडळाच्या सभागृहानें किंवा सभागृहांनीं कलम २०८ प्रमाणें केलेल्या कोणत्याहि नियमाला किंवा त्या कलमांतील उपकलम (२) प्रमाणें राज्याच्या कायदे-मंडळाला लागू होणाऱ्या कोणत्याहि नियमाला किंवा स्थायी आदेशाला जर विसंगत असेल तर (कायद्यांतील) तजवीज प्रभावी ठरेल.

२१०. (१) १७ व्या भागांत कांहींहि म्हटलें असलें तरी राज्याच्या कायदेमंडळाचें कामकाज ३४८ कलमानुसार राज्याच्या सरकारी भाषेंत किंवा भाषांत किंवा हिंदींत किंवा इंपजींत चालेल :

तथापि जर एखाद्या सभासदाला आपलें म्हणणें वर दिलेल्या भाषांपैकीं कोणत्याहि भाषेंत नीटपणें मांडतां येत नसेल तर विधानसभेच्या अध्यक्षाला किंवा विधानपरिषदेच्या सभापतीला किंवा त्या जागीं काम करीत असलेल्या व्यक्तीला त्या सभासदाला मातृभाषेंत बोलण्याची परवानगी देतां येईल.

(२) कायदेमंडळानें कायदा करून अन्य व्यवस्था न केल्यास या कलमांत असलेले " किंवा इंग्रजींत " हे शब्द ही घटना अमलांत आल्यापासून पंधरा वर्षांनंतर त्या कलमांतून जणू वगळले गेले आहेत असें समजण्यांत येईल.

२११. उच्चतम न्यायालयांतील किंवा उच्च न्यायालयांतील कोणत्याहि न्यायाधीशाच्या, तें काम करीत असतांना, केलेल्या वर्तनाबद्दल कायदेमंडळांत चर्चा केली जाणार नाहीं.

२१२. (१) कायदेमंडळांतील कामकाजाची मान्यता, (व्हॅलिडिटी) त्या कामकाजांत नियमबाह्यता होती या सबबीवर आक्षेपाचा विषय होणार नाहीं.

(२) या घटनेनें किंवा घटनेखालीं ज्या अधिकाऱ्याला किंवा कायदे-मंडळाच्या सभासदाला कार्यपद्धतीचें किंवा कार्याचें नियमन करण्याकरतां

किंवा शांतता राखण्याकरतां कायदेमंडळांत अधिकार दिले असतील, तर ते अधिकार बजावणारी व्यक्ति कोणत्याहि न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रांत येणार नाहीं.

प्रकरण ४

राज्यपालाचे कायदेविषयक अधिकार

२१३. (१) राज्याची विधानसभा किंवा जेथें विधान परिषद असेल तेथें दोन्हीहि सभागृहांच्या बैठकी चालू नसतांना, जर कोणत्याहि वेळीं राज्यपालाला असें वाटलें कीं, विद्यमान परिस्थितीमुळें तांतडीचे उपाय योजणें आवश्यक आहे तर त्यानें परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार वटहूकूम काढावेत :

मात्र—

(अ) एखाद्या बिलांत असणाऱ्या त्याच कलमांना या घटनेप्रमाणें तें बिल कायदेमंडळांत आणण्याकरतां राष्ट्रपतीची पूर्वमंजुरी लागली असती; किंवा (ब) तींच कलमें असणारें बिल राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवणें त्याला आवश्यक वाटलें असतें; किंवा (क) कायदेमंडळाचा तींच कलमें असणारा एखादा कानू या घटनेप्रमाणें राष्ट्रपतीकडे विचाराकरतां पाठविल्यावर त्यांची संमति न मिळाल्यास अमान्य (Invalid) ठरला असतां,

असा कोणताहि वटहुकुम राज्यपाल हा राष्ट्रपतीकडून सूचना मिळाल्या-शिवाय काढणार नाहीं.

(२) या कलमान्वयें काढलेल्या वटहुकुमाला राज्यपालानें मान्यता दिलेल्या कायदेमंडळाच्या कानूइतकीच शक्ति व क्षमता असेल, पण असला प्रत्येक वटहुकूम—

(अ) विधान सभेपुढें किंवा जेथें विधान परिषद असेल तेथें दोन्ही सभागृहांपुढें ठेवला जाईल, आणि तो कायदेमंडळाची पुनः बैठक भरल्या-पासून सहा आठवडे संपतांच रद्द होईल किंवा ही मुदत संपण्यापूर्वी त्या वटहुकुमाच्या नापसंतीचा ठराव विधान सभेनें पास केल्यास आणि विधान परिषद असल्यास तिनें संमति दिल्यास असा ठराव पास झाल्यावर किंवा

त्या परिषदेनें संमती दिल्यावर तो वटहुकुम रद्द होईल; आणि (ब) राज्यपालाकडून केव्हांहि तो वटहुकूम परत घेतला जाईल.

स्पष्टीकरणः—जेथें विधान परिषद असलेलीं कायदेमंडळाचीं सभागृहें निरनिराळ्या तारखांना भरविण्यांत येतील तेथें जें सभागृह उशीरा बोलावलें असेल तेथून सहा आठवडे, या कलमाच्या उद्देशाकरतां, मोजावेत.

(३) या कलमाखालीं काढावयाच्या वटहुकुमांत जर अशी एखादी योजना असेल कीं, जी राज्यपालानें संमति दिलेल्या कायदेमंडळाच्या कायद्यांत मान्यता पावणार नाहीं, तर ती योजना असलेला वटहुकुम रद्द होईल :

मात्र, पार्लमेंटच्या एखाद्या कायद्याशीं किंवा समानसूचींत निर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधीं विद्यमान कायद्याशीं, विरुद्ध असणाऱ्या राज्याच्या कायदेमंडळाच्या कायद्यावर ह्या घटनेंतील तजविजीकरतां होणाऱ्या परिणामासंबंधीं एखादा राष्ट्रपतीच्या सूचनेनुसार या कलमाखालीं काढलेला वटहुकूम हा राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवलेला व त्यानें संमति दिलेला कायदेमंडळाचा कायदा आहे असें मानलें जाईल.

प्रकरण ५

राज्यांतील उच्च न्यायालयें

२१४. (१) प्रत्येक राज्याला एक उच्च न्यायालय असेल.

(२) ही घटना सुरू होण्यापूर्वी जें न्यायालय ज्या प्रांतावर अधिकार चालवीत असेल तें त्या त्या राज्याचें ह्या घटनेच्या कार्याकरतां उच्च न्यायालय समजलें जाईल.

(३) या कलमांत निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक उच्च न्यायालयाला ह्या प्रकरणांतील तजविजी लागू होतील.

२१५. प्रत्येक उच्च न्यायालय हें अभिलेखाचें (Record) न्यायालय असेल आणि त्याला त्या न्यायालयाच्या बेअदबीकरतां शिक्षा करण्यासह सर्व अधिकार असतीलः

२१६. प्रत्येक उच्च न्यायालयांत एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपतीनें वेळोवेळीं अवश्य वाटणारे त्यांनीं नेमलेले न्यायाधीश असतील :

मात्र अशा प्रकारें नेमलेले त्या त्या न्यायालयांतील न्यायाधीश हे केव्हांहि राष्ट्रपति वेळोवेळीं हुकुम काढून कमाल संख्या ठरवील त्यापेक्षां संख्येनें अधिक असणार नाहींत.

२१७. राष्ट्रपति स्वतःच्या सहीशिक्क्याच्या हुकुमान्वयें उच्च न्यायालयांतील प्रत्येक न्यायाधीशाची नेमणूक करील. तसें करण्यापूर्वी तो भारताच्या मुख्य न्यायाधीशाचा, राज्याच्या राज्यापालाचा आणि ती नेमणूक उच्च न्यायालयांतील मुख्य न्यायाधीशाशिवाय अन्य न्यायाधीशाची असेल तर त्या न्यायालयांतील मुख्य न्यायाधीशाचा सल्ला घेईल. तो न्यायाधीश वयाच्या साठ वर्षेंपर्यंत अधिकारावर राहील:

मात्र—

(अ) कोणत्याहि न्यायाधीशाला आपल्या सहीनें राष्ट्रपतीकडे राजीनामा देतां येईल; (ब) कलम १२४ (४) मध्यें उच्चतम न्यायालयांतील न्यायाधीशाला जागेवरून दूर करण्यासंबंधीं जी पद्धति सांगितली आहे त्याप्रमाणें कोणत्याहि न्यायाधीशाला राष्ट्रपति काढूं शकेल; (क) जर राष्ट्रतीनें एखाद्या न्यायाधीशाला उच्चतम न्यायालयाचा न्यायाधीश नेमलें किंवा भारतांतील दुसऱ्या उच्च न्यायालयांत त्याची बदली केली तर त्याची जागा रिकामी होईल.

(२) कोणतीहि व्यक्ति भारताची नागरिक असल्याशिवाय उच्च न्यायालयांतील न्यायाधीशाच्या जागीं नेमली जाण्यास पात्र होणार नाहीं; आणि ती—

(अ) भारतांत कमींत कमी दहा वर्षें न्यायखात्यांतल्या हुद्द्यावर असलेली असली पाहिजे; किंवा (ब) परिशिष्ट १ मध्यें दिलेल्या कोणत्याहि राज्यांतल्या उच्च न्यायालयांत किंवा दोन किंवा अधिक अशा न्यायालयांत लागोपाठ दहा वर्षें वकिलीचें काम केलेली असली पाहिजे.

स्पष्टीकरण:—(अ) उच्च न्यायालयांतील वकिलीची मुदत मोजतांना वकील झाल्यानंतर जर त्यानें न्यायखात्यांतल्या हुद्द्यावर काम केलें असेल तर तो काळ धरण्यांत येईल; (ब) भारतांतील न्यायखात्यांतल्या हुद्द्याचा किंवा उच्च न्यायालयांतल्या वकिलीचा काळ मोजतांना त्यांत ही घटना अमलांत

येण्यापूर्वीं १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीं जो हिंदुस्थान १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांत निर्दिष्ट केला आहे त्यांतील कोणत्याहि भागांत त्यानें न्यायखात्यांतल्या हुद्द्यावर किंवा त्या विभागांतल्या हायकोर्टांत वकिली केली असेल तर तो काळ धरला जाईल.

२१८. कलम १२४ (४) व (५) मध्यें दिलेल्या तरतुदी ह्या उच्चतम न्यायालयाला जशा लागू आहेत तशा त्या उच्च न्यायालयालाहि लागू होतील. जेथें उच्चतम न्यायालय म्हटलें असेल तेथें उच्च न्यायालयाला अनुलक्षून तो उल्लेख आहे असें समजावें.

२१९. तिसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकूम, राज्यांत नेमलेला उच्च न्यायालयाचा प्रत्येक न्यायाधीश, अधिकारग्रहणापूर्वीं राज्यपालासमोर किंवा त्यानें त्याकरितां नेमलेल्या व्यक्तीसमोर शपथ किंवा प्रतिज्ञा करील.

२२०. ही घटना सुरू झाल्यानंतर उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या जागेवर काम केलेल्या कोणत्याहि व्यक्तीला भारतांत कोठल्याहि न्यायालयांत किंवा कोणत्याहि अधिकाऱ्यासमोर वकिली करतां येणार नाहीं किंवा काम चालवितां येणार नाहीं.

२२१. (१) दुसऱ्या परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला पगार दिला जाईल.

(२) प्रत्येक न्यायाधीशाला पार्लमेंट कायदा करून किंवा कायद्याखालीं वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें भत्ते किंवा गैरहजिरीच्या रजेचा आणि पेन्शनचा हक्क प्राप्त होईल. आणि तसें ठरविलें जाईपर्यंत त्याला दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेले भत्ते व हक्क मिळण्याचा हक्क आहे. तथापि त्याची नेमणूक झाल्यानंतर त्याला नुकसानकारक होईल असे भत्त्याच्या किंवा रजेच्या किंवा पेन्शनच्या हक्कांत बदल होणार नाहींत.

२२२. (१) भारतांतच एका उच्च न्यायालयांतून दुसऱ्या उच्च न्यायालयांत कोणाहि न्यायाधीशाची बदली राष्ट्रपतीला भारताच्या मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्यानें करतां येईल.

(२) जेव्हां एकाद्या न्यायाधीशाची अशी बदली केली गेली असेल, तेव्हां ज्या मुदतींत तो दुसऱ्या न्यायालयांत काम करीत असेल, त्या मुदतींत

त्याला आपल्या पगाराशिवाय पार्लमेंट कायद्यानें ठरवील तो भरपाई-भत्ता मिळण्याचा हक्क असेल; आणि त्यापूर्वी राष्ट्रपति हूकुम काढून निश्चित करील तितका भरपाई-भत्ता त्याला मिळेल.

२२३. जेव्हां उच्च न्यायालयांतील मुख्य न्यायाधीशाची जागा रिकामी असेल किंवा एखादा असा मुख्य न्यायाधीश गैरहजिरीमुळें किंवा अन्य कारणामुळें आपल्या जागेचें काम पाहण्यास असमर्थ असेल, तेव्हां राष्ट्रपति त्याकरतां नेमील तो त्या न्यायालयांतील दुसरा न्यायाधीश त्या जागेचें काम करील.

२२४. ह्या प्रकरणांत कांहींही म्हटलें असलें तरी राज्याच्या उच्च न्यायालयाचा कोणीहि मुख्य न्यायाधीश, केव्हांहि राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीनें, जो त्या किंवा अन्य उच्च न्यायालयांत न्यायाधीशाच्या जागेवर होता त्याला त्या राज्याच्या न्यायालयांतील न्यायाधीशाच्या जागेवर बसण्यास व काम करण्यास विनंति करूं शकेल; आणि अशी विनंति केली गेलेली व्यक्ति जोंपर्यंत अशी बसेल व काम करील तोंपर्यंत त्या व्यक्तीला राष्ट्रपति हुकूम काढून ठरवील ते भत्ते मिळण्याचा आणि त्या न्यायालयाचे सर्व अधिकार, सत्ता व सवलती मिळण्याचा हक्क प्राप्त होईल. पण अन्यथा तिला त्या न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून समजलें जाणार नाहीं :

मात्र या कलमान्वयें कोणाहि अशा न्यायाधीशाला त्याच्या संमती-शिवाय त्या न्यायालयांत न्यायाधीश म्हणून बसण्यास व काम पहाण्यास सांगतां येईल असें समजूं नये.

२२५. या घटनेंतील तजविजींना अनुसरून आणि या घटनेनें कायदे-मंडळाला दिलेल्या अधिकारान्वयें योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कोणत्याहि कायद्याला अनुसरून, विद्यमान उच्च न्यायालयाचें अधिकारक्षेत्र व प्रशासित कायदा, आणि त्या न्यायालयांत न्यायदानाच्या प्रशासनासंबंधीं न्यायाधीशांचे ते ते अधिकार, तसेंच न्यायालयाचे नियम करण्याची कोणतीहि सत्ता आणि न्यायालयाच्या आणि त्यांतील सदस्यांच्या एकेकटे किंवा विभागशः बसण्या-संबंधीचें नियमन करण्याची सत्ता, ही ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वी जी होती तीच असेल :

मात्र जमीनमहसुलाच्या कोणत्याहि बाबतींत किंवा तो वसूल करण्यासंबंधीं काढलेले हुकूम किंवा केलेली उपाययोजना यांबाबत ही घटना सुरू होण्यापूर्वी, एखाद्या उच्च न्यायालयाच्या प्राथमिक अधिकारक्षेत्राच्या बजावणीला जो कांहीं प्रतिबंध असेल तो त्या अधिकारक्षेत्राच्या बजावणीबाबत यापुढें राहणार नाहीं.

२२६. (१) कलम ३२ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, प्रत्येक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला ज्या क्षेत्रांत त्याचा अधिकार चालत असेल त्या सर्व क्षेत्रांत, भाग ३ मध्यें दिलेल्या हक्कबजावणीकरितां किंवा अन्य कारणाकरितां एकाद्या व्यक्तीला, अधिकाऱ्याला आणि योग्य बाबतींत सरकारलाहि हुकुम, लेखी हुकुम, इसमाला हजर करणें किंवा मनाई हुकुम देणें यासंबंधीं सत्ता असेल.

(२) उच्चतम न्यायालयाला ३२ (२) कलमाप्रमाणें दिलेल्या सत्तेला, उच्च न्यायालयाला उपकलम (१) मध्यें दिलेल्या सत्तेनें कमीपणा येणार नाहीं.

२२७. (१) प्रत्येक उच्च न्यायालयाचें जें अधिकारक्षेत्र असेल, त्यांतील सर्व न्यायालयांवर व न्यायसभांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार त्या न्यायालयाचे असतील.

(२) वर दिलेल्या तजविजीच्या सर्वसामान्यत्वाला बाधक न होतां प्रत्येक उच्च न्यायालयाला—

(अ) असल्या न्यायालयाकडून माहितीपत्रकें मागवितां येतील;

(ब) तशा न्यायालयांतील कामकाजांचें व व्यवहाराचें नियमन करण्याकरतां नमुने ठरवून देतां येतील आणि सर्वसामान्य नियम करतां येतील व फर्मावतां येतील; आणि (क) अशा न्यायालयांतील अधिकाऱ्यांनीं पुस्तकें, नोंदी व कसे ठेवावे यांचे नमुने ठरवितां येतील.

(३) त्या न्यायालयांतले शेरीफ, सर्व कारकून व अधिकारी आणि त्या न्यायालयांत काम करणारे ॲटर्नीज, ॲड्व्होकेट्स व वकील यांच्या फीचे हिशेब तक्ते ठरवितां येतील :

मात्र उपकलमें (२) व (३) प्रमाणें हे नियम करतांना, नमुने घालून देतांना किंवा तक्ते ठरवितांना त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या कायद्याला तें विसंगत असणार नाहीं, आणि त्याला राज्यपालाची पूर्वसंमती लागेल.

(४) कोणत्याहि कायद्यानें किंवा कायद्याखालीं स्थापित केलेलीं जीं हत्यारी फौजेसंबंधीं न्यायालयें किंवा न्यायसभा असतील त्यांच्यांवर देखरेख करण्याचे अधिकार या कलमानें उच्च न्यायालयाला दिले आहेत असें समजण्यांत येणार नाहीं.

२२८. जर उच्च न्यायालयाची खात्री पटली कीं, खालच्या न्यायालयांत चालूं असलेल्या खटल्यांत या घटनेच्या अर्थासंबंधीं महत्त्वाचा कायद्याचा मुद्दा अंतर्भूत झाला आहे आणि त्या मुद्द्याचा निकाल होणें हें त्या खटल्याच्या निवाड्याला अवश्य आहे तर तें उच्च न्यायालय त्या खालच्या न्यायालयांतून तो खटला काढून घेईल, आणि—

(अ) एकतर स्वतःच त्या खटल्याचा निकाल लावील किंवा (ब) त्या न्यायाच्या मुद्द्याचा निर्णय देऊन तो खटला आपल्यां त्या मुद्द्यावरील निर्णयाच्या नकलेसह जेथून तो खटला काढून घेतला त्या न्यायालयाकडे पाठवील आणि तें न्यायालय त्या निर्णयानुसार पुढें खटल्याचें काम चालवील.

२२९. (१) उच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्या नेमणुका उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा ते सांगतील तो दुसरा न्यायाधीश किंवा त्या न्यायालयाचा अधिकारी करील :

मात्र जेथें उच्च न्यायालयाचें मुख्य ठिकाण असेल तेथील राज्यपाल नियम करून, त्या नियमांत निर्दिष्ट केलेल्या बाबतींत, स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सल्ला घेतल्यावांचून, त्या न्यायालयाशीं संबद्ध नसलेल्या व्यक्तींची नेमणूक तेथील नोकरीवर करूं नये असें सांगेल.

(२) राज्याचें कायदेमंडळ कायदा करून ठरवील त्याला अनुसरून, उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश किंवा दुसरा न्यायाधीश किंवा मुख्य न्यायाधीशानें नियम करण्याकरतां अधिकार दिलेला न्यायालयांतील अधिकारी जे नियम करून ठरवील त्याप्रमाणें उच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्या नोकरीसंबंधींच्या शर्ती असतील :

मात्र जेथें उच्च न्यायालयाचें मुख्य ठिकाण असेल तेथील राज्यपालाची पगार, भत्ते, रजा किंवा पेन्शन्स् एवढ्यापुरती या उपकलमाखालीं करावयाच्या नियमांना संमती घेतलेली असेल.

(३) उच्च न्यायालयाच्या कारभाराकरतां लागणारा, अधिकाऱ्यांचे व नोकरांचे किंवा नोकरासंबंधीचे पगार, भत्ते, पेन्शन्स् यांच्या खर्चासुद्धां खर्च, राज्याच्या संचित निधीवर आकारला जाईल आणि त्या न्यायालयानें घेतलेली फी व इतर पैसा त्या निधींत जमा होईल.

२३०. पार्लमेंट कायदा करून ज्या राज्यांत उच्च न्यायालयाचें मुख्य ठिकाण आहे त्या राज्याच्या क्षेत्रांत नसणाऱ्या किंवा परिशिष्ट (१) मधील अन्य राज्यांत—

(अ) उच्च न्यायालयाचें अधिकारक्षेत्र वाढवूं शकेल; किंवा (ब) तें क्षेत्र कमी करूं शकेल.

२३१. ज्या राज्यांत उच्च न्यायालयाचें मुख्य ठिकाण आहे त्या राज्याच्या विभागाबाहेर जेथें उच्च न्यायालय आपले अधिकार बजावीत असेल—

(अ) तेथें उच्च न्यायालयाचें मुख्य ठिकाण असलेल्या कायदेमंडळाला तें अधिकारक्षेत्र वाढविण्याला, मर्यादित करण्याला किंवा बंद करण्याला या घटनेनें कांहीं अधिकार प्राप्त झाला आहे असें समजूं नये; (ब) तसेंच परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मध्यें दिलेल्या राज्याच्या कायदेमंडळाला त्या राज्यांत असलेल्या त्या विभागाचें अधिकारक्षेत्र नष्ट करण्याचा अधिकार या घटनेनें प्राप्त झाला आहे असें समजूं नये; किंवा (क) उपकलम (ब) मधील योजनांना अनुसरून त्या विभागांत जर उच्च न्यायालयाचे मुख्य ठाणें असतें तर त्या विभागांतील उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रासंबंधीं जे कायदे कायदे-मंडळाला करतां आले असते तसे कायदे अशा विभागासंबंधीं करण्यास प्रतिबंध नाहीं.

२३२. जेथें उच्च न्यायालय पहिल्या परिशिष्टांतील राज्यांपैकीं एका राज्यापेक्षां अधिक ठिकाणीं अधिकार चालवीत असेल किंवा तें राज्य आणि त्या राज्याचा भाग नसलेल्या क्षेत्रावर अधिकार चालवीत असेल तेथें—

(अ) या प्रकरणांत उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाबाबत जेथें जेथें राज्यपालाचा उल्लेख आला आहे तेथें तेथें राज्यपाल म्हणजे—ज्या राज्यांत न्यायालयाचें मुख्य ठिकाण असेल त्याचा राज्यपाल असें समजलें जाईल;

(ब) जेथें दुय्यम न्यायालयाचे नियम, नमुने व तक्ते यांना राज्यपालाच्या संमतीसंबंधीं उल्लेख आला असेल, तेथें त्या उल्लेखाचा अर्थ, दुय्यम न्यायालय जेथें असेल तेथल्या राज्यपालाची किंवा राजप्रमुखाची संमति असा समजला जाईल किंवा तो विभाग जर परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्याबाहेर असेल तर राष्ट्रपतीची संमति असें समजलें जाईल; आणि (क) राज्याच्या संचित निधि या उल्लेखाचा अर्थ न्यायालयाचें मुख्य ठिकाण असलेल्या राज्याचा संचित निधि असा असेल.

प्रकरण ६

दुय्यम न्यायालयें

२३३. (१) एखाद्या राज्यांतील जिल्हा न्यायाधीश म्हणून नेमणुका, त्यांची (विशिष्ट जिल्ह्यांत) स्थापना, पगारवाढ हीं त्या राज्यासंबंधीं अधिकारक्षेत्र असलेल्या उच्च न्यायालयांतील मुख्य न्यायाधीशाच्या सल्ल्यानें राज्यपाल करील.

(२) संघाच्या किंवा राज्याच्या नोकरींत नसलेली एखादी व्यक्ति सात वर्षांपेक्षां कमी नसलेला काळ ॲडव्होकेट किंवा वकील असेल आणि उच्च न्यायालयानें तिची नेमणुकीकरतां शिफारस केली असेल तरच त्या जिल्हा न्यायाधीशाच्या जागीं नेमली जाण्यास लायक ठरेल.

२३४. जिल्हा न्यायाधीशाखेरीज राज्याच्या न्यायखात्यांत करावयाच्या दुसऱ्या नेमणुका, त्या राज्याचा राज्यपाल हा आपण त्यासंबंधीं केलेल्या नियमांनुसार स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशनचा व तेथें अधिकार असलेल्या उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन करील.

२३५. जिल्हा न्यायालयांवरील आणि त्याच्या दुय्यम न्यायालयांवरील नियंत्रण, आणि ज्यांत राज्याच्या न्यायखात्यांतील नोकरींत असलेल्या आणि जिल्हा न्यायाधीशाच्या हुद्द्यापेक्षां कमी हुद्दा धारण करीत असलेल्या व्यक्तींच्या स्थापना (Posting), पगारवाढ व रजामंजुरी यांचा अंतर्भाव केला आहे, उच्च न्यायालयाकडे दिलेलें असेल; पण अशा व्यक्तींना जो त्यांच्या नोकरीच्या नियमनाकरतां केलेल्या कायद्यांत अपिलाचा हक्क असेल तो काढून घेतला जाईल असा किंवा त्या कायद्याखालीं असलेल्या नोकरीच्या

शर्तींविरहित उच्च न्यायालयानें त्यांच्याशीं वागावें म्हणून उच्च न्यायालयाला अधिकार दिले आहेत असा, या कलमांतील कशाचाहि अर्थ केला जाणार नाहीं.

२३६. या प्रकरणांत—

(अ) 'जिल्हा न्यायाधीश' या शब्दसमुच्चयांत, शहरच्या मुलकी कोर्टांचा जज्ज, ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज, जॉइंट डिस्ट्रिक्ट जज्ज, ॲसिस्टंट डिस्ट्रिक्ट जज्ज, स्मॉल कॉज कोर्टाचा चीफ जज्ज, चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट, ॲडिशनल चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट, सेशन्स जज्ज, ॲडिशनल सेशन्स सज्ज व ॲसिस्टंट सेशन्स जज्ज, यांचा अंतर्भाव होतो; (ब) 'न्यायखात्यांतील नोकरी' याचा अर्थ अशी नोकरी कीं, जिचा उद्देश जिल्हा न्यायाधीशाची जागा किंवा जिल्हा न्यायाधीशाच्या जागेपेक्षां कमी दर्जाच्या न्यायालयीन मुलकी जागा भरून काढण्याचा असेल अशा व्यक्तींचीच असलेली नोकरी.

२३७. राज्यपाल हा जाहिरनामा काढून या प्रकरणांतील वरील कलमें आणि त्याअन्वयें केलेले नियम हे ज्याप्रमाणें राज्यांतील न्यायखात्यांत नेमलेल्या नोकरांना लागू होतील, त्याचप्रमाणें राज्यांतील एकाद्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या, त्या जाहीरनाम्यांत दिलेल्या अपवाद व दुरुस्त्यांनुसार मॅजिस्ट्रेट्सना अशा अशा तारखेपासून लागू होतील असें फर्मावतील.

भाग ७ वा — पहिल्या परिशिष्टांतील भाग ब मधील राज्यें

२३८. ६ व्या प्रकरणांतील तरतुदी ह्या ज्याप्रमाणें पहिल्या परिशिष्टांतील भाग अ मधील राज्यांना लागू आहेत त्याप्रमाणें भाग ब मधील राज्यांनाहि लागू होतील.

मात्र त्यांत पुढील दुरुस्त्या व वगळणुकी असतील:—

(१) ६ व्या भागांत जेथें जेथें 'राज्यपाल' शब्द आहे तेथें तेथें २३२ (ब) कलमांत दुसऱ्या वेळीं आलेल्या त्या शब्दाशिवाय अन्यत्र 'राजप्रमुख' हा शब्द घालावा.

(२) कलम १५२ मध्यें भाग अ च्या ऐवजीं भाग ब असें घालावें.

(३) १५५, १५६ व १५७ हीं कलमें गाळावीं.

(४) १५८ कलमांत—

(१) उपकलम (१) मध्यें ' नेमणूक केली ' असे जे शब्द आहेत त्या ऐवजीं ' झाली ' असें घालावें; (२) उपकलम (३) ऐवजीं पुढील उपकलम घालावें—

" (३) राज्याच्या सरकारच्या प्रमुख ठिकाणीं जर राजप्रमुखाचें स्वतःचें निवासस्थान नसेल तर त्याला भाडें न देतां सरकारी निवासस्थानाचा वापर करण्याचा आणि राजप्रमुखाला, राष्ट्रपति सर्वसामान्य किंवा खास हुकूम काढून जे भत्ते ठरवील ते मिळण्याचा हक्क असेल;"

(३) उपकलम ४ मधील ' प्राप्ती आणि ' हे शब्द वगळावे.

(५) कलम १५९ मध्यें " सर्वांत श्रेष्ठ उपलब्ध असणारा न्यायाधीश " या शब्दांनंतर " किंवा त्या बाबतींत राष्ट्रपति ठरवील तशा अन्य रीतीनें " हे शब्द घालावे.

(६) १६४ कलमांत उपकलम (१) ला सांगितलेल्या " तथापि-पासूनचा " या अपवादाऐवजीं पुढील अपवाद घालावा:—

" मात्र मध्यभारताच्या राज्यांत जनजातीच्या कल्याणाकरतां एक मंत्री असेल व तो आपल्या या कामाच्या जोडीला अनुसुचित जातीच्या, मागासलेल्या वर्गाच्या कल्याणाचें किंवा इतर काम करील."

(७) कलम १६८, उपकलम (१) बद्दल पुढील उपकलम घालावें:—

" (१) प्रत्येक राज्याकरतां एक कायदेमंडळ असेल. त्यांत राजप्रमुख आणि—

(अ) म्हैसूर राज्यांत दोन सभागृहें असतील; (ब) इतर राज्यांत एक सभागृह असेल. "

(८) १८६ कलमांत " दुसऱ्या परिशिष्टांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें " या शब्दांऐवजीं " राजप्रमुख जसें ठरवील तसें " हे शब्द घालावेत.

(९) १९५ कलमांत " त्या त्या प्रांतांतील कायदे-मंडळांतील सभासदांना ही घटना सुरू होण्यापूर्वी लागू असणारे " ह्या शब्दांऐवजीं " जसें राजप्रमुख ठरवील तसें " हे शब्द घालावेत.

(१०) कलम २०२, उपकलम, (३) मध्यें—

(१) पोटकलम (अ) ऐवजीं पुढील पोटकलम घालावें—

" (अ) राजप्रमुखाचे भत्ते आणि त्याच्या कचेरीसंबंधीं इतर खर्च राष्ट्रपति सर्वसाधारण किंवा खास हुकुमान्वयें ठरवील ते; "

(२) पोटकलम (फ) बद्दल पुढील पोटकलमें घालावीं—

" (फ) त्रावणकोर व कोचीन या राज्याच्या बाबतींत, ही घटना सुरू होण्यापूर्वीं त्रावणकोर व कोचीनच्या संस्थानिकांनीं त्रावणकोर व कोचीनचें संयुक्त राज्य करण्याकरतां जो करार केला त्याप्रमाणें देवास्वम फंडाला दरवर्षीं द्यावयाचे ५१ लाख रुपये; (ग) ह्या घटनेनें किंवा कायदे-मंडळानें कायद्यानें तसा बसवावा म्हणून जाहीर केलेला दुसरा एखादा खर्च. "

(११) कलम २०८ मधील उपकलम (२) ऐवजीं पुढील उपकलम घालावें:—

" (२) उपकलम (१) मधील नियम केले जाईपर्यंत, ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वीं जे कामकाजाचे अमलांत असलेले नियम व स्थायी आदेश संस्थानच्या कायदेमंडळासंबंधीं होते किंवा जेथें कायदे-मंडळाचें सभागृह नव्हतें तेथें ही घटना अमलांत येण्यापूर्वीं राजप्रमुख ठरवील तशा प्रांताच्या कायदेमंडळाच्या कामकाजाचे अमलांत असलेले नियम व स्थायी आदेश विधान परिषदेचा सभापति किंवा विधान सभेचा अध्यक्ष त्यांत ज्या दुरुस्त्या किंवा फेरफार करील त्याला अनुसरून राज्याच्या कायदेमंडळाला लागू होतील. "

(१२) २१४ (२) कलमांत " प्रांत " ऐवजीं " हिंदी संस्थानें " असे शब्द घालावेत.

(१३) कलम २२१ ऐवजीं पुढील कलम घालावें—

" २२१. (१) प्रत्येक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला राष्ट्रपति राजप्रमुखाच्या सल्ल्यानें ठरवील तो पगार दिला जाईल.

(२) प्रत्येक न्यायाधीशाला पार्लमेंट कायदा करून किंवा कायद्याखालीं वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें भत्ते किंवा गैरहजिरीच्या रजेचा आणि पेन्शनचा हक्क असेल आणि तसें ठरविलें जाईपर्यंत राष्ट्रपति राज-प्रमुखाच्या सल्ल्यानें ठरवील ते भत्ते व हक्क मिळण्याचा त्याला हक्क असेल :

तथापि न्यायाधीशाची नेमणूक झाल्यानंतर त्याला नुकसानकारक होईल असे त्याच्या भत्त्याच्या किंवा रजेच्या किंवा पेन्शनच्या हक्कांत बदल होणार नाहींत."

भाग ८ परिशिष्ट १ भाग क मधील राज्यें

२३९. (१) या भागांतील इतर तजविजींनुसार, परिशिष्ट १, भाग क मध्यें निर्दिष्ट केलेलें राज्य हें राष्ट्रपति योग्य वाटेल त्या मर्यादेपर्यंत, त्यानें नेमलेल्या चीफ कमिशनर किंवा उपराज्यपालामार्फत किंवा लगतच्या राज्यांतील सरकारमार्फत राष्ट्रपतीकडून अनुशासिलें जाईल :

तथापि राष्ट्रपति लगतच्या राज्यांतील सरकारमार्फत—

(अ) संबंधित सरकारच्या सल्ल्याशिवाय; आणि (ब) राष्ट्रपतीला अत्यंत उचित वाटेल अशा रीतीनें अनुशासित प्रजेचें मत अजमावल्याशिवाय, अधिकार चालविणार नाहीं.

(२) ह्या कलमांत उल्लेखिलेल्या राज्यांत राज्याचा भागहि अंतर्भूत होतो.

२४०. (१) परिशिष्ट १, भाग क मध्यें निर्दिष्ट केलेल्या आणि चीफ कमिशनर किंवा उपराज्यपालाकडून अनुशासिलेल्या राज्याकरतां पार्लमेंट कायदा करून—

(अ) त्या राज्यांत कायदेमंडळ म्हणून काम करण्यास नेमलेलें, निवडलेलें, किंवा अंशतः नेमलेलें आणि अंशतः निवडलेलें असें मंडळ; किंवा (ब) सल्लागार किंवा मंत्रिमंडळ किंवा दोन्ही, कायद्यानें ठरविलें जाईल, तशी घटना, सत्ता व कार्य असलेलें,

निर्माण करील किंवा असल्यास चालूं ठेवील.

(२) उपकलम (१) मध्यें उल्लेखिलेल्या अशा कायद्यांत जरी ही घटना दुरुस्त करण्याची व्यवस्था असली किंवा तिचा तसा परिणाम होत असला तरी ३६८ कलमाच्या कामाकरतां घटनेची ही दुरुस्ती आहे असें समजलें जाणार नाहीं.

२४१. (१) परिशिष्ट १, भाग क मधील राज्याकरतां पार्लमेंट कायद्यानें उच्च न्यायालय स्थापूं शकेल किंवा तेथें असलेलें न्यायालय ह्या घटनेंतील सर्व किंवा कोणत्याहि कामाकरतां उच्च न्यायालय आहे असें जाहीर करूं शकेल.

(२) भाग ६, प्रकरण ५ मध्यें दिलेलीं कलमें, हीं जशीं २१४ कलमांत उल्लेखिलेल्या उच्च न्यायालयाला लागू आहेत, तशी ती कलम (१) मधील न्यायालयाला पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्या अपवादांन्वयें व सुधारणांन्वयें लागू होतील.

(३) या घटनेंतील तजविर्जीना अनुसरून आणि या घटनेनें किंवा घटनेखालीं कायदेमंडळाला दिलेल्या सत्तेनुरूप त्या योग्य अशा कायदेमंडळानें केलेल्या कोणत्याहि कायद्यांना अनुसरून, जें प्रत्येक उच्च न्यायालय या घटनेच्या आरंभापूर्वी परिशिष्ट १, भाग क मधील राज्यावर किंवा त्यांत अंतर्भूत केलेल्या विभागावर सत्ताधिकार चालवीत असेल तें त्याच राज्यावर किंवा विभागावर घटनेच्या आरंभानंतरहि सत्ताधिकार चालवीत राहील.

(४) परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्यांत, उच्च न्यायालयाचें अधिकारक्षेत्र वाढाविण्याची किंवा कमी करण्याची जी पार्लमेंटला सत्ता आहे, ती भाग क मधील राज्यांना किंवा त्यांत अंतर्भूत केलेल्या विभागांना लागू करण्याची पार्लमेंटची सत्ता या कलमानें कमी होत नाहीं.

२४२. (१) पार्लमेंट कायद्यानें अन्य व्यवस्था करीपर्यंत कूर्ग कायदे कौंसिलची घटना, सत्ता व कार्यें, जीं या घटनेपूर्वी होतीं तीं, तशींच राहतील.

(२) कूर्गमधील जमीनमहसुलाच्या वसुलीसंबंधीं आणि कूर्गच्या खर्चासंबंधींची व्यवस्था राष्ट्रपति हुकूम काढून निराळी तजवीज करीपर्यंत न बदलतां तशीच राहील.

भाग ९

परिशिष्ट १, भाग ड मधील व त्या परिशिष्टांत न दर्शविलेले अन्य प्रदेश

२४३. (१) परिशिष्ट १, भाग ड मधील आणि भारतांत असलेल्या पण त्या परिशिष्टांत न दर्शविलेल्या प्रदेशांचा राज्यकारभार राष्ट्रपति, त्याला योग्य वाटेल त्या प्रमाणापर्यन्त, चीफ कमिशनरच्या किंवा त्यानें नेमावयाच्या अन्य अधिकाऱ्याच्यामार्फत चालवील.

(२) अशा प्रदेशांच्या शांतता व सुराज्याकरतां राष्ट्रपति नियम करील आणि त्या नियमानें पार्लमेंटनें केलेला कोणताहि कायदा किंवा त्या प्रदेशाला त्या काळापुरता लागू असणारा विद्यमान कायदा, रद्द किंवा दुरुस्त होऊं शकेल आणि राष्ट्रपति जेव्हां हे नियय जाहीर करील तेव्हां त्यांना त्या प्रदेशांना लागू असणाऱ्या पार्लमेंटच्या कायद्याइतकेंच प्राबल्य व परिणामक्षमता असेल.

भाग १०

अनुसूचित (Scheduled) व जनजाति (Tribal) क्षेत्र

२४४. (१) परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या आसामशिवायच्या कोणत्याहि राज्यांतल्या अनुसूचित विभागांचें आणि जनजातींचें नियंत्रण आणि अनुशासन यांना ५ व्या परिशिष्टांतलीं कलमें लागू होतील.

(२) आसाममधील जनजाति क्षेत्राच्या अनुशासनाला सहाव्या परिशिष्टांतील कलमें लागू होतील.

भाग ११ संघ व राज्य यांचे संबंध

प्रकरण १—कायदे-कानूविषयक संबंध

कायदेविषयक सत्ताविभागणी

२४५. (१) या घटनेंतील व्यवस्थेला अनुसरून पार्लमेंट भारतांतील सर्व प्रदेशासाठीं किंवा एखाद्या भागासाठीं कायदे करील आणि राज्याचें कायदेमंडळ सर्व राज्यासाठीं किंवा एखाद्या भागासाठीं कायदे करील.

(२) पार्लमेंटनें केलेला कोणताहि कायदा हा त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर लागू होईल, एवढ्यासाठीं गैरकायदा समजला जाणार नाहीं.

२४६. (१) पुढील उपकलमें (२) व (३) मध्यें कांहींहि असलें तरी, पार्लमेंटला सातव्या परिशिष्टांतल्या १ ल्या सूचींत (जिला या घटनेंत ' संघसूचि ' संबोधिलें आहे) नमूद केलेल्या कोणत्याहि बाबींबद्दल कायदे करण्याची संपूर्ण सत्ता आहे.

(२) पुढील उपकलम (३) मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंटला आणि उपकलम (१) ला अनुसरून कोणत्याहि परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्याच्या कायदेमंडळालाहि परिशिष्ट ७ मधील तिसऱ्या सूचींत (जिला घटनेंत ' समवर्ति सूचि ' म्हटलें आहे) नमूद केलेल्या कोणत्याहि बाबीसंबंधीं कायदे करण्याची सत्ता आहे.

(३) उपकलमें (१) व (२) यांना अनुसरून परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्यांना ७ व्या परिशिष्टांतल्या २ ऱ्या सूचींत (जिला ' राज्य-सूचि ' असें या घटनेंत म्हटलें आहे) नमूद केलेल्या कोणत्याहि बाबीसंबंधीं त्या राज्याकरतां किंवा त्याच्या भागाकरतां कायदे करण्याची संपूर्ण सत्ता आहे.

(४) पहिल्या परिशिष्टांतल्या भाग अ किंवा भाग ब मध्यें अंतर्भूत नसलेल्या भारतांतील कोणत्याहि प्रदेशाकरतां कोणत्याहि बाबीसंबंधीं, जरी ती बाब राज्यसूचींत असली तरी, कायदे करण्याची पार्लमेंटला सत्ता आहे.

२४७. संघसूचींत नमूद केलेल्या बाबींसंबंधीं पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांच्या किंवा विद्यमान कायद्याच्या अधिक चांगल्या कारभाराकरतां, या प्रकरणांत कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंट कायद्यानें अधिक न्यायालयांच्या स्थापनेची तजवीज करूं शकेल.

२४८. (१) समवर्ति सूचींत किंवा राज्यसूचींत नमूद नसलेल्या कोणत्याहि बाबींसंबंधीं कायदा करण्याची पार्लमेंटला संपूर्ण सत्ता आहे.

(२) ह्या दोन्ही यादींत नमूद नसलेल्या, कर बसविण्याकरतां करावयाच्या कायद्याची सत्ताहि अशा सत्तेंत अंतर्भूत होईल.

२४९. (१) या प्रकरणांतील मागील कलमांत कांहींहि म्हटलें असलें तरी, जर राज्यपरिषदेनें दोन-तृतीयांश हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या

सभासदांच्या पाठिंब्यानें जर असें ठरावानें जाहीर केलें कीं, राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें राज्यसूचींत नमूद केलेल्या व ठरावांत दर्शविलेल्या बाबी-संबंधीं पार्लमेंटनें कायदा करणें आवश्यक किंवा युक्त आहे, तर पार्लमेंटनें तसे कायदे, तो ठराव जारी आहे तोंपर्यंत त्या बाबीसंबंधीं साऱ्या किंवा भारतांतील एखाद्या भागाच्या प्रदेशाकरतां करणें हें कायदेशीर असेल.

(२) वरील उपकलम (१) प्रमाणें पास झालेला ठराव त्यांत निर्दिष्ट केलें असेल त्याप्रमाणें एक वर्षापेक्षां अधिक काळ अमलांत राहाणार नाहीं :

मात्र, जर आणि जेव्हां असला एखादा ठराव अमलांत राहण्याला पसंतीदर्शक ठराव उपकलम (१) मध्यें सांगितलेल्या पद्धतीनें पास झाला तर तो ठराव ज्या दिवशीं त्या ठरावाचा या कलमाखालीं अंमल संपला असतां तेथून आणखी एक वर्ष अमलांत राहील.

(३) जर उपकलम (१) मधील ठराव पास झाला नसता तर पार्लमेंट जो कायदा करावयास अधिकारक्षम ठरलें नसतें, तो कायदा त्या ठरावाचा अंमल संपल्यापासून सहा महिने संपतांच, त्या अधिकारक्षमते-बाहेरील प्रमाणांत रद्द होईल. मात्र तो काळ संपण्यापूर्वीं ज्या गोष्टी केल्या किंवा करावयाच्या वगळण्यांत आल्या त्यावर सदर कायदा रद्द झाल्यानें कांहीं परिणाम होणार नाहीं.

२५०. (१) या प्रकरणांत कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंटला, जोंपर्यंत आणीबाणीचा जाहीरनामा चालू आहे तोंपर्यंत भारतांतील साऱ्या किंवा कोणत्याहि प्रदेशांत राज्यसूचींत नमूद केलेल्या कोणत्याहि बाबींसंबंधीं कायदे करण्याची सत्ता असेल.

(२) जर आणीबाणीच्या परिस्थितीचा जाहीरनामा निघाला नसता तर पार्लमेंट जो कायदा करावयास अधिकारक्षम ठरलें नसतें, तो कायदा आणीबाणीच्या परिस्थितीचा जाहीरनामा रद्द झाल्यानंतर सहा महिन्यांनीं त्या अधिकारक्षमतेबाहेरील प्रमाणांत रद्द होईल. मात्र हा काळ संपण्यापूर्वीं ज्या गोष्टी केल्या किंवा करावयाच्या वगळण्यांत आल्या त्यावर हा कायदा रद्द झाल्यानें कांहीं परिणाम होणार नाहीं.

२५१. २४९ व २५० कलमांमधील कशानेंहि या घटनेप्रमाणें राज्याच्या कायदेमंडळाला कोणताहि कायदा करण्याची जी सत्ता दिली

६४७०
का.

आहे त्याप्रमाणें कायदा करण्यास प्रतिबंध नाहीं. पण जर कायदेमंडळानें केलेल्या कायद्यांतलें कोणतेंहि कलम, पार्लमेंटला वरील दोन्ही कलमांपैकीं कोणत्याहि कलमाप्रमाणें असलेल्या सत्तेनुसार पार्लमेंटनें केलेल्या कायद्याच्या कलमाला विरोधी असेल तर पार्लमेंटचा कायदा, कायदेमंडळानें पार्लमेंटच्या कायद्याच्या अगोदर किंवा मागाहून केला असला तरी, प्रभावी ठरेल. आणि जोंपर्यंत पार्लमेंटचा कायदा अमलांत असेल तोंपर्यंत कायदेमंडळाचा कायदा त्या विरोधापुरता रद्द ठरेल.

२५२. (१) जर राज्याच्या दोन किंवा अधिक कायदेमंडळांना असें वाटलें कीं, २४९ व २५० कलमांतील व्यवस्थेव्यतिरिक्त राज्यासंबंधीं ज्या बाबतींत कायदे करण्याचा पार्लमेंटला अधिकार नाहीं, त्या बाबींचें पार्लमेंटनें कायद्यानें नियमन करणें इष्ट आहे, आणि जर त्या कायदेमंडळांतील सर्व सभागृहांनीं तसा ठराव केला, तर पार्लमेंटनें तशा नियमनाकरतां कायदा करणें कायदेशीर होईल. अशा प्रकारें पास केलेला तो कायदा त्या राज्यांना लागू होईल आणि जीं राज्यें मागाहून आपल्या सभागृहांत, व जेथें दोन सभागृहें असतील तेथें प्रत्येक सभागृहांत, असा ठराव पास करतील त्यांनाहि तो लागू होईल.

(२) अशा प्रकारें पास केलेला पार्लमेंटचा कायदा दुरुस्त किंवा रद्द करावयाचा असला तर तो पार्लमेंटच्या तशाच कायद्यानें पास किंवा मान्य होईल; पण तो ज्या राज्याला लागू असेल, त्या राज्याच्या कायदेमंडळाला कायद्यानें दुरुस्त किंवा रद्द करतां येणार नाहीं.

२५३. या प्रकरणांतील वरील कलमांत कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंटला संबंध भारतांतील प्रदेशांकरतां किंवा एका भागाकरतां एखादा अन्य राष्ट्र किंवा राष्ट्रांबरोबर केलेला तहनामा, करार किंवा अभिसमय (Convention) किंवा आंतरराष्ट्रीय परिषद, मंडळ किंवा दुसरी संस्था यांच्या निर्णयाच्या परिपालनाकरतां (Implementing) कायदा करण्याची सत्ता आहे.

२५४. (१) जर राज्याच्या कायदे मंडळानें केलेली एखादी कायद्यांतील तरतूद पार्लमेंटला कायदे करण्याच्या अधिकारान्वयें केलेल्या कायद्याच्या तरतुदीला किंवा समवर्ति सूचींत नमूद केलेल्या एखाद्या बाबतींतल्या विद्य-

मान कायद्याच्या तरतुदीला विरोधी असेल, तर उपकलम (२) मधील व्यवस्थेला अनुसरून, पार्लमेंटनें केलेला कायदा कायदेमंडळानें केलेल्या कायद्याच्या किंवा विद्यमान कायद्याच्या अगोदर किंवा मागाहून पास झाला असला तरी पार्लमेंटचा कायदा प्रभावी ठरेल; आणि राज्याच्या कायदे-मंडळाचा कायदा त्या विरोधापुरता रद्द ठरेल.

(२) परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्याच्या कायदेमंडळानें समवर्ति सूचींतल्या कोणत्या एका बाबींसंबंधीं केलेला कायदा जेथें पार्लमेंटनें आगाऊ केलेल्या कायद्याला किंवा तत्संबंधीं विद्यमान कायद्याला विरोधी असेल तेथें कायदे मंडळानें केलेला तो कायदा त्या राज्यांत प्रभावी ठरेल. मात्र तो कायदा त्या राज्यानें राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवलेला व संमति मिळालेला असला पाहिजे :

तथापि या कलमांतल्या कशानेंहि पार्लमेंटला त्याच बाबीसंबंधीं केव्हांहि व कोणताहि, ज्यांत कायदेमंडळानें केलेल्या कायद्यांत भर घालणें, दुरुस्ती करणें, बदलणें किंवा रद्द करणें अंतर्भूत असेल, असा कायदा करण्यास प्रतिबंध नसेल.

२५५. पार्लमेंटचा किंवा परिशिष्ट १ मधील अ किंवा ब विभागाच्या कायदेमंडळाचा कायदा आणि त्या कायद्यांतलें कोणतेंहि कलम, याला या घटनेप्रमाणें जरूर असलेली कांहीं शिफारस किंवा पूर्वमंजुरी मिळाली नव्हती एवढ्यामुळें जर त्याला पुढीलप्रमाणें संमति मिळाली असेल तर अमान्य ठरणार नाहीं—

(अ) जेथें राज्यपालाची शिफारस हवी होती, पण राज्यपालानें किंवा राष्ट्रपतीनें संमति दिली असेल; (ब) जेथें राजप्रमुखाची शिफारस हवी होती, पण राजप्रमुखानें किंवा राष्ट्रपतीनें संमति दिली असेल; (क) जेथें राष्ट्र-पतीची शिफारस किंवा पूर्वमंजुरी हवी होती; पण राष्ट्रपतीनें संमति दिली असेल.

प्रकरण २—अनुशासन संबंध

सर्वसामान्य

२५६. प्रत्येक राज्याची कार्यकारी सत्ता अशा रीतीनें चालवली जाईल कीं, जीमुळें पार्लमेंटच्या व त्या राज्याला लागू असणाऱ्या विद्यमान कायद्यांना

मान्यता मिळण्याची खात्री असेल, आणि संघाची कार्यकारी सत्ता, भारत सरकारला जे आदेश त्याकरतां राज्याला देणें आवश्य वाटेल तेथपर्यंत पोहोंचेल.

२५७. (१) प्रत्येक राज्याची कार्यकारी सत्ता अशा रीतीनें चालविली जाईल कीं, जमिुळें, संघाच्या कार्यकारी सत्ता चालविण्याला अडथळा येणार नाहीं किंवा अपाय होणार नाहीं, आणि संघाची कार्यकारी सत्ता भारत सरकारला जे आदेश त्याकरतां त्या राज्याला देणें आवश्य वाटेल तेथपर्यंत पोहोंचेल.

(२) संघाच्या आदेशांत जीं राष्ट्रीय व लष्करी दृष्ट्या महत्त्वाचीं म्हणून घोषित केलेलीं दळणवळणाचीं साधनें असतील, त्यांच्या उभारणीकरतां व तीं सुस्थितींत ठेवण्याकरतां आदेश देण्यापर्यंत संघाच्या कार्यकारी सत्तेची व्याप्ति असेल :

मात्र या कलमानें, हमरस्ते व जलमार्ग हे राष्ट्रीय हमरस्ते व जलमार्ग आहेत हें पार्लमेंटनें घोषित करण्यावर किंवा ह्या घोषित रस्त्यांवरील व जलमार्गांवरील संघाच्या सत्तेवर किंवा नाविक, लष्करी, आणि विमान-दलाच्या कामासंबंधीं आपल्या कार्यांचा एक भाग म्हणून दळणवळणाचीं साधनें उभारण्याचा व तीं सुस्थितींत ठेवण्याच्या संघाच्या सत्तेवर मर्यादा येत नाहींत.

(३) राज्यांतील रेल्वेमार्ग सुरक्षित ठेवण्याकरतां कोणते उपाय योजावेत या संबंधीं राज्याला आदेश देण्यापर्यंतहि संघाच्या कार्यकारीच्या सत्तेची व्याप्ति असेल.

(४) उपकलम (२) मध्यें दळणवळणाच्या साधनांची उभारणी व सुस्थितींत राखणी या संबंधीं राज्याला दिलेला कोणताहि आदेश अमलांत आणण्याकरतां किंवा उपकलम (३) मध्यें कोणत्याहि रेल्वेच्या रक्षणाकरतां करावयाच्या उपाययोजनेचा आदेश अमलांत आणण्याकरितां, जर असा आदेश आला नसता तर राज्यानें मामुली कामांतला खर्च म्हणून जो खर्च केला असता त्यापेक्षां या आदेशामुळें जास्त खर्च करावा लागला तर भारत सरकारनें त्या राज्याला संमत खर्चाची रक्कम द्यावी किंवा त्या रकमेबद्दल एकमत झालें नाहीं, तर राज्याला लागलेल्या त्या जादा खर्चाच्या निर्णया-

करितां भारताच्या मुख्य न्यायाधीशानें एक लवाद नेमावा व तो ठरवील तो खर्च द्यावा.

२५८. (१) या घटनेंत कांहींही असलें तरी, राष्ट्रपति राज्याच्या सरकारच्या संमतीनें त्या सरकारकडे किंवा त्याच्या अधिकाऱ्याकडे संघाची कार्यकारी सत्ता पोहोंचण्याच्या बाबतींतली कामें करण्याचे अधिकार सशर्त किंवा बिनशर्त सोपवील.

(२) ज्या बाबतींत राज्याच्या कायदेमंडळाला कायदे करण्याची सत्ता नाहीं असा त्या राज्याला लागू असणारा एखादा पार्लमेंटनें केलेला कायदा, राज्यावर किंवा त्यांतल्या पदाधिकाऱ्यावर किंवा अधिकाऱ्यावर कर्तव्यें सोपवील आणि सत्ता देईल किंवा तसें करण्याचे अधिकार देईल.

(३) जेथें या कलमान्वयें राज्याला किंवा त्याच्या पदाधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला सत्ता दिली असेल किंवा त्याच्यावर कर्तव्यें सोपवलीं असतील तेथें भारत सरकार राज्याला जी संमत होईल ती खर्चाची रक्कम देईल किंवा ह्या रकमेबाबत एकमत झालें नाहीं तर, ती सत्ता व कर्तव्यें करतांना राज्यानें कारभारासाठीं जो जादा खर्च केला असेल तो ठरविण्याकरितां भारताचे मुख्य न्यायाधीश एक लवाद नेमतील आणि ते जो खर्च ठरवतील तो त्या राज्याला दिला जाईल.

२५९. या घटनेंत कांहींहि असलें तरी, परिशिष्ट पहिलें, भाग ब मध्यें नमूद केलेल्या राज्यांत, ही घटना सुरू होण्यापूर्वी जर एखादी लष्करी फौज असेल तर पार्लमेंट कायद्यानें अन्यथा ठरवीपर्यंत तें राज्य ती फौज घटनेनंतरहि राष्ट्रपति वेळोवेळीं त्यासंबंधीं जे सर्वसामान्य किंवा खास हुकूम काढील त्यांना अनुसरून ती तशीच बाळगीत राहील.

(२) उपकलम (१) मध्यें निर्दिष्ट केलेली लष्करी फौज ही संघाच्या लष्करी फौजेचा भाग होईल.

२६०. भारतीय प्रदेशाचा भाग नसलेल्या एखाद्या प्रदेशांतल्या सरकारबरोबर भारत सरकार करार करून त्या सरकारकडे असलेलीं कार्यकारी, कायदेविषयक किंवा न्यायालयीन कामें आपल्याकडे घेऊं शकेल; पण तसा प्रत्येक करार, त्यावेळीं अमलांत असणाऱ्या परराष्ट्रीय अधिकारक्षेत्रासंबंधींच्या कायद्याच्या अंमलबजावणीला अनुसरून व त्यांनीं शासित होईल.

२६१. भारताच्या सर्व प्रदेशांत संघाच्या आणि प्रत्येक राज्याच्या सार्वजनिक कृत्यावर, अभिलेखावर आणि न्यायालयीन कामकाजावर संपूर्ण श्रद्धा व विश्वास ठेवला जाईल.

(२) उपकलम १ मध्यें निर्दिष्ट केलेलीं कृत्यें, अभिलेख व कामकाज यांची शाबिती कशी व कोणत्या परिस्थितींत करावी आणि त्याचा होणारा परिणाम कसा ठरवावा हें पार्लमेंट कायदा करून ठरवील.

(३) भारताच्या कोणत्याहि प्रदेशांतल्या दिवाणी न्यायालयांनीं दिलेला अखेरचा निर्णय किंवा केलेले हुकूम हे त्या प्रदेशांत कोठेंहि कायद्याप्रमाणें बजावले जाऊं शकतील.

पाण्याचे तंटे

२६२. (१) दोन राज्यांत असलेल्या नदीच्या किंवा नदीच्या खोऱ्याच्या पाण्याचा किंवा पाण्यांतील वापर, वांटणी किंवा ताबा या संबंधीचे तंटे व तक्रारींचा निर्णय कसा लावावा हें पार्लमेंट कायद्यानें ठरवूं शकेल.

(२) या घटनेंत कांहींहि असलें तरी, उच्चतम न्यायालयाला किंवा इतर न्यायालयाला उपकलम (१) मधील तंट्याच्या किंवा तक्रारीच्या बाबतींत अधिकारक्षेत्र नाहीं असें पार्लमेंट कायद्यानें ठरवूं शकेल.

राज्याराज्यात सूत्रबद्धता

२६३. जर राष्ट्रपतीला केव्हांहि असें वाटलें कीं, पुढील कर्तव्यें सोपविलेलें मंडळ नेमून सार्वजनिक हितरक्षण होईल तर त्यानें हुकूम काढून तें नेमणें, त्याच्या कामाचें स्वरूप ठरविणें आणि त्याची घटना व कामकाज-पद्धत ठरविणें हें कायद्याला धरून असेल—

(अ) राज्यामध्यें निर्माण झालेल्या तंट्यांची चौकशी करणें व सल्ला देणें; (ब) ज्यांत कांहीं किंवा सर्व राज्यें किंवा संघ आणि एक किंवा अधिक राज्य यांचे समान हितसंबंध असतील अशा विषयांची चौकशी व चर्चा करणें; किंवा (क) अशा कोणत्याहि विषयासंबंधीं शिफारशी करणें आणि त्या विषयाच्या बाबतींत विशेषतः धोरण व कार्य यांत सूत्रबद्धता रहावी म्हणून शिफारशी करणें.

भाग १२ अर्थ, मिळकत, करार आणि फिर्यादी

प्रकरण १—अर्थ

सर्वसामान्य

२६४. या भागांत, संदर्भाचा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) ' अर्थव्यवस्था मंडळ ' म्हणजे २८० कलमान्वयें बनविलेलें अर्थ-व्यवस्था मंडळ; (ब) ' राज्य ' यांत परिशिष्ट १, भाग क मधील राज्य अंतर्भूत नाहीं; (क) परिशिष्ट १, भाग क मधील राज्यांचा ज्यावेळीं उल्लेख येईल त्यावेळीं त्यांत परिशिष्ट १, भाग ड मधील कोणत्याहि प्रदेशाचा आणि त्या पारिशिष्टांत उल्लेखित नसलेल्या पण भारतांत असलेल्या प्रदेशाचा समावेश असेल.

२६५. कायद्याच्या सत्तेशिवाय कोणताहि कर बसविला किंवा वसूल केला जाणार नाहीं.

२६६. कलम २६७ मधील तरतुदींना आणि या प्रकरणांत कांहीं कर व जकातींचें सर्व किंवा कांहीं निव्वळ उत्पन्न राज्याला वांटून देण्यासंबंधीच्या तरतुदींना अनुसरून, भारत सरकारला मिळालेला सर्व वसूल, त्या सरकारनें अल्प मुदतीच्या हुंड्या (ट्रेझरी बिलांनीं) काढलेलीं कर्जे किंवा मंजुरीपूर्वी लागणाऱ्या खर्चाकरतां दिलेल्या आगाऊ रकमा (वेज् अँड मीन्स अॅडव्हान्सेस) आणि त्या सरकारला कर्जफेडीचे मिळालेले पैसे यांचा एक संचित निधि केला जाऊन त्याला ' भारताचा संचित निधि ' असें संबोधण्यांत येईल आणि त्याच सर्व पद्धतीनें राज्याकडे जमा झालेल्या पैशाला ' राज्याचा संचित निधि ' असें संबोधण्यांत येईल.

(२) भारत किंवा राज्यांच्या सरकाराकडे किंवा सरकाराकरतां आलेला इतर सर्व सार्वजनिक पैसा भारताच्या किंवा राज्यांच्या सार्वजनिक हिशेब-खात्यांत जमा होईल.

(३) भारताच्या किंवा राज्याच्या संचित निधीच्या पैशाचा, कायद्या-शिवाय आणि या घटनेंत सांगितलेल्या पद्धति व कामाशिवाय विनियोग करतां येणार नाहीं.

२६७. (१) पार्लमेंट कायदा करून कायम तसलमात (imprest) रकमेच्या स्वरूपाचा ' भारतीय सादिलवार निधि " स्थापन करूं शकेल; त्या निधींत तशा कायद्यानें ठरविल्या जातील त्या रकमांचा वेळोवेळीं भरणा होईल आणि हा निधि, कलम ११५ किंवा ११६ प्रमाणें पार्लमेंट कायद्यानें तो खर्च प्रमाणित करीपर्यन्त अनपेक्षित खर्च भागविण्याकरतां राष्ट्रपतीला त्या निधींतून आगाऊ रकमा देतां याव्या म्हणून राष्ट्रपतीजवळ ठेवला जाईल.

(२) राज्याचें कोणतेंहि कायदेमंडळ कायदा करून तसलमात रकमेच्या स्वरूपाचा " राज्याचा सादिलवार निधि " या नांवाचा निधि स्थापन करूं शकेल; त्या निधींत तशा कायद्यानें ठरविल्या जातील त्या रकमांचा वेळोवेळीं भरणा होईल आणि हा निधि कलम २०५ किंवा २०६ प्रमाणें कायदेमंडळ कायद्यानें प्रमाणित करीपर्यन्त अनपेक्षित खर्च भागविण्याकरतां त्या राज्याचा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांना त्या निधींतून आगाऊ रकमा देतां याव्या म्हणून राज्यपाल किंवा राजप्रमुखाजवळ ठेवला जाईल.

संघ व राज्य यांत वसूलवांटणी

२६८. (१) संघसूचींत निर्दिष्ट केलेल्या स्टँपावरील कर, आणि औषधि आणि प्रसाधनें यांच्या तयार वस्तूंवरील अबकारी कर भारत सरकार वसूल करील; पण ते जमा करण्याचें काम—

(अ) जेथें परिशिष्ट १, भाग क मध्यें नमूद केलेल्या राज्यांत ते वसूल करावयाचे असतील तेथें भारत सरकार जमा करील; आणि (ब) इतर बाबतींत, ज्या राज्यांत ते वसूल व्हावयाचे असतील तेथील राज्य जमा करील.

(२) कोणत्याहि राज्यांत वसूल व्हावयाचे त्या अर्थवर्षांतील अशा करांचें उत्पन्न भारत सरकारच्या संचित निधीचा भाग न होतां तें त्या राज्याला वांटून दिलें जाईल.

२६९. (१) पुढील कर व जकाती भारत सरकार बसवील व जमा करील; पण ती जमा उपकलम (२) मधील व्यवस्थेनुसार राज्याला वांटून दिली जाईल—

(अ) शेतजमिनीशिवाय इतर मिळकतीच्या वारसदारीवरील कर; (ब) शेतजमिनीशिवाय इतर मिळकतींवरील संपत्ति कर; (क) रेल्वे,

समुद्र किंवा विमानमार्गानें नेल्या जाणाऱ्या उतारूंवरील व मालावरील सीमांत कर (Terminal Tax); (ड) रेल्वेभाडें व हंशील यांवरील कर; (ई) स्टॉक एक्स्चेंज व वायदे बाजारांतील देवघेवीवरील स्टँप ड्यूटी-व्यतिरिक्त कर; (फ) वृत्तपत्रांच्या खरेदी-विक्रीवरील आणि त्यांत प्रसिद्ध झालेल्या जाहीरातींवरील कर.

(२) कोणत्याहि अर्थवर्षांतील अशा जकाती व करांचें, परिशिष्ट १, भाग क मधील राज्यांतील उत्पन्नाशिवायचें निव्वळ उत्पन्न भारत संचित निधींत जमा न होतां ज्या राज्यांतून त्या वर्षीं तें उत्पन्न वसूल व्हावयाचें असेल, त्याच्या नांवानें जमा होईल व पार्लमेंट कायद्यानें जीं वांटणीचीं तत्त्वें ठरवील त्याप्रमाणें त्या राज्यांना वांटून दिलें जाईल.

२७०. (१) शेतीच्या प्राप्तीवरील कराशिवाय अन्य प्राप्तीवरील कर भारत सरकारकडून वसविला व जमा केला जाईल आणि उपकलम (२)-प्रमाणें त्याची संघ व राज्यांत वांटणी केली जाईल.

(२) परिशिष्ट क मधील राज्यांच्या कराच्या उत्पन्नांचा आणि संघाच्या प्राप्तीवरील द्यावयाच्या करांचा अंतर्भाव नसलेल्या कोणत्याहि अशा करा-पासून जें कोणत्याहि अर्थवर्षांत निवळ उत्पन्न येईल त्याचा जो दरशेंकडा हिस्सा ठरेल, तो भारतीय संचित निधीचा भाग न बनतां, ज्या राज्यांतून त्या वर्षीं तो कर वसूल करावयाचा असेल त्याच्या नांवावर जमा होईल आणि जी पद्धत ठरेल त्याप्रमाणें व त्या वेळेपासून तो त्या राज्यांना वांटून दिला जाईल.

(३) उपकलम (२)करतां, प्रत्येक अर्थवर्षांत, प्राप्तीवरील कराच्या निवळ उत्पन्नांतील, जो संघ प्राप्तीवरील कराचें निवळ उत्पन्न सोडून दरशेंकडा हिस्सा ठरविला जाईल तो, परिशिष्ट १, भाग क मधील राज्यांना द्यावयाचा हिस्सा समजला जाईल.

(४) या कलमांत—

(अ) "प्राप्तीवरील कर" यांत मंडळावरील कर (Corporation Tax) धरला नाहीं;

(ब) ' ठरविलेला ' याचा अर्थ—

(१) अर्थव्यवस्था मंडळ स्थापिलें जाईपर्यंत राष्ट्रपतीनें हुकमानें ठरविलेला, आणि

(२) अर्थव्यवस्था मंडळ स्थापन झाल्यानंतर त्या मंडळाच्या शिफारशींचा विचार करून राष्ट्रपतीनें हुकुमानें ठरविलेला;

(क) ' संघप्राप्ति ' यांत ज्यावर प्राप्तिकर घेतां येतो अशा भारत सरकारच्या संचित निधींतून द्यावयाचें पेन्शन व सर्व प्राप्ति यांचा समावेश होतो.

२७१. कलमें २६९ व २७० मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी पार्लमेंटला त्या कलमांत सांगितलेल्या कोणत्याहि जकाती व कर संघाच्या कामाकरतां जादा आकार लादून केव्हांहि वाढवितां येतील आणि अशा कोणत्याहि जादा करांचें सर्व उत्पन्न भारत संचित निधींत जमा होईल.

२७२. संघसूचींत औषधें व प्रसाधनें यांच्यावरील ज्या अबकारी कराचा उल्लेख केला आहे, त्या कराशिवाय संघाचे अन्य अबकारी कर भारत सरकारकडून बसविले व जमा केले जातील; पण जर पार्लमेंटनें कायदा करून तशी व्यवस्था केली तर ज्या राज्यांना तो कर बसविणारा कायदा लागू होतो, त्या राज्यांना भारतीय संचित निधींतून त्या कराच्या निवळ उत्पन्नांतील सर्व किंवा कांहीं रकमा दिल्या जातील. आणि त्या रकमा त्या राज्यांना, जीं वांटणीचीं तत्त्वें त्या कायद्यानें निर्दिष्ट केलीं जातील त्याप्रमाणें वांटल्या जातील.

२७३. ताग व तागाचा माल यांवरील निर्यात कराचें जें वार्षिक निवळ उत्पन्न असेल त्यांतील कोणताहि हिस्सा पश्चिम बंगाल, बिहार, आसाम व ओरिसा यांना ठरवून न देतां त्या ऐवजीं त्या राज्याच्या जमेकरतां सहाय्यक अनुदान (Grants-in-aid) म्हणून दरवर्षी भारत संचित निधीवर ज्या ठरविल्या जातील अशा रकमा आकारल्या जातील.

(२) जोंपर्यंत हा ताग व तागाच्या वस्तूंवरील निर्यात कर भारत सरकारकडून वसूल केला जात राहील तोंपर्यंत किंवा ही घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षें या दोहोंपैकीं जी अगोदरची मुदत असेल तोंपर्यंत, वरील ठरविलेल्या रकमांचा बोजा भारत संचित निधीवर राहील.

(३) ह्या कलमांत " ठरविलेल्या " या शब्दाला २७० कलमांतील शब्दाचाच अर्थ आहे.

२७४. जें बिल किंवा दुरुस्ती, ज्या करांत किंवा जकातींत राज्यांचे हितसंबंध आहेत असे कर किंवा जकात लादते किंवा त्यांत बदल करते किंवा जें भारतीय प्रातिकरासंबंधीं कायद्याच्या करतां केलेली शेतीचें उत्पन्न याची व्याख्या बदलते, किंवा ज्या तत्त्वावर वर दिलेल्या या प्रकरणांतील तरतुदीप्रमाणें राज्यांना पैसे वांटतां येतात किंवा वांटले जाऊं शकतात त्या तत्त्वांना जें बाधक ठरतें, किंवा जें या प्रकरणांत वर दर्शविलेल्या तरतुदीप्रमाणें संघाच्या कामाककरतां जादा कर लादते, तें बिल किंवा दुरुस्ती राष्ट्रपतीच्या शिफारशींशिवाय कोणत्याहि सभागृहांत आणतां किंवा मांडतां येणार नाहीं.

(२) या कलमांत " राज्याचे हितसंबंध असलेला कर किंवा जकात " याचा अर्थ—

(अ) ज्या कराचें किंवा जकातीचें सर्व किंवा कांहीं निवळ उत्पन्न कोणत्याहि राज्याला नेमून दिलें आहे तो कर किंवा ती जकात; किंवा (ब) ज्या कराचा किंवा जकातीचा निवळ उत्पन्नाशीं संबंध आल्यानें ज्या रकमा भारत संचित निधींतून राज्याला तात्पुरत्या द्यावयाच्या असतील तो कर किंवा जकात.

२७५. (१) ज्या राज्यांना मदतीची जरूरी आहे असें पार्लमेंट ठरवील त्या राज्याच्या उत्पन्नाला साहाय्य म्हणून दर वर्षीं निरानिराळ्या राज्यांना निरानिराळ्या रकमा पार्लमेंट कायद्यानें ठरवून देईन व त्याचा बोजा भारत संचित निधीवर ठेवला जाईल :

मात्र राज्यांतील अनुसूचित क्षेत्रांच्या (Scheduled areas) अनुशासनाचा दर्जा, त्या राज्यांतील इतर क्षेत्रांबरोबर वाढविण्याकरतां किंवा त्या राज्यांतील अनुसूचित जनजातींच्या (Tribes) कल्याणाची अभिवृद्धि करण्याकरतां तें राज्य भारत सरकारच्या संमतीनें ज्या विकासयोजना हातीं घेईल, यांचा जरूर तो खर्च त्या राज्याला भागवितां यावा म्हणून त्यांच्या भांडवली व सालोसालच्या खर्चांकरितां त्या राज्याच्या उत्पन्नाला साहाय्य म्हणून भारताच्या संचित निधीतून रकमा दिल्या जातील :

तसेंच आसामला भारत संचित निधींतून भांडवली व सालोसालच्या खर्चाकरितां साहाय्य म्हणून पुढीलप्रमाणें रकमा दिल्या जातील—

(अ) ६ वें परिशिष्ट, परिच्छेद २० ला जोडलेल्या कोष्टकांतील भाग अ मध्यें निर्देश केलेल्या जनजाती क्षेत्रांच्या कारभाराकरतां ही घटना सुरू होण्यापूर्वीं दोन वर्षांत जमेपेक्षां जो अधिक खर्च असेल त्याची सरासरी; आणि (ब) त्या राज्यांतील जनजाती क्षेत्रांच्या (Tribal areas) राज्यकारभाराचा दर्जा, त्या राज्यांतील इतर क्षेत्रांबरोबर वाढविण्याकरतां, तें राज्य भारत सरकारच्या पसंतीनें ज्या विकासयोजना हातीं घेईल त्याचा खर्च.

(२) उपकलम (१) मधील तरतूद पार्लमेंट करीपर्यंत, त्या कलमानें पार्लमेंटला दिलेले अधिकार, राष्ट्रपतिकडून हुकूम काढून बजावण्यालायक असेल आणि या कलमान्वयें काढलेला राष्ट्रपतीचा हुकुम पार्लमेंट जी काय तरतूद करील तिला अनुसरून, परिणामक्षम ठरेल :

मात्र, अर्थव्यवस्था मंडळाची स्थापना झाल्यानंतर, त्या मंडळाच्या शिफारशींचा विचार केल्याशिवाय, या उपकलमाखालीं राष्ट्रपतीला हुकुम काढतां येणार नाहीं.

२७६. (१) कलम २४६ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, राज्याच्या कायदेमंडळाचा राज्यांच्यासाठीं किंवा त्या राज्यांतील नगरपालिका, जिल्हा बोर्ड, लोकल बोर्ड अगर दुसरी अधिकारी संस्था यांच्यासाठीं, व्यवसाय, रोजगार, धंदे किंवा नोकऱ्या यांवरील करांसंबंधींचा कायदा हा उत्पन्नावरील कराचा कायदा आहे म्हणून बेकायदा ठरणार नाहीं.

(२) अशा प्रकारें बसविलेला कर दरवर्षीं दर माणशीं २५० रुपयांपेक्षां जास्त असणार नाहीं :

पण जर, ही घटना अमलांत येण्याच्या अगोदरच्या अर्थवर्षांत, एखाद्या राज्यांत किंवा एखाद्या नगरपालिकेंत, बोर्डांत किंवा अधिकृत संस्थेंत, व्यवसाय, रोजगार, धंदे किंवा नोकऱ्या यांवर बसविलेला कर जारी असेल व त्या कराचें प्रमाण किंवा जास्तींत जास्त प्रमाण २५० रुपयांपेक्षां अधिक असेल तर पार्लमेंट कायद्यानें त्याविरुद्ध अन्य व्यवस्था करीपर्यंत तो तसाच

वसूल केला जाईल. अशा प्रकारें पार्लमेंटकडून केला जाणारा कायदा सर्वसाधारण असेल किंवा विशिष्ट राज्यें, नगरपालिका, बोर्डें व अधिकृत संस्थांना अनुलक्षून असेल.

(३) राज्याच्या कायदेमंडळाला वर दिलेली व्यवसाय, रोजगार, धंदे व नोकऱ्या यांसंबंधीं कायदे करण्याची जी सत्ता दिली आहे, तीमुळें पार्लमेंटची, व्यवसाय, रोजगार, धंदे नोकऱ्या यांच्यापासून मिळणाऱ्या किंवा निर्माण होणाऱ्या उत्पन्नावरील करासंबंधीं कायदे करण्याची सत्ता मर्यादित होते असें समजलें जाणार नाहीं.

२७७. एखादा कर, जकात, पट्टी किंवा फी ही, ही घटना सुरू होण्यापूर्वीं जर एखाद्या राज्याच्या सरकारकडून, नगरपालिकेकडून, किंवा दुसऱ्या स्थानिक अधिकृत संस्थेकडून किंवा मंडळाकडून, त्यांच्या त्यांच्या कामासाठीं कायदेशीरपणें वसूल केली जात असेल तर, त्या करांचा, जकातींचा, पट्ट्यांचा किंवा फीचा संघसूचींत निर्देश असला तरी पार्लमेंट त्याविरुद्ध कायद्यानें योजना करीपर्यंत, ते कर पूर्वीप्रमाणेंच वसूल केले जातील व त्या त्या कामाला लावले जातील.

२७८. (१) या घटनेंत कांहींहि असलें तरी भारत सरकार उपकलम (२) ला अनुसरून, परिशिष्ट १, भाग ब मधील राज्यांशीं पुढील बाबतींत करार करूं शकेल—

(अ) ज्या राज्यांत भारत सरकारला एखादा कर किंवा जकात बसवितां येते, तो कर किंवा जकात बसविणें किंवा जमा करणें आणि जमा रकमेची या प्रकरणांत सांगितलेल्या तरतुदींपेक्षां निराळ्या रीतीनें वांटणी करणें; (ब) या घटनेप्रमाणें भारत सरकारला जो कर किंवा जी जकात त्या राज्यांत बसवितां येते तिच्या किंवा उत्पन्नाच्या जमेंत जर त्या राज्याला तूट येणार असेल तर त्याकरितां भारत सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत; (क) कलम २९१ (१) प्रमाणें भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या पैशांत, अशा राज्यानें द्यावयाचा आपला हिस्सा,

आणि जेव्हां असा करार केला जाईल तेव्हां त्या करारांतील शर्तींनुसार या प्रकरणांतील तरतुदी त्या राज्याला लागू होतील.

(२) उपकलम (१) प्रमाणें केला गेलेला करार ही घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षांपेक्षां अधिक काळ अमलांत राहाणार नाहीं :

मात्र जर राष्ट्रपतीला अर्थव्यवस्था मंडळाचा अहवाल विचारांत घेऊन असें वाटलें कीं, तो करार रद्द करावा किंवा सुधारावा तर तो त्याच्या सुरुवातीपासून पांच वर्षांनंतर केव्हांहि तसें करूं शकेल.

२७९. (१) ह्या प्रकरणांत मागील कलमांत ' निव्वळ उत्पन्न ' असें जेथें आलें आहे त्याचा अर्थ कोठल्याहि करापासून किंवा जकातीपासून आलेल्या उत्पन्नांतून वसुली खर्च वजा जातां राहिलेलें उत्पन्न असा आहे. तसेंच एखाद्या विभागांतलें, किंवा विभागविषयक कर किंवा जकात किंवा कराचा किंवा जकातीचा भाग याचें निवळ उत्पन्न भारताचा महालेखा परीक्षक (.मुख्य हिशेबतपासनीस) अजमावील आणि दाखला देईल तें या कलमाकरतां समजावें. त्याचें दाखला-पत्र निर्णायक असेल.

(२) वर जें सांगितलें आहे त्याला आणि या प्रकरणांतील स्पष्ट व्यवस्थेला अनुसरून, पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांत किंवा राष्ट्रपतीनें काढलेल्या हुकुमांत, जेथें या भागांत सांगितल्याप्रमाणें ज्या जकातीचें किंवा कराचें उत्पन्न कोणत्याहि राज्याला नेमून दिलें असेल किंवा द्यावयाचें असेल तेथें त्या कायद्यांत किंवा हुकुमांत तें उत्पन्न कसें मोजावें, कोणत्या वेळेपासून किंवा केव्हां आणि कोणत्या रीतीनें त्या पैशाचा भरणा करावा, तसेंच एक अर्थवर्ष व दुसरें अर्थवर्ष यांची सांगड कशी घालावी, आणि इतर प्रासंगिक किंवा अनुषंगिक गोष्टी कशा कराव्या या संबंधीची तरतूद असेल.

२८०. (१) राष्ट्रपति, ही घटना सुरू झाल्यापासून दोन वर्षांच्या आंत आणि त्यानंतर प्रत्येक पांच वर्षांच्या अखेरीस किंवा त्याला जरूर वाटल्यास त्याच्याहि अगोदर एक हुकुम काढून अर्थव्यवस्था मंडळ स्थापन करील. त्यांत राष्ट्रपतीनें नेमलेला एक सभापति व चार इतर सभासद असतील.

(२) या मंडळावरील सभासदांची नेमणूक करण्यास कोणती अवश्य लायकी असावी आणि त्यांची निवड कशी होईल हें पार्लमेंट कायदा करून ठरवील.

(३) पुढील बाबतींत राष्ट्रपतीला शिफारस करण्याचें त्या मंडळाचें काम असेल—

(अ) या प्रकरणांत दिल्याप्रमाणें संघ व राज्यें यांच्यामध्यें जें करांचें निवळ उत्पन्न वांटावयाचें आहे अगर वाटावें लागेल त्या संबंधीं, आणि राज्याराज्यांत तें उत्पन्न त्यांच्या हिश्शाप्रमाणें कसें विभागावें या संबंधीं; (ब) भारतीय संचित निधींतून राज्यांच्या उत्पन्नाला जी साहाय्यक देणगी द्यावयाची ती कोणत्या तत्त्वावर द्यावी यासंबंधीं; (क) परिशिष्ट १, भाग ब-मधील राज्यें व भारत सरकार यांच्यामध्यें कलम २७८ (अ) किंवा कलम ३०६ प्रमाणें झालेल्या एखाद्या कराराच्या अटी तशाच चालूं ठेवणें अगर त्या बदलणें यासंबंधीं; आणि (ड) वसूल परिस्थिति खंबीर राहावी याकरतां राष्ट्रपति अर्थव्यवस्था मंडळाला जी जी कांहीं विचारणा करील त्यासंबंधीं.

(४) हें मंडळ आपली कार्यपद्धति निश्चित करील आणि त्याला पार्लमेंट कायद्यानें देईल तें कार्य करण्यासंबंधीचे अधिकार असतील.

२८१. या घटनेंतील तरतुदींप्रमाणें अर्थव्यवस्था मंडळानें केलेली प्रत्येक शिफारस व त्यावर राष्ट्रपतीनें काय उपाययोजना केली यांचें स्पष्टीकरणाचें टांचण, राष्ट्रपति प्रत्येक सभागृहापुढें ठेवील.

किरकोळ अर्थव्यवस्था

२८२. एखाद्या सार्वजनिक कार्याकरतां पार्लमेंट किंवा राज्याचें कायदे-मंडळ कायदे करूं शकत नसलें तरी त्या कार्यासाठीं संघ किंवा राज्य साहाय्य देऊं शकेल.

२८३. भारतीय संचित निधीचा व सादिलवार निधीचा ताबा, त्या निधींत करावयाच्या पैशाचा भरणा, त्या निधींतून काढावयाचे पैसे, भारत सरकारकडे किंवा सरकारमार्फत आलेल्या पण वरील फंडांत जमा नसलेल्या सार्वजनिक पैशाचा ताबा, सार्वजनिक पैशाच्या हिशेबखातीं त्या पैशाचा भरणा, त्या खात्यांतून काढावयाचे पैसे आणि वरील बाबींसंबंधीं प्रासंगिक किंवा अनुषंगिक सर्व बाबी यांचें नियमन पार्लमेंट कायद्यानें करील आणि तशी व्यवस्था होईपर्यंत राष्ट्रपति नियम करून करील.

(२) राज्याच्या संचित निधीचा व सादिलवार निधीचा ताबा, त्या निधींत करावयाचा पैशाचा भरणा, त्या निधींतून काढावयाचे पैसे, राज्याच्या सरकारकडे किंवा सरकारमार्फत आलेल्या पण वरील फंडांत जमा नसलेल्या सार्वजनिक पैशाचा ताबा, सार्वजनिक पैशाच्या हिशेबखातीं त्या पैशाचा भरणा, त्या खात्यांतून काढावयाचे पैसे आणि वरील बाबीसंबंधीं प्रासंगिक किंवा अनुषंगिक सर्व बाबी यांचें नियमन राज्याचें कायदेमंडळ कायद्यानें करील आणि तशी व्यवस्था होईपर्यंत राज्यपाल किंवा राजप्रमुख नियम करून, करतील.

२८४. भारत सरकारनें किंवा राज्याच्या सरकारनें उभारलेल्या किंवा त्यांच्याकडे जमा झालेल्या सार्वजनिक पैशाशिवाय व वसूल पैशाशिवायचा सर्व पैसा, ज्या संघाच्या किंवा राज्याच्या कामकाजाकरितां नेमलेल्या अधिकाऱ्याकडे त्या नात्यानें आला असेल अगर त्याच्याकडे ठेवला असेल; किंवा (ब) भारत सरकारच्या प्रदेशांत असलेल्या एखाद्या कोर्टाकडे एखाद्या खटल्याचे, बाबीचे, हिशेबाचे किंवा व्यक्तींचे नांवानें आलेले किंवा ठेवलेले पैसे असतील ते,
भारताच्या किंवा राज्याच्या, जसें असेल त्याप्रमाणें, सार्वजनिक हिशेब-खातीं जमा केले जातील.

२८५. (१) पार्लमेंटकडून अन्यथा कायद्यानें व्यवस्था झाल्याशिवाय संघाची मालमत्ता ही राज्यानें किंवा राज्यांतील अधिकृत संस्थेनें बसविलेल्या करापासून मुक्त असेल.

(२) पार्लमेंट अन्यथा व्यवस्था करीपर्यंत राज्यांतील कोणत्याहि अधिकृत संस्थेला, संघाच्या मिळकतीवर जर ती मिळकत ही घटना सुरू होण्यापूर्वी, कराला किंवा कर बसविला जाण्याला पात्र असेल, व जर तो कर त्या राज्यांत वसूल केला जात असेल तर तसा कर बसविण्याला उपकलम (१) मधील कशानेंहि प्रतिबंध होणार नाहीं.

२८६. (१) राज्याचा कोणताहि कायदा मालाच्या खरेदी-विक्रीवर कर बसविणार नाहीं किंवा तो बसविण्याला अधिकार देणार नाहीं. जर ती

खरेदी विक्री—

(अ) राज्याबाहेर, किंवा (ब) भारतांतील प्रदेशांत आयात-निर्यातीच्या क्रमांत झाली असेल तर.

खुलासा—जरी मालाच्या विक्रीसंबंधीच्या सर्वसाधारण नियमांप्रमाणें त्या मालांतील ऐवज तशा खरेदी-विक्रीमुळें दुसऱ्या राज्यांत गेला असला तरी पोटकलम (अ)च्या साठीं, एखाद्या राज्याच्या उपयोगाकरतां मालाची खरेदी-विक्री झाली आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून तो माल तेथें खरोखर हवालीं करण्यांत आला तर त्या राज्यांत त्या मालाची खरेदी-विक्री झाली असें समजण्यांत येईल.

(२) पार्लमेंटनें कायदा करून अन्यथा ठरविल्याशिवाय जर एखाद्या मालाची खरेदी-विक्री राज्याराज्यांतील व्यापार किंवा धंद्याच्या क्रमांत होत असेल, तर त्या मालाच्या खरेंदी-विक्रीवर कर बसविण्याचा कायदा करण्याचा राज्याला अधिकार नाहीं किंवा तसा अधिकार देतां येणार नाहीं :

मात्र ही घटना सुरू होण्यापूर्वी एखाद्या राज्यानें कायदेशीरपणें बसविलेला खरेदी-विक्रीवरील कर हा जरी ह्या कलमांतील तरतुदींना विरोधी असला तरी तो ३१ मार्च १९५१ पर्यंत तसाच वसूल केला जात रहावा असें राष्ट्रपति हुकुमान्वयें सांगेल.

(३) पार्लमेंटनें समाजाच्या जीवनाला आवश्यक म्हणून कायद्यानें जाहीर केलेल्या कोणत्याहि मालाच्या खरेदी-विक्रीवर जरी एखाद्या राज्याच्या कायदेमंडळानें कायदा करून कर बसविला किंवा बसविण्याला अधिकार दिला, तरी तो कायदा राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवल्याशिवाय व त्याची संमति मिळाल्याशिवाय अमलांत येणार नाहीं.

२८७. पार्लमेंटनें कायदा करून अन्यथा ठरविल्याशिवाय कोणत्याहि राज्याचा कायदा (सरकारतर्फे किंवा अन्य व्यक्तीतर्फे निर्माण केलेल्या) विजेच्या उपयोगावर किंवा विक्रीवर कर बसविणार नाहीं किंवा तो बसविण्याला अधिकार देणार नाहीं. जर ती वीज—

(अ) भारत सरकारकडून वापरली जात असेल किंवा त्या सरकारला वापरण्याकरतां विकली असेल; किंवा (ब) भारत सरकारकडून एखादी रेल्वे उभारण्याकरतां, सुस्थितींत ठेवण्याकरितां किंवा चालविण्याला वापरली

जात असेल; किंवा ती रेल्वे चालविणाऱ्या रेल्वे कंपनीकडून तशा कामा-करतां वापरली जात असेल किंवा ती त्या सरकारला किंवा तशा एखाद्या रेल्वे कंपनीला एखादी रेल्वे उभारण्याकरतां, सुस्थितींत ठेवण्याकरतां किंवा चालविण्याकरतां विकली असेल,

आणि जर असा एखादा विजेच्या विक्रीवर कर बसविणारा किंवा कर बसविण्यास अधिकार देणारा कायदा केला गेला तर त्या कायद्यांत भारत सरकारला त्यांच्या उपयोगाकरतां त्या सरकारकडून विकलेल्या विजेची किंमत किंवा वर सांगितलेल्या अशा एखाद्या रेल्वे कंपनीला रेल्वे उभारणी-करतां, ती सुस्थितींत ठेवण्याकरतां किंवा चालू ठेवण्याकरतां विकलेल्या विजेची किंमत दुसऱ्या कोणत्यांहि मोठ्या प्रमाणावर विजेचा उपयोग करणाऱ्या ग्राहकाला द्याव्या लागणाऱ्या किंमतींतून कराची रक्कम वजा घालून जितकी होईल तितकीच आकारली जाण्याची कायद्यांत खबरदारी घेतली जाईल.

२८८. (१) विद्यमान कायद्यानें किंवा पार्लमेंटनें केलेल्या कायद्यानें राज्याराज्यांतील नद्या किंवा नद्यांच्या खोऱ्यांच्या नियमनाकरतां किंवा वाढीकरितां स्थापित झालेल्या अधिकृत संस्थेनें जर पाणी किंवा वीज सांठवली, निर्माण केली, उपयोगांत आणली, वांटली किंवा विकली, तर त्यावर ही घटना सुरू होण्यापूर्वी जारी असलेला राज्याचा कोणताहि कायदा राष्ट्रपतीनें हुकूम काढून अन्यथा तरतूद केल्याशिवाय, कर बसविणार नाहीं किंवा तो बसविण्याला अधिकार देणार नाहीं.

खुलासा—या उपकलांत "राज्याचा जारी असलेला कायदा" या शब्दप्रयोगांत ह्या घटनेपूर्वी पास झालेला किंवा केलेला आणि पूर्वी रद्द न झालेला कायदा याचा अंतर्भाव होतो. तो कायदा किंवा त्यांतील भाग कोठल्याहि किंवा विशिष्ट भागांत जरी अमलांत नसला तरी त्याचा असा अंतर्भाव होईल.

(२) उपकलम (१) मध्यें सांगितलेला असा एखादा कर, राज्याच्या कायदेमंडळाला कायद्यानें बसवितां येईल किंवा बसविण्याला अधिकार देतां येईल; पण तो कायदा राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवल्यानंतर त्याची त्याला संमति मिळालेली असली तरच तो अमलांत येईल; आणि जर तशा

कायद्यांत कराचे दर ठरविण्याची तरतूद किंवा त्या कराशीं संबंधित असलेल्या इतर बाबींची तरतूद कोणत्याहि अधिकृत संस्थेनें त्या कायद्यान्वयें नियम किंवा हुकूम काढून करावयाची असली तर, राष्ट्रपतीची पूर्वसंमति त्याला लागेल अशी त्या कायद्यांत योजना असली पाहिजे.

२८९. (१) राज्याची मिळकत आणि उत्पन्न हीं संघाच्या करापासून मुक्त असतील.

(२) राज्याच्या सरकारनें किंवा त्यांच्या तर्फेनें जर कोणताहि उद्योग किंवा धंदा चालविला जात असला, किंवा त्यासंबंधीं कांहीं व्यवहार होत असला, किंवा त्याकरतां एखादी मिळकत उपयोगांत आणली जात असली किंवा व्यापली गेली असली, किंवा त्यापासून एखादें उत्पन्न येत असलें किंवा निर्माण होत असलें, तर पार्लमेंट ठरवील त्या मर्यादेंत उपकलम (१) प्रमाणें संघाला कर बसविण्यास किंवा बसविण्याचा अधिकार देण्यास प्रतिबंध येणार नाहीं.

(३) पार्लमेंट कायद्यानें घोषित करील त्या राज्याच्या सामान्य कामाकरितां अनुषंगिक असलेल्या कोणत्याहि उद्योगाला किंवा धंद्याला किंवा कोणत्याहि प्रकारच्या उद्योगाला किंवा धंद्याला उपकलम (२) लागू होणार नाहीं.

२९०. या घटनेप्रमाणें न्यायालयाचे किंवा कमिशनचे खर्च किंवा ही घटना अमलांत येण्यापूर्वी ज्यांनीं ब्रिटिश राजवटींत हिंदुस्थानची नोकरी केली असेल आणि ही घटना अमलांत आल्यापासून जो संघाचें किंवा राज्याचें काम करीत असेल त्याला किंवा त्याच्यासंबंधीं द्यावयाचें पेन्शन ह्यांचा बोजा जेथें भारतीय संचित निधीवर किंवा राज्याच्या संचित निधीवर टाकला असेल तर—

(अ) ज्या बाबतींत हा बोजा भारताच्या संचित निधीवर असेल आणि जेथें कोर्ट किंवा कमिशन राज्याच्या स्वतंत्र गरजानुरूप काम करीत असेल किंवा व्यक्तीनें पूर्णतः किंवा अंशतः राज्याचें काम केलें असेल; किंवा (ब) ज्या बाबतींत हा बोजा राज्याच्या संचित निधीवर असेल आणि जेथें कोर्ट किंवा कमिशन संघाच्या किंवा दुसऱ्या राज्याच्या गरजेनुरूप काम करीत असेल, किंवा व्यक्तीनें पूर्णतः अगर अंशतः संघाचें किंवा दुसऱ्या राज्याचें

काम केलें असेल, तर राज्याच्या संचित निधीवर किंवा, जसें असेल त्याप्रमाणें, भारताच्या किंवा दुसऱ्या राज्याच्या संचित निधीवर त्याचा बोजा टाकला जाईल आणि त्या खर्चाकरितां किंवा पेन्शनकरतां जो सहमतानें ठरेल तो वांटा दिला जाईल, किंवा हें सहमत न झाल्यास भारताच्या मुख्य न्यायाधीशानें नेमलेल्या लवादाकडून जो वांटा ठरविला जाईल तो दिला जाईल.

२९१. (१) ही घटना सुरू होण्यापूर्वीं हिंदी संस्थानिकानें केलेल्या लेखी किंवा अन्य करारान्वयें हिंदुस्थानच्या वसाहत सरकारनें त्या संस्थानच्या अधिपतीला एखादी करमाफ असलेली खाजगी खर्चाकरतां रक्कम देण्याची ग्वाही किंवा खात्री दिली असेल तर—

(अ) त्या रकमेचा बोजा भारताच्या संचित निधीवर राहील व त्यांतून ती रक्कम दिली जाईल; आणि (ब) अशा प्रकारें संस्थानिकांना दिलेल्या रकमांवर प्राप्तीवरील सर्व कर माफ असेल.

(२) जर अशा हिंदी संस्थानचे प्रदेश परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मध्यें असतील, तर त्या राज्याच्या संचित निधीवर बसविलेला व दिला जाणारा हिस्सा, जर कांहीं असला तर, भारत सरकारकडून उपकलम (१) प्रमाणें दिल्या जाणाऱ्या रकमेच्या देण्यांत राष्ट्रपति कलम २७८ (१) मधील करारानुसार ठरवील त्याप्रमाणें, त्या मुदतीपर्यंत समाविष्ट होईल.

प्रकरण २— कर्ज

२९२. संघाच्या कार्यकारी सत्तेंत पार्लमेंट कायद्यानें वेळोवेळीं ठरवील त्या, असल्याच तर मर्यादेंत, भारताच्या संचित निधीच्या तारणावर कर्ज उभारणें आणि त्या असल्याच तर मर्यादेंत, हवाला देणें येतें.

२९३. (१) या कलमाच्या तरतुदींना अनुसरून राज्याच्या कायदे मंडळाच्या कार्यकारी सत्तेंत, त्या राज्याचें कायदेमंडळ वेळोवेळीं कायद्यानें ठरवील त्या, असल्याच तर, मर्यादेंत, राज्याच्या संचित निधीच्या तारणावर भारताच्या प्रदेशांत कर्ज उभारणें आणि त्या असल्याच तर मर्यादेंत, हवाला देणें येतें.

(२) पार्लमेंट कायद्यानें किंवा कायद्याखालीं ज्या अटी ठरवील त्यांना अनुसरून भारत सरकार राज्याला कर्ज देऊं शकेल किंवा २९२ कलमांत ठरविलेल्या मर्यादांचा जेथवर अतिक्रम होत नाहीं तेथवर, राज्यानें उभारलेल्या कर्जांना हमी देऊं शकेल आणि अशा कर्जाकरितां लागणाऱ्या रकमांचा बोजा भारताच्या संचित निधीवर असेल.

(३) जर भारत सरकारनें किंवा त्याच्या मागील सरकारनें प्रांतांना दिलेल्या कर्जापैकीं कांहीं कर्जफेड शिल्लक असेल किंवा भारत सरकारनें किंवा त्याच्या मागल्या सरकारनें हवाला दिलेल्या कर्जापैकीं कांहीं कर्जफेड शिल्लक असेल तर राज्य, भारत सरकारच्या संमतिशिवाय कर्ज उभारूं शकणार नाहीं.

(४) कलम (३) प्रमाणें जी संमति द्यावयाची ती भारत सरकार ज्या अटी, असल्याच तर, घालणें युक्त वाटेल त्या घालून देईल.

प्रकरण ३

मिळकत, करार, हक्क, देणीं, जबाबदाऱ्या व दावे

२९४. (१) हिंदुस्थानच्या वसाहत सरकारची म्हणून जी सर्व मालमत्ता व येणीं बादशहाच्या नांवावर होतीं आणि प्रत्येक गव्हर्नरच्या प्रांताच्या सरकारची म्हणून जी सर्व मालमत्ता व येणीं बादशहाच्या नांवावर होतीं तीं ही घटना सुरू होतांच संघ व संबंधी राज्यें यांच्याकडे अनुक्रमें जातील.

(२) हिंदुस्थानच्या वसाहत सरकारचे आणि प्रत्येक गव्हर्नरच्या प्रांताचे सर्व हक्क, देणीं आणि जबाबदाऱ्या, त्या एखाद्या करारान्वयें अगर अन्य करणानें उद्भूत झालेल्या असोत, त्या ही घटना सुरू होतांच अनुक्रमें भारत सरकारच्या व संबंधित राज्याच्या होतील :

मात्र ही घटना सुरू होण्यापूर्वी पाकिस्तान वसाहत किंवा पश्चिम व पूर्व बंगाल, पश्चिम व पूर्व पंजाब हे निर्माण झाल्यामुळें जी जुळवाजुळव केली गेली असेल किंवा करावी लागली असेल तिला अनुसरून वरील व्यवस्था होईल.

२९५. (१) ही घटना सुरू होतांच—

(अ) ही घटना सुरू होण्यापूर्वी जी सर्व मिळकत व येणीं परिशिष्ट १, भाग ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्यांशीं अनुबद्ध (कॉरस्पॉंडिंग) अशा हिंदी

संस्थानांची होती, तीं संघाचीं होतील; (आणि) ती मालमत्ता व येणीं जर कांहीं कामाकरतां धारण केलेला असतील तर तीं कामें त्यानंतर भारत सरकारचीं संघसूची नमूद केलेल्या बाबींशीं संबंधित कामें होतील; आणि (ब) जे सर्व हक्क, देणीं आणि जबाबदाऱ्या परिशिष्ट १, भाग ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या हिंदी राज्याशीं अनुबद्ध अशा हिंदी संस्थानांच्या सरकारचीं होतीं, मग तीं कोणत्याहि करारानें किंवा अन्य करणानें उद्भूत झालेलीं असोत, ते हक्क, तीं देणीं व त्या जबाबदाऱ्या भारत सरकारच्या होतील, (आणि) जर ते हक्क कांहीं कामाकरतां संपादन केले असतील किंवा तीं देणीं व जबाबदाऱ्या अशा कांहीं कामाकरतां स्वीकारल्या असतील तर तीं कामें त्यानंतर भारत सरकारचीं संघसूचींत नमूद केलेल्या बाबींशीं संबंधित कामें होतील :

मात्र ही व्यवस्था हिंदुस्थान सरकार व संस्थानी सरकार यांच्यामध्यें झालेल्या कराराला अनुसरून असेल.

(२) उपकलम (१) मध्यें नमूद केलेल्या करारांव्यतिरिक्त अन्य करारान्वयें अगर अन्यथा उद्भूत झालेल्या सर्व जबाबदाऱ्या, देणीं, हक्क, येणीं आणि सर्व मिळकती यांचा संस्थानांच्याकडे असणारा वारसा त्या संस्थानशीं अनुबद्ध असणाऱ्या परिशिष्ट १, भाग ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्याकडे ही घटना सुरू होतांच जाईल.

२९६. पुढील तरतुदींना अनुसरून भारतांतील कोणतीही मिळकत, जर ही घटना अमलांत न आल्या कारणानें बेवारशी किंवा रद्दबातल किंवा हक्कदार मालक न सापडल्यामुळें स्वामीहीन म्हणून बादशहाची किंवा हिंदी संस्थानिकाची झाली असती, ती, ती जर संस्थानच्या हद्दींत असेल तर राज्याकडे आणि अन्य बाबतींत संघाकडे जाईल :

मात्र जर एखादी मिळकत ज्या तारखेला अशा रीतीनें बादशहाची किंवा संस्थानिकाची झाली असती ती जर हिंदुस्थान सरकारच्या किंवा संस्थानी सरकारच्या कबज्यांत किंवा ताब्यांत असेल तर ती त्या वेळीं संघाच्या किंवा राज्याच्या कामाकरतां ज्याप्रमाणें वापरली गेली असेल किंवा धारण केली गेली असेल त्याप्रमाणें ती संघाची किंवा त्या राज्याची होईल.

खुलासा.—या कलमांत ' संस्थानिक ' व ' हिंदी संस्थान ' यांना कलम २६३ मधीलच अर्थ आहे.

२९७. भारताच्या जलप्रांगणांतल्या समुद्राखालीं असणाऱ्या सर्व जमिनी, खनिज द्रव्यें आणि मौल्यवान वस्तू संघाकडे जातील आणि संघाच्या कामाकरतां धारण केल्या जातील.

२९८. (१) संघाच्या व प्रत्येक राज्याच्या कार्यकारी सत्तेमध्यें योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्याला बाध येऊं न देतां संघासाठीं किंवा राज्यासाठीं अनुक्रमें धारण केलेल्या मिळकतींचें दान, विक्री, विल्हेवाट, किंवा गहाण, आणि तशाच कामासाठीं अनुक्रमें मिळकतीची खरेदी किंवा संपादणी करणें आणि करार करणें हे येतात.

(२) संघाच्या किंवा राज्याच्या कामासाठीं संपादन केलेली मिळकत संघाची किंवा तशा राज्याची, जसें असेल त्याप्रमाणें, होईल.

२९९. (१) संघ किंवा राज्य आपली कार्यकारी सत्ता बजावीत असतां त्यांनीं केलेले सर्व करार हे अनुक्रमें, राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांनीं केले आहेत असें निर्देशिलें जाईल; आणि त्या सत्तेच्या बजावणींत केलेले मिळकतीसंबंधीचे असे करार व दिलेलीं आश्वासनें राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख सांगतील, आणि अधिकार देतील त्या व्यक्तीकडून व त्या पद्धतीनें त्यांच्यातर्फे अमलांत आणले जातील.

(२) या घटनेच्या उद्दिष्टांकरतां किंवा या पूर्वीच्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्याच्या उद्दिष्टांकरतां केलेल्या व अमलांत आणलेल्या करारांबाबत किंवा आश्वासनाबाबत राष्ट्रपति, राज्यपाल किंवा राजप्रमुख यांपैकीं कोणीही व्यक्तिशः जबाबदार नसतील, त्याचप्रमाणें त्यांच्यामार्फत जी व्यक्ति असे करार किंवा आश्वासनें देत असेल किंवा अमलांत आणीत असेल तीहि व्यक्तिशः जबाबदार नसेल.

३००. (१) भारत सरकार भारत संघाच्या नांवानें आणि राज्य सरकार राज्याच्या नांवानें दावे करूं शकतील किंवा त्यांच्यावर दावे केले जाऊं शकतील; आणि जर ही घटना अमलांत आली नसती तर हिंदुस्थानचें वसाहत सरकार आणि संबंधी प्रांत किंवा संबंधी हिंदी संस्थानें हीं ज्याप्रमाणें दावे करूं शकलीं असतीं किंवा त्यांच्यावर दावे केले गेले जाऊं शकले असते त्याचप्रमाणें त्याच बाबतींत अनुक्रमें आपापल्या कार्यासंबंधीं दावे त्यांना करतां येतील किंवा त्यांच्यावर केले जाऊं शकतील. हे दावे या घटनेनें

दिलेल्या अधिकारान्वयें पार्लमेंटला किंवा राज्याला जे कायदे करतां येतील त्यांना अनुसरून आणले जातील किंवा त्यांच्यावर केले जातील.

(२) जर या घटनेच्या प्रारंभीं—

(अ) ज्यांत वसाहत सरकार पक्षकार आहे असे खटले चालू असतील तर त्या जागीं संघ पक्षकार झाला असें समजलें जाईल; आणि (ब) ज्यांत प्रांत किंवा हिंदी संस्थान पक्षकार आहे असे खटले चालू असतील तर त्या प्रांताच्या किंवा संस्थानच्या जागीं, अनुबद्ध राज्य पक्षकार झालें असें समजण्यांत येईल.

भाग १३

भारतीय प्रदेशांत धंदे, व्यापार आणि ने-आण

३०१. ह्या भागांतील इतर तरतुदींना अनुसरून साऱ्या भारतांत, धंदे, व्यापार आणि ने-आण अनिर्बंध असेल.

३०२. एका राज्याचा दुसऱ्या राज्यांशीं किंवा भारताच्या प्रदेशांतील कोणत्याहि भागांत होणारे धंदे, व्यापार आणि ने-आण यांचें स्वातंत्र्य सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें पार्लमेंट कायद्यानें निर्बंधित करूं शकेल.

३०३. (१) सातव्या परिशिष्टांतील कोणत्याहि सूचींत धंदे आणि व्यापार यांच्यासंबंधीं एखादी नोंद आहे एवढ्यामुळें एक राज्य व दुसरें राज्य यांच्यांत भेदाभेद करणें किंवा तो करण्यास अधिकार देणें, किंवा एका राज्यापेक्षां दुसऱ्या राज्याला पसंती देणें किंवा पसंती देण्यास अधिकार देणें, या संबंधीचा कायदा करण्यास कलम ३०२ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, पार्लमेंटला किंवा राज्याच्या कायदेमंडळाला, सत्ता नसेल.

(२) पण जर भारतीय प्रदेशांतील कोणत्याहि भागांत सामानाच्या कमताईमुळें निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्याकरतां कायद्यानें आवश्यक ठरवलें तर कलम (१) मधील कशानेंहि पार्लमेंटला कायदा करून ही पसंती किंवा भेदाभेद करण्यास अगर ती करण्याचा अधिकार देण्यास प्रतिबंध नसेल.

३०४. कलम ३०१ किंवा ३०३ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी राज्याचें कायदे-मंडळ कायदा करून—

(अ) आपल्या राज्यांत तयार झालेल्या किंवा निर्माण झालेल्या मालावर जो कर त्या राज्यानें बसविला असेल, तसाच्च कर अन्य राज्यांतून आयात झालेल्या किंवा तयार केलेल्या तशाच वस्तूंवर, भेदाभेद नसावा याकरतां बसवूं शकेल, आणि (ब) सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आपल्या राज्याशीं किंवा राज्यांत होणारा धंदा, व्यापार आणि ने-आण यांच्या स्वातंत्र्यावर वाजवी बंधनें घालूं शकेल :

मात्र उपकलम (ब) करतां आणावयाचें बिल किंवा उपसूचना राष्ट्रपतीच्या पूर्वमंजुरीशिवाय राज्याच्या कायदेमंडळांत आणलें किंवा मांडलें जाणार नाहीं.

३०५. कलमें ३०१ आणि ३०३ मधील कांहींहि, राष्ट्रपति हुकुम काढून, अन्यथा व्यवस्था करीपर्यंत, विद्यमान कायद्याच्या कलमांना बाधक होणार नाहीं.

३०६. या भागांत वर कांहींहि तरतुदी असल्या किंवा या घटनेंत अन्य कांहीं तरतुदी असल्या तरी परिशिष्ट १, भाग ब मधील एखादें राज्य ही घटना सुरू होण्यापूर्वी आपल्या राज्यांत दुसऱ्या राज्यांतून आयात होणाऱ्या मालावर किंवा आपल्या राज्यांतून दुसऱ्या राज्यांत जाणाऱ्या निर्यात मालावर कर किंवा जकात वसूल करीत असेल तर, भारत सरकार आणि त्या राज्याचें सरकार यांच्यामध्यें त्यासंबंधीं करार झाला असल्यास त्या करारांतील शर्तीप्रमाणें ही घटना सुरू झाल्यापासून त्या करारांत नमूद केलें असेल त्याप्रमाणें जास्तींत जास्त दहा वर्षेंपर्यंत तो कर किंवा जकात बसवूं व वसूल करूं शकेल :

मात्र जर कलम २८० प्रमाणें स्थापन झालेल्या अर्थव्यवस्था मंडळाचा अहवाल विचारांत घेतल्यानंतर राष्ट्रपतीला अवश्य वाटलें तर तो अशा सुरुवातीला पांच वर्षें पुरीं झाल्यानंतर केव्हांहि तो करार रद्द किंवा दुरुस्त करूं शकेल.

३०७. कलमें ३०१, ३०२, ३०३ व ३०४ मधील हेतु सिद्धीस नेण्यासाठीं पार्लमेंट कायद्यानें त्यांना योग्य वाटेल त्या अधिकाऱ्याची नेमणुक

करूं शकेल आणि अशा नेमलेल्या अधिकाऱ्याला पार्लमेंट आवश्यक वाटेल ती सत्ता व तें काम देऊं शकेल.

भाग १४ संघाच्या व राज्याच्या नोकऱ्या

प्रकरण १—नोकऱ्या

३०८. या भागांत संदर्भाला दुसरा अर्थ अभिप्रेत नसल्यास 'राज्य' याचा अर्थ परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील राज्य असा आहे.

३०९. या घटनेंतील तरतुदींना अनुसरून, संघाचीं किंवा राज्याचीं कामें करण्याकरतां ज्या सरकारी नोकऱ्यांवर आणि जागांवर व्यक्तींच्या नेमणुका होतील, त्यांच्या भरतीचें आणि नोकरीच्या शर्तींचें नियमन योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्यानुसार केलें जाईल :

मात्र या कलमाप्रमाणें योग्य त्या कायदेमंडळाच्या कायद्यानें किंवा कायद्याखालीं व्यवस्था केली जाईपर्यंत, राष्ट्रपति किंवा त्यानें नेमलेली व्यक्ति संघाच्या कामासंबंधीं असलेल्या नोकऱ्या व हुद्दे आणि राज्यपाल किंवा राजप्रमुख किंवा त्यानें नेमलेली व्यक्ति राज्याच्या कामासंबंधीं असलेल्या नोकऱ्या व हुद्दे यांच्या भरतीविषयीं किंवा नोकरीच्या शर्तींविषयीं नियमांन्वयें नियमन करण्यास समर्थ असतील. त्यांनीं तसे केलेले नियम तशा त्या कायद्यांतील कलमांनुसार परिणामक्षम ठरतील.

३१०. (१) या घटनेनें जशी स्पष्टपणें व्यवस्था केली आहे त्याशिवाय, लष्करी नोकरींत किंवा संघाच्या मुलकी नोकरींत किंवा अखिल भारतीय नोकरींत असलेला किंवा संघांतील लष्करी किंवा मुलकी हुद्दयावर असलेला प्रत्येक इसम, राष्ट्रपतीची मर्जी असेल तोंपर्यंत, अधिकारावर राहील; आणि राज्याच्या मुलकी नोकरींत किंवा मुलकी हुद्दयावर असलेला प्रत्येक इसम राज्यपालाची किंवा राजप्रमुखाची मर्जी असेल तोंपर्यंत अधिकारावर राहील.

(२) एखादा इसम संघाच्या किंवा राज्याच्या मुलकी हुद्दयावर राष्ट्रपतीची किंवा राज्यपालाची किंवा राजप्रमुखाची मर्जी असेपर्यंत जरी अधिकारावर असला तरी, जर एखादा लष्करी नोकरींत किंवा अखिल भारतीय नोकरींत

किंवा संघाच्या किंवा राज्याच्या मुलकी नोकरींत नसलेला इसम एखाद्या करारान्वयें या घटनेखालीं त्या हुद्द्यावर नेमला गेला, आणि जर राष्ट्रपतीला किंवा राज्यपालाला किंवा राजप्रमुखाला विशिष्ट लायकी असलेल्या इसमाच्या कामांचा फायदा मिळवून घेणें जर अवश्य वाटेल तर ते, त्या कराराची मुदत संपण्यापूर्वी ती जागा रद्द केली गेल्यास किंवा त्याच्या कोठल्याहि दुर्वर्तनाशीं संबंध नसलेल्या कारणानें त्याला जागा रिकामी करावी लागल्यास त्याला नुकसानभरपाई देण्याची तरतूद करूं शकतील.

३११. (१) कोणत्याहि संघाच्या मुलकी नोकरींत असलेला किंवा अखिल भारतीय नोकरींत असलेला किंवा राज्याच्या मुलकी नोकरींत असलेला किंवा संघामध्यें किंवा राज्यामध्यें मुलकी हुद्द्यावर असलेला, कोणताहि इसम, ज्या अधिकाऱ्यानें त्याची नेमणूक केली असेल त्या अधिकाऱ्यापेक्षां दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्याकडून बडतर्फ किंवा दूर केला जाणार नाहीं.

(२) वर सांगितलेला कोणताहि इसम त्याच्याविरुद्ध करावयाच्या उपाययोजनेसंबंधीं, त्याला कारणें दाखविण्याची योग्य संधि दिल्याशिवाय बडतर्फ किंवा दूर केला जाणार नाहीं किंवा त्याचा हुद्दा कमी केला जाणार नाहीं :

मात्र हें कलम पुढील बाबतींत लागू होणार नाहीं—

(अ) जेथें एखाद्या इसमाला फौजदारी आरोपाखालीं शिक्षा होण्याला कारण झालेल्या वर्तणुकीमुळें बडतर्फ किंवा दूर केलें असेल किंवा त्याचा दर्जा कमी केला असेल; (ब) जेथें, ज्या अधिकाऱ्याला एखाद्या इसमाच्या बडतर्फीची किंवा त्याला दूर करण्याची किंवा त्याचा दर्जा कमी करण्याची सत्ता दिलेली आहे, त्या अधिकाऱ्याची जर त्या अधिकाऱ्यानें लेखी नमूद करावयाच्या कारणाकरतां, खात्री झाली कीं, अशा इसमाला कारणें दाखविण्याची संधि देणें सयुक्तिक दृष्टीनें व्यवहार्य नाहीं; किंवा (क) जेथें राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांची खात्री झाली कीं, त्या इसमाला राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें तशी संधि देणें युक्त नाहीं (तेथें हें कलम लागू होणार नाहीं.)

(३) एखाद्या इसमाला वरील उपकलम (२) प्रमाणें कारण दाखविण्याची संधि देणें सयुक्तिक दृष्टीनें व्यवहार्य आहे किंवा नाहीं असा प्रश्न

निर्माण झाल्यास ज्या अधिकाऱ्याला अशा इसमाच्या बडतर्फीची किंवा दूर करण्याची किंवा दर्जा कमी करण्याची सत्ता दिली असेल त्याचा निकाल अखेरचा ठरेल.

३१२. (१) भाग ११ मध्यें कांहींहि असलें तरी जर राज्यपरिषदेनें $\frac{2}{3}$ पेक्षां कमी हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांच्या पाठिंब्यानें ठराव करून ठरविलें कीं, राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें तसें (पुढील व्यवस्था) करणें जरूर व युक्त आहे तर पार्लमेंट कायदा करून संघाला व राज्याला समान असणाऱ्या अशा एक किंवा अधिक अखिल भारतीय नोकऱ्या निर्माण करूं शकेल आणि या प्रकरणांतील अन्य व्यवस्थेला अनुसरून या नोकरींत नेमल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या भरतीचे व नोकरीच्या शर्तींचें नियमन करूं शकेल.

(२) या घटनेच्या सुरुवातीला ज्यांना इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस आणि इंडियन पोलीस सर्व्हिस असें म्हणण्यांत येत होतें, त्या, पार्लमेंटनें या कलमाखालीं निर्माण केल्या आहेत असें समजलें जाईल.

३१३. या घटनेखालीं, यासंबंधीं दुसरी तजवीज होईपर्यंत, ही घटना सुरू होण्यापूर्वीं जे कायदे अमलांत होते आणि जे ही घटना सुरू झाल्यानंतर, जी सार्वजनिक नोकरी किंवा हुद्दा, अखिल भारतीय नोकरी किंवा संघाची किंवा राज्याची नोकरी किंवा हुद्दा म्हणून चालू असेल, तिला लागू असतील, ते या घटनेच्या तरतुदींशीं सुसंगत असतील तितक्या प्रमाणांत अमलांत राहतील.

३१४. या घटनेनें अन्यथा स्पष्टपणें व्यवस्था केलेल्याखेरीज जो प्रत्येक जण सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौन्सिल यांच्याकडून हिंदुस्थान सरकारांत सिव्हिल सर्व्हिसकरतां नेमला गेल्यानें ही घटना सुरू होतांना व नंतर भारत सरकारच्या किंवा राज्याच्या नोकरींत काम करीत राहिला असेल, त्याला ज्या भारत सरकार आणि राज्यसरकारची तो वेळोवेळीं नोकरी करीत आला आहे त्याच्याकडून पगार, रजा आणि पेन्शन या संबंधीं त्याच नोकरीच्या शर्ती आणि शिस्तीच्या बाबींसंबंधीं तेंच किंवा बदललेल्या परिस्थित्यनुरूप अनुकूल होतील त्यासारखेच हक्क, जे त्याला ही घटना सुरू होण्यापूर्वीं हक्कानें प्राप्त झाले असते ते, मिळण्याचा हक्क आहे.

प्रकरण २

सार्वजनिक नोकऱ्या नेमणूक मंडळें

३१५. (१) या कलमाला अनुसरून संघाकरतां एक व राज्याकरतां एक पब्लिक सर्व्हिस कमिशन (सार्वजनिक नोकर नेमणूक मंडळ) असेल.

(२) जर दोन किंवा अधिक राज्यें आपल्या राज्यांच्या गटाकरितां एकच नेमणूक मंडळ असावें असें ठरवितील, आणि तसा ठराव जर ते आपल्या सभागृहांत, किंवा जेथें दोन सभागृहें आहेत तेथें प्रत्येक राज्याच्या सभागृहांत पास करतील तर पार्लमेंट त्या राज्यांच्या आवश्यकतेकरतां एक संयुक्त नोकर नेमणूक मंडळ नेमण्याचा कायदा करील (त्याला या प्रकरणांत संयुक्त मंडळ असें म्हटलें आहे.)

(३) त्या कायद्यांतील उद्देश सिद्धीस नेण्याकरतां त्या कायद्यांत जरूर व इष्ट त्या प्रासंगिक किंवा अनुषंगिक तजविजी असतील.

(४) जर संघाच्या नोकर नेमणूक मंडळाला राज्याच्या राज्यपालानें किंवा राजप्रमुखानें विनंति केली तर तें मंडळ राष्ट्रपतीच्या संमतीनें सर्व किंवा कोणत्याहि राज्याच्या गरजा भागविण्याकरतां काम करील.

(५) या घटनेंत जेथें संघाच्या नेमणुक मंडळाचा किंवा राज्याच्या नेमणुक मंडळाचा उल्लेख आला आहे तेथें, संदर्भाला अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास तो उल्लेख संघाच्या किंवा राज्याच्या विशिष्ट बाबतींतल्या गरजांकरतां काम करीत असलेल्या मंडळाला अनुलक्षून केलेला असेल.

३१६. (१) या नोकर नेमणुक मंडळाचा अध्यक्ष आणि इतर सभासद यांची नेमणुक संघाच्या किंवा संयुक्त मंडळाच्या बाबतींत राष्ट्रपति करील आणि राज्याच्या नेमणुक मंडळाच्या बाबतींत राज्यपाल किंवा राजप्रमुख करील :

मात्र प्रत्येक नेमणुक मंडळाचे जवळ जवळ निम्मे सभासद हे त्यांच्या त्यांच्या नेमणुकीच्या दिवशीं भारत सरकारांत किंवा राज्यसरकारांत कमींत कमी दहा वर्षें हुद्द्यावर असलेले असले पाहिजेत आणि ही वर्षांची मुदत मोजतांना त्यांचा ह्या घटनेच्या प्रारंभापूर्वी हिंदुस्थानांत बादशाहाच्या किंवा हिंदी संस्थानाच्या हुद्द्यावर असलेला काळ धरला जाईल.

(२) ज्या दिवशीं नोकर नेमणुक मंडळाचा सभासद आपल्या कामावर रुजू होईल तेथून सहा वर्षें तो आपल्या जागेवर राहील किंवा संघाच्या मंडळाच्या बाबतींत त्याच्या वयाला पांसष्टावें वर्ष लागेपर्यंत आणि राज्याच्या किंवा संयुक्त मंडळाच्या बाबतींत साठावें वर्षें लागेपर्यंत जें यांतलें कमी असेल तेथपर्यंत तो कामावर राहील :

मात्र—

(अ) नोकर नेमणुक मंडळाचा सभासद संघ मंडळाच्या किंवा संयुक्त मंडळाच्या बाबतींत राष्ट्रपतीकडे आणि राज्यमंडळाचा सभासद राज्यपाल किंवा राजप्रमुखाकडे स्वदस्तुरचें लिखाण करून आपल्या जागेचा राजीनामा देऊं शकेल; (ब) नोकर नेमणुक मंडळींच्या सभासदाला कलम ३१७, उपकलम (१) किंवा (३) मध्यें सांगितलेल्या पद्धतीनें पदभ्रष्ट करतां येईल.

(३) नोकर नेमणुक मंडळाचा सभासद म्हणून जी व्यक्ति अधिकाराच्या जागेवर असेल ती त्या जागेची मुदत संपल्यानंतर त्या जागेवर पुनः नेमली जाण्यास अपात्र ठरेल.

३१७. (१) उपकलम (३) ला अनुसरून, नोकर नेमणुक मंडळाचा अध्यक्ष किंवा एखादा सभासद यांना फक्त राष्ट्रपतीच्या हुकुमानें गैरवर्तणुकीच्या कारणाकरतां पदभ्रष्ट करतां येईल. तत्पूर्वी राष्ट्रपति उच्चतम न्यायालयाकडे त्या बाबतींत विचारणा करील व तें न्यायालय १४५ कलमांत ठरविलेल्या पद्धतीनें चौकशी करील आणि अमुक कारणाकरतां त्याला काढून टाकावें असा अहवाल सादर करील व त्यानंतर राष्ट्रपति त्याला काढण्याचा हुकूम काढील.

(२) संघ मंडळाच्या व संयुक्त मंडळाच्या बाबतींत राष्ट्रपति आणि राज्यमंडळाच्या बाबतींत राज्यपाल किंवा राजप्रमुख, ज्यांच्यासंबंधीं उपकलम (१) प्रमाणें उच्चतम न्यायालयाकडे विचारणा केली गेली असेल, अशा अध्यक्षाला किंवा मंडळाच्या सभासदाला उच्चतम न्यायालयाकडून विचारणा केल्या गेलेल्या बाबतींत अहवाल येऊन हुकुम काढीपर्यंत तात्पुरतें कामावरून दूर करूं शकेल.

(३) उपकलम (१) मध्यें कांहींहि असलें तरी, राष्ट्रपति हुकुम काढून नोकर नेमणुक मंडळाच्या अध्यक्षाला किंवा सभासदाला जर तो अध्यक्ष किंवा सभासद जर—

(अ) नादार म्हणून ठरविला गेला असेल; किंवा (ब) आपल्या अधिकाऱ्याच्या मुदतींत कचेरीच्या कामाव्यतिरिक्त कोणतीहि पगारी नोकरी करीत असेल; किंवा (क) राष्ट्रपतीच्या मतानें मनाच्या किंवा शरीराच्या दुर्बलतेमुळें अधिकारावर राहण्यास अपात्र असेल,

तर राष्ट्रपति त्याला पदभ्रष्ट करूं शकेल.

(४) जर नोकर नेमणुक मंडळाचा अध्यक्ष किंवा दुसरा एखादा सभासद भारत-सरकारनें किंवा त्याच्या मार्फतीनें किंवा एखाद्या राज्याच्या सरकारनें केलेल्या एखाद्या कॉंट्रॅक्टमध्यें किंवा करारामध्यें संबंधित किंवा हितसंबंधित असला किंवा झाला किंवा त्यापासून होणाऱ्या कोणत्याहि प्रकारच्या नफ्यांत, लाभांत, किंवा त्यापासून होणाऱ्या प्राप्तींत सभासदाशिवाय अन्य नात्यानें आणि एखाद्या एकत्रित भांडवलानें स्थापलेल्या कंपनीच्या इतर सभासदांबरोबर, कोणत्याहि प्रकारें भाग घेत असला तर तो उपकलम (१) च्या कारणापुरता गैरवर्तणुकीकरतां अपराधी आहे असें समजण्यांत येईल.

३१८. संघ मंडळाच्या किंवा संयुक्त मंडळाच्या बाबतींत राष्ट्रपति आणि राज्यमंडळाच्या बाबतींत राज्यपाल किंवा राजप्रमुख नियम करून—

(अ) मंडळाची सभासद-संख्या आणि त्यांच्या नोकरीच्या शर्ती ठरवील; आणि (ब) मंडळाच्या नोकरवर्गांतील नोकरांची संख्या आणि नोकरीच्या शर्तींची तरतूद करील :

मात्र मंडळाच्या सभासदाच्या नेमणुकीनंतर त्याला तोट्याच्या होतील अशा रीतीनें त्याच्या नोकरीच्या शर्ती बदलल्या जाणार नाहींत.

३१९. आपल्या जागेवरून निवृत्त झाल्यावर—

(अ) संघ नोकर नेमणुक मंडळाचा अध्यक्ष भारत सरकारमध्यें किंवा राज्यसरकारमध्यें पुनः नोकरीवर घेतला जाण्यास अपात्र ठरेल;
(ब) संघ नोकर नेमणुक मंडळाचा अध्यक्ष, संघ मंडळाचा अध्यक्ष म्हणून किंवा दुसरा एक सभासद म्हणून किंवा दुसऱ्या एखाद्या राज्य-

नेमणुक मंडळाचा अध्यक्ष म्हणून नेमला जाण्यास लायक ठरेल; पण भारत सरकारच्या किंवा राज्यसरकारच्या दुसऱ्या कोणत्याहि नोकरींत नेमला जाण्यास लायक ठरणार नाहीं; (क) संघ नोकर नेमणुक मंडळांतील अध्यक्षाशिवायचा दुसरा कोणीही सभासद, संघ मंडळाच्या किंवा राज्यमंडळाच्या अध्यक्षपदाकरतां लायक असेल पण तो भारत सरकारच्या किंवा राज्यसरकारच्या दुसऱ्या कोणत्याहि नोकरींत नेमला जाण्यास लायक ठरणार नाहीं; (ड) राज्य नोकर नेमणुक मंडळांतील अध्यक्षाशिवायचा दुसरा कोणीही सभासद, संघ मंडळाचा अध्यक्ष किंवा सभासद म्हणून किंवा त्या किंवा दुसऱ्या राज्यमंडळाचा अध्यक्ष म्हणून नेमला जाण्यास लायक ठरेल, पण तो भारत सरकारच्या किंवा राज्यसरकारच्या कोणत्याहि नोकरींत नेमला जाण्यास लायक ठरणार नाहीं.

३२०. (१) संघाचीं आणि राज्याचीं नोकर नेमणुक मंडळें संघाच्या आणि राज्याच्या नोकऱ्यांसाठीं करावयाच्या नेमणुकांकरतां परीक्षा घेण्याचें काम करतील.

(२) संघाच्या नोकर नेमणुक मंडळाला दोन किंवा अधिक राज्यांनीं खास लायकी लागणाऱ्या उमेदवारांच्या नोकऱ्यांकरतां संयुक्त भरतीच्या योजना आंखण्यासाठीं व त्या अमलांत आणण्यासाठीं मदत करण्याची विनंति केली तर ती मदत करणें हें त्यांचें काम असेल.

(३) संघाच्या किंवा राज्याच्या नोकर नेमणुक मंडळाचा सल्ला—

(अ) मुलकी नोकऱ्या व मुलकी हुद्दे यांत भरती करण्याच्या पद्धतीच्या सर्व बाबतींत; (ब) मुलकी नोकऱ्या व हुद्दे यांत नेमणुका करतांना आणि एका नोकरींतून दुसऱ्या नोकरींत बढती व बदली करतांना कोणतीं तत्त्वें अनुसरावीं आणि अशा नेमणुकाकरतां, बढतीकरतां, व बदलीकरतां उमेदवारांची योग्यता कशी ठरवावी या बाबतींत; (क) भारत सरकारांत किंवा राज्यसरकारांत मुलकी नात्यानें नोकरी करीत असणाऱ्या व्यक्तींना लागू असणाऱ्या विनंत्या किंवा अर्ज यांसह सर्व शिस्तीच्या बाबतींत; (ड) एखादा इसम भारत सरकारमध्यें किंवा राज्याच्या सरकारमध्यें किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांत किंवा संस्थानांत मुलकी नात्यानें नोकरी करीत असेल किंवा त्यान

नोकरी केलेली असेल आणि त्यांनीं आपलें कर्तव्य बजवतांना एखादें कृत्य केलें असेल किंवा तें करावयाचा त्याचा उद्देश असेल, त्या कृत्याबाबत त्याच्यावर भरलेल्या कोर्टांतल्या खटल्यांत स्वतःचा बचाव करतांना जो खर्च झाला असेल त्या खर्चाची मागणी त्यानें किंवा त्याचे बाबतींत केली गेल्यास तो खर्च परिस्थितीप्रमाणें भारताचा किंवा राज्याच्या संचित निधींतून द्यावयाच्या बाबतींत; (इ) एखाद्या इसमानें भारत सरकारची किंवा राज्यसरकारची किंवा ब्रिटिश हिंदुस्थानची किंवा संस्थानची मुलकी खात्यांत नोकरी करीत असतांना झालेल्या इजांबद्दल पेन्शनची मागणी केली तर त्या बाबतींत आणि ही पेन्शनची रक्कम किती असावी या प्रश्नाबाबत (सल्ला) अनुक्रमें घेतला जाईल.

आणि नोकर नेमणुक मंडळाचें त्यांना राष्ट्रपतीनें किंवा राज्यपालानें किंवा राजप्रमुखानें विचारलेल्या प्रश्नाबाबत किंवा अन्य कोणत्याहि बाबतींत सल्ला देणें कर्तव्य असेल :

तथापि राष्ट्रपति, अखिल भारतीय नोकऱ्यांच्या बाबतींत आणि संघाच्या कामासंबंधींच्या इतर नोकऱ्या व जागा यांच्या बाबतींत आणि राज्यपाल किंवा राजप्रमुख राज्याच्या कामासंबंधीच्या इतर नोकऱ्या व जागा यांच्या बाबतींत नियम करील आणि त्या नियमांत कोणत्या बाबतींत एकतर सामान्यतः किंवा विशिष्ट प्रश्नाच्या किंवा प्रश्नांच्या बाबतींत किंवा विशिष्ट परिस्थितींत या नेमणुक मंडळाचा सल्ला घेणें जरूरीचें नाहीं तें निर्दिष्ट करील.

(४) कलम १६, उपकलम (४) मध्यें निर्देशिलेल्या तरतुदींबद्दल किंवा कलम ३३५ मधील तरतुदी अमलांत आणण्याबद्दल उपकलम (३)-प्रमाणें नोकर नेमणूक मंडळाचा सल्ला घेणें आवश्यक नसेल.

(५) उपकलम (३) ला असलेल्या शर्तींप्रमाणें राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांनीं केलेले नियम ते तयार झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर चौदापेक्षां कमी दिवस पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवले जाणार नाहींत, आणि ज्या अधिवेशनांत ते ठेवले जातील त्या अधिवेशनांत पार्लमेंटचीं दोन्ही सभागृहें किंवा राज्याच्या कायदेमंडळाचें एक सभागृह किंवा दोन्ही सभागृहें ते रद्द करण्याचे किंवा त्यांत दुरुस्ती करण्याचे जे काय फेरफार करतील त्यांना अनुसरून ते असतील.

३२१. संघाच्या नोकर नेमणूक मंडळानें किंवा राज्याच्या नोकर नेमणूक मंडळानें, संघाच्या किंवा राज्याच्या आणि स्थानिक अधिकृत संस्था किंवा कायद्यानें बनवलेलें संघटित मंडळ किंवा एखादी सार्वजनिक संस्था यांच्या नोकऱ्यांच्या बाबतींत आपल्या कामाशिवाय अधिक काम करावयास सांगणारी तरतूद पार्लमेंटच्या किंवा राज्याच्या कायदेमंडळाच्या कायद्यांत असेल.

३२२. संघाच्या किंवा राज्याच्या नोकर नेमणुक मंडळाचें, त्यांच्या खात्यांतील मंडळींचें किंवा मंडळीना द्यावयाचे पगार, भत्ते आणि पेन्शन्स् यांसह सर्व खर्च भारत संचित निधि किंवा राज्य संचित निधीवर तसा तसा बसवला जाईल.

३२३. (१) संघ मंडळ दरसाल राष्ट्रपतीकडे आपल्या कामाचा अहवाल सादर करील आणि हा अहवाल आल्यावर राष्ट्रपति त्याची एक नक्कल पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवील. त्या नकलेसोबत मंडळाचे जर कांहीं सल्ले नाकारलेल्या प्रकरणांचीं त्यांच्या कारणासह खुलासे करणारीं टांचणें असलीं तर तींहि पुढें ठेवविलीं जातील.

(२) राज्यमंडळ दरसाल राज्यपालाकडे किंवा राजप्रमुखाकडे आपल्या कामाचा अहवाल सादर करील आणि संयुक्त मंडळ दरसाल त्यानें केलेल्या त्या राज्यांतील आपल्या कामाचा अहवाल अशा प्रत्येक राज्याच्या राजप्रमुखाकडे सादर करील आणि राज्यपाल किंवा राजप्रमुख हा अहवाल आल्यानंतर त्याची नक्कल राज्याच्या कायदेमंडळापुढें ठेववील. त्या नकलेसोबत मंडळाचे जर कांहीं सल्ले नाकारलेल्या प्रकरणांचीं त्यांच्या कारणासह खुलासे करणारीं टांचणें असलीं तर तींहि पुढें ठेवविलीं जातील.

भाग १५ निवडणुका

३२४. या घटनेखालीं पार्लमेंटकरतां आणि प्रत्येक राज्यांतील कायदेमंडळाकरतां आणि राष्ट्रपति व उपराष्ट्रपती यांच्या जागांच्या निवडणुकांकरतां तयार करावयाच्या मतदारांच्या याद्या आणि पार पाडावयाच्या निवडणुकी यांच्या संबंधीची देखरेख, मार्गदर्शन आणि नियंत्रण; आणि पार्लमेंट किंवा राज्याच्या कायदेमंडळाकरतां केल्या जाणाऱ्या निवडणुकांतून किंवा निवड-

णुकीच्या ज्या शंका व तंटे निर्माण होतील त्यांच्या निर्णयाकरतां नेमावयाचीं नेमणूक लवाद-मंडळें हें सर्व एका मंडळावर सोपविलें जाईल. (या घटनेंत त्या मंडळाला ' निवडणूक मंडळ ' म्हटलें आहे.)

(२) या निवडणूक मंडळांत एक मुख्य निवडणुक कमिशनर आणि ज्यांची राष्ट्रपति वेळोवेळीं संख्या ठरवील ते इतर निवडणूक कमिशनर्स, नेमावयाचे असले तर, असतील; आणि निवडणूक मंडळाचा मुख्य कमिशनर आणि इतर कमिशनर्स यांची नेमणुक पार्लमेंट कायद्यानें ठरवील त्याला अनुसरून, राष्ट्रपति करील.

(३) जेव्हां दुसरा कोणी निवडणूक कमिशनर म्हणून नेमला जाईल, तेव्हां मुख्य निवडणूक कमिशनर हा त्या मंडळाचा अध्यक्ष म्हणून काम करील.

(४) लोकसभागृहाच्या आणि प्रत्येक राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी आणि ज्या राज्यांत विधान परिषद असेल त्या परिषदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी आणि त्यानंतर दर दोन वर्षांनीं करावयाच्या निवडणुकीपूर्वी, राष्ट्रपति निवडणूक मंडळाच्या सल्ल्यानें त्याला जरूर वाटेल तितके प्रादेशिक कमिशनर्सहि निवडणूक मंडळावर उपकलम (१) प्रमाणें सोंपविलेल्या कामांत मदत करण्यासाठीं नेमील.

(५) पार्लमेंटनें केलेल्या कोणत्याहि कायद्याला अनुसरून निवडणूक कमिशनर्स आणि प्रादेशिक कमिशनर्स यांच्या नोकरीच्या अटी आणि त्यांच्या कामाची कालमर्यादा राष्ट्रपति नियम करून ठरवील ती असेल.

मात्र, मुख्य निवडणूक कमिशनरला अधिकारावरून काढावयाची पद्धति व कारणें जीं उच्चतम न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशासंबंधीं असतील तींच त्यालाहि लागू होतील आणि मुख्य निवडणूक कमिशनरच्या नोकरीच्या अटी त्याच्या नेमणुकीनंतर त्याला अहितकारी होतील अशा रीतीनें बदलल्या जाणार नाहींत :

तसेंच आणखी दुसरा कोणताहि निवडणूक कमिशनर किंवा प्रादेशिक कमिशनर मुख्य निवडणूक कमिशनरच्या शिफारशीशिवाय काढला जाणार नाहीं.

(६) निवडणूक मंडळावर उपकलम (१) प्रमाणें सोंपविलेलीं कामें त्यांना पार पाडतां यावींत म्हणून जर निवडणूक मंडळानें राष्ट्रपतीला किंवा राज्यपालाला किंवा राजप्रमुखाला जरूर तो नोकर वर्ग देण्यासंबंधीं विनंति केली तर जरूर तो नोकर वर्ग निवडणूक कमिशनरला किंवा प्रादेशिक कमिशनरला तो तो उपलब्ध करून देईल.

३२५. पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाच्या निवडणुकीकरतां किंवा राज्याच्या कायदे मंडळाच्या सभागृहाच्या किंवा प्रत्येक सभागृहाच्या निवडणुकीकरतां प्रत्येक प्रादेशिक मतदार संघाची एकच सर्वसाधारण मतदार यादी असेल आणि कोणतीहि व्यक्ति केवळ धर्माच्या, वंशाच्या, जातीच्या, लिंगाच्या किंवा त्यापैकीं एखाद्या कारणाकरतां त्या यादींत समाविष्ट होण्यास नालायक समजली जाणार नाहीं, किंवा तसल्या मतदार संघांतील खास मतदार यादींत आपला समावेश करावा असा हक्क सांगूं शकणार नाहीं.

३२६. लोकसभागृहाच्या आणि राज्यांतील विधान सभेच्या निवडणुका प्रौढ मतदानानें होतील; याचा अर्थ असा कीं, जी व्यक्ति अशी भारताची नागरिक असेल आणि जी योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्यान्वयें ठरविलेल्या तारखेला एकवीस वर्षांपेक्षां कमी वयाची नसेल आणि जी वास्तव्य नसल्याच्या, वेडेपणाच्या गुन्ह्याच्या, लांचलुचपतीच्या किंवा बेकायदा कृत्याच्या कारणामुळें या घटनेप्रमाणें किंवा योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्याप्रमाणें, अन्यथा नालायक ठरत नसेल, त्या व्यक्तीचा अशा निवडणुकीकरतां मतदार म्हणून नांव नोंदविलें जाण्याचा हक्क आहे.

३२७. या घटनेंतील तजविजींना अनुसरून, पार्लमेंट वेळोवेळीं पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाच्या किंवा राज्याचें सभागृह किंवा प्रत्येक सभागृहाच्या निवडणुकीच्या सर्व बाबींसंबंधीं किंवा विषयीं कायदा करून तरतूद करील. त्यांत मतदारांच्या याद्या तयार करणें, मतदार संघाच्या मर्यादा ठरविणें, आणि अशा गृहाची किंवा गृहांची योग्य रचना व्हावी याकरतां आवश्यक त्या इतर गोष्टी करणें यांचा अंतर्भाव होईल.

३२८. या घटनेच्या तरतुदींना अनुसरून आणि पार्लमेंटनें त्यासंबंधीं व्यवस्था केली नसेल त्या प्रमाणांत, राज्याचें कायदेमंडळ वेळोवेळीं त्या राज्याच्या सभागृहाच्या किंवा कोणत्याहि सभागृहाच्या निवडणुकीसंबंधींच्या

किंवा विषयींच्या सर्व बाबींची कायद्यानें तरतूद करील; त्यांत मतदारांच्या याद्या तयार करणें आणि अशा गृहाची किंवा गृहांची योग्य रचना व्हावी याकरतां अवश्यक त्या इतर गोष्टी करणें याचा अंतर्भाव होईल.

३२९. या घटनेंत कांहींहि असलें तरी—

(अ) मतदार संघाच्या मर्यादा ठरविणें किंवा त्या संघांना जागा वांटून देणें या संबंधीं कलम ३२७ किंवा ३२८ प्रमाणें केलेल्या किंवा करावयाचा उद्देश असलेल्या कायद्याच्या कायदेशीरपणाचा प्रश्न कोणत्याहि कोर्टांत उपस्थित केला जाणार नाहीं;

(ब) पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहाच्या किंवा राज्याच्या सभागृहाच्या किंवा कोणत्याहि एका सभागृहाच्या निवडणुकीसंबंधीं योग्य त्या कायदेमंडळानें केलेल्या कायद्यानें किंवा कायद्याखालीं जी पद्धत ठरविली असेल व ज्या अधिकाऱ्याकडे अर्ज करावयाचा असेल, त्याच्याकडे निवडणूक अर्ज केल्याशिवाय, त्या निवडणुकीसंबंधीं प्रश्न उपस्थित केला जाणार नाहीं.

भाग १६ कांहीं वर्गांसंबंधीं खास तजविजी

३३०. (१) लोकसभागृहांत—

(अ) अनुसूचित जाती; (ब) आसामांतील जनजातींच्या विभागातील अनुसूचित जनजातींशिवाय इतर अनुसूचित जनजाती (Scheduled Tribes); आणि (क) आसामांतील स्वयंशासित जिल्ह्यांतील अनुसूचित जनजाती यांच्याकरतां जागा राखून ठेवण्यांत येतील.

(२) ज्या राज्यांत राखीव जागा असतील तेथील एकूण लोकसंख्येशीं त्या राज्यांतील अनुसूचित जातींच्या किंवा राज्यांतील किंवा राज्याच्या विभागांतील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचें जें प्रमाण असेल तें जवळजवळ शक्य तोंवर प्रमाण, लोकसभेंत त्या राज्याला एकूण दिलेल्या जागांशीं, त्या राज्यांत उपकलम (१) प्रमाणें अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातींकरतां राखून ठेवलेल्या जागाचें असेल.

३३१. कलम ८१ मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी, जर राष्ट्रपतीच्या मतानें लोकसभेंत अँग्लो-इंडियन जातीचें पुरेसें प्रतिनिधित्व नसेल, तर तो त्या जातींतील दोघांपेक्षां अधिक नसणारांची लोकसभागृहांत नेमणूक करील.

३३२. (१) परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्यांत, आसामांतील अनुसूचित जनजातींच्या विभागांतील जनजातींशिवाय, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातींकरतां जागा राखून ठेवल्या जातील.

(२) आसामच्या विधान सभेंत स्वयंशासित जिल्ह्यांकरतांहि जागा राखून ठेवल्या जातील.

(३) ज्या राज्यांत राखीव जागा असतील तेथील एकूण लोकसंख्येशीं त्या राज्यांतील अनुसूचित जातींच्या किंवा त्या राज्यांतील किंवा त्या राज्याच्या विभागांतील जनजातींच्या लोकसंख्येचें जें प्रमाण असेल तेंच जवळजवळ शक्यतोंवर प्रमाण त्या राज्यांत असलेल्या एकूण जागांच्या संख्येशीं उपकलम (१) प्रमाणें कोणत्याहि राज्याच्या विधान सभेंत अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजातींकरतां राखून ठेवलेल्या जागांचें असेल.

(४) आसाममधील स्वयंशासित जिल्ह्याच्या लोकसंख्येचें त्या राज्यांतल्या एकूण लोकसंख्येशीं जें प्रमाण असेल त्या प्रमाणापेक्षां कमी नसलेलें, आसाम राज्यांतल्या विधान सभेंत ज्या एकूण सभासदांच्या जागा असतील त्या जागांच्या संख्येशीं आसाममधील स्वयंशासित जिल्ह्याकरतां राखून ठेवलेल्या जागांचें प्रमाण असेल.

(५) शिलाँग म्युनिसिपॅलिटी व लष्कर यांच्या मतदार संघाशिवाय आसाममध्यें स्वयंशासित जिल्ह्याकरतां राखून ठेवलेल्या जागांच्या मतदार-संघांत त्या जिल्ह्याबाहेरील कोणताहि विभाग असणार नाहीं.

(६) आसाम राज्यांतल्या कोणत्याहि स्वयंशासित जिल्ह्याच्या अनुसूचित जनजातींची नसणारी व्यक्ति, शिलाँगच्या लष्कर व म्युनिसिपॅलिटीच्या बनलेल्या मतदार संघाव्यतिरिक्त, त्या जिल्ह्यांतल्या कोणत्याहि मतदार संघामार्फत विधान सभेच्या निवडणुकीला उभी राहूं शकणार नाहीं.

३३३. कलम १७० मध्यें कांहींहि असलें तरी जर राज्यपाल किंवा राजप्रमुख यांच्या मतानें त्या राज्यांतल्या विधान सभेंत अँग्लो-इंडियन जमातीला प्रतिनिधित्व असणें जरूर असलें आणि त्या सभेंत त्यांचें पुरेसें प्रतिनिधित्व नसलें तर तो योग्य वाटेल तितक्या त्या जमातींतल्या सभासदांना तेथें नेमूं शकेल.

३३४. या भागांत मागें कांहींहि असलें तरी—

(अ) लोकसभागृह आणि राज्यांच्या विधान सभा यांत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरतां राखून ठेवलेल्या जागा; आणि (ब) लोकसभागृह आणि राज्यांच्या विधानसभा यांत अँग्लो-इंडियन जमातींचें नेमणुकीनें प्रतिनिधित्व, ह्या संबंधीच्या या घटनेंतील तरतुदी ही घटना सुरू झाल्यानंतर दहा वर्षांनंतर अमलांत रहणार नाहींत :

मात्र, लोकसभागृहांतील किंवा राज्याच्या विधानसभेंतील प्रतिनिधित्वाला त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या त्या त्या सभागृहाचें विसर्जन झाल्याशिवाय, या कलमानें बाध येणार नाहीं.

३३५. संघाच्या किंवा राज्याच्या नोकऱ्या व जागांसंबंधीं नेमणुका करतांना राज्यकारभाराची कार्यक्षमता राखण्याची दक्षता घेऊन अनुसूचित जातींचें व अनुसूचित जनजातींचे हक्क विचारांत घेतले जातील.

३३६. (१) रेल्वे, कस्टम, पोस्ट व तारखातें या संघाच्या नोकऱ्यांत, अँग्लो-इंडियन जमातीच्या करावयाच्या नेमणुका ह्या, ही घटना सुरू झाल्यानंतर पहिल्या दोन वर्षांत, १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच्या पद्धतीप्रमाणेंच होतील.

या जमातीकरतां वरील खात्यांत राखून ठेवलेल्या जागांच्या प्रमाणांत मागील दोन वर्षांतल्या जागांच्या प्रमाणापेक्षां त्यानंतर दर दोन दोन वर्षांनीं दहा टक्के कपात होईल :

मात्र ही घटना सुरू झाल्यानंतर दहा वर्षांचे अखेर अशा सर्व राखीव जागा ठेवणें बंद होईल.

(२) जर या जमातींतले लोक इतर जमातींतल्या लोकांशीं तुलना करतांना गुणाच्या दृष्टीनें लायक असतील तर त्यांच्याकरतां उपकलम (१) प्रमाणें राखून ठेवलेल्या जागांपेक्षां अधिक जागा देण्यास किंवा राखीव जागां-

व्यतिरिक्त अन्य जागा देण्यास उपकलम (१) प्रमाणें कोणताहि प्रत्यवाय नाहीं.

३३७. ३१ मार्च १९४८ ला संपणाऱ्या अर्थ वर्षांत अँग्लो-इंडियन जमातीच्या शिक्षणाकरतां ज्या ग्रँट्स दिल्या जात होत्या त्याच ग्रँट्स ही घटना सुरू झाल्यानंतर पहिल्या तीन अर्थवर्षांत संघ आणि परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मधील प्रत्येक राज्य देईल :

त्या नंतरच्या प्रत्येक तीन वर्षांच्या काळांत पूर्वीच्या तीन वर्षांच्या काळापेक्षां दहा टक्क्यांनीं ह्या ग्रँट्स् कमी होऊं शकतील :

मात्र ही घटना सुरू झाल्यानंतर दहा वर्षांनीं अँग्लो-इंडियन जमातीला जितक्या प्रमाणांत खास सवलत म्हणून ग्रँट्स् मिळत असत, तितक्या प्रमाणांत त्या बंद होतील :

आणखी शिवाय, कोणत्याहि शिक्षणसंस्थेला ती संस्था जर अँग्लो-इंडियन जमातीशिवाय अन्य जमातीच्या कमींत कमी चाळीस टक्के विद्यार्थ्यांना दरसाल प्रवेश मिळवून देण्याची सोय करीत नसेल तर तिला कोणतीही ग्रँट मिळण्यावर या कलमाप्रमाणें हक्क सांगतां येणार नाहीं.

३३८. (१) प्रत्येक अनुसूचित जातीकरतां आणि जनजातीकरतां एक खास अधिकारी राष्ट्रपतीकडून नेमलेला असेल.

(२) हा खास अधिकारी या घटनेंत अनुसूचित जाती व जनजातींना जीं संरक्षणें दिलीं आहेत त्या संबंधींची चौकशी करील आणि राष्ट्रपति सांगेल तितक्या तितक्या मुदतीचा त्यांच्याकडे ती संरक्षणें कशी चालू आहेत या संबंधीं अहवाल सादर करील आणि राष्ट्रपति तो अहवाल पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेववील.

(३) या कलमांत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातींचा जो उल्लेख आला आहे त्यांत राष्ट्रपति ३४० (१) कलमाप्रमाणें नेमलेल्या मंडळाचा अहवाल आल्यानंतर हुकुमांत नमूद करील त्या मागासलेल्या वर्गांचा आणि अँग्लो-इंडियन जमातीचा उल्लेख अंतर्भूत आहे असें समजलें जाईल.

३३९. (१) पहिल्या परिशिष्टांत नमूद केलेल्या भाग अ आणि ब-मधील राज्यांतल्या अनुसूचित जनजातींच्या कल्याणाचा आणि अनुसूचित

विभागांतील कारभाराचा अहवाल सादर करण्याकरतां राष्ट्रपति हुकूम काढून एक मंडळ केव्हांहि नेमूं शकेल; आणि ही घटना सुरू झाल्यानंतर मात्र दहा वर्षांनीं त्यानें हमखास तें मंडळ नेमलेंच पाहिजे.

त्या हुकुमांत मंडळ कसें बनवावें, त्याला सत्ता काय असावी आणि त्याची कार्यपद्धति कशी असावी याचें विवरण असूं शकेल आणि त्यांत राष्ट्रपतीला आवश्यक किंवा इष्ट वाटतील त्या प्रासंगिक किंवा अनुषंगिक तरतुदी असूं शकतील.

(२) राज्यांतील अनुसूचित जनजातींच्या हिताकरतां आदेशांत निर्दिष्ट केलेल्या योजना तयार करणें व त्या अमलांत आणणें आवश्यक आहे असें राज्यांना आदेश देण्याचें, संघाच्या कार्यकारी सत्तेंत येईल.

३४०. राष्ट्रपतीनें हुकूम काढून त्याला योग्य वाटेल तितक्या व्यक्तींचें, भारतांतील सामाजिक व शैक्षणिक बाबतींत मागासलेल्या वर्गांच्या परिस्थितीची आणि ज्या अडचणी ते अनुभवीत आहेत त्यांची चौकशी करण्याकरतां आणि त्या अडचणी दूर करण्याकरतां व त्यांची परिस्थिति सुधारण्याकरतां संघानें किंवा राज्यानें कोणते उपाय योजावेत आणि त्याकरतां संघ व राज्यांनीं रकमा काय द्याव्यात, कोणत्या अटीवर द्याव्यात, याची शिफारस करण्याकरतां, एक मंडळ नेमावें. ज्या हुकुमान्वयें हें मंडळ नेमण्यांत येईल त्याच्या कार्यपद्धतीचें विवरण त्या हुकमांत असेल.

(२) अशा प्रकारें नेमलेलें मंडळ त्यांच्याकडे विचारणा केलेल्या बाबींची चौकशी करील आणि त्याला दिसून आलेल्या वस्तुस्थितीचा अहवाल राष्ट्रपतीला सादर करील आणि त्याला योग्य वाटतील त्या अन्य शिफारशीहि करील.

(३) राष्ट्रपति असा सादर केलेला अहवाल व त्या अहवालासंबंधीं योजलेल्या उपायांची माहिती देणारें पत्रक सभागृहापुढें ठेववील.

३४१. (१) राष्ट्रपति, राज्याच्या राज्यपालाचा किंवा राजप्रमुखाचा सल्ला घेतल्यावर, या घटनेच्या उद्दिष्टांकरतां त्या राज्यांत अनुसूचित जाती कोणाला म्हणावें हें त्या जाती, वंश, जनजाती किंवा त्या जातींतील, वंशांतील किंवा जनजातींतील पोटभाग किंवा त्यांचे भाग हें त्यांचा जाहीरनाम्यांत निर्देश करून सांगूं शकेल.

(२) उपकलम (१) प्रमाणें काढलेल्या जाहीरनाम्यांतल्या यादींत ज्या जातींच्या अनुसूचित जाती म्हणून उल्लेख असेल त्या यादींतून कोणतीहि जात, वंश किंवा जनजात किंवा त्या जातींतील, वंशांतील किंवा जनजातींतील एखादा पोटविभाग किंवा भाग पार्लमेंट कायदा करून काढून टाकूं शकेल किंवा त्या यादींत घालूं शकेल; पण वर दिलेल्या पद्धतीशिवाय त्या कलमाखालीं काढलेला जाहीरनामा दुसऱ्या जाहीरनाम्यानें बदलला जाणार नाहीं.

३४२. (१) राष्ट्रपति, राज्याच्या राज्यपालाचा किंवा राजप्रमुखाचा सल्ला घेतल्यावर, या घटनेच्या उद्दिष्टांकरतां त्या राज्यांत अनुसूचित जनजाति कोणाला म्हणावें हें, त्या जनजाती किंवा त्या जनजातींचे समाज किंवा जनजातींतील किंवा जनजातींच्या समाजांतील पोटभाग किंवा भाग हे त्यांचा जाहीरनाम्यांत निर्देश करून, सांगूं शकेल.

(२) उपकलम (१) प्रमाणें काढलेल्या जाहीरनाम्यांतल्या यादींत, ज्या जातींचा अनुसूचित जनजाती म्हणून उल्लेख असेल त्या यादींतून कोणतीहि जनजात किंवा जनजात समाज किंवा त्या जनजातींतला किंवा जनजात समाजांतला एखादा पोटभाग किंवा भाग पार्लमेंट कायदा करून काढूं शकेल किंवा त्या यादींत घालूं शकेल; पण वर दिलेल्या पद्धतीशिवाय त्या कलमाखालीं काढलेला जाहीरनामा दुसऱ्या जाहीरनाम्यानें बदलला जाणार नाहीं.

भाग १७ कचेरीची भाषा

प्रकरण १—संघ-भाषा

३४३. (१) संघाची सरकारी भाषा देवनागरी लिपींतील हिंदी असेल.

संघाच्या सरकारी कामकाजाकरतां ज्या स्वरूपाचे अंक उपयोगांत आणावयाचे ते भारतीय अंकांच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असतील.

(२) उपकलम (१) मध्यें कांहींहि म्हटलें असलें तरी ही घटना सुरू झाल्यानंतर पंधरा वर्षेंपर्यंत इंग्रजी भाषा संघाच्या सर्व सरकारी कामकाजा-

करतां, ही घटना सरू होण्यापूर्वी जशी ती उपयोगांत होती, तशीच उपयोगांत राहील :

मात्र राष्ट्रपति वरील मुदतींत हुकूम काढून कोणत्याहि सरकारी कामकाजाकरतां हिंदीच्या जोडीला इंग्रजी भाषा, आणि भारतीय अंकांच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या जोडीला देवनागरी स्वरूपाचे अंक वापरण्याला अधिकार देऊं शकेल.

(३) ह्या कलमांत कांहींहि असलें तरी पार्लमेंट वरील पंधरा वर्षांचा काळ लोटल्यावर कायदा करून—

(अ) इंग्रजी भाषेचा, किंवा (ब) देवनागरी स्वरूपाच्या अंकांचा त्या कायद्यांत नमूद करण्यांत येईल त्या कामाकरतां उपयोग करण्याची तरतूद करूं शकेल.

३४४. (१) ही घटना सुरू झाल्यानंतर पांच वर्षांनीं आणि तिच्या सुरुवातीनंतरचीं दहा वर्षें संपल्यावर राष्ट्रपति हुकूम काढून एक मंडळ बनवील. त्या मंडळांत एक अध्यक्ष आणि आठव्या परिशिष्टांत दिलेल्या निरनिराळ्या भाषांचे प्रतिनिधि असणारे जे राष्ट्रपति नेमील ते सभासद म्हणून असतील. त्या मंडळानें कोणत्या पद्धतीनें काम करावें हें त्या हुकुमांत सांगितलेलें असेल.

(२) राष्ट्रपतीला पुढील बाबतींत शिफारस करण्याचें मंडळाचें काम असेल—

(अ) संघाच्या सरकारी कामाकरतां हिंदी भाषेचा अधिकाधिक उपयोग; (ब) संघाच्या सर्व किंवा कांहीं सरकारी कामाकारितां इंग्रजी भाषेच्या उपयोगावर बंधनें; (क) ३४८ कलमांत सांगितलेल्या सर्व किंवा कोणत्याहि कामाकरितां वापरली जावयाची भाषा; (ड) संघाच्या एका किंवा अनेक निर्दिष्ट कामाकरितां वापरावयाच्या अंकांचें स्वरूप; (इ) संघाच्या सरकारी भाषेसंबंधीं आणि संघ व राज्य किंवा एक राज्य व दुसरें राज्य यांच्यामधील व्यवहाराच्या भाषेसंबंधीं आणि त्याच्या उपयोगासंबंधीं, राष्ट्रपति मंडळाला ज्या अन्य बाबतींत विचारणा करील त्या.

(३) उपकलम (२) प्रमाणें आपल्या शिफारशी करतांना, मंडळ भारताच्या औद्योगिक, सांस्कृतिक आणि शास्त्रीय प्रगतीचा आणि सरकारी

नोकऱ्यांत बिगर हिंदी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या न्याय्य हक्कांचा व हित-संबंधांचा योग्य विचार करील.

(४) जींत लोकसभागृहाचे २० आणि राज्यपरिषदेचे १० सभासद असतील अशी एक ३० जणांची समिति बनविण्यांत येईल. त्यांच्या निवडणुका त्या त्या सभागृहाकडून त्या त्या प्रमाणांत होतील. त्या निवडणुकीकरतां प्रमाणशीर मतदानपद्धति क्रमदेय एकमताची असेल.

(५) उपकलम (१) प्रमाणें बनलेल्या मंडळाच्या शिफारशींची तपासणी करणें आणि आपलें मत राष्ट्रपतीला कळविणें हें या समितीचें काम असेल.

(६) ३४३ कलमांत कांहींहि असलें तरी, राष्ट्रपति उपकलम (५) मधील अहवालाचा विचार करून त्या अहवालांतील सर्व किंवा कोणत्याहि भागाला अनुसरून आदेश देऊं शकेल.

प्रकरण २—प्रादेशिक भाषा

३४५. कलमें ३४६ आणि ३४७ यांना अनुसरून राज्याचें कायदे-मंडळ कायदा करून राज्यांत प्रचलित असलेल्या एका किंवा अधिक भाषांना किंवा हिंदीला, त्या राज्याच्या सरकारी कामकाजाकरितां, भाषा किंवा अनेक भाषा म्हणून मान्यता देऊं शकेल :

मात्र राज्याच्या कायदे मंडळाकडून कायद्यानें अन्यथा व्यवस्था होईपर्यंत ही घटना अमलांत येण्यापूर्वी जी इंग्रजी भाषा त्या राज्यांत ज्या सरकारी कामकाजाकरितां उपयोगांत आणली जात होती, त्या कामकाजाकरतां तशीच उपयोगांत आणली जात राहील.

३४६. संघामध्यें सरकारी कामकाजाकरितां कांहीं काळ जी भाषा वापरण्याकरतां अधिकृत ठरली आहे तीच भाषा एक राज्य आणि दुसरें राज्य आणि एक राज्य आणि संघ यांच्यामधील व्यवहाराची भाषा असेल :

मात्र जर दोन किंवा अधिक राज्यांनीं हिंदी भाषा हीच त्या राज्यांतील व्यवहाराची भाषा असावी असें मान्य केलें तर ती भाषा त्या व्यवहाराकरतां उपयोगांत आणतां येईल.

३४७. जर एखाद्या राज्यांतील भरीव प्रमाणांतल्या लोकसंख्येनें इच्छा प्रगट केली कीं, आपण बोलत असलेली भाषा ही त्या राज्यानें मान्य करावी

तर राष्ट्रपतीची त्या मागणीवरून खात्री पटल्यास राष्ट्रपति त्या आदेशांत निर्दिष्ट करील त्या कामाकरतां तीहि भाषा सर्व राज्यांत किंवा विभागांत अधिकृत म्हणून मानली जावी असें सांगेल.

प्रकरण ३—उच्चतम, उच्च वगैरे न्यायालयांची भाषा

३४८. (१) या भागांतील वरील तरतुदींत कांहींहि असलें तरी पार्लमेंट कायद्यानें अन्यथा व्यवस्था करीपर्यंत—

(अ) उच्चतम न्यायालयाचें आणि प्रत्येक उच्च न्यायालयाचें कामकाज;

(ब) अधिकृत मूळ पाठः—

(१) पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहापुढें किंवा राज्याच्या सभागृहापुढें किंवा कोणत्याहि सभागृहापुढें आणावयाचें बिल आणि त्यावर मांडावयाच्या उपसूचना, (२) पार्लमेंटनें किंवा राज्यानें पास केलेले सर्व कायदे, राष्ट्रपतीनें किंवा राज्यपालानें किंवा राजप्रमुखानें काढलेले वटहुकुम, आणि (३) या घटनेप्रमाणें किंवा पार्लमेंटच्या किंवा राज्याच्या कायद्याप्रमाणें काढलेले सर्व हुकूम, नियम, पोटनियम, उपनियम, हें इंग्रजी भाषेंत असेल.

(२) उपकलम (१), पोटकलम (अ) मध्यें कांहींहि असलें तरी एखाद्या राज्याचा राज्यपाल किंवा राजप्रमुख राष्ट्रपतीची पूर्वसंमति घेऊन त्या राज्यांत मुख्य ठिकाणीं असलेल्या उच्च न्यायालयांतील कामकाज हिंदी भाषेंत किंवा त्या राज्यांत कोणत्याहि सरकारी कामकाजाकरतां उपयोगांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत चालविण्याला अधिकार देऊं शकेल :

मात्र, या कलमांतील कांहींहि उच्च न्यायालयाच्या निवाड्याला, हुकुमनाम्याला किंवा हुकुमाला लागू असणार नाहीं.

(३) उपकलम (१), पोटकलम (ब) मध्यें कांहींहि असलें तरी, जेथें राज्याच्या कायदेमंडळानें, त्या मंडळांत आणलेल्या बिलाची किंवा पास करावयाच्या कायद्याची भाषा किंवा राज्यपालानें किंवा राजप्रमुखानें काढलेल्या वटहुकुमांची भाषा किंवा त्या पोटकलमांतील तिसऱ्या परिच्छेदांतल्या हुकुमाची, नियमाची, पोट-नियमाची व उप-नियमाची भाषा इंग्रजीशिवाय दुसरी ठरविली असेल तर, त्यांचे राज्यपाल किंवा राजप्रमुख

यांच्या अधिकारानें राज्याच्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झालेलें इंग्रजी भाषांतर हें वरील कलमाच्या कार्यभागापुरतें अधिकृत मूळ पाठ म्हणून मानलें जाईल.

३४९. ३४८ (१) कलमामध्यें दर्शविलेल्या कोणत्याहि कामाकरतां वापरावयाच्या भाषेची तरतूद करणारें कोणतेंहि बिल किंवा उपसूचना, राष्ट्रपतीच्या पूर्वमंजुरीशिवाय पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहापुढें ही घटना सुरू झाल्यापासून पंधरा वर्षांत आणतां किंवा मांडतां येणार नाहीं; आणि राष्ट्रपति ३४४ (१) कलमाप्रमाणें बनविलेल्या मंडळाच्या शिफारशी आणि त्या कलमाच्या उपकलम (४) प्रमाणें बनविलेल्या समितीचा अहवाल विचारांत घेतल्याशिवाय अशा कोणत्याहि आणावयाच्या बिलाला किंवा मांडावयाच्या उपसूचनेला मंजुरी देणार नाहीं.

प्रकरण ४—खास सूचना

३५०. संघांतील किंवा राज्यांतील कोणत्याहि अधिकाऱ्याकडे किंवा अधिकृत संस्थेकडे कोणाहि व्यक्तीला आपलें गाऱ्हाणें दूर होण्याकरितां संघांत किंवा राज्यांत जी भाषा असेल त्या भाषेंत आपलें म्हणणें मांडण्याचा हक्क असेल.

३५१. हिंदी भाषेचा विस्तार करणें, भारताच्या संमिश्र संस्कृतीतील सर्व घटकांच्या विचारप्रदर्शनाचें माध्यम म्हणून उपयोग होण्याकरतां तिचा विकास करणें, तिच्या स्वाभाविक वळणाला अडथळा येऊं न देतां हिंदुस्थानींतील आणि आठव्या परिशिष्टांत दिलेल्या अन्य भाषांतील घडण, धाटणी आणि प्रयोग हे आपलेसे करून ती भाषा संपन्न करणें आणि जेथें अवश्य किंवा इष्ट असेल तेथें त्या भाषेच्या शब्दसंग्रहाकरतां मुख्यतः संस्कृत आणि नंतर इतर भाषांच्या भांडाराचा उपयोग करणें हें संघाचें कर्तव्य असेल.

३५२. (१) युद्धामुळें किंवा बाहेरील आकमणामुळें किंवा अंतर्गत अशांततेमुळें भारताच्या किंवा भारतांतील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका आणणारी गंभीर आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली आहे अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो एक जाहीरनामा काढून त्या अर्थाच्या आणीबाणीची घोषणा करील.

(२) उपकलम (१) प्रमाणें काढलेला जाहीरनामा—

(अ) नंतरच्या जाहीरनाम्यानें परत घेतला जाईल; (ब) पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवला जाईल; (क) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांकडून ठरावानें दोन महिन्यांच्या आंत मान्य न झाल्यास दोन महिने संपतांच तिचा अंमल संपेल :

मात्र जर असा हा जाहीरनामा लोकसभा बरखास्त झाल्यानंतर काढला असेल किंवा पोटकलम (क) मध्यें दिलेल्या दोन महिन्यांच्या मुदतींत लोकसभागृह बरखास्त झालें असेल, आणि तो जाहीरनामा मान्य करणारा ठराव राज्यपरिषदेनें पास केला असेल पण लोकसभागृहानें त्या जाहीरनाम्यासंबंधीं ती मुदत संपण्यापूर्वी ठराव पास केला नसेल तर लोकसभागृहाची पुनर्रचना झाल्यानंतर तीस दिवसांचे आंत तो जाहीरनामा मान्य केल्याचा ठराव त्याहि सभागृहानें पास न केल्यास त्या पुनर्रचित लोकसभागृहाची पहिली बैठक झालेल्या दिवसापासून तीस दिवसांनंतर तो जाहीरनामा अमलांत राहणार नाहीं.

(३) भारताची किंवा भारताच्या एखाद्या विभागाची सुरक्षितता युद्धामुळें किंवा परराष्ट्रीय आक्रमणामुळें किंवा अंतर्गत अशांततेमुळें धोक्यांत आहे असें जाहीर करणारी घोषणा राष्ट्रपति, संकट जवळ असल्याची खात्री पटल्यास, प्रत्यक्ष युद्धप्रसंगापूर्वी किंवा तशा आक्रमणापूर्वी करूं शकेल.

३५३. आणीबाणीचा जाहीरनामा अमलांत असेपर्यंत—

(अ) या घटनेंत कांहींहि म्हटलें असलें तरी संघाच्या कार्यकारी सत्तेला, राज्यानें आपल्या कार्यकारी सत्तेची अंमलबजावणी कशा रीतीनें करावी या

संबंधीं आदेश देतां येईल; (ब) पार्लमेंटला कोणत्याहि बाबतींत कायदा करण्याची जी सत्ता आहे, तींत त्या बाबीचा निर्देश संघसूचींत केला नसला तरी, भारत सरकार किंवा त्याचे पदाधिकारी किंवा शासनसंस्था यांना सत्ता देण्यासंबंधीं किंवा त्यांच्यावर काम लादण्यासंबंधीं किंवा ती सत्ता देण्याचे किंवा लादण्याचे अधिकार देण्यासंबंधीं, कायदे करण्याची सत्ता अंतर्भूत होईल.

३५४. (१) जोंपर्यंत आणीबाणीचा जाहीरनामा चालू असेल, तोंपर्यंत राष्ट्रपति कलम २६८ पासून २७९ पर्यंतच्या सर्व किंवा कांहीं तरतुदी, एक हुकुम काढून त्या हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या त्याला योग्य वाटतील ते अपवाद किंवा दुरुस्त्या यांना अनुसरून अमलांत रहातील असें फर्मावूं शकेल. मात्र ह्या तरतुदी कोठल्याहि परिस्थितींत ज्या अर्थवर्षांत ती घोषणा रद्द होईल त्या वर्षापलीकडे लागू होणार नाहींत.

(२) उपकलम (१) प्रमाणें काढलेला प्रत्येक हुकुम, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवला जाईल.

३५५. प्रत्येक राज्याचें परकीय आक्रमणापासून आणि अंतर्गत अशांततेपासून रक्षण करणें आणि प्रत्येक राज्याचें सरकार या घटनेंतील व्यवस्थेनुरूप चालूं राहील असें आश्वासन देणें हें संघाचें कर्तव्य असेल.

३५६. (१) अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, ज्या परिस्थितींत या घटनेप्रमाणें सरकारी राज्यकारभार चालू राहणें अशक्य आहे, अशी राष्ट्रपतीची, राज्याच्या राज्यपालाकडून किंवा राजप्रमुखाकडून वृत्तान्त आल्यावर किंवा अन्यथा खात्री पटली, तर राष्ट्रपति जाहीरनामा काढून—

(अ) राज्याच्या सरकारचीं सर्व किंवा कोणतींहि कामें आपल्याकडे घेऊं शकेल आणि राज्यपाल किंवा राजप्रमुख किंवा कायदेमंडळाशिवायचें राज्यांतील कोणतेंहि मंडळ किंवा शासनसंस्था यांना दिलेली किंवा त्याच्याकडून बजावली जाणारी सर्व किंवा कोणतीहि सत्ता आपल्याकडे घेऊं शकेल; (ब) राज्याच्या कायदेमंडळाचे सत्ताधिकार पार्लमेंटकडून किंवा पार्लमेंटच्या अधिकाराखालीं बजावले जातील असें घोषित करील; (क) त्या जाहीरनाम्यांतील उद्दिष्टें सिद्धीस नेण्यासाठीं राष्ट्रपति त्याला अवश्य किंवा इष्ट वाटतील त्या प्रासंगिक

आणि अनुषंगिक तरतुदी करिल. या तरतुदींत, राज्यांतील कोणत्याहि मंडळासंबंधीं किंवा शासनसंस्थेसंबंधीं या घटनेंत असणाऱ्या कोणत्याहि तरतुदींचा वापर पूर्णतः किंवा अंशतः स्थगित करण्याकरतां तरतुदींचाहि समावेश होईल :

मात्र उच्च न्यायालयाला दिलेल्या व त्याच्याकडून अमलांत आणल्या जाणाऱ्या सत्ता स्वतःकडे घेण्यास किंवा उच्च न्यायालयासंबंधीं असलेल्या घटनेच्या तरतुदींचा वापर पूर्णतः किंवा अंशतः स्थगित करण्यास, राष्ट्रपतीला हें कलम कांहींही अधिकार देणार नाहीं.

(२) असा कोणताहि जाहीरनामा दुसऱ्या जाहीरनाम्यानें परत घेतला किंवा बदलला जाऊं शकेल.

(३) या कलमाप्रमाणें काढलेला प्रत्येक जाहीरनामा पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवला जाईल; आणि तो पूर्वीचा जाहीरनामा परत घेणारा जाहीरनामा नसल्यास दोन महिने संपतांच, त्या मुदतीपूर्वी पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनीं ठरावांनीं मान्य न केल्यास, अमलांत राहणार नाहीं :

मात्र जर असा जाहीरनामा (पूर्वीचा जाहीरनामा परत न घेणारा) लोकसभागृह बरखास्त झाल्यानंतर काढला असेल किंवा या उपकलमामध्यें दिलेल्या दोन महिन्यांच्या मुदतींत तें बरखास्त झालें असेल आणि तो जाहीरनामा मान्य करणारा ठराव राज्य परिषदेनें पास केला असेल, पण लोकसभागृहानें त्या जाहीरनाम्यासंबंधीं ती मुदत संपण्यापूर्वी ठराव पास केला नसेल तर लोकसभागृहाची पुनर्रचना झाल्यानंतर तीस दिवसांचे आंत तो जाहीरनामा मान्य केल्याचा ठराव त्याहि सभागृहानें पास न केल्यास त्या पुनर्रचित लोकसभागृहाची पहिली बैठक झालेल्या दिवसापासून तीस दिवसांनंतर तो जाहीरनामा अमलांत रहाणार नाहीं.

(४) अशा प्रकारें मान्यता मिळालेला जाहीरनामा, जर परत घेतला नसेल, तर उपकलम (३) प्रमाणें जाहीरनाम्याला मान्यता देणारा दुसरा ठराव पास झाल्याच्या तारखेपासून सहा महिने संपतांच तो अमलांत राहणार नाहीं :

मात्र जर आणि जेव्हां जेव्हां पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांकडून सदर जाहीरनामा अमलांत ठेवण्यासंबंधींचा ठराव पास केला जाईल तेव्हां तेव्हां

तो जाहीरनामा परत घेतला न गेल्यास, तो या कलमाप्रमाणें ज्या दिवशीं त्याचा अंमल अन्यथा संपला असता, त्या दिवसापासून आणखी सहा महिने जारी राहील; पण कोणत्याहि परिस्थितींत तो जाहीरनामा तीन वर्षांपेक्षां जास्त काळ अमलांत राहणार नाहीं :

आणखी शिवाय, जर अशा या सहा महिन्यांच्या मुदतींत लोकसभागृह बरखास्त झालें असेल आणि जर राज्यपरिषदेनें तो जाहीरनामा चालू ठेवण्याचा ठराव पास केला असेल; पण लोकसभागृहानें त्या मुदतींत तो जाहीरनामा चालू ठेवण्याचा ठराव पास केला नसेल, तर लोकसभागृहाची पुनर्रचना झाल्यानंतर तीस दिवसांचे आंत तो जाहीरनामा मान्य केल्याचा ठराव त्याहि सभागृहानें पास न केल्यास, त्या पुनर्रचित लोकसभागृहाची पहिली बैठक झालेल्या दिवसापासून तीस दिवसांनंतर तो जाहीरनामा अमलांत राहणार नाहीं.

३५७. (१) जेथें ३५६ (१) कलमान्वयें काढलेल्या जाहीरनाम्यांत राज्याच्या कायदेमंडळाची सत्ता पार्लमेंटकडून किंवा पार्लमेंटच्या अधिकारान्वयें अमलांत आणली जाईल असें जाहीर झालें असेल, तेथें—

(अ) पार्लमेंट राष्ट्रपतीला राज्याच्या कायदेमंडळाची कायदे करण्याची सत्ता अर्पण करील आणि राष्ट्रपतीला ती सत्ता तो निर्दिष्ट करील त्या कोणत्याहि अधिकाऱ्याला, त्यांना लादावयास योग्य वाटतील अशा अटींवर, द्यावयास पार्लमेंट अधिकार देईल; (ब) पोटकलम (अ) प्रमाणें कायदे करण्याची सत्ता ज्या पार्लमेंटला किंवा राष्ट्रपतीला किंवा अन्य शासनसंस्थेला दिली आहे, ते संघाला किंवा संघाच्या पदाधिकाऱ्याला किंवा शासनसंस्थांना सत्ता देण्याचें किंवा कामें नेमून देण्याचें किंवा ती सत्ता किंवा कामें नेमून देण्याचे अधिकार देण्यासंबंधीचे, कायदे करूं शकतील; (क) ज्यावेळीं लोकसभागृहाची बैठक नसेल त्यावेळीं, राज्याच्या संचित निधींतून, पार्लमेंटकडून त्या खर्चाला मंजुरी मिळेपर्यंत, राष्ट्रपति खर्चाला अधिकार देऊं शकेल.

(२) उपकलम (१), पोटकलम (अ) मध्यें उल्लेख केलेल्या पार्लमेंटनें किंवा राष्ट्रपतीनें किंवा दुसऱ्या शासनसंस्थेनें राज्याचे कायदे करण्याची सत्ता अमलांत आणतांना केलेला कोणताहि कायदा, जो ते तेथें ३५६

कलमाप्रमाणें जाहीरनामा निघाला नसता तर करण्याला समर्थ झाले नसते तो कायदा जाहीरनाम्याचा अंमल संपल्यावर एक वर्षानें त्या असमर्थतेपुरता रद्द होईल. मात्र ज्या तरतुदीचा अंमल अशा रीतीनें संपणार आहे, त्या योग्य त्या कायदेमंडळाच्या कायद्यानें दुरुस्तीसह किंवा दुरुस्तीशिवाय अगोदर रद्द केल्या नाहींत किंवा पुनः कायद्यानें स्थापित केल्या नाहींत तर ती मुदत संपण्यापूर्वी ज्या गोष्टी केल्या अगर करावयाच्या राहिल्या त्यांना हें लागू होणार नाहीं.

३५८. जोंपर्यंत आणीबाणीचा जाहीरनामा जारी आहे, तोंपर्यंत भाग ३ मध्यें व्याख्या केलेल्या राज्याची सत्ता जर त्या भागांतील तरतुदी नसत्या तर जो कायदा करण्यास किंवा कार्यकारी उपाय योजण्यास समर्थ झालें असेंत तो कायदा करण्यास किंवा कार्यकारी उपाय योजण्यास कलम १९ मध्यें दिलेल्या कशानेंहि निर्बंधित होणार नाहीं. पण अशा प्रकारें केलेला कोणताहि कायदा, जाहीरनामा संपतांच, तो जाहीरनामा संपण्यापूर्वी केलेल्या गोष्टी किंवा करावयाच्या वगळलेल्या गोष्टींशिवाय त्या असमर्थतेपुरता अमलांत राहणार नाहीं.

३५९. (१) जेथें आणीबाणीचा जाहीरनामा जारी आहे तेथें राष्ट्रपति, जोंपर्यंत जाहीरनामा जारी आहे, तोंपर्यंत किंवा तो आपल्या हुकुमांत सांगेल त्या कमी मुदतीपर्यंत, हुकूम काढून जाहीर करूं शकेल कीं, भाग ३ मध्यें दिलेल्या व हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या त्या त्या हक्कांच्या अंमलबजावणीकरतां न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क आणि कोठल्याहि न्यायालयांत अशा हक्कांच्या अंमलबजावणीकरतां चालूं असलेलें कामकाज, स्थगित राहील.

(२) वरीलप्रमाणें काढलेला हुकूम भारताच्या साऱ्या किंवा एका भागाला लागू होऊं शकेल.

(३) उपकलम (१) प्रमाणें काढलेला प्रत्येक हुकुम, तो हुकुम काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवला जाईल.

३६०. (१) जर राष्ट्रपतीची खात्री झाली कीं, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, जीमुळें भारताचें किंवा त्यांतील एका भागाचें

आर्थिक स्थैर्य किंवा पत धोक्यांत आहे, तर तो त्या अर्थाचा जाहीरनामा काढून घोषणा करूं शकेल :

(२) ३५२ कलमाखालीं काढलेल्या आणीबाणीच्या जाहीरनाम्याला जशा ३५२ (२) कलमांतील तरतुदी लागू आहेत, तशाच त्या या कलमाखालीं काढलेल्या जाहीरनाम्यालाहि लागू होतील.

(३) उपकलम (१) मध्यें सांगितलेला जाहीरनामा जारी असेपर्यंत संघाची कार्यकारी सत्ता आपल्या आदेशांत निर्दिष्ट करील तीं अर्थविषयक शास्त्राचीं तत्त्वें पाळण्यासंबंधीं कोणत्याहि राज्याला आदेश देईल आणि राष्ट्रपतीला त्याकरतां जरूर व पुरेसे वाटतील असे दुसरेहि आदेश कार्यकारी सत्ता राज्याला देईल.

(४) या घटनेंत घटनेंत कांहींहि असलें तरी--

(अ) तशा त्या आदेशांत--

(१) राज्याच्या कारभारांत नोकरी करीत असणाऱ्या सर्व किंवा कांहीं वर्गांच्या इसमांचे पगार आणि भत्ते कमी करण्याच्या जरुरीसंबंधीची तरतूद असूं शकेल; (२) कलम २०७ मधील तरतुदी ज्यांना लागू आहेत अशीं सर्व पैशासंबंधीं किंवा अन्य बिलें कायदेमंडळाकडून पास झाल्यावर राष्ट्रपतीच्या विचाराकरतां राखून ठेवण्याच्या तरतुदीचा त्यांत समावेश होईल;

(ब) या कलमाखालीं काढलेलो जाहीरनामा जारी असेपर्यंत राष्ट्रपतीला उच्चतम न्यायालयांतल्या आणि उच्च न्यायालयांतल्या न्यायाधीशासह, संघाच्या कारभारांत नोकरी करीत असणाऱ्या सर्व वर्गांच्या किंवा एका वर्गाच्या इसमांचे पगार व भत्ते कमी करावेत अशासंबंधीं आदेश देण्याचा अधिकार असेल.

३६१. (१) आपल्या पदासंबंधीं अधिकार चालविण्याबद्दल आणि कर्तव्यें करण्याबद्दल आणि ते अधिकार आणि कर्तव्यें चालवीत असतांना आणि करीत असतांना त्यांनीं केलेल्या किंवा करावयाचा हेतू असलेल्या एखाद्या कृत्याबद्दल, राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांना न्यायालयापुढें जाब द्यावा लागणार नाहीं :

मात्र कलम ६१ प्रमाणें लादलेल्या आरोपांच्या चौकशीकरतां पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहानें नेमलेल्या किंवा योजिलेल्या कोणत्याहि न्यायालया-कडून किंवा समितीकडून किंवा मंडळाकडून राष्ट्रपतीच्या वर्तनाची तपासणी होऊं शकेल :

त्याचप्रमाणें या कलमाचा असा अर्थ केला जाणार नाहीं कीं, एखाद्या व्यक्तीला भारत सरकारविरुद्ध किंवा राज्याच्या सरकारविरुद्ध योग्य दावे आणण्याचा जो हक्क आहे तो मर्यादित होत आहे.

(२) जोपर्यंत राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख आपापल्या पदांवर आहेत तोंपर्यंत त्यांच्याविरुद्ध कोणत्याहि न्यायालयांत कोठलेंहि फौजदारी काम दाखल होणार नाहीं किंवा चालू राहणार नाहीं.

(३) राष्ट्रपति, राज्यपाल किंवा राजप्रमुख जोंवर अधिकारपदावर आहेत तोंवर कोणतेंहि न्यायालय त्यांच्या अटकेचा किंवा बंदीचा हुकूम काढणार नाहीं.

(४) राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख ह्यांनीं आपापल्या पदावर येण्यापूर्वी अगर नंतर वैयक्तिक नात्यानें केलेल्या किंवा करावयाचा उद्देश असलेल्या एखाद्या कृत्याबद्दल, दाद मागितली असेल तर त्यांच्या-विरुद्ध कोणत्याहि न्यायालयांत ते जोंपर्यंत आपल्या पदावर आहेत तोंपर्यंत दिवाणी दाव्याचें स्वरूप, त्याचें कारण आणि जो पक्षकार तो दावा आणीत असेल त्या पक्षकाराचें नांव, वर्णन, राहण्याचें ठिकाण आणि त्यांनीं मागित-लेली दाद यासंबंधीं राष्ट्रपति किंवा राज्यपाल किंवा राजप्रमुख यांना लेखी नोटीस दिल्याला किंवा ती नोटीस त्यांच्या कचेरींत दाखल केल्याला दोन महिने संपून गेल्याशिवाय दिवाणी दावा आणतां येणार नाहीं.

३६२. हिंदुस्थानच्या संस्थानिकांचे वैयक्तिक हक्क, खास अधिकार आणि मानमरातब यासंबंधीं, कलम २९१ (१) प्रमाणें जे करार किंवा करारनामे झाले असतील त्याप्रमाणें द्यावयाची ग्वाही व आश्वासनें यांकडे पार्लमेंट किंवा कायदेमंडळ आपली कायदे करण्याची सत्ता वापरतांना किंवा संघ किंवा राज्य आपली कार्यकारी सत्ता वापरतांना, योग्य तें लक्ष देईल.

३६३. (१) या घटनेंत कांहींहि असलें तरी, पण १४३ कलमांतील तरतुदींना अनुसरून, ज्यांत वसाहत सरकार किंवा त्यांच्या अगोदरचें सरकार पक्षकार होतें किंवा आहे आणि जे ही घटना सुरू झाल्यानंतर अमलांत ठेवले गेले आहेत असे तह, करार, करारनामे, सनदा किंवा दुसरे तसले लेख जे कोणत्याहि हिंदी संस्थानिकानें या घटनेच्या सुरुवातीपूर्वी केले असतील किंवा त्यांची अंमलबजावणी केली असेल त्यांतील एखाद्या तरतुदी-संबंधीं किंवा असे तह, करार, करारनामे, सनदा, किंवा इतर लेख यांच्या-संबंधीं या घटनेंत असलेल्या तरतुदींवरून निर्माण होणाऱ्या हक्कांसंबंधीं, किंवा उत्पन्न होणाऱ्या जबाबदाऱ्या किंवा कर्तव्यांसंबंधीं तंटा उपस्थित झाल्यास त्यांत उच्चतम न्यायालय किंवा दुसरें कोणतेंहि न्यायालय यांना अधिकारक्षेत्र नसेल.

(२) या कलमांत—

(अ) ' हिंदी संस्थानें ' याचा अर्थ ही घटना सुरू होण्यापूर्वी ब्रिटिश सरकारनें किंवा हिंदुस्थान वसाहत सरकारनें अशा संस्थानचा मान्य केलेला कोणताहि प्रदेश; (ब) ' संस्थानिक ' याचा अर्थ ही घटना सुरू होण्या-पूर्वी ब्रिटिश सरकारनें किंवा वसाहत सरकारनें त्या संस्थानचा अधिपति म्हणून मानलेला कोणताहि प्रिन्स, चीफ किंवा दुसरी व्यक्ति.

३६४. (१) या घटनेंत कांहींहि असलें तरी राष्ट्रपति जाहीरनाम्यांत निर्दिष्ट करील त्या तारखेपासून—

(अ) पार्लमेंट किंवा कायदेमंडळानें केलेला कोणताहि कायदा प्रमुख बंदराला किंवा विमानतळाला लागू होणार नाहीं किंवा ते त्या जाहीरनाम्यांत निर्दिष्ट करतील त्या अपवादासह किंवा दुरुस्त्यांसह त्यांना लागू होईल असें सांगूं शकेल; किंवा (ब) एखाद्या प्रमुख बंदराला किंवा विमानतळाला

त्या तारखेपूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या वगळलेल्या गोष्टींव्यतिरिक्त, विद्यमान कायदा लागू होणार नाहीं असा तो आदेश देईल किंवा त्या आदेशांत निर्दिष्ट केलेल्या अपवादांसह, किंवा त्या दुरुस्त्यांसह तशा बंदराला किंवा विमानतळाला तो लागू होईल असा आदेश देईल.

(२) या कलमांत—

(अ) ' प्रमुख बंदर ' याचा अर्थ पार्लमेंटनें केलेल्या कोणत्याहि कायद्यानें किंवा कायद्याखालीं किंवा विद्यमान कायद्याखालीं प्रमुख बंदर ठरवलें असेल तें; आणि त्यांत त्या बंदराच्या मर्यादेंत तात्पुरत्या अंतर्भूत केलेल्या सर्व क्षेत्राचा समावेश होतो; (ब) विमानतळ म्हणजे विमानमार्ग, विमानें आणि विमानवाहतुक यांच्यासंबंधीं केलेल्या कायद्यांत व्याख्या केलेले विमानतळ.

३६५. या घटनेंतील कोणत्याहि कलमाखालीं संघानें कार्यकारी सत्तेचा अंमल करतांना जे आदेश दिले असतील ते जर एखाद्या राज्यानें पाळले नाहींत किंवा ते अमलांत आणले नाहींत तर, त्या राज्याचें सरकार या घटनेच्या तजविजींप्रमाणें चालवतां न येणारी परिस्थिति तेथें निर्माण झाली आहे असें राष्ट्रपति कायदेशीरपणानें गृहीत धरून चालू शकेल.

३६६. या घटनेंत, संदर्भावरून अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास, पुढील शब्दांचे अर्थ, येथें जे दिले आहेत ते, मानले जातील:—

(१) ' शेतीचें उत्पन्न ' म्हणजे भारतीय प्राप्तीकराच्या कायद्यांत शेतीउत्पन्नाची जी व्याख्या केली आहे तें; (२) अँग्लो-इंडियन म्हणजे ती व्यक्ति कीं, ज्या व्यक्तीचा बाप किंवा इतर कोणताहि पुरुषपूर्वज युरोपियन वंशाचा होता, किंवा आहे; पण जो भारताचा रहिवासी झाला आहे आणि जो हिंदुस्थानांत तात्पुरत्या स्थायिक झालेल्या नव्हे पण कायम राहत असणाऱ्या आईबापांच्या पोटीं हिंदुस्थानांत जन्मला आहे अगर होता; (३) ' कलम ' म्हणजे या घटनेचें कलम; (४) ' उसनें घेणें ' (Borrow) यांत वार्षिक ग्रॅट्सनीं पैसा उभारणें अंतर्भूत होतें. कर्ज (Loan)चाहि अर्थ तसाच लावावयाचा; (५) उपकलम (Clause) म्हणजे कलमांत येणारें उपकलम; (६) कॉर्पोरेशन कर (संस्था कर) म्हणजे

कंपन्यांकडून उत्पन्नावर दिला जाणारा कोणताहि कर व ज्यांत पुढील अटी पुऱ्या केल्या जातात असा कर:—

(अ) तो शेतीच्या उत्पन्नावर आकारला जाणारा नाहीं; (ब) कंपन्यांकडून जो कर दिला जातो, त्यांत त्या कराला लागू होणाऱ्या कायद्यान्वयें कंपन्यांकडून व्यक्तीला वांटल्या जाणाऱ्या नफ्यांत कपात करण्याचा अधिकार नसलेला कर; (क) ज्या व्यक्तींना हा नफा मिळतो त्याचें प्राप्तिकराकरतां एकूण उत्पन्न काढतांना हा कर विचारांत घेण्याची त्यांत तरतूद नसली पाहिजे, किंवा अशा व्यक्तीकडून दिला जाणारा प्राप्तिकर किंवा त्याला परत मिळणारी जी या करांतील रक्कम असेल तींत हा नफा विचारांत न घेण्याची तरतूद असली पाहिजे.

(७) ' कॉरस्पॉंडिंग प्रॉव्हिन्स ' किंवा ' कॉरस्पॉंडिंग इंडियन स्टेट ' किंवा ' कॉरस्पॉंडिंग स्टेट ' कोणतें याबद्दल शंका उत्पन्न झाल्यास राष्ट्रपति त्या विशिष्ट प्रश्नाकरतां ठरवील तो; (८) ' देणें ' यांत वार्षिक हप्त्यानें भांडवल फेडण्याची जी देणीं देण्याची जबाबदारी असते तिचा आणि हवाल्याकरतां द्यावयाच्या देण्याचा अंतर्भाव होतो. ' देण्याच्या बोजा'चा वरील व्याख्येच्या अनुरोधानें अर्थ केला जाईल; (९) ' संपत्ती कर ' म्हणजे मृत्यूनंतर जी मिळकत कायद्याप्रमाणें (दुसऱ्याकडे) जाते किंवा जाते असें समजलें जातें, अशासंबंधीं पार्लमेंटनें किंवा कायदेमंडळानें कायद्यान्वयें किंवा कायद्याखालीं ठरविलेल्या नियमांनुसार संपत्तीच्या मूळ किंमतीवरून निश्चित केलेला किंवा बसविलेला कर; (१०) ' विद्यमान कायदा ' म्हणजे जो ही घटना सुरू होण्यापूर्वी ज्यांना हा कायदा करण्याचा अधिकार आहे अशा कोणत्याहि कायदेमंडळानें, शासनसंस्थेनें किंवा व्यक्तीनें पास केलेला किंवा केलेला कायदा, वटहुकूम, हुकूम, पोट-कायदा, नियम वगैरे; (११) ' फेडरल कोर्ट ' म्हणजे १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें स्थापित झालेलें फेडरल कोर्ट; (१२) ' माल ' यांत सर्व सामान, पदार्थ व वस्तु यांचा समावेश होतो; (१३) ' ग्वाही ' यांत ही घटना सुरू होण्यापूर्वी जर एखाद्या धंद्यांतल्या नफ्यांत ठराविक रकमेपेक्षां कमी रक्कम आली तर द्यावयाच्या पैशासंबंधीं घेतलेली जबाबदारी समाविष्ट होते;

(१४) ' उच्च न्यायालय ' म्हणजे या घटनेपुरते कोणत्याहि राज्यांतलें समजलें गेलेलें उच्च न्यायालय, आणि त्यांत—

(अ) या घटनेप्रमाणें उच्च न्यायालय म्हणून स्थापिलेलें किंवा पुनः स्थापिलेलें भारतांतल्या कोणत्याहि विभागांतलें, उच्च न्यायालय येतें; आणि (ब) या घटनेच्या सर्व किंवा कांहीं उद्दिष्टांकरतां भारतांतल्या कोणत्याहि विभागांतले ज्याला पार्लमेंट कायद्यानें उच्च न्यायालय ठरवूं शकेल त्या न्यायालयाचा समावेश होतो.

(१५) ' हिंदी संस्थान ' म्हणजे ज्या प्रदेशाला हिंदुस्थानच्या वसाहत सरकारनें असें संस्थान म्हणून मान्यता दिली असेल तें; (१६) ' भाग ' म्हणजे या घटनेचा भाग; (१७) ' पेन्शन ' म्हणजे ज्यांत रक्कम भरावयाची असो किंवा नसो, जी एकाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तीसंबंधीं द्यावयाची असते ती. तींत अशा रीतीनें द्यावयाच्या निवृत्तीवेतनाचा, ग्रॅच्युइटीच्या आणि परत देण्यादाखल जी रक्कम किंवा ज्या रकमा, व्याजासह किंवा व्याजाशिवाय किंवा प्रॉव्हिडंट फंडांत भरलेल्या वर्गणीच्या झालेल्या भरीसह होतील, याचा समावेश होऊं शकेल; (१८) ' आणीबाणीचा जाहीरनामा ' म्हणजे जो कलम ३५२, उपकलम (१) प्रमाणें काढला असेल तो; (१९) ' जाहीरनामा ' म्हणजे भारताच्या गॅझेटांत किंवा राज्याच्या सरकारी गॅझेटांत केलेलें जाहीर निवेदन; (२०) रेल्वेमध्यें—

(अ) नगरपालिकेच्या हद्दींत सर्वस्वी असलेल्या ट्रॅमवेचा अंतर्भाव होत नाहीं; किंवा (ब) पार्लमेंटनें जी रेल्वे नाहीं असें कायद्यानें जाहीर केलें असेल आणि जी सर्वस्वीं एका राज्यांत असेल अशी दळणवळणाची दुसरी लाईन, हिचाही अंतर्भाव होत नाहीं.

(२१) राजप्रमुख म्हणजे—

(अ) हैदराबाद राज्यासंबंधीं बोलावयाचें झाल्यास जी व्यक्ति राष्ट्रपतीनें तात्पुरती हैदराबादची निझाम म्हणून मान्य केली आहे ती; (ब) जम्मू व काश्मीर राज्यासंबंधीं किंवा म्हैसूर राज्यासंबंधीं बोलावयाचें झाल्यास जी व्यक्ति राष्ट्रपतीनें तात्पुरती त्या राज्याचे महाराज म्हणून मान्य केली आहे ती; (क) परिशिष्ट १, भाग ब मध्यें नमूद केलेल्या दुसऱ्या एखाद्या राज्या-

संबंधीं बोलावयाचें झाल्यास ज्या व्यक्तीला राष्ट्रपतीनें तात्पुरती राजप्रमुख म्हणून मान्यता दिली असेल ती.

वरील राज्यांत ज्या व्यक्तीला राष्ट्रपतीनें राजप्रमुखाची सत्ता चालविण्यासं तात्पुरतें लायक ठरविले असेल त्याहि व्यक्तीचा समावेश होतो. (२२) हिंदी संस्थानचा अधिपति म्हणजे ज्या प्रिन्सनें, चीफनें किंवा दुसऱ्या व्यक्तीनें कलम २९१, उपकलम (१) मध्यें उल्लेखिलेला करार वगैरे केला असेल आणि ज्याला राष्ट्रपतीनें त्या संस्थानचा अधिपति म्हणून तात्पुरती मान्यता दिली असेल तो. त्यांत राष्ट्रपतीनें त्या अधिपतीचा वारसदार म्हणून तात्पुरती मान्यता दिलेली व्यक्तीहि समाविष्ट होते; (२३) ' परिशिष्ट ' म्हणजे या घटनेचें परिशिष्ट; (२४) ' शेडयूल्ड् कास्ट्स् ' (अनुसूचित जाती) म्हणजे ज्या जाती, वंश, किंवा जनजाती किंवा ज्या जाती, वंश किंवा जनजातींतील भाग किंवा पोटविभाग हे कलम ३४१ च्या-प्रमाणें या घटनेच्या उद्दिष्टांकरतां अनुसूचित जाती म्हणून आहेत त्या; (२५) " शेडयूल्ड ट्राइब्स " (अनुसूचित जनजाति) म्हणजे त्या जनजाति किंवा जनजाती समाज, किंवा त्यांतील विभाग किंवा पोटविभाग हे कलम ३४२ प्रमाणें या घटनेच्या उद्दिष्टाकरतां अनुसूचित जनजाति म्हणून आहेत त्या; (२६) सिक्युरिटीज् यांत स्टॉक्स् (रोखे) येतात; (२७) ' पोटकलम ' म्हणजे उपकलमाचें पोटकलम; (२८) ' करभार ' यांत सर्वसाधारण किंवा स्थानिक किंवा खास कर किंवा दस्त हे येतात; आणि कराचा तसा अर्थ केला जाईल; (२९) ' प्राप्तीवरील कर ' यांत जादा नफ्यावरील करासारखा कर येतो; (३०) " उप-राजप्रमुख " याचा परिशिष्ट १, भाग ब मधील राज्याच्या दृष्टीनें अर्थ करावयाचा म्हणजे ज्याला राष्ट्रपतीनें त्या राज्याचा उपराजप्रमुख म्हणून तात्पुरती मान्यता दिली असेल तो.

३६७. (१) संदर्भाला अन्य आवश्यकता नसल्यास, १८९७ चा जनरल क्लॉजेस ॲक्ट हा त्यांत ३७२ कलमान्वयें केलेल्या फेरफार व दुरुस्त्यांसह तो जसा हिंदुस्थान वसाहत कायदेमंडळाच्या कायद्याच्या अर्थ-प्रतिपादनाला लागू होतो, तसाच या घटनेचा अर्थ लावण्यालाहि लागू होईल.

(२) या घटनेमध्यें पार्लमेंटनें किंवा परिशिष्ट १, भाग अ किंवा ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या कायदेमंडळानें केलेले किंवा त्याचे असलेले कायदे अगर कानू यांचा जेथें उल्लेख असेल तेथें त्यांत राष्ट्रपतीनें किंवा राज्यपालानें किंवा राजप्रमुखानें काढलेल्या वटहुकूमाचाहि उल्लेख आहे असें समजलें जाईल.

(३) या घटनेकरतां ' परकें राज्य ' म्हणजे भारताशिवाय इतर राज्य :

मात्र, पार्लमेंटनें केलेल्या कायद्याला अनुसरून, राष्ट्रपति हुकूम काढून त्या हुकमांत निर्दिष्ट करील त्या कामांकरतां, एखादें राज्य परकें राज्य नाहीं असें सांगूं शकेल.

भाग २० घटनादुरुस्ती

३६८. या घटनेच्या दुरुस्तीचें काम, पार्लमेंटच्या कोणत्याहि सभागृहांत त्याकरतां बिल आणूनच सुरू करतां येईल आणि जेव्हां तें बिल त्या सभागृहांतील एकूण सभासद संख्येच्या बहुमतानें आणि हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासद संख्येच्या दोन-तृतीयांश बहुमतानें पास होईल, तेव्हां तें राष्ट्रपतीकडे संमतीकरतां पाठविलें जाईल आणि त्या बिलाला संमति मिळाल्यावर त्या बिलाबरहुकूम ही घटना दुरुस्त होईल :

पण जर या दुरुस्तीला पुढील बाबतींत बदल करावयाचे असतील—

(अ) कलम ५४, ५५, ७३, १६२ किंवा २४१; किंवा (ब) भाग ५, प्रकरण ४, भाग ६, प्रकरण ५, किंवा भाग ११ प्रकरण १; किंवा (क) सातव्या परिशिष्टांतील कोणतीहि सूचि; किंवा (ड) पार्लमेंटांत राज्यांचें प्रतिनिधित्व; किंवा (इ) या कलमांतील तरतुदी,

तर ती दुरुस्ती परिशिष्ट १, भाग अ आणि ब मध्यें दिलेल्या निम्यापेक्षां कमी नसलेल्या राज्यांच्या कायदेमंडळांकडूनहि राष्ट्रपतीकडे संमतीकरतां धाडण्यापूर्वी ठरावानें मंजूर केलेली असली पाहिजे.

३६९. या घटनेंत कांहींहि असलें तरी पार्लमेंटला ही घटना सुरू झाल्यापासून पांच वर्षांपर्यंत खालील बाबींसंबंधीं, त्या जणूं समानसूचींत आहेत असें समजून, कायदे करण्याची सत्ता असेल—

(अ) कापूस आणि लोकर यांचें कापड, कच्चा कापूस (सरकी काढलेला आणि सरकी न काढलेला किंवा कपास धरून) सरकी, कागद (वृत्तपत्र कागदासह), खाद्यपदार्थ, (खाद्य, गळित, वस्तू व तेल धरून), गुरांची दाणावैरण, (तेलाची पेंड व इतर पेंड धरून), कोळसा, (कोक आणि कोळशापासूनचे पदार्थ धरून), लोखंड, पोलाद आणि अभ्रक यांचा राज्यांत व्यापार आणि धंदा करणें आणि त्याचें उत्पादन, पुरवठा आणि वांटणी करणें; (ब) उपकलम (अ) मध्यें दिलेल्या बाबींसंबंधीं केलेल्या कायद्याविरुद्ध गुन्हे, त्यांपैकीं एखाद्या बाबींत उच्चतम न्यायालयाखेरीज अन्य न्यायालयांचें अधिकारक्षेत्र व सत्ता आणि न्यायालयांत घेतलेल्या फीशिवाय त्या बाबींसंबंधीं अन्य फी; पण या कलमांतील तरतुदी नसत्या तर पार्लमेंटला जी कायदा करण्याची सत्ता नसती, असा पार्लमेंटनें केलेला कायदा, त्या नसलेल्या सत्तेपुरता, ती मुदत संपतांच, रद्द होईल; मात्र ती मुदत संपण्यापूर्वीं ज्या गोष्टी केल्या असतील किंवा करावयाच्या वगळल्या असतील त्याला हें लागू नाहीं.

३७०. (१) या घटनेंत कांहींहि असलें तरी—

(अ) कलम २३८ मधील तरतुदी जम्मू व काश्मीर संस्थानला लागू होणार नाहींत; (ब) त्या संस्थानांकरतां पार्लमेंटनें करावयाच्या कायद्याची सत्ता पुढीलप्रमाणें मर्यादित होईल.

(१) ज्या सामीलनाम्याप्रमाणें तें संस्थान हिंदुस्थानच्या वसाहतींत सामील झालें, त्यांत निर्दिष्ट केलेल्या ज्या बाबींसंबंधीं वसाहत कायदेमंडळ त्या संस्थानाला अनुलक्षून कायदे करूं शकेल, त्या बाबींशीं संघ व समानसूचींतल्या ज्या बाबी संस्थान सरकारच्या सल्ल्यानें जुळत्या आहेत असें राष्ट्रपति सांगेल त्या; (२) उपरिनिर्दिष्ट याद्यांतील ज्या बाबी, राज्यसरकारच्या संमतीनें राष्ट्रपति हुकूम काढून निर्दिष्ट करील अशा.

खुलासा:—या कलमाकरतां संस्थान सरकार म्हणजे, तारीख ५ मार्च १९४८ रोजीं महाराजांनीं काढलेल्या जाहीरनाम्याप्रमाणें तात्पुरत्या अधिकारावर असलेल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानें चालणारी जी व्यक्ति काश्मीर व जम्मूचे महाराज म्हणून तात्पुरती राष्ट्रपतीनें मान्य केली असेल ती.

(क) कलम १ मधील आणि या कलमांतील तरतुदी त्या संस्थानाला लागू होतील; (ड) राष्ट्रपति हुकुमान्वयें निर्दिष्ट करील अशा अपवाद व दुरुस्त्या; ३ या घटनेच्या दुसऱ्या तजविजी त्या संस्थानाला लागू होतील :

मात्र पोटकलम (ब), परिच्छेद (१) मध्यें उल्लेखिलेल्या संस्थानच्या सामीलनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या बाबींना अनुलक्षून जर हुकूम काढावयाचा असेल तर राष्ट्रपतीला त्या संस्थानच्या सरकारच्या सल्ल्याशिवाय तो काढतां येणार नाहीं :

आणखी शिवाय, मागील पूर्वीच्या अपवादांत उल्लेखिलेल्या बाबींव्यतिरिक्त अन्य बाबींसंबंधीं तो हुकूम असेल तर तो त्या संस्थानी सरकारच्या संमतिशिवाय काढतां येणार नाहीं.

(२) उपकलम (१), पोटकलम (ब), परिच्छेद (२) मध्यें किंवा त्या उपकलमाच्या पोटकलम (ड) मधील दुसऱ्या अपवादामध्यें उल्लोखिलेली संमति, जर त्या संस्थानची घटना बनविणारी घटना परिषद बोलावण्यापूर्वी दिली गेली, तर ती संमति त्या परिषदेपुढें तिला योग्य वाटेल तो निकाल देण्याकरतां ठेवली जाईल.

(३) या कलमांत वर कांहींहि तरतुदी असल्या तरी राष्ट्रपति जाहीरनामा काढून त्यांत जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेपासून हें कलम रद्द होईल अगर फक्त अमुक अपवाद आणि दुरुस्त्यांसह तें अमलांत राहील असें घोषित करील :

मात्र राष्ट्रपतीकडून हा जाहीरनामा निघण्यापूर्वी उपकलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या घटना-परिषदेची शिफारस त्याला अवश्यक असेल.

३७१. या घटनेंत कांहींहि म्हटलें असलें तरी ही घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षेपर्यंत किंवा पार्लमेंट कायद्यानें जी त्यापेक्षां जवळची अगर लांबची मुदत एखाद्या राज्यासंबंधीं ठरवील तोंपर्यंत, परिशिष्ट १, भाग ब मध्यें

उल्लेखिलेल्या प्रत्येक राज्याचें सरकार सर्वसामान्यपणें राष्ट्रपतीच्या ताब्यांत असेल आणि तें राज्य राष्ट्रपतीनें वेळोवेळीं कांहीं विशिष्ट आदेश दिले तर ते मान्य करील :

मात्र राष्ट्रपति हुकुमांत निर्दिष्ट करील त्या एखाद्या राज्याला या कलमांतील तरतुदी लाग् नाहींत असें हुकूम काढून सांगूं शकेल.

३५२. (१) ३९५ कलमामध्यें दिलेले कायदे या घटनेनें रद्द झाले तरी, या घटनेच्या इतर कलमांप्रमाणें, ही घटना सुरू होण्यापूर्वी जो सर्व कायदा हिंदुस्थानांत जारी होता, तो योग्य अशा कायदेमंडळाकडून किंवा योग्य अशा शासनसंस्थेकडून रद्द होईपर्यंत किंवा बदलला जाईपर्यंत किंवा दुरुस्त होईपर्यंत अमलांत राहील.

(२) या घटनेंतील कलमांशीं, हिंदुस्थानांत जारी असलेल्या कायद्यांचीं कलमें जुळतीं करावीं म्हणून राष्ट्रपति हुकूम काढून त्या कायद्यांत जरूर किंवा युक्त वाटेल ते फेरफार किंवा जुळवाजुळव रद्द करण्याच्या किंवा दुरुस्तीच्या दृष्टीनें करूं शकेल आणि त्या हुकुमांत जी तारीख दिली असेल त्या तारखेपासून त्यानें केलेल्या जुळवाजुळवीसह किंवा फेरफारांसह त्या कायद्याचा अंमल होईल अशी त्या हुकुमांत तरतूद करील. अशा जुळवाजुळवीसंबंधीं किंवा फेरफारांसंबंधीं कोणत्याहि न्यायालयांत जाब विचारला जाणार नाहीं.

(३) उपकलम (२) मधील कशानेंही—

(अ) ही घटना अमलांत येऊन दोन वर्षें झाल्यावर राष्ट्रपतीला कोणत्याहि कायद्यांत जुळवाजुळव किंवा फेरफार करण्याचा अधिकार दिला आहे असें समजलें जाणार नाहीं; किंवा (ब) वरील कलमाप्रमाणें राष्ट्रपतीनें जुळवाजुळवी केलेला किंवा फेरफार केलेला कोणताहि कायदा योग्य अशा कायदे मंडळाला किंवा योग्य अशा अधिकृत संस्थेला रद्द अगर दुरुस्त करण्यास प्रतिबंध आहे असें समजलें जाणार नाहीं.

स्पष्टीकरण १.—' अमलांत असलेला कायदा ' यांत या कलमांत, ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानांतल्या कायदेमंडळानें किंवा योग्य त्या

अधिकृत संस्थेनें केलेला किंवा पास केलेला पण पूर्वी रद्द न केलेला कायदा येतो. तो कायदा किंवा त्यांतले भाग हे जरी अगदींच किंवा विशिष्ट विभागांत त्यावेळीं अमलांत नसले तरी, (त्याचा अंतर्भाव अमलांत असलेल्या कायद्यांत होईल.)

स्पष्टीकरण २.—हिंदुस्थानांतल्या कायदेमंडळानें किंवा दुसऱ्या योग्य त्या संस्थेनें पास केलेला किंवा केलेला कायदा हा जर ही घटना सुरू होण्यापूर्वीं बाह्य प्रदेशांना, व हिंदुस्थानांतल्या प्रदेशांनाहि लागू झालेला असेल तर तो वर म्हटल्याप्रमाणें त्यांत केलेल्या जुळवाजुळवी व फेरफारांसह बाह्य प्रदेशांना तसाच लागू होत राहील.

स्पष्टीकरण ३.—या कलमांतल्या कशाचाहि असा अर्थ केला जाणार नाहीं कीं, जो हंगामी कायदा असेल तो त्याच्या समाप्तीच्या ठरलेल्या मुदतीनंतर किंवा ही घटना अमलांत आली नसती तर जो त्या दिवशीं संपला असतां त्याच्यानंतर अमलांत राहील.

स्पष्टीकरण ४.—१९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील विभाग ८८ प्रमाणें प्रांताच्या गव्हर्नरनें काढलेला आणि ही घटना सुरू होण्यापूर्वी अमलांत असलेला वटहुकुम त्या प्रांताला अनुबद्ध असणाऱ्या राज्याच्या गव्हर्नरनें अगोदर परत घेतला नसेल तर कलम ३८२, उपकलम (१) प्रमाणें काम करीत असलेल्या विधान सभेची पहिली बैठक सुरू झाल्यानंतर सहा आठवडे संपतांच अमलांत राहणार नाहीं; आणि या कलमांतील कशाचाहि अर्थ तो वटहुकूम त्या मुदतीनंतर चालू ठेवला जाईल, असा केला जाणार नाहीं.

३५३. कलम २२, उपकलम (७) प्रमाणें पार्लमेंट तजवीज करीपर्यंत किंवा ही घटना सुरू होऊन एक वर्ष उलटेपर्यंत, यापैकीं जें लवकर होईल तोंपर्यंत, तें कलम, त्यांतल्या उपकलमें (४) आणि (७) मध्यें जेथें पार्लमेंटचा कोणताहि उल्लेख असेल तेथें जणूं काय राष्ट्रपतीचा उल्लेख केला आहे असे शब्द घालून आणि त्या उपकलमांत जेथें पार्लमेंटनें केलेल्या कोणत्याहि कायद्याचा कोणताहि उल्लेख असेल तेथें जणू काय राष्ट्रपतीनें काढलेल्या हुकुमाचा उल्लेख केला आहे असे शब्द घालून, अमलांत राहील.

३७४. (१) ही घटना सुरू होण्यापूर्वी फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशाच्या हुद्द्यावर असलेले न्यायाधीश, त्यांची अन्यथा इच्छा नसल्यास ही घटना सुरू होतांच उच्चतम न्यायालयाचें न्यायाधीश होतील आणि नंतर कलम १२५ मध्यें उच्चतम न्यायालयाच्या न्यायाधिशांचे जे पगार, भत्ते आणि रजा आणि पेन्शनचे जे हक्क सांगितले आहेत ते त्यांना मिळतील.

(२) ह्या घटनेच्या सुरवातीला फेडरल कोर्टांत असलेले सर्व दिवाणी व फौजदारी दावे, अपिलें आणि कामकाज उच्चतम न्यायालयाकडे पाठविले जातील आणि त्या न्यायालयाला ते ऐकण्याचा आणि त्यांचा निकाल करण्याचा अधिकार राहील; आणि फेडरल कोर्टांनें या घटनेच्या सुरुवातीपूर्वी दिलेले निकाल आणि काढलेले हुकूम ते जणू काय उच्चतम न्यायालयानें दिलेले किंवा काढलेले निकाल किंवा हुकूम आहेत असें समजून त्या निकाल किंवा हुकमाइतकेच प्रभावी व परिणामकारक असतील.

(३) " हिज् मॅजेस्टी इन् कौन्सिल " यांना हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि कोर्टाकडून येणारीं अपिलें आणि अर्ज आणि कोर्टाचे निकाल, हुकुमनामे किंवा हुकुम यासंबंधीं निकाल देण्याचे अधिकार, त्यांना हे सत्ताधिकार चालविण्यास कायद्यानें ज्या मर्यादेंत अधिकार दिला असेल त्या मर्यादेंत, या घटनेनें गैरकायदा ठरणार नाहींत, आणि बादशहांचे (इन् कौन्सिल) त्या अपिलांवरील किंवा अर्जांवरील ही घटना सुरू झाल्यानंतरचे हुकूम हे जणू काय या घटनेनें दिलेल्या सत्ताधिकाराची बजावणी करणाऱ्या उच्चतम न्यायालयाचे हुकुमनामे किंवा हुकुम आहेत अशा रीतीनें प्रभावी होतील.

(४) पहिल्या परिशिष्टांत भाग (ब) मध्यें दिलेल्या राज्यामध्यें प्रीव्ही कौंसिल म्हणून काम करीत असलेल्या अधिकृत संस्थेचें, ही घटना सुरू होणाऱ्या दिवशीं व त्यानंतर त्या राज्यांतील कोर्टाकडून आलेलीं अपिलें, अर्ज, निकाल, हुकूमनामा किंवा हुकूम स्वीकारण्यासंबंधींचे व निकाल करण्यासंबंधीचें अधिकारक्षेत्र संपेल आणि त्यांच्यापुढें घटनेच्या सुरुवातीला चालू असलेलीं सर्व अपिलें व इतर कामकाज उच्चतम न्यायालयाकडे पाठविलें जाईल, व त्या कोर्टाकडून त्यांचा निकाल लावला जाईल.

(५) या कलमांतील तरतुदी अमलांत आणण्याकरतां पार्लमेंटकडून कायद्यानें आणखी तजवीज होऊं शकेल.

३७५. अखिल भारतांतील सर्व दिवाणी फौजदारी आणि जमनिमहसुलाची अधिकारसत्ता असणारीं कोर्टें, न्याय, अंमलबजावणी आणि सचीव खात्यांतील सर्व अधिकारी आणि पदाधिकारी या घटनेंतील तजविजींना अनुसरून आपापलीं कामें करीत राहतील.

३७६. (१) कलम २१७, उपकलम (२) मध्यें कांहींहि असलें तरी, या घटनेपूर्वी कोणत्याहि प्रांतांतील उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या जागेवर असणारे न्यायाधीश यांची अन्यथा इच्छा नसल्यास, ही घटना सुरू होतांच अनुबद्ध राज्यांतील उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होतील आणि नंतर ते कलम २२१ मध्यें केलेल्या तजविजीप्रमाणें पगार, भत्ते, रजा, पेन्शन्स्च्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या हक्कांचे हकदार होतील.

(२) ही घटना सुरू होण्यापूर्वी परिशिष्ट १, भाग ब मधील राज्यांशीं अनुबद्ध असलेल्या हिंदी संस्थानांतल्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावर असलेले न्यायाधीश, त्यांची अन्यथा इच्छा नसल्यास, ही घटना सुरू होतांच तशा निर्दिष्ट राज्यांतल्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होतील, आणि ते कलम २१७ उपकलम (१) व (२) मध्यें कांहींहि असलें तरी त्या कलमाच्या उपकलम (१) ला दिलेल्या शर्तींनुसार, राष्ट्रपति हुकुमानें ठरवील ती मुदत संपेपर्यंत अधिकारी राहतील.

(३) या कलमांत असलेल्या ' न्यायाधीश ' शब्दांत ॲक्टिंग किंवा ॲडिशनल जज्ज येत नाहीं.

३७७. ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वीं जो हिंदुस्थानचा ऑडिटर जनरल म्हणून होता तो त्याची अन्यथा इच्छा नसल्यास भारताचा कॉम्ट्रोलर आणि ऑडिटर जनरल होईल आणि त्यानंतर त्याला कलम १४८ (३) मधील त्या अधिकाऱ्याला जे पगार आणि जे रजा-पेन्शनचे हक्क सांगितले आहेत ते मिळण्याचा त्याला हक्क प्राप्त होईल, आणि ही घटना सुरू होण्यापूर्वी त्याला लागू असणाऱ्या तरतुदींत ठरलेल्या त्याच्या जागेच्या संपणाऱ्या मुदतीपर्यंत त्या जागेवर राहण्याचा त्याला हक्क प्राप्त होईल.

३७८. (१) जे या घटनेपूर्वी हिंदुस्थानच्या वसाहत सरकारच्या सरकारी नोकर नेमणूक मंडळाचे सभासद होते, ते त्यांची अन्यथा इच्छा

नसल्यास, या घटनेपासून संघाच्या नोकर नेमणुक मंडळाचे सभासद होतील आणि कलम ३१६, उपकलम (१) व (२) मध्यें कांहींहि असलें तरी त्या कलमांतील उपकलम (२) च्या शर्तींनुसार अशा सभासदांना घटनेपूर्वी लागू असणाऱ्या नियमांत ठरविल्याप्रमाणें त्यांच्या जागेची मुदत संपेपर्यंत अधिकारावर राहतील.

(२) ही घटना सुरू होण्यापूर्वी प्रांताच्या नोकर नेमणुक मंडळाचे सभासद किंवा प्रांतांच्या गटाकरतां काम करीत असलेले नोकर नेमणूक मंडळाचे सभासद, त्यांची अन्यथा इच्छा नसल्यास, ही घटना सुरू होतांच अनुबद्ध राज्याच्या नोकर नेमणुक मंडळाचे किंवा अनुबद्ध राज्यांचें काम करणाऱ्या संयुक्त नोकर नेमणुक मंडळाचे अनुक्रमें सभासद होतील, आणि कलम ३१६, उपकलम (१) आणि (२) मध्यें कांहींहि असलें तरी त्या कलमाचा उपकलम (२) मधील शर्तींनुसार अशा सभासदांना घटनेपूर्वी लागू असणाऱ्या नियमांत ठरविल्याप्रमाणें त्यांच्या जागेची मुदत संपेपर्यंत अधिकारावर राहतील.

३७९. (१) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांची रीतसर रचना होईपर्यंत आणि तीं सभागृहें या घटनेच्या कलमाप्रमाणें पहिल्या अधिवेशनाला बोलावली जाईपर्यंत, ह्या घटनेपूर्वी जें मंडळ हिंदुस्थान वसाहतीची घटना परिषद म्हणून काम करीत होतें, तें तात्पुरतें पार्लमेंट म्हणून होईल आणि पार्लमेंटला या घटनेंतल्या कलमांनीं दिलेली सर्व सत्ता बजावतील व सर्व कामें करतील.

स्पष्टीकरण:—या उपकलमाच्या उद्दिष्टांकरतां, हिंदुस्थान वसाहतीच्या घटना-परिषदेंत पुढील सभासदांचा अंतर्भाव होतो—

(१) कोणत्याहि राज्याचे किंवा इतर प्रदेशांचें ज्यांना उपकलम (२) प्रमाणें प्रतिनिधित्व दिलें आहे ते सभासद, आणि (२) त्या परिषदेंत प्रासंगिक रिकाम्या झालेल्या जागांवर निवडलेले सभासद.

(२) राष्ट्रपति नियमानें पुढील तजविजी करूं शकेल—

(अ) उपकलम (१) प्रमाणें काम करणाऱ्या पार्लमेंटमध्यें, ह्या घटनेच्या पूर्वी वसाहत सरकारच्या घटना परिषदेंत प्रतिनिधित्व नसलेल्या राज्याला किंवा दुसऱ्या प्रदेशाला प्रतिनिधित्व देणें, (ब) तात्पुरत्या पार्ल-

मेंटमध्यें हे राज्याचे किंवा इतर प्रदेशाचे प्रतिनिधि कसे निवडावयाचे, आणि (क) अशा प्रतिनिधींना कोणती लायकी असावयाची.

(३) हिंदुस्थान वसाहतीच्या घटना परिषदेचा एखादा सभासद जर ६ ऑक्टोबर १९४९ पूर्वी अगर ही घटना सुरू झाल्यानंतर कोणत्याहि वेळीं, गव्हर्नरच्या प्रांताच्या कायदेमंडळ सभागृहाचा किंवा परिशिष्ट १, भाग ब मधील राज्याशीं अनुबद्ध असलेल्या हिंदी संस्थानच्या कायदे-मंडळ सभागृहाचा सभासद असला किंवा अशा एखाद्या राज्याचा मंत्री असला तर, त्याची सभासदत्वाची जागा ही घटना सुरू होतांच त्याचें त्या सभागृहाचें सभासदत्व अगोदर संपलें नसल्यास रिकामी होईल आणि अशी प्रत्येक रिकामी जागा प्रासंगिक मानली जाईल.

(४) उपकलम (३) मध्यें सांगितलेली हिंदुस्थान वसाहतीच्या घटनापरिषदेंतली अशी एखादी जागा ही घटना सुरू होण्यापूर्वी त्या उपकलमा-प्रमाणें रिकामी झाली नसली तरी, ही घटना सुरू होण्यापूर्वी अशी जागा भरून काढण्याची व्यवस्था करतां येईल; पण अशा रीतीनें ही घटना सुरू होण्यापूर्वी निवडून आलेल्या व्यक्तीला ती जागा रिकामी होईपर्यंत त्या परिषदेंत स्थानापन्न होण्याचा अधिकार प्राप्त होणार नाहीं.

(५) जेव्हां १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें घटना परिषद ही वसाहत कायदेमंडळ म्हणून काम करीत होती तेव्हां तिचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून अधिकार धारण करणारी व्यक्ति, ह्या घटनेला सुरुवात झाल्यानंतर उपकलम (१) प्रमाणें काम करणाऱ्या तात्पुरत्या पार्लमेंटची अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष होईल.

३८० (१) भाग ५, प्रकरण १ मधील तजविजींनुसार राष्ट्रपति निवडला जाईपर्यंत, व तो अधिकारग्रहण करीपर्यंत जी व्यक्ति हिंदुस्थान वसाहतीच्या घटना परिषदेकडून त्याकरतां निवडली जाईल ती भारताची राष्ट्रपति होईल.

(२) हिंदुस्थान वसाहतीच्या घटना परिषदेकडून अशा प्रकारें निवडल्या गेलेल्या राष्ट्रपतीची जागा, मृत्यू, राजीनामा पदभ्रष्टता किंवा अन्य कारणानें रिकामी झाली तर ती जागा ३७९ कलमाप्रमाणें काम चालविणाऱ्या

तात्पुरत्या पार्लमेंटाकडून निवडणुकीनें भरून काढली जाईल आणि अशी निवडणूक होईपर्यंत भारताचा मुख्य न्यायाधीश राष्ट्रपति म्हणून काम करील.

३८१. राष्ट्रपति ह्या घटनेप्रमाणें आपल्या मंत्रिमंडळांत ज्याची नेमणुक करील ते त्या मंडळाचे सभासद होतील. आणि अशा नेमणुका होईपर्यंत ह्या घटनेच्या सुरुवातीला जे सभासद हिंदुस्थान वसाहतीचे मंत्रिपदावर होते ते सभासद त्या सुरुवातीनंतर या घटनेप्रमाणें राष्ट्रपतीच्या मंत्रिमंडळाचे सभासद होतील व अधिकारावर राहतील.

३८२. (१) परिशिष्ट १, भाग अ मधील प्रत्येक राज्याच्या कायदेमंडळाच्या सभागृहाची किंवा सभागृहांची रीतसर रचना झाली किंवा रचना झाल्या नाहींत आणि या घटनेप्रमाणें त्यांना पहिल्या अधिवेशनाकरतां पाचारण केलें नाहीं, तोंपर्यंत अनुबद्ध प्रांतांत या घटनेपूर्वी काम चालवीत असणारें सभागृह किंवा सभागृहें या घटनेच्या तजविजीनें तशा प्रत्येक राज्यांतील कायदेमंडळाच्या सभागृहाला किंवा सभागृहांना दिलेली सत्ता बजावतील आणि कामें करतील.

(२) उपकलम (१) मध्यें कांहींहि असलें तरी, जेथें एखाद्या प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची पुनर्रचना करण्याकरतां ह्या घटनेच्या सुरुवातीपूर्वी सार्वत्रिक निवडणुका करण्याचा हुकूम दिला असेल तेथें जणु काय ही घटना अमलांत आली नव्हती असें समजून ही घटना अमलांत आल्यानंतर निवडणुका पुऱ्या कराव्यात आणि अशा प्रकारें पुनर्रचना झालेली असेंब्ली ज्या प्रांताची लेजिस्लेटिव्ह असेंब्ली आहे असें त्या उपकलमाकरतां मानलें जाईल.

(३) ह्या घटनेपूर्वी जी व्यक्ति प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या अध्यक्ष (Speaker) किंवा उपाध्यक्षपदावर (Deputy Speaker) असेल किंवा जी व्यक्ति प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या सभापति (President) किंवा उपसभापतीच्या (Deputy President) जागेवर असेल, ती व्यक्ति घटनेनंतर त्या प्रांताशीं परिशिष्ट १, भाग अ मध्यें दिलेल्या अनुबद्ध राज्यांच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष

किंवा लेजिस्लेटिव्ह कौंसिलचा सभापति किंवा उपसभापति म्हणून, ती असेंब्ली किंवा कौन्सिल उपकलम (१) प्रमाणें चालत आहे तोंपर्यंत राहील :

मात्र, जेथें ही घटना सुरू होण्यापूर्वी प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची पुनर्रचना करण्याकरतां सार्वत्रिक निवडणुकींचा हुकूम दिला असेल आणि जेथें ही घटना सुरू झाल्यानंतर असेंब्लीचें पहिलें अधिवेशन भरेल, तेथें या उपकलमांतील तजविजी लागू होणार नाहींत. तसें तें पुनर्रचित सभागृह असेंब्लींतील दोन सभासदांची अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून निवड करील.

३८३. ह्या घटनेपूर्वी कोणत्याहि प्रांतांत जी व्यक्ति गव्हर्नरच्या जागेवर असेल ती व्यक्ति घटनेनंतर परिशिष्ट १ भाग अ मधील अनुबद्ध राज्याची, भाग ६, प्रकरण २ मधील तजविजींप्रमाणें नवा राज्यपाल नेमला जाईपर्यंत व तो अधिकारग्रहण करीपर्यंत, राज्यपाल होईल.

३८४. राज्याचा राज्यपाल ज्या व्यक्तींची राज्यपालाच्या मंत्रिमंडळाचे सभासद म्हणून त्याकरतां नेमणूक करील ते त्या मंडळाचे या घटनेप्रमाणें सभासद होतील आणि अशा नेमणुका केल्या जाईपर्यंत ज्या सर्व व्यक्ति घटनेपूर्वी राज्याच्या अनुबद्ध प्रांताच्या मंत्रिपदावर होत्या, त्या ही घटना सुरू होतांच या घटनेप्रमाणें राज्याच्या राज्यपालाच्या मंत्रिमंडळाचे सभासद होतील व त्या पदावर राहतील.

३८५. पहिल्या परिशिष्टांत भाग ब मध्यें निर्दिष्ट केलेल्या राज्याच्या कायदेमंडळाचें सभागृह किंवा सभागृहें ह्या घटनेच्या तरतुदीप्रमाणें रीतसर घडविलें किंवा घडवलीं जाईपर्यंत व तें किंवा ती पहिल्या अधिवेशनाकरितां बोलावली जाईपर्यंत जें मंडळ किंवा जी शासनसंस्था ही घटना सुरू होण्यापूर्वी अनुबद्ध हिंदी संस्थानचें कायदेमंडळ म्हणून काम करीत होती, ते मंडळ किंवा ती शासनसंस्था या घटनेनें अशा निर्दिष्ट केलेल्या राज्याच्या कायदेमंडळाच्या गृहाला किंवा गृहांना दिलेली सत्ता बजावील आणि सोंपविलेलीं कामें करील.

३८६. परिशिष्ट १, भाग ब मध्यें दिलेल्या राज्याचा राजप्रमुख ज्या व्यक्तींची त्याकरितां नेमणुक करील त्या व्यक्ती, या घटनेप्रमाणें राजप्रमुखाच्या मंत्रिमंडळाच्या सभासद होतील आणि अशा नेमणुका केल्या जाईपर्यंत

ज्या व्यक्ती या घटनेपूर्वी अनुबद्ध हिंदी संस्थानच्या मंत्रिपदावर होत्या त्या व्यक्ती ही घटना सुरू होतांच या घटनेखालीं त्या राजप्रमुखाच्या मंत्रि-मंडळाच्या सभासद म्हणून होतील व पदावर राहतील.

३८७. ही घटना सुरू झाल्यापासून तीन वर्षांच्या मुदतींत, या घटनेच्या कोणत्याहि कलमाखालीं करावयाच्या निवडणुकांकरतां भारताची किंवा त्यांतील एखाद्या विभागाची लोकसंख्या, या घटनेंत कांहींहि असलें तरी, राष्ट्रपति हुकुमानें फर्मावील त्या पद्धतीनें ठरवली जाईल आणि त्या हुकुमानें निरानिराळ्या कामांकरतां आणि निरानिराळ्या राज्यांकरतां निरानिराळ्या तरतुदी तो करूं शकेल.

३८८. (१) कलम ३७९, उपकलम (१) खालीं काम चालवीत असलेल्या तात्पुरत्या पार्लमेंटांत सभासदांच्या रिकाम्या झालेल्या प्रासंगिक जागा, आणि कलम ३७९, उपकलमें (३) व (४) मध्यें उल्लेख केलेल्या जागा भरल्या जातील आणि त्या रिकाम्या जागा भरण्यासंबंधीं सर्व बाबींचें (यांत तशा जागा भरण्याच्या निवडणुकींतून निर्माण झालेल्या शंका व तंटे यासंबंधीचे निर्णय येतील) नियमन—

(अ) राष्ट्रपति त्यासंबंधीं करील त्या नियमान्वयें केलें जाईल; आणि (ब) त्या बाबतींत नियम केले जाईपर्यंत, या जागा भरण्याचे वेळीं किंवा ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थान वसाहतीच्या घटना परिषदेंतील जागा भरण्यासंबंधीं व तद्विषयक अन्य बाबींसंबंधीं जे नियम अस्तित्वांत असतील आणि ही घटना सुरू होण्यापूर्वी घटना परिषदेच्या अध्यक्षानें आणि ती सुरूं झाल्यानंतर भारताच्या राष्ट्रपतीनें त्या नियमांत जे अपवाद व फेरफार केले असतील त्यांना अनुसरून ह्या जागा भरल्या जातील:

मात्र, या कलमांत उल्लेखिलेली जागा ती रिकामी होण्यापूर्वी अनुसूचित जातींच्या किंवा मुसलमान किंवा शीख समाजाकडून भरलेली असेल आणि ती प्रांताच्या किंवा पहिल्या परिशिष्टांतील भाग अ मधील राज्याच्या प्रतिनिधि-त्वाची असेल तर ती जागा भरून काढणारी व्यक्ति घटना परिषदेच्या अध्यक्षानें किंवा भारताच्या राष्ट्रपतीनें त्यांना अन्य व्यवस्था करणें जरूर किंवा योग्य न वाटल्यास त्याच जातीकडून भरली जाईल. तसेंच ती जागा प्रांताचे किंवा

परिशिष्ट १, भाग अ मधील राज्यांचें प्रातिनिधित्व करणाऱ्या सभासदाची असेल तर त्या प्रांताच्या किंवा अनुबद्ध राज्याच्या किंवा त्या राज्याच्या विधान सभेंतील प्रत्येक सभासदाला त्या निवडणुकींत भाग घेण्याचा व मत देण्याचा हक्क असेल.

स्पष्टीकरणः—(अ) गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या (अनुसूचित जात) १९३६ च्या हुकुमामध्यें कोणत्याहि प्रांतांतल्या म्हणून निर्दिष्ट केलेल्या सर्व जाति, वंश किंवा जनजाती किंवा त्या जातींतील, वंशांतील, किंवा जनजातींतील भाग किंवा गट, ह्या या उपकलमाच्या कामापुरत्या, त्या प्रांतांतील किंवा अनुबद्ध राज्यांतील अनुसूचित जाति, राष्ट्रपति कलम ३४१, उपकलम (१) प्रमाणें अनुबद्ध राज्यांतील अनुसूचित जाती निर्दिष्ट करणारा जाहीरनामा काढीपर्यंत, समजल्या जातील; (ब) कोणत्याहि प्रांतांतील किंवा राज्यांतील अनुसूचित जातींचा एक समाज आहे असें समजलें जाईल.

(२) ३८२ किंवा ३८५ कलमांखालीं काम करीत असलेल्या राज्याच्या कायदेमंडळांतील प्रासंगिक जागा भरल्या जातील आणि या घटनेच्या सुरुवातीपूर्वी, या जागा भरण्यासंबंधीं आणि तद्विषयक बाबींचें नियमन करण्यासंबंधीं ज्या तरतुदी अमलांत होत्या, त्या तरतुदींत राष्ट्रपतीनें हुकूम काढून जे अपवाद आणि दुरुस्त्या केल्या असतील त्यांना अनुसरून अशा जागा भरण्यासंबंधीच्या सर्व बाबींचें नियमन (निवडणुकीसंबंधीं उत्पन्न होणाऱ्या शंका व तंट्यांच्या निकालासह) केलें जाईल.

३८९. ही घटना सुरू होण्यापूर्वीं हिंदुस्थानच्या वसाहत कायदेमंडळापुढें किंवा प्रांताच्या किंवा हिंदी संस्थानच्या कायदेमंडळापुढें एखादें बिल चालूं असेल, तर या घटनेप्रमाणें पार्लमेंटनें किंवा अनुबद्ध राज्याच्या कायदेमंडळानें केलेल्या नियमांत, कांहीं विरोधी तरतुदी केल्या असल्यास त्यांचा अंतर्भाव करून त्याप्रमाणें त्या तरतुदींनुसार पार्लमेंट किंवा अनुबद्ध राज्याचें कायदेमंडळ यांच्यापुढें तें तसेंच चालूं राहूं शकेल. हिंदी वसाहत सरकारचें कायदेमंडळ किंवा प्रांताचें किंवा हिंदी संस्थानचें कायदेमंडळ यांत त्या बिलाच्या कामकाजासंबंधीं झालेल्या नोंदी, ह्या पार्लमेंट किंवा अनुबद्ध राज्यांतल्या कायदेमंडळात झालेल्या नोंदी आहेत असें जणु काय समजलें जाईल (आणि त्याप्रमाणें तें बिल चालूं राहूं शकेल).

३९०. भारताच्या संचित निधीसंबंधीं किंवा राज्याच्या संचित निधी-संबंधीं आणि त्यापैकीं कोणत्याहि निधींतील पैशाच्या विनियोगासंबंधीं या घटनेंतील तरतुदी, ही घटना सुरू होण्याच्या दिवसापासून ३१ मार्च १९५० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) भारत सरकारकडे किंवा राज्यसरकारकडे जमा झालेल्या किंवा त्यांनीं उभारलेल्या किंवा खर्च केलेल्या पैशाला लागू होणार नाहींत, आणि त्या मुदतींत केलेला कोणताहि खर्च, हा योग्य रीतीचा अधिकृत खर्च मानला जाईल. मात्र त्याकरतां तो खर्च अधिकृत खर्चाच्या यादींत नमूद केलेला असला पाहिजे आणि तो १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील तरतुदींप्रमाणें हिंदुस्थान वसाहतीच्या गव्हर्नर जनरलनें किंवा अनुबद्ध प्रांतांतील गव्हर्नरनें प्रमाणित केलेला असला पाहिजे किंवा ही घटना सुरू होण्यापूर्वीं अनुबद्ध हिंदी संस्थानच्या उत्पन्नांतून करावयाच्या खर्चाला जे अधिकृत करण्यासंबंधींचे नियम लागू होते त्या नियमाप्रमाणें राज्याच्या राजप्रमुखानें अधिकृत केला असला पाहिजे.

३९१. (१) ही घटना मंजूर झाल्यापासून ती सुरू होण्याच्या दरम्यानच्या काळांत जर १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील तरतुदींप्रमाणें कोणत्याहि वेळीं एखादी उपाययोजना केली आणि त्याकरितां राष्ट्रपतीच्या मताप्रमाणें परिशिष्ट १ व परिशिष्ट ४ ची दुरुस्ती अवश्य आहे असें त्याला वाटलें तर, या घटनेंत कांहींहि असलें तरी, राष्ट्रपति हुकुमान्वयें, केलेल्या उपाययोजनेला परिणामक्षम करण्याकरतां, त्या परिशिष्टांत जरूर त्या दुरुस्त्या करील आणि त्या हुकुमांत राष्ट्रपति त्याला अवश्य वाटेल त्या पुरवणीच्या किंवा प्रासंगिक किंवा अनुषंगिक तरतुदी समाविष्ट करूं शकेल.

(२) जेव्हां पहिलें किंवा चवथें परिशिष्ट अशा प्रकारें दुरुस्त केलें जाईल, तेव्हां या घटनेंत त्या परिशिष्टासंबंधीं केलेला निर्देश हा दुरुस्त परि-शिष्टाला अनुलक्षून आहे असें समजलें जाईल.

३९२. (१) राष्ट्रपति कोणत्याहि अडचणींचें, विशेषतः १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील तरतुदींचें या घटनेंतील तरतुदींत संक्रमण होतांना येणाऱ्या अडचणींचें निवारण हुकूम काढून करूं शकेल. त्या हुकुमांत तो निर्दिष्ट करील त्या काळांत ही घटना त्याला अवश्य किंवा इष्ट वाटतील

त्या फेरफारांनुसार, मग ते फेरफार दुरुस्तीचे, किंवा भर घालण्याचे किंवा वगळण्याचे असले तरी, त्यांना अनुसरून परिणामक्षम ठरेल :

मात्र हा हुकुम भाग ५, प्रकरण २ प्रमाणें बनलेल्या पार्लमेंटच्या पहिल्या बैठकीनंतर काढतां येणार नाहीं.

(२) उपकलम (१) प्रमाणें काढलेला प्रत्येक हुकूम पार्लमेंटपुढें ठेवला जाईल.

(३) या कलमानें व ३२४ कलमानें आणि कलम ३६७ (३) नें व कलम ३९१ नें राष्ट्रपतीला ज्या सत्ता दिलेल्या आहेत त्या या घटनेपूर्वी हिंदुस्थान वसाहतीच्या गव्हर्नर जनरलकडून बजावल्या जाण्यास लायक असतील.

३९३. या घटनेला ' भारतीय घटना ' असें म्हणावें.

३९४. हें कलम आणि कलमें ५, ६, ७, ८, ९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७९, ३८०, ३८८, ३९१, ३९२ आणि ३९३ हीं एकदम अमलांत येतील आणि या घटनेचीं बाकीचीं कलमें ज्याला या घटनेंत घटनेचा आरंभ असें म्हटलें आहे त्या दिवशीं म्हणजे ता. २६ जानेवारी १९५० रोजीं अमलांत येतील.

३९५. १९४७ चा इंडियन इंडिपेन्डन्स ॲक्ट आणि १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, तो कायदा दुरुस्त करण्याकरतां किंवा त्याला पुरवणी जोडण्याकरतां केलेल्या सर्व कायद्यासह, पण १९४९ चा प्रीव्ही कौन्सिलचें अधिकारक्षेत्र नष्ट करण्याचा कायदा वगळून, या कलमान्वयें रद्द करण्यांत येत आहे.

परिशिष्ट : १

(कलमें १, ४ व ३९१)

भारतांतील राज्य व प्रदेश

भाग अ

राज्यांचीं नांवें	अनुबद्ध प्रांतांचीं नांवें
१ आसाम	आसाम
२ बिहार	बिहार
३ मुंबई	मुंबई
४ मध्यप्रदेश	मध्यप्रांत व वऱ्हाड
५ मद्रास	मद्रास
६ ओरिसा	ओरिसा
७ पंजाब	पूर्व पंजाब
८ संयुक्त प्रांत	संयुक्त प्रांत
९ पश्चिम बंगाल	पश्चिम बंगाल

राज्यांच्या प्रदेशमर्यादा

ही घटना अंमलांत येण्यापूर्वी आसाम राज्यांत जे प्रदेश सामील होते ते, खासी संस्थानें व आसामच्या जनजातींचे प्रदेश या सर्वांचा समावेश आसाम प्रांतांत होईल.

ही घटना अंमलांत येण्यापूर्वी पश्चिम बंगालमध्यें जो प्रदेश समाविष्ट होता तो प्रदेश बंगाल प्रांत म्हणून ओळखला जाईल.

या विभागांत उल्लेखिलेल्या प्रत्येक राज्याचा प्रदेश ही घटना सुरू होण्यापूर्वी, ज्या अनुबद्ध प्रांतांत व प्रदेशांत समाविष्ट होता तो त्या त्या प्रांतांत व प्रदेशांत समाविष्ट होईल, तसेंच घटनेच्या प्रारंभापूर्वी १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या २९० (अ) कलमान्वयें जे प्रदेश प्रांताचे अंगभूत भाग म्हणून त्या प्रांताच्या अंमलाखालीं होते ते प्रदेशही त्या राज्यांत समाविष्ट होतील.

भाग ब

राज्यांचीं नांवें

१ हैद्राबाद
२ जम्मू व काश्मीर
३ मध्यभारत
४ म्हैसूर
५ पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानें यांचा संघ
६ राजस्थान
७ सौराष्ट्र
८ त्रावणकोर—कोचीन
९ विंध्य प्रदेश

राज्यांच्या प्रदेशमर्यादा

या भागांतील प्रत्येक संस्थानांचा प्रदेश, ही घटना सुरू होण्यापूर्वी ज्या ज्या हिंदी संस्थानांत समाविष्ट होता त्या त्या संस्थानांचा तो बनेल; आणि (अ) राजस्थान व सौराष्ट्र यांच्या बाबतींत ज्या प्रदेशांचा कारभार १९४७ च्या एक्स्ट्रॉ प्रॉव्हिन्शियल ज्युरिस्डिक्शन ॲक्टांतील तरतुदीनुसार अगर अन्य रीतीनें त्या त्या संस्थानाकडून चालत असे ते प्रदेशही या राज्यांत सामील होतील.

(ब) घटनेच्या सुरवातीपूर्वी पंथ पिप्लोदा या नांवाचा जो चीफ कमिशनरचा प्रांत होता तो मध्यभारत राज्यांत समाविष्ट होईल.

भाग क

राज्यांचीं नांवें

१ अजमीर
२ भोपाळ
३ बिलासपूर
४ कुचबिहार
५ कुर्ग

६ दिल्ली
७ हिमाचल प्रदेश
८ कच्छ
९ मणिपूर
१० त्रिपुरा

राज्यांच्या प्रदेशमर्यादा

ही घटना अंमलांत येण्यापूर्वी अजमीर, मेरवाडा, कुर्ग व दिल्ली हे चीफ कमिशनरचे प्रांत ज्या प्रदेशांत समाविष्ट होते ते प्रदेश अजमीर, कुर्ग व दिल्ली या राज्यांत अनुक्रमें सामील होतील.

या भागांतील इतर प्रत्येक राज्याचा प्रदेश, घटनेच्या प्रारंभापूर्वी १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या २९० (अ) कलमाखालील हुकुमान्वयें चीफ कमिशनरचे प्रांत म्हणून जे अनुशासित केले जात होते त्या प्रदेशांचा मिळून होईल.

भाग ड

अंदमान व निकोबार बेटें

परिशिष्ट : २

[कलमें ५९ (३), ६५ (३), ७५ (६), ९७, १२५, १४८ (३), १५८ (३), १६४ (५), १८६ व २२१]

भाग अ

राष्ट्रपति आणि पहिल्या परिशिष्टाच्या अ भागांत नमूद केलेल्या राज्यांचे राज्यपाल यांच्यासंबंधीं योजना.

१. राष्ट्रपति आणि प्रथम परिशिष्टाच्या अ भागांत नमूद कलल्या राज्यांचे राज्यपाल यांना दरमहा पुढीलप्रमाणें तनखा मिळेल.

राष्ट्रपति	१०००० रुपये
राज्यपाल	५५०० रुपये

२. ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानचा वसाहत सरकारचा गव्हर्नर जनरल व प्रांतांचे गव्हर्नर यांना जे भत्ते मिळत होते तितकेच राष्ट्रपति व राज्यपाल यांना अनुक्रमें दिले जातील.

३. ही घटना सुरू होण्यापूर्वी गव्हर्नर जनरल व प्रांतांचे गव्हर्नर यांना ज्या सवलती होत्या त्या अनुक्रमें राष्ट्रपति व राज्यपाल यांना, त्यांच्या अधिकाराच्या मुदतींत मिळतील.

४. ज्या वेळीं उपराष्ट्रपति किंवा दुसरा कोणी इसम राष्ट्रपतीचें काम करीत असेल किंवा राष्ट्रपति या नात्यानें तात्पुरता स्थानापन्न झाला असेल अथवा जो राज्यपालाचें काम करीत असेल, त्यांना अनुक्रमें राष्ट्रपति व राज्यपाल यांची प्रांति, भत्ते व सवलती मिळण्याचा हक्क आहे.

भाग ब

संघराज्याचे मंत्री व पहिल्या परिशिष्टांत भाग अ आणि भाग ब मध्यें हे निर्दिष्ट केलेल्या राज्यांचे मंत्रि यांच्या संबंधींच्या तजविजी.

५. ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदी वसाहत राज्याचे मुख्य प्रधान आणि इतर मध्यवर्ती मंत्री यांना जो पगार व भत्ता देण्यांत येत असे तोच पगार आणि भत्ता संघराज्याचे पंतप्रधान आणि इतर मंत्री यांना अनुक्रमें दिला जाईल.

६. ही घटना सुरू होण्यापूर्वी ज्या अनुबद्ध प्रांतांचे अथवा हिंदी संस्थानांचे मंत्री यांना जो पगार व भत्ता दिला जात असे तोच पगार आणि भत्ता, पहिल्या परिशिष्टाच्या (अ) अथवा (ब) भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांच्या मंत्र्यांना दिला जाईल.

भाग क

लोकसभागृहाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, राज्यपरिषदेचे सभापति आणि उपसभापति, पहिल्या परिशिष्टाच्या अ भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्याच्या विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष व अशा राज्याच्या विधानपरिषदेचे सभापति व उपसभापति यांच्या संबंधींची तरतूद.

७. ही घटना अंमलांत येण्यापूर्वी हिंदी वसाहत-सरकारच्या घटना-समितीच्या अध्यक्षाला जो पगार व भत्ता मिळत असे, तोच पगार व भत्ता

लोकसभागृहाचे अध्यक्ष आणि राज्यपरिषदेचे सभापति यांना दिला जाईल. तसेंच ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदी वसाहत-सरकारच्या घटना-समितीच्या उपाध्यक्षाला जो पगार व भत्ता दिला जात असे तो पगार व भत्ता लोकसभागृहाचे उपाध्यक्ष व राज्यपरिषदेचे उपसभापति यांना देण्यांत येईल.

८. ही घटना अंमलांत येण्यापूर्वी प्रांतिक कायदेमंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि प्रांताच्या वरिष्ठ कायदेमंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना जो पगार व भत्ता दिला जात असे, तोच पगार व भत्ता पहिल्या परिशिष्टां-तील अ भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्याच्या विधानसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, तसेंच राज्याच्या विधानपरिषदेचे सभापति आणि उपसभापति यांना अनुक्रमें देण्यांत येईल. ही घटना अंमलांत येण्यापूर्वी ज्या प्रांतांत वरिष्ठ कायदेमंडळ अस्तित्वांत नव्हतें त्या राज्याच्या विधानपरिषदेचे सभापति व उपसभापति यांना त्या राज्याचा राज्यपाल ठरवील तो पगार व भत्ता देण्यांत येईल.

भाग ड

उच्चतम न्यायालयाचे न्यायाधीश व पहिल्या परिशिष्टाच्या (अ) भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांतील हायकोर्टांचे न्यायाधीश यांच्या संबंधींची व्यवस्था.

९. (१) उच्चतम न्यायालयाच्या न्यायाधीशांना, त्यांच्या प्रत्यक्ष अधिकारावर असलेल्या मुदतीबद्दल, त्यांना दरमहा पुढीलप्रमाणें वेतन देण्यांत येईल:—

मुख्य न्यायाधीश	५००० रु.
इतर न्यायाधीश	४००० रु.

मात्र उच्चतम न्यायालयाचे न्यायमूर्ति म्हणून नेमणूक होण्याच्या वेळीं एकाद्या न्यायाधीशाला (दुर्बलता अगर इजा यामुळें मिळणारें पेन्शन सोडून) हिंदुस्थान सरकार, किंवा तत्पूर्वीचें सरकार, राज्य अथवा तत्पूर्वीचें प्रांतिक सरकार यांच्या अमदानींत केलेल्या नोकरीबद्दल जर पेन्शन मिळत असेल तर, उच्चतम न्यायाधीशाच्या अधिकारान्वयें त्याला जो पगार मिळावयाचा तो त्या पेन्शनच्या रकमेइतका कमी करण्यांत येईल.

(२) उच्चतम न्यायालयाच्या प्रत्येक न्यायाधीशाला, भाडें न देतां, सरकारी निवासस्थान मिळण्याचा हक्क राहील.

(३) ही घटना अंमलांत येण्यापूर्वी जो न्यायाधीश (अ) फेडरल कोर्टाचा सरन्यायाधीश म्हणून अधिकारावर असेल आणि घटनेनंतर ३७४ कलमाच्या (१) उपकलमान्वयें उच्चतम न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश झाला असेल अथवा (ब) फेडरल कोर्टाचा दुसरा एखादा न्यायाधीश असेल आणि घटनेनंतर वरील कलमान्वयें उच्चतम न्यायालयाचा न्यायाधीश झाला असेल, तर मुख्य न्यायाधीश अथवा इतर न्यायाधीश या नात्यानें जोंपर्यंत तो अधिकारावर असेल तोंपर्यंत त्याला या परिच्छेदांतील उपपरिच्छेद (२) लागू होणार नाहीं; आणि जो न्यायाधीश उच्चतम न्यायालयाचा न्यायाधीश अगर मुख्य न्यायाधीश अशा प्रकारें होईल तो मुख्य न्यायाधीश अगर न्यायाधीश या न्यायानें प्रत्यक्ष वेळ त्या कामांत घालवील त्या कामाबद्दल त्याला वरील पोटकलम [१] मध्यें निर्दिष्ट केलेल्या वेतनाशिवाय जादा वेतन मिळण्याचा हक्क आहे. हें जादा वेतन म्हणजे घटनेनंतर त्या जागेचा असा ठरलेला पगार व घटनेपूर्वी त्याला मिळत असलेला पगार यांची वजाबाकी करून राहिलेली रक्कम खास वेतन म्हणून मिळेल.

(४) उच्चतम न्यायालयाच्या प्रत्येक न्यायाधीशाला आपल्या कामासाठीं हिंदुस्थानांत कोठेंही प्रवास करावा लागला तर त्याला प्रवासखर्चासाठीं योग्य तो भत्ता भरपाईदाखल देण्यांत येईल. तसेंच, राष्ट्रपति वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें, त्याला प्रवासाच्या योग्य त्या सोयी दिल्या जातील.

(५) उच्चतम न्यायालयाच्या न्यायाधीशाची गैरहजेरीची रजा (त्यांत रजेचा भत्ता समाविष्ट आहे) व पेन्शन यासंबंधींचे हक्क, ही सुरू होण्यापूर्वी फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांना जे हक्क होते तेच राहतील.

१०. (१) पहिल्या परिशिष्टांतील (अ) भागांत निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक राज्यांतील हायकोर्टाच्या न्यायाधीशांना, त्यांच्या प्रत्यक्ष अधिकारावर असलेल्या मुदतीबद्दल त्यांना दरमहा पुढीलप्रमाणें पगार दिला जाईल.

सरन्यायाधीश	४००० रु.
इतर न्यायाधीश	३५०० रु.

(२) ही घटना सुरू होण्यापूर्वी जो इसम (अ) कोणत्याही प्रांतांत हायकोर्टाचा मुख्य न्यायाधीश म्हणून अधिकारपदावर असेल आणि या घटनेनंतर ३७६ कलमाच्या (१) उपकलमान्वयें त्या प्रांताच्या अनुबद्ध राज्याच्या हायकोर्टाचा मुख्य न्यायाधीश म्हणून असेल, अथवा (ब) कोणत्याही प्रांतांत हायकोर्टाचा न्यायाधीश म्हणून अधिकारपदावर असेल आणि घटनेनंतर वरील कलमान्वयें त्या प्रांताच्या म्हणजे राज्याच्या हायकोर्टाचा एक न्यायाधीश (मुख्य न्यायाधीशाशिवाय) म्हणून असेल, तर या परिच्छेदांतील उपपरिच्छेद (१) मध्यें निर्देशिलेल्या पगारापेक्षां जास्त पगार तो घटनेपूर्वी घेत असेल तर, मुख्य न्यायाधीश किंवा इतर न्यायाधीश या नात्यानें प्रत्यक्ष कामावर असलेल्या मुदतीबद्दल वरील पोट–परिच्छेदांत निर्दिष्ट केलेल्या त्याच्या पगाराव्यतिरिक्त त्याला जादा वेतन मिळण्याचा हक्क आहे. हें जादा वेतन म्हणजे घटनेच्या पूर्वी त्याला मिळत असलेला पगार आणि घटनेनंतर त्या जागेचा ठरलेला पगार यांची वजावाट करून राहिलेली रक्कम होय.

(३) हायकोर्टाच्या प्रत्येक न्यायाधीशाला आपल्या कामासाठीं हिंदुस्थानांत कोठेंही प्रवास करावा लागला तर त्याला प्रवासखर्चासाठीं योग्य तो भत्ता भरपाईदाखल देण्यांत येईल. तसेंच, राष्ट्रपति वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें त्याला प्रवासाच्या योग्य त्या सोयीहि दिल्या जातील.

(४) कोणत्याहि राज्यांतील हायकोर्टाच्या न्यायाधीशांची गैरहजेरीची रजा (यांत रजेचा भत्ता समाविष्ट आहे) व पेन्शन यासंबंधींचे हक्क, ही घटना सुरू होण्यापूर्वी त्या त्या प्रांतांतील हायकोर्टाच्या न्यायाधीशांना जे हक्क होते तेच रहातील.

११. संदर्भानें दुसरा अर्थ अभिप्रेत नसल्यास, या भागांतील,

(अ) ' मुख्य न्यायाधीश ' या शब्दांत बदली मुख्य न्यायाधीश समाविष्ट होतो व ' न्यायाधीश ' या शब्दांत हंगामी (ॲडहॉक)न्यायाधीशाचा अंतर्भाव होतो;

(ब) ' प्रत्यक्ष नोकरी ' या शब्दप्रयोगांत—

[१] न्यायाधीश या नात्याच्या अधिकाराची मुदत अथवा राष्ट्रपतीच्या विनंतीनुसार त्यानें नेमून दिलेली कामगिरी करण्यास लागलेला काळ:

[२] रजेच्या मुदतीव्यतिरिक्त असलेल्या हक्काच्या सुट्या; आणि

[३] हायकोर्टातून उच्चतम न्यायालयांत किंवा एका हायकोर्टातून दुसऱ्या हायकोर्टांत बदली झाल्यावर नव्या जागीं रुजू होण्यासाठीं लागणारा काळ यांचा अंतर्भाव होतो.

भाग ई

भारताचा मुख्य हिशेबतपासनीस याच्या संबंधींच्या तजविजी.

(१) भारताचा मुख्य हिशेबतपासनीस याला दरमहा ४००० रुपये प्रमाणें पगार दिला जाईल.

(२) ही घटना अंमलांत येण्यापूर्वी, जो इसम हिंदुस्थानचा सर हिशेबतपासनीस या अधिकारावर होता तो जर ३७७ कलमान्वयें घटनेनंतर भारताचा मुख्य हिशेबतपासनीस झाला तर त्याला या परिच्छेदाच्या (१) उपकलमांत निर्देशिलेल्या पगाराव्यतिरिक्त जादा वेतन मिळण्याचा हक्क आहे. हें जादा वेतन म्हणजे घटनेपूर्वी त्याला मिळत असलेला पगार आणि घटनेनंतर त्या जागेचा ठरलेला पगार यांची वजावाट करून जी रक्कम राहील तें त्याचें जादा वेतन होय.

(३) भारताचा मुख्य सर हिशेबतपासनीस याची गैरहजेरीची रजा, पेन्शन व नोकरीच्या इतर अटी यासंबंधींचे हक्क ही घटना सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानच्या मुख्य हिशेबनीसाला जे हक्क होते, तेच रहातील आणि त्या हक्कांच्या कलमांत जेथें जेथें गव्हर्नर-जनरलचा उल्लेख आला आहे तेथें तेथें तो उल्लेख राष्ट्रपतीला अनुलक्षून आहे असें समजण्यांत येईल.

— —

परिशिष्ट : ३

[कलमें ७५ (४), ९९, १२४ (६), १४८ (२), १६४ (३), १८८ आणि २१९].

शपथ अगर प्रतिज्ञा यांचे नमुने

[१]

संघराज्याच्या मंत्र्यानें घ्यावयाची अधिकारस्वीकाराची शपथ.

"मी अ. ब. ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारताच्या राज्यघटनेबद्दल पूर्ण श्रद्धा व निष्ठा, बाळगीन, संघराज्याचा मंत्री या नात्यानें मी आपलें कर्तव्य सद्-सद्विवेक बुद्धीला अनुसरून व प्रामाणिकपणें बजावीन, आणि भीति अगर लोभ किंवा प्रेम अगर विद्वेष न बाळगतां घटना आणि कायदा यांना अनुसरून सर्व प्रकारच्या लोकांना योग्य रीतीनें वागवीन."

[२]

संघराज्याच्या मंत्र्यानें घ्यावयाची गौप्यगोपनाची शपथ—

"मी अ. ब. ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, संघराज्याचा मंत्री या नात्यानें माझ्यापुढें विचारार्थ ज्या बाबी आणल्या जातील किंवा ज्या गोष्टी मला ज्ञात होतील, त्यांतील मंत्री या नात्यानें माझें कर्तव्य योग्य बजावण्याच्या दृष्टीनें ज्यांची आवश्यकता लागेल अशा खेरीज करून, मी कोणत्याहि बाबीबद्दल कोणाजवळहि प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें बोलणार नाहीं किंवा त्या प्रकट करणार नाहीं."

[३]

पार्लमेंटच्या सभासदानें घ्यावयाची शपथ अगर करावयाची प्रतिज्ञा.

"मी अ. ब. राज्यपरिषदेचा (किंवा लोकसभागृहाचा) लोकनियुक्त (किंवा सरकारनियुक्त)सभासद या नात्यानें ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारताच्या राज्य-घटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व राजनिष्ठा बाळगीन आणि ज्या कर्तव्यांना मी आरंभ करणार आहे तीं कर्तव्यें प्रामाणिकपणें पार पाडीन."

[४]

उच्चतम न्यायालयाचे न्यायाधीश वं भारताचे मुख्य हिशेबतपासनीस यांनीं घ्यावयाची शपथ अगर करावयाची प्रतिज्ञाः—

"मी अ. ब. भारताच्या उच्चतम न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश (किंवा न्यायाधीश, अथवा भारताचा मुख्य हिशेबतपासनीस) या नात्यानें नियुक्त झालेला ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारतीय राज्यघटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व राजनिष्ठा बाळगीन, आणि भीति अथवा लोभ, प्रेम अगर विद्वेष न बाळगतां माझी फक्त कर्तृत्वशक्ति, ज्ञान आणि सारासारबुद्धि यांचा जास्तींत जास्त उपयोग करून, योग्य रीतीनें आणि प्रामाणिकपणें मी आपलीं कर्तव्यें बजावीन, आणि घटना व कायदा यांना उचलून धरीन."

[५]

राज्याच्या मंत्र्यानें घ्यावयाची अधिकारस्वीकाराची शपथः—

"मी अ, ब, ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारतीय राज्यघटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व निष्ठा बाळगीन व...राज्याचा, मंत्री या नात्यानें मी आपलें कर्तव्य प्रामाणिकपणें व चोखपणें बजावीन आणि भीति अगर लोभ, प्रेम अगर विद्वेष न बाळगतां घटना आणि कायदा यांना अनुसरून सर्व जनतेला योग्य रीतीनें वागवीन."

[६]

राज्याच्या मंत्र्यानें घ्यावयाची गौप्यगोपनाची शपथः—

"मी अ. ब. ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, राज्याचा मंत्री या नात्यानें माझ्यापुढें विचारार्थ ज्या बाबी आणल्या जातील अगर ज्या मला ज्ञात होतील, त्यांतील मंत्री या नात्यानें माझें कर्तव्य योग्य बजावण्याच्या दृष्टीनें ज्यांची अवश्यकता लागेल अशा खेरीजकरून, मी कोणत्याहि बाबीबद्दल कोणाजवळही प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें बोलणार नाहीं किंवा त्या प्रकट करणार नाहीं."

[७]

राज्याच्या कायदेमंडळाच्या सभासदानें घ्यावयाची शपथ किंवा करावयाची प्रतिज्ञाः—

" मी अ.ब. विधानसभेचा (किंवा विधानपरिषदेचा) लोकनियुक्त किंवा (सरकारनियुक्त) सभासद या नात्यानें ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों)कीं,कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारताच्या राज्यघटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व निष्ठा बाळगीन आणि ज्या कर्तव्यांना मी आरंभ करणार आहे तीं कर्तव्यें प्रामाणिकपणें पार पाडीन. "

[८]

हायकोर्टाच्या न्यायाधीशांनीं घ्यावयाची शपथ किंवा करावयाची प्रतिज्ञा—

" मी अ. ब, राज्याच्या हायकोर्टाचा मुख्य न्यायाधीश (किंवा न्यायाधीश) म्हणून नियुक्त झालेला, ईश्वरसाक्ष शपथ घेतों (अगर गंभीरपणें प्रतिज्ञा करतों) कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या भारतीय राज्यघटनेबद्दल मी पूर्ण श्रद्धा व निष्ठा बाळगीन, आणि भीति अथवा लोभ, प्रेम अगर विद्वेष न बाळगतां माझी कर्तृत्वशक्ति, ज्ञान आणि सारासारबुद्धि यांचा जास्तींत जास्त उपयोग करून, योग्य रीतीनें आणि प्रामाणिकपणें मी आपलें कर्तव्य बजावीन आणि घटना व कायदा यांना उचलून धरीन."

परिशिष्ट : ४

[कलमें ४ (१), ८० (२) आणि ३९१]

राज्यपरिषदेंतील सभासदांच्या जागांची वांटणी

या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांच्या किंवा राज्यांच्या गटांच्या पुढें जे आंकडे दिलेले आहेत त्यावरून त्या त्या राज्याला किंवा गटाला तितक्या जागा दिल्या जातील असें समजावें.

जागांचें कोष्टक

राज्यपरिषद.

पहिल्या परिशिष्टाच्या (अ) भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांचे प्रतिनिधि

		एकूण जागा
१	आसाम	६
२	बिहार	२१
३	मुंबई	१७
४	मध्यप्रदेश	१२
५	मद्रास	२७
६	ओरिसा	९
७	पंजाब	८
८	संयुक्त प्रांत	३१
९	पश्चिम बंगाल	१४
	एकूण...१४५	

पहिल्या परिशिष्टाच्या (ब) भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांचे प्रतिनिधिः—

	राज्यें	एकूण जागा
१	हैद्राबाद	११
२	जम्मू आणि काश्मीर	४
३	मध्यभारत	६।
४	म्हैसूर	६
५	पतियाळा आणि पूर्व पंजाब या संस्थानांचा संघ	३
६	राजस्थान	९
७	सौराष्ट्र	४
८	त्रावणकोर-कोचीन	६
९	विंध्य प्रदेश	४
	...एकूण ५३	

पहिल्या परिशिष्टाच्या (क)भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांचे प्रतिनिधिः-

राज्यें व राज्यांचे गट		एकूण जागा
१ अजमीर	}	१
२ कुर्ग		
३ मोपाळ		१
४ बिलासपूर	}	१
५ हिमाचल प्रदेश		
६ कुचबिहार		१
७ दिल्ली		१
८ कच्छ		१
९ मणिपूर	}	१
१० त्रिपुरा		
		एकूण...७

एकूण सर्व जागा ... २०५

परिशिष्ट : ५

[कलम २४४ (१)]

अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जाति यांच्या नियंत्रणासंबंधीं व कारभारासंबंधीं तुरतुदी.

भाग अ

सर्वसाधारण.

१. व्याख्या.—संदर्भान्वयें दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर या परिशिष्टांतील राज्य या शब्दाचा अर्थ पहिल्या परिशिष्टाच्या (अ) अगर (ब) भागांत निर्दिष्ट केलेलें राज्य असा आहे. मात्र यांत आसाम समाविष्ट नाहीं.

२. अनुसूचित क्षेत्रांतील राज्याची कार्यकारी सत्ता—या परिशिष्टांतील तरतुदीनुसार राज्याची कार्यकारी सत्ता, त्या राज्याच्या कक्षेंत असलेल्या अनुसूचित क्षेत्रावरही चालते.

३. अनुसूचित क्षेत्राच्या शासनव्यवस्थेसंबंधीं राज्यपाल अगर राजप्रमुख यांनीं राष्ट्रपतीला पाठवावयाचा अहवाल. ज्या राज्यांत अगर संस्थानांत अनुसूचित प्रदेश असतील त्या राज्याच्या राज्यपालानें अगर राजप्रमुखानें, दरवर्षी किंवा राष्ट्रपति मागणी करील त्या वेळीं, आपल्या मुलुखांतील अनुसूचित क्षेत्राच्या राज्यकारभारासंबंधींचा अहवाल राष्ट्रपतीला सादर केला पाहिजे.अशा अनुसूचित क्षेत्राच्या शासनव्यवस्थेबाबत राज्याला सूचना करण्याचा अधिकार संघराज्याच्या कार्यकारी सत्तेला राहील.

भाग ब

अनुसूचित क्षेत्र व अनुसूचित जाति यांचें नियंत्रण व कारभार.

४ जनजातींचें सल्लागारमंडळ—(१) अनुसूचित क्षेत्र असलेल्या प्रत्येक राज्यांत आणि राष्ट्रपतीनें तसा आदेश दिल्यास, अनुसूचित प्रदेश नसलेल्या पण अनुसूचित जाति असलेल्या राज्यांतहि, वीसांपेक्षां जास्त नसलेल्या सभासदांचें एक जनजाति सल्लागारमंडळ स्थापन केलें जाईल. या सभासदांपैकीं तीन चतुर्थांश किंवा त्या सुमाराइतके सभासद त्या त्या राज्याच्या कायदेमंडळांत अनुसूचित जातींचे प्रतिनिधि म्हणून बसतील.

मात्र, त्या राज्याच्या कायदेमंडळांतील अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींची संख्या जनजाति सल्लागारमंडळांतील सभासदांपेक्षां कमी असेल तर उरलेल्या जागा त्या जातीच्या इतर लोकांकडून भरल्या जातील.

(२) राज्यांतील अनुसूचित जातींचें हितसंवर्धन व प्रगति यांसंबंधीं राज्यपाल किंवा राजप्रमुख ज्या विचारणा करतील त्यांना अनुसरून जनजाति सल्लागारमंडळानें मार्गदर्शन करणें हें त्याचें कर्तव्य टरेल.

(३) राज्यपाल अगर राजप्रमुख यांनीं खालील बाबतींत जरूरी असेल त्याप्रमाणें पुढील गोष्टींचें नियमन करण्याकरतां किंवा टरविण्याकरतां नियम करावेत.

[अ] सल्लागार मंडळाच्या सभासदांची संख्या, त्यांच्या नेमणुकीची, मंडळाच्या अध्यक्षाच्या नेमणुकीची, तसेंच मंडळाचे अधिकारी व नोकरवर्ग यांच्या नेमणुकीची पद्धत. [ब] सभानियमन व इतर कामकाजपद्धति. [क] इतर सर्व प्रासंगिक बाबी.

५. अनुसूचित क्षेत्रांना लागू होणारा कायदा—(१) या घटनेंत कांहींहि म्हटलें असलें तरी, राज्यपाल किंवा राजप्रमुख यानें जाहीरनामा काढून राज्यांतील अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या कोणत्याहि भागाला पार्लमेंटचा अगर कायदेमंडळाचा अमुक एक कायदा त्या जाहीरनाम्यांत जे कांहीं अपवाद अगर फेरबदल करील त्याला अनुसरून लागू आहे किंवा नाहीं असें घोषित करील आणि या उपपरिच्छेदाखालीं दिलेली कोणतीहि सूचना, गतकालसापेक्ष परिणाम घडवून आणणारी असेल.

(२) राज्यपाल किंवा राजप्रमुख, आपल्या मुलुखांतील जें क्षेत्र त्या-वेळीं अनुसूचित क्षेत्र म्हणून समजलें गेलें असेल त्या क्षेत्राच्या शांततेसाठीं व सुव्यवस्थेसाठीं कायदेकानू करूं शकेल.

मागें निर्दिष्ट केलेल्या सत्तेच्या सर्वसामान्यपणाला बाधा न येईल अशा प्रकारें आणि विशेषतः असे कायदेकानू ;

(अ) या क्षेत्रांतल्या अनुसूचित जातींतील लोकांमधील किंवा लोकांकडून जमिनीची अदलाबदल थांबवूं शकतील किंवा त्याचें नियमन करूं शकतील;

(ब) क्षेत्रांतल्या अनुसूचित जातींतील लोकांना जमिनी देण्याचें नियमन करूं शकतील.

(क) या क्षेत्रांतल्या अनुसूचित जातींतील लोकांना जे सावकार व्याजबट्टा करीत असतील त्यांच्या सावकारीच्या व्यवहाराचें नियमन करूं शकतील.

(३) वरील परिच्छेदाच्या उपपरिच्छेद (२) मध्यें सांगितल्याप्रमाणें अशा तऱ्हेचा कायदा कानू करतांना राज्यपाल किंवा राजप्रमुख, पार्लमेंटचा किंवा राज्याच्या कायदेमंडळाचा किंवा त्या वेळीं त्या क्षेत्राला लागू असलेला कायदा रद्द, किंवा दुरुस्त करूं शकेल.

(४) या परिच्छेदान्वयें केलेले सर्व कायदेकानू ताबडतोब राष्ट्रपतीकडे सादर केले पाहिजेत आणि त्यांची संमति मिळेपर्यंत ते अंमलांत येणार नाहींत.

(५) राज्यपाल किंवा राजप्रमुख यांनीं असे कायदेकानू करतांना, त्या राज्यांत जेथें जनजाति सल्लागारमंडळ असेल. तेथें त्याचा सल्ला घेतल्याशिवाय, या परिच्छेदान्वयें त्यांना कोणतेहि कायदेकानू करतां येणार नाहींत.

भाग क

अनुसूचित प्रदेश

६. अनुसूचित प्रदेश—(१) या घटनेंत 'अनुसूचित प्रदेश' म्हणजे राष्ट्रपतिहुकुमान्वयें 'अनुसूचित प्रदेश' म्हणून जे प्रदेश जाहीर करील ते असा या शब्दांचा अर्थ आहे.

(२) राष्ट्रपति केव्हांहि हुकूम काढून,

[अ] असें फर्मावूं शकेल कीं, सर्व अनुसूचित प्रदेश किंवा त्यांतील एखादा निर्दिष्ट भाग यापुढें तसा प्रदेश किंवा तसा भाग राहाणार नाहीं;

[ब] कोणतेंहि अनुसूचित क्षेत्र बदलूं शकेल, पण तें सरहद्दी ठाकठीक करण्याकरतांच;

(क) राज्याच्या सरहद्दी बदलल्यावर अगर संघराज्यांत त्या राज्याचा प्रवेश झाल्यावर अथवा नवीन राज्य निर्माण झाल्यावर, जो पूर्वी कोणत्याहि राज्यांत समाविष्ट झालेला नव्हता असा प्रदेश अनुसूचित क्षेत्र होईल किंवा त्या क्षेत्राचा भाग होईल असें जाहीर करील.

आणि या हुकुमांत राष्ट्रपतीला योग्य आणि आवश्यक अशा प्रासंगिक किंवा अनुषंगिक तरतुदी दाखल होऊं शकतील,तथापि पूर्वी दिलेल्या पद्धति या परिच्छेदाच्या (१) उपपरिच्छेदान्वयें काढलेला हुकूम नंतर काढलेल्या कोणत्याहि हुकुमान्वयें फिरवतां येणार नाहीं.

भाग ड

परिशिष्टाची दुरुस्ती

७. परिशिष्टांत दुरुस्ती—(१) या परिशिष्टांतील कलमांपैकीं कोण-

तेंहि कलम पार्लमेंट वेळोवेळीं कायद्यानें त्यांत नवी भर घालून बदल करून किंवा तें रद्द करून दुरुस्त करूं शकेल, आणि अशा प्रकारें या परिशिष्टांत दुरुस्ती करण्यांत आली म्हणजे घटनेंत उल्लेखिलेलें हें परिशिष्ट म्हणजे दुरुस्त परिशिष्ट होय असें संदर्भानें समजावें.

(२) या परिच्छेदाच्या (१) उपपरिच्छेदामध्यें सांगितलेला कायदा ३६८ व्या कलमासाठीं घटनेची दुरुस्ती आहे असें समजलें जाणार नाहीं.

परिशिष्ट : ६

(कलम २४४ (२) आणि २७५ (१))

आसामांतील जनजाति प्रदेशांच्या राज्यकारभारा-संबंधींच्या तजविजी

१. स्वायत्त जिल्हे आणि स्वायत्त प्रदेश—(१) या परिशिष्टाच्या २० व्या परिच्छेदास जोडलेल्या कोष्टकाच्या (अ) विभागांतील प्रत्येक बाबींतील जनजाति प्रदेश, या परिच्छेदानुसार, स्वायत्त जिल्हा म्हणून समजला जाईल.

(२) एका स्वायत्त जिल्ह्यांत जर निरनिराळ्या अनुसूचित जनजाति असतील, तर राज्यपाल जाहीरनामा काढून अशा जातींचे वास्तव्य असणाऱ्या क्षेत्राचें किंवा क्षेत्रांचे स्वायत्त प्रदेश म्हणून विभाग करूं शकेल.

(३) जाहीरनामा काढून राज्यपाल,

(अ) वरील कोष्टकाच्या (अ) विभागांत कोणताहि मुलूख समाविष्ट करूं शकेल.

(ब) या कोष्टकाच्या (अ) विभागांतून कोणताहि भाग अलग करूं शकेल,

(क) नवीन स्वायत्त जिल्हा निर्माण करूं शकेल,

(ड) कोणत्याहि स्वायत्त जिल्ह्याचें क्षेत्रफळ वाढवूं शकेल,

(इ) कोणत्याहि स्वायत्त जिल्ह्याचें क्षेत्रफळ कमी करूं शकेल,

(फ) दोन किंवा अधिक स्वायत्त जिल्हे किंवा त्यांचे विभाग यांचें एकत्रीकरण करून तो एक स्वायत्त जिल्हा बनवूं शकेल,

(ग) कोणत्याहि स्वायत्त जिल्ह्याच्या सरहद्दी तो निश्चित करूं शकेल.

मात्र, या उपपरिच्छेदाच्या (क) (ड) (इ) आणि (फ)या पोटकलमांनुसार राज्यपालाला जर हुकूम काढावयाचा असेल तर या परिशिष्टाच्या १४ व्या परिच्छेदाच्या उपपरिच्छेदाप्रमाणें नेमलेल्या कमिशनचा अहवाल विचारांत घेतल्याखेरीज त्याला तसा हुकूम काढतां येणार नाहीं.

२. जिल्हा कौन्सिलें व प्रादेशिक कौन्सिलें यांची घटना—(१) प्रत्येक स्वायत्त जिल्ह्याला एक जिल्हा कौन्सिल असेल. या कौन्सिलच्या सभासदांची संख्या २४ पेक्षां जास्त असतां कामा नये व त्यापैकीं तीन चतुर्थांशापेक्षां कमी नाहींत इतके सभासद प्रौढ मतदान पद्धतीनें निवडले जातील.

(२) या परिशिष्टाच्या पहिल्या परिच्छेदांतील (२) उपपरिच्छेदान्वयें स्वायत्त प्रदेश म्हणून बनविलेल्या प्रत्येक प्रदेशासाठीं एक स्वतंत्र प्रादेशिक कौन्सिल असेल.

(३) प्रत्येक जिल्हा कौन्सिल व प्रत्येक प्रादेशिक कौन्सिल हें त्या त्या जिल्ह्याचें किंवा प्रदेशाचें समवायी (कार्पोरेट) मंडळ असेल व त्या त्या नांवानें तें ओळखलें जाईल, तसेंच त्याला कायम परंपरा असेल, त्याचा एक विशिष्ट शिक्का असेल आणि जर खटल्याचा प्रसंग आला तर त्याच नांवानें तें दावा लावील किंवा त्यांच्यावर दावा केला जाईल.

(४) या परिशिष्टांतील तरतुदीनुसार, स्वायत्त जिल्ह्याचा कारभार, या परिशिष्टान्वयें जर त्या जिल्ह्यांतील प्रादेशिक कौन्सिलच्या हातीं सोंपविला नसेल तर तो त्या जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलकडेच राहील आणि स्वायत्त प्रदेशाचा कारभार त्या प्रदेशाच्या प्रादेशिक कौन्सिलच्या हातीं राहील.

(५) प्रादेशिक कौन्सिल असलेल्या स्वायत्त जिल्ह्यांतील जिल्हा कौन्सिलला प्रादेशिक कौन्सिलच्या सत्तेखालील प्रदेशाबाबत या परिशिष्टान्वयें मिळणाऱ्या अधिकाराखेरीज प्रादेशिक कौन्सिल त्या विभागाकरतां देईल ते अधिकार मिळतील.

(६) स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांतील विद्यमान जनजातींचीं कौन्सिलें अथवा इतर जनजातींच्या प्रातिनिधिक संस्था यांच्या सल्ल्यानें जिल्हा कौन्सिलें व प्रादेशिक कौन्सिलें यांची पहिली घटना करण्याबाबतचे नियम राज्यपाल करील आणि हे नियम खालील बाबींसंबंधींचे असतीलः—

[अ] जिल्हा कौन्सिलें व प्रादेशिक कौन्सिलें यांची रचना व त्यांतील जागांची वांटणी.

[ब] या कौन्सिलांच्या निवडणुकीसाठीं मतदारसंघांचे प्रादेशिक विभाग निश्चित करणें;

[क] या निवडणुकीसाठीं मतदानाची लायकी ठरविणें व मतदारांच्या याद्या तयार करणें;

[ड] या कौन्सिलांचे सभासद म्हणून निवडून देण्यासंबंधींची पात्रता;

[ई] या कौन्सिलांच्या सभासदांची सभासदत्वाची मुदत;

[फ] अशा कौन्सिलांतील सभासदांच्या निवडणुका अगर नेमणुका यासंबंधीं इतर बाबी;

[ग] जिल्हा व प्रादेशिक कौन्सिलांतील कामकाजाची पद्धति.

[ह] जिल्हा व प्रादेशिक कौन्सिलांच्या नोकरवर्गाच्या व अधिकाऱ्यांच्या नेमणुका.

(७) या परिच्छेदाच्या (६) व्या उपपरिच्छेदांत निर्दिष्ट केलेल्या बाबींसंबंधीं, जिल्हा व प्रादेशिक कौन्सिलें अस्तित्वांत आल्यावर त्यांनीं नियम तयार करावे व शिवाय पुढील बाबींसंबंधींहि त्यांना नियम करतां येतीलः—

[अ] दुय्यम स्थानिक कौन्सिलें अगर बोर्डें यांची प्रस्थापना व त्यांच्या कामकाजाची पद्धत; आणि.

[ब] जिल्हा अथवा प्रदेश यांच्या कारभारासंबंधींच्या कामकाजविषयक सामान्यपणें सर्व बाबी.

मात्र या उपपरिच्छेदानुसार जिल्हा अगर प्रादेशिक कौन्सिल नियम तयार करीपर्यंत, अशा प्रत्येकीं कौन्सिलच्या निवडणुका, अधिकारी व नोकर यांच्या नेमणुका व कामकाजपद्धति यांसंबंधीं राज्यपालानें ६ व्या परिच्छेदान्वयें केलेले नियम अंमलांत राहतील.

तसेंच उत्तर काचार व मिकिरच्या टेकड्या या विभागाचा डेप्युटी कमिशनर किंवा सबडिव्हिजनल ऑफिसर, या परिशिष्टाच्या २० व्या पारिच्छेदास जोडलेल्या कोष्टकाच्या (अ) विभागांतील कलम ५ व ६ यांत निर्दिष्ट केलेल्या मुलुखांपुरता, जिल्हा कौन्सिलचा पदसिद्ध अध्यक्ष राहील, आणि त्याला, जिल्हा कौन्सिल प्रथमतः अस्तित्वांत आल्यापासून सहा वर्षेपर्यंत, राज्यपालाच्या नियंत्रणाखालीं जिल्हा कौन्सिलचा एखादा ठराव अगर निर्णय रद्द करण्याची किंवा त्याला योग्य वाटतील त्या सूचना जिल्हा कौन्सिलला देण्याची सत्ता राहील आणि जिल्हा कौन्सिलनें यांपैकीं प्रत्येक सूचना अमलांत आणली पाहिजे.

३. जिल्हा कौन्सिलें व प्रादेशिक कौन्सिलें यांचे कायदे करण्याचे अधिकार—

(१) आपल्या प्रदेशांतील स्वायत्त मुलुखासाठीं, प्रादेशिक कौन्सिलला व आपल्या जिल्ह्यांतील स्वायत्त मुलुखांसाठीं, त्यांतील प्रादेशिक कौन्सिलच्या अधिकाराखालील प्रदेश वगळून जिल्हा कौन्सिलला, खालील बाबींसंबंधीं कायदे करण्याचा अधिकार आहे—

(अ) शेती, गुरेंचराईचीं कुरणें, वास्तव्य अगर शेतीविरहित इतर कामें यासाठीं, किंवा एखाद्या गांवांतील अथवा शहरांतील रहिवाशांच्या संभाव्य हितसंबंधांसाठीं राखीव जंगलाखेरीज इतर जमीन देणें, ताब्यांत घेणें, वापरणें अगर राखून ठेवणें;

मात्र आसाम सरकारला अशी जमीन ताब्यांत घेण्यासाठीं अधिकार देणारा कायदा अस्तित्वांत असेल तर सार्वजनिक कामासाठीं व्यापलेली अगर न व्यापलेली जमीन सक्तीनें कबज्यांत घेण्यास वरील कायद्यांचा प्रतिबंध होणार नाहीं;

(ब) राखीव जंगल नसलेल्या जंगलाची व्यवस्था;

(क) शेतकीसाठीं कालवे अगर पाट यांचा उपयोग;

(ड) झुम पद्धतीचें किंवा इतर आलटून पालटून करावयाच्या लागवडीच्या प्रकाराचें नियमन;

(इ) ग्रामपंचायती अथवा शहरसमित्या किंवा कौन्सिलें यांची स्थापना व त्यांचे अधिकार;

(फ) ग्राम अथवा शहरपोलीस, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता यांसह खेड्याच्या किंवा शहराच्या कारभारासंबंधींच्या इतर बाबी;
(ग) प्रमुखांची अगर नायकांची नेमणूक किंवा परंपरेची योजना,
(ह) मालमत्तेचा वारसा,
(ई) विवाह,
(ज) सामाजिक चालीरीती.

(२) या परिच्छेदांतील 'राखीव जंगल' याचा अर्थ १८९९ च्या आसाम जंगल कायद्यान्वयें अथवा त्या प्रदेशांत अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यान्वयें राखीव जंगल म्हणून नमूद केलेला कोणताहि प्रदेश.

(३) या परिच्छेदान्वयें केलेले सर्व कायदे तावडतोब राज्यपालाकडे पाठविले पाहिजेत व त्याची संमति आल्याशिवाय ते अंमलांत येऊं शकणार नाहींत.

(४) स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांतिल न्यायदानाची व्यवस्था:—(१) स्वायत्त प्रदेशांतील टापूसाठीं प्रादेशिक कौन्सिलला व आपल्या प्रदेशांत प्रादेशिक कौन्सिलच्या अमलाखालीं जर एखादा टापू असेल तर तो सोडून बाकीच्या स्वायत्त जिल्ह्यांतील टापूसाठीं जिल्हा कौन्सिलला आपल्या जिल्ह्यांत ग्रामपंचायती किंवा कोर्टे, ज्यांना या परिशिष्टांतील परिच्छेद ५ उपपरिच्छेद (१) मधील तरतुदी इतर कोर्टांना वगळून, लागू आहेत.

अशा दाव्या किंवा खटल्याव्यतिरिक्त त्या टापूंतील सर्वच जनजातीच्या असणाऱ्या पक्षापक्षांमधील दावे व खटले चालविण्याकरतां ग्रामपंचायती स्थापतां येतील. तसेंच अशा ग्रामपंचायतींचे सभासद म्हणून अथवा कोर्टाचे प्रमुख अधिकारी म्हणून योग्य माणसांची नेमणूक जिल्हा कौन्सिलें व प्रादेशिक कौन्सिलें करतील व या परिशिष्टांतील ३ च्या परिच्छेदानुसार केलेल्या त्या कायद्यांच्या अनुशासंनासाठीं जरूर ते अधिकारी नेमतील.

(२) या घटनेंत कांहींहि असलें तरी, स्वायत्त प्रदेशासाठीं असलेल्या प्रादेशिक कौन्सिलला अथवा प्रादेशिक कौन्सिलनें नेमलेल्या एखाद्या कोर्टाला, किंवा एखाद्या स्वायत्त जिल्ह्याच्या टापूंत असें प्रादेशिक कौन्सिल

नसेल तर त्या प्रदेशापुरतें जिल्हा कौन्सिलला अगर जिल्हा कौन्सिलनें नेमलेल्या एखाद्या कोर्टाला, या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदान्वयें अस्तित्वांत आलेल्या कोर्टांतफें अथवा ग्रामपंचायतीतफें जे खटले व कज्जे चालविले जातील त्यांच्या बाबतींत अपील कोर्टाचे अधिकार राहतील, मात्र या परिशिष्टाच्या ५ व्या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदाखाली येणारे कज्जे यांतून वगळले जातील, आणि राज्यांतील हायकोर्ट किंवा उच्चतम न्यायालय, याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कोर्टाला असे खटले किंवा कज्जे यासंबंधींचा सत्ताधिकार नाहीं.

(३) या परिच्छेदाच्या २ ऱ्या उपपरिच्छेदांतील तरतुदी राज्यपाल वेळोवेळ हुकूम काढून निर्दिष्ट करील त्याप्रमाणें ज्यांना लागूं होईल असे खटले व कज्जे चालविण्याचा अधिकार आसामच्या हायकोर्टाला राहील व तो अधिकार तें बजावील.

(४) प्रादेशिक कौन्सिल किंवा जिल्हा कौन्सिल राज्यपालाच्या अगाऊ संमतीनें पुढील बाबींचें नियमन करण्याकरतां नियम करील—

(अ) ग्रामपंचायती व कौन्सिलें यांची स्थापना आणि या परिच्छेदाप्रमाणें त्यांनीं बजावण्याची सत्ता;

(ब) या परिच्छेदांतील उपपरिच्छेद (१) मधील दावे व खटले चालवितांना ग्रामपंचायतीनीं व कोर्टांनीं अनुसरावयाची कार्यपद्धति;

(क) प्रादेशिक किंवा जिल्हा कौन्सिलनीं किंवा त्या कौन्सिलनीं स्थापलेल्या कोर्टांनीं अपिलांच्या बाबतींत व या परिच्छेदांतील उपपरिच्छेद (२) प्रमाणें काम चालवितांना कोणती पद्धत अनुसरावी त्याबद्दल

(ड) तशा कौन्सिलच्चे व कोर्टाचे हुकूम व न्यायनिवाडे कसे अंमलांत आणावे याबद्दल

(इ) या परिच्छेदांतील उपपरिच्छेद (१) व (२) मधील तरतुदी पार पाडण्याकरतां इतर अनुषंगिक गोष्टीबाबत.

५. १९०८ चा दिवाणी कामाचा कायदा व १८९८ चा फौजदारी कामाचा कायदा याखालीं, खटले, आणि दावे व गुन्हे यांच्या चौकशीसाठीं प्रादेशिक व जिल्हा कौन्सिलें, कांहीं कोर्टें व अधिकारी यांना देण्यांत येणारे अधिकार—

(१) एखादा स्वायत्त जिल्हा किंवा प्रदेश यांत अंमलांत असलेल्या व राज्यपालानें तसा निर्देश केलेल्या कायद्याखालीं, किंवा इंडियन पिनल कोड अथवा तो जिल्हा किंवा तो प्रदेश यांत तात्पुरता अंमलांत असलेला दुसरा कायदा याखालीं, ज्याला फांशी, जन्मठेप किंवा पांच वर्षांपेक्षां कमी नसलेली शिक्षा असेल अशा गुन्ह्यांचे खटले चालविण्यासाठीं, त्या जिल्ह्यांत किंवा प्रदेशांत सत्ता असलेलें त्या जिल्ह्याचें किंवा प्रदेशाचें कौन्सिल, किंवा अशा जिल्हा कौन्सिलनें स्थापलेलें कोर्ट किंवा त्या संबंधांत राज्यपालानें नेमलेला एखादा अधिकारी यांना १९०८ चें सिव्हिल प्रोसिजर कोड किंवा १८९८ चें क्रिमिनल प्रोसिजर कोड याखालील जरूर ते अधिकार त्याला योग्य वाटतील त्याप्रमाणें राज्यपाल देऊं शकेल. आणि त्यानंतर वरील कौन्सिल, कोर्ट अगर अधिकारी, त्यांना दिलेल्या अधिकारान्वयें, दावे किंवा कज्जे चालूं शकतील.

(२) या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदानुसार जिल्हा कौन्सिल, प्रादेशिक कौन्सिल, कोर्ट अगर अधिकारी यांना दिलेले सत्ताधिकार राज्यपाल काढून घेऊं शकेल किंवा त्यांत बदल करूं शकेल.

(३) परिच्छेदांत निःसंदिग्धपणें निर्दिष्ट केलेल्या बाबींखेरीज स्वायत्त जिल्हा किंवा स्वायत्त प्रदेश यांतील कोणताहि दावा, कज्जा किंवा गुन्हा यांच्या चौकशीबाबत १९०८ चा दिवाणी कामाचा कायदा १८९८ चा फौजदारी कामाचा कायदा लागू पडणार नाहीं; आणि असे खटले कोणत्या पद्धतीनें चालवावे यासंबंधीं राज्यपाल कामकाजाचे नियम ठरवील.

६. प्राथमिक शाळा वगैरे काढण्याचा जिल्हा कौन्सिलचा अधिकार

स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलला आपल्या जिल्ह्यांत प्राथमिक शाळा, दवाखाने, बाजार, कोंडवाडे, नदींतील नावा, मासे धरण्याचीं ठिकाणें, रस्ते व जलमार्ग या गोष्टी स्थापतां येतील, बांधतां येतील अगर त्यांची व्यवस्था पहातां येईल. विशेषतः जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षण कोणत्या भाषेंतून व कोणत्या पद्धतीनें देण्यांत यावें हेहि त्यांना ठरवितां येईल.

७. जिल्हा व प्रादेशिक निधि—(१) प्रत्येक स्वायत्त जिल्ह्यासाठीं एक जिल्हानिधि आणि प्रत्येक स्वायत्त प्रदेशासाठीं एक प्रदेशनिधि स्थापन

करण्यांत येईल. या घटनेच्या तजविजीनुसार त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलकडे व त्या त्या प्रदेशाच्या प्रादेशिक कौन्सिलकडे ज्या रकमा कारभाराबाबत येतील त्या त्या निधींत जमा केल्या जातील.

(२) जिल्हानिधि किंवा प्रदेशानिधि यांच्या व्यवस्थेसाठीं जिल्हा कौन्सिलला अथवा प्रादेशिक कौन्सिलला, राज्यपालाच्या मंजुरीनें, नियम करतां येतील, आणि अशा तऱ्हेनें केलेले नियम पैसे भरणें, काढणें, त्यांचें रक्षण करणें व वरील बाबीशीं संबंधित व अनुषंगिक गोष्टी करण्याची कार्य-पद्धति ठरवून देतील.

८. जमीनमहसूल ठरविणें, जमा करणें व कर बसाविणें यां-संबंधींचे अधिकार—(१) स्वायत्त प्रदेशांतील सर्व जमिनीबाबत प्रादेशिक कौन्सिलला आणि प्रादेशिक कौन्सिलच्या अधिकाराखालील असलेंच तर क्षेत्र वगळून स्वायत्त जिल्ह्यांतील सर्व जमिनीबाबत जिल्हा कौन्सिलला, आसामधील जमीनमहसुलाच्या बाबतींत सर्वसामान्यपणें आसाम सरकार त्या वेळीं ज्या तत्त्वानें चालत असेल त्या तत्त्वानुसार, या जमिनींचा सारा ठरविण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार राहील.

(२) आपल्या टापूंतील स्वायत्त प्रदेशाबाबत प्रादेशिक कौन्सिल व प्रादेशिक कौन्सिलच्या अधिकाराखालीं असलेलें क्षेत्र वगळून स्वायत्त जिल्ह्याचें जिल्हा कौन्सिल यांना जमिनी व इमारती यांवर कर बसाविणें व वसूल करणें आणि या क्षेत्रांतील रहिवाशांवर पट्टी बसाविणें व वसूल करणें हे अधिकार रहातील.

(३) स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलला आपल्या जिल्ह्यांत पुढील-पैकीं किंवा कोणतेहि कर बसाविण्याचा आणि वसूल करण्याचा अधिकार राहील:—

[अ] व्यवसाय, व्यापार, उद्योग व नोकरी यांवर कर;

[ब] जनावरें, वाहनें व नावा यांवर कर;

[क] बाजारांत विक्रीसाठीं येणाऱ्या मालावर कर आणि नावांतून वाहतूक केले जाणारे उतारू व माल यांवर पट्टी; आणि

[ड] शाळा, दवाखाने व रस्ते सुस्थितींत ठेवण्यासाठीं कर.

(४) या परिच्छेदाच्या (२) व (३) उपपरिच्छेदांत नमूद केलेले

कर बसविण्यासाठीं व त्यांची वसुली करण्यासाठीं प्रादेशिक कौन्सिल अगर जिल्हा कौन्सिल यांना नियम करतां येतील.

९. खनिज संपत्तीची पहाणी अगर उत्खनन करण्यासाठीं परवाने अगर कौलनामे—(१) एखाद्या स्वायत्त जिल्ह्याच्या क्षेत्रांत खनिज संपत्तीची पहाणी अगर उत्खनन यासाठीं आसाम सरकारनें दिलेले परवाने अगर कौलनामे यांच्यापासून दरवर्षी जें मालकी हक्काचें उत्पन्न येईल त्या उत्पन्नाचा वांटा आसाम सरकार व त्या जिल्ह्याचें जिल्हा कौन्सिल यांच्यामध्यें जो ठरेल तेवढाच जिल्हा कौन्सिलला देण्यांत येईल.

(२) जिल्हा कौन्सिलला दिल्या जाणाऱ्या मालकी हक्काच्या रकमेंच्या वांट्यासंबंधीं जर कांहीं तंटा उद्भवला, तर तो निर्णयासाठीं राज्यपालाकडे सोंपविण्यांत येईल आणि राज्यपालानें सारासार विचारानें ठरविलेली रक्कम या पारिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदान्वयें जिल्हा कौन्सिलला यावयाची रक्कम असें समजलें जाईल आणि राज्यपालाचा हा निर्णय अखेरचा समजण्यांत येईल.

१०. जनजातिव्यतिरिक्त अन्य लोकांनीं सावकारी व व्यापार करण्याबाबत नियंत्रण करणारे नियम करण्याची सत्ता—(१) जिल्ह्याच्या क्षेत्रांत रहात असलेल्या अनुसूचित जनजातीखेरीज इतर जातींनीं आपल्या जिल्ह्यांत सावकारी किंवा व्यापार सुरू केल्यास त्याचें नियमन करण्यासाठीं स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलला नियम करतां येतील.

(२) विशेषतः आणि सर्वसाधारणपणें वरील सत्तेला बाध न येतां अशा नियमान्वयें,

[अ] सावकारी करण्याचा परवाना असल्याखेरीज कोणालाहि सावकारी करतां येणार नाहीं असें सांगतां येईल;

[ब] सावकारानें आकारावयाच्या व वसूल करावयाच्या व्याजाचा जास्तींत जास्त दर ठरवितां येईल;

[क] सावकारांनीं हिशेब ठेवावे व त्यांचे हिशेब जिल्हा कौन्सिलनें नेमलेल्या अधिकाऱ्यांनीं तपासावे, अशी व्यवस्था करतां येईल;

[ड] या जिल्ह्यांत रहाणाऱ्या अनुसूचित जनजातीबाहेरच्या कोणाहि

इसमाला जिल्हा कौन्सिलच्या परवान्याखेरीज, कोणत्याहि वस्तूचा ठोक अगर किरकोळ व्यापार करतां येणार नाहीं, असें ठरवितां येईल;

मात्र, जिल्हा कौन्सिलच्या एकूण सभासदसंख्येपैकीं किमान तीन चतुर्थांश बहुमतानें पास झाल्याशिवाय, या परिच्छेदान्वयें असे नियम करतां येणार नाहींत.

त्याचप्रमाणें सदर नियम करण्यापूर्वी त्या जिल्ह्यांत सावकारी अगर व्यापार करीत असलेल्या कोणाहि इसमास या नियमान्वयें परवाना देण्याचें नाकारतां येणार नाहीं.

(३) या परिच्छेदान्वयें केलेले सर्व नियम तावडतोब राज्यपालाकडे सादर केले पाहिजेत व त्याच्या संमतीशिवाय ते अंमलांत येऊं शकणार नाहीं.

११. या परिशिष्टानुसार केलेले कायदे, कानू व नियम यांचें प्रसिद्धीकरण—या परिशिष्टान्वयें जिल्हा कौन्सिल अगर प्रादेशिक कौन्सिल यांनीं केलेले कायदे, कानू व नियम राज्याच्या सरकारी गॅझेटमध्यें तावडतोब प्रसिद्ध केले पाहिजेत आणि ते तसे प्रसिद्ध झाल्यावरच त्यांना कायदेशीरपणा प्राप्त होईल.

१२. पार्लमेंट आणि राज्याची विधानसभा यांचे कायदे स्वायत्त जिल्हे आणि स्वायत्त प्रदेश यांना लागू करणें—(१) या घटनेंत कांहींहि असलें तरी

(अ) या परिशिष्टाच्या तिसऱ्या परिच्छेदामध्यें, जिल्हा कौन्सिल अगर प्रादेशिक कौन्सिल यांनीं ज्याबाबत कायदे करण्यास हरकत नाहीं, म्हणून ज्या बाबींचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्या बाबींसंबंधीचे राज्याच्या विधानसभेनें केलेले कायदे आणि बिनगाळलेली मादक दारू पिण्याला बंदी करणारे किंवा त्यावर नियंत्रण घालणारे राज्याच्या विधानसभेनें केलेले कायदे, जिल्हा कौन्सिलनें जाहीरनामा काढून तसा निर्देश केल्याशिवाय स्वायत्त जिल्हा किंवा जिल्हा कौन्सिलला अधिकारक्षेत्र असलेला स्वायत्त प्रदेश यांना लागू होणार नाहींत आणि जिल्हा कौन्सिल कोणत्याहि कायद्यासंबंधीं तसा निर्देश देतांना, तसा एखादा कायदा तो जिल्हा,

प्रदेश किंवा त्याचा कांहीं भाग यांना लागू होतांना कांहीं विशिष्ट अपवादांसह किंवा दुरुस्त्यासह परिणामक्षम होईल असें जिल्हा कौन्सिल जाहीर करूं शकेल.

[ब] या उपपरिच्छेदाच्या (अ) उपकलमांतील तरतुदी ज्याला लागू नाहींत असा पार्लमेंटचा किंवा राज्याच्या विधानसभेचा एखादा कायदा एखाद्या स्वायत्त जिल्ह्याला किंवा स्वायत्त प्रदेशाला लागू होणार नाहीं, असें जाहीरनामा काढून राज्यपाल निर्दिष्ट करूं शकेल अगर जाहीरनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या दुरुस्त्यांसह किंवा अपवादांसह वरील कायदे एखाद्या स्वायत्त जिल्ह्याला, प्रदेशाला अगर त्याच्या एखाद्या भागाला राज्यपाल लागू आहेत असें निर्दिष्ट करू शकेल.

(२) या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदांत दिलेल्या सूचना गत-कालसापेक्ष असाव्यात.

१३. वार्षिक अंदाजपत्रकांत स्वायत्त जिल्ह्याच्या अंदाजी जमाखर्चाची स्वतंत्रपणें नोंद करणें:—

आसाम सरकारच्या संचित निधींत जमा होणाऱ्या अगर त्यांतून खर्च होणाऱ्या, स्वायत्त जिल्ह्याच्या अंदाजपत्रकांतील जमाखर्चाच्या रकमा प्रथम चर्चेसाठीं जिल्हा कौन्सिलपुढें ठेवल्या पाहिजेत आणि चर्चेनंतर हे जमा-खर्चाचे आंकडे, २०२ कलमान्वयें राज्याच्या विधानसभेपुढे ठेवावयाच्या वार्षिक अंदाजपत्रकांत स्वतंत्रपणें दाखविण्यांत आले पाहिजेत.

१४. स्वायत्त जिल्हे आणि स्वायत्त प्रदेश यांच्या कारभाराची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठीं कमिशनची नेमणूक:—

(१) राज्यांतील स्वायत्त जिल्ह्यांचा व स्वायत्त प्रदेशांचा कारभार व तत्संबंधींच्या त्यांनीं निर्दिष्ट केलेल्या कांहीं बाबी तसेंच या परिशिष्टाच्या १ ल्या परिच्छेदांतील ३ ऱ्या उपपरिच्छेदांतील (क) (ड) (इ) (फ) या कलमांत निर्दिष्ट केलेल्या बाबींचीहि तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठीं राज्यपालाला कोणत्याहि वेळीं कमिशन नेमतां येईल, किंवा स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांच्या कारभाराची सर्वसाधारणपणें व विशेषतः खालील बाबतींत चौकशी करण्यासाठीं व वेळोवेळीं अहवाल सादर करण्यासाठीं त्याला कमिशनची नेमणूक करतां येईल.

[अ] त्या जिल्ह्यांतील व प्रदेशांतील शैक्षणिक, आरोग्यविषयक व दळणवळणांची व्यवस्था,

[ब] हे जिल्हे आणि प्रदेश यांच्याबाबत कांहीं नवीन व विशिष्ट कायद्याची आवश्यकता; आणि

[क] जिल्हा व प्रादेशिक कौन्सिलांनीं केलेले कायदे, कानू व नियम यांचें अनुशासन आणि या कमिशननें कोणत्या पद्धतीनें कामकाज करावें हें राज्यपालच सांगेल.

(२) अशा प्रत्येक कमिशनचा अहवाल, राज्यपालानें केलेल्या शिफारसींसह, तद्विषयक मंत्र्यानें राज्याच्या विधानसभेपुढें ठेवला पाहिजे व त्या बाबतींत आसाम सरकारनें काय करण्याचें योजिलें आहे यासंबंधींचें खुलासापत्रकहि सादर केलें पाहिजे.

(३) आपल्या मंत्र्यामध्यें राज्यांतील सरकारी कामाची वांटणी करतांना, आपल्या राज्यांतील स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांच्या हितसंवर्धनासाठीं राज्यपालानें एका मंत्र्याची खास नेमणूक करावी.

१५. जिल्हा किंवा प्रादेशिक कौन्सिलें यांनीं केलेले कायदे व ठराव रद्द करणें किंवा तहकूब ठेवणें:—(१) एखाद्या जिल्हा कौन्सिलचा किंवा प्रादेशिक कौन्सिलचा एखादा कायदा किंवा ठराव भारताच्या सुरक्षिततेस बाधक होण्याचा संभव आहे अशी कोणत्याहि वेळीं राज्यपालाची खात्री पटल्यास तो कायदा किंवा ठराव त्याला रद्द करतां येईल, किंवा तहकूब ठेवतां येईल आणि अशा ठरावाच्या अंमलबजावणीस किंवा तो कायदा चालू ठेवण्यास अगर बजावण्यास प्रतिबंध करण्यासाठीं (कौन्सिल स्थगित करणें, त्याचे सर्व किंवा कांहीं अधिकार स्वत:च्या हातीं घेणें अशासारखी) त्याला जरूर वाटेल ती उपाययोजना तो करूं शकेल.

(२) या परिच्छेदाच्या (१) उपपरिच्छेदान्वयें राज्यपालानें काढलेला हुकूम, त्याच्या कारणासह शक्य तों लवकर राज्याच्या विधानसभेपुढें ठेवण्यांत आला पाहिजे आणि विधानसभेनें तो हुकूम परत घेतला नाहीं तर तो काढल्यापासून बारा महिनेपर्यंत अंमलांत राहील.

मात्र राज्याची विधानसभा जर आणि जेव्हां असा हुकूम चालू रहाण्याबद्दलच्या पसंतीचा ठराव पास करील तर राज्यपालानें रद्द न

केल्यास तो हुकूम काढल्यापासून ज्या तारखेला या परिच्छेदान्वये येईल तो रद्द झाला असता तेथून तो अंमलांत राहील.

१६. जिल्हा किंवा प्रादेशिक कौन्सिल बरखास्त करणें:—

या परिशिष्टाच्या १४ व्या परिच्छेदानुसार नेमलेल्या कमिशननें जर शिफारस केली तर राज्यपाल जाहीरनामा काढून एखादें जिल्हा अगर प्रादेशिक कौन्सिल बरखास्त करण्याचा हुकूम काढूं शकेल, आणि

(अ) त्या कौन्सिलच्या पुनर्घटनेसाठीं ताबडतोब सार्वत्रिक निवडणुका कराव्यात असा आदेश देऊं शकेल, अथवा,

(आ) राज्याच्या विधानसभेच्या पूर्वसंमतीनुसार अशा कौन्सिलच्या अधिकाराखालील क्षेत्राचा कारभार तो आपल्या हातीं घेऊं शकेल, अथवा वरील परिच्छेदान्वयें नेमलेल्या कमिशनकडे किंवा त्याला योग्य वाटेल त्या दुसऱ्या एखाद्या संस्थेकडे जास्तींत जास्त बारा महिनेपर्यंत तो कारभार सोपवूं शकेल.

मात्र, जेव्हां या परिच्छेदाच्या (अ) उपकलमान्वयें हुकूम काढण्यांत आलेला असेल तेव्हां, नवीन सार्वत्रिक निवडणुका होऊन कौन्सिलची पुनर्घटना होईपर्यंत, या परिच्छेदाच्या (ब) कलमांत निर्देशिल्याप्रमाणें वरील क्षेत्राच्या कारभारासंबंधींची आणखी उपाययोजना राज्यपाल करील.

तसेंच, जिल्हा अगर प्रादेशिक कौन्सिलला, राज्याच्या विधानसभेपुढें आपलें म्हणणें मांडण्याची संधि दिल्याखेरीज या परिच्छेदाच्या (ब) उपकलमांप्रमाणें उपाययोजना करतां येणार नाहीं.

१७. अशा जिल्ह्यांत मतदारसंघ निर्माण करतांना स्वायत्त जिल्ह्यांतून भाग वगळणें:—

आसामच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीकरतां राज्यपाल हुकुमान्वयें असें जाहीर करू शकेल कीं, स्वायत्त जिल्ह्यांतील एखादा टापू, कायदेमंडळांतील विशिष्ट जिल्ह्यांसाठीं राखून ठेवलेल्या एक किंवा अधिक जागा भरण्याच्या दृष्टीनें मतदारसंघाचा विभाग होऊं शकणार नाहीं.

१८. या परिशिष्टाच्या २० व्या कलमाला जोडलेल्या कोष्टकाच्या (ब) विभागांत निर्दिष्ट केलेल्या टापूंना या परिशिष्टांतील तरतुदी लागू करणें:—

(१) राज्यपाल

[अ] राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीनुसार जाहीरनामा काढून, या परिशिष्टांतील पूर्वनिर्दिष्ट सर्व किंवा कांहीं तरतुदी, या परिशिष्टाच्या २० व्या कलमाला जोडलेल्या कोष्टकाच्या (ब) विभागांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि जनजाति प्रदेशाला अगर त्याच्या कोणत्याहि भागाला लागू करूं शकेल आणि त्यानंतर वरील तरतुदीप्रमाणें तो प्रदेश किंवा तो भाग यांचा कारभार चालवितां येईल, आणि

[ब] राष्ट्रपतीच्या तशाच पूर्वसंमतीनें जाहीरनामा काढून वरील कोष्टकाच्या (ब) विभागांत निर्देशिलेला जनजाति प्रदेश किंवा त्याचा एखादा भाग त्या कोष्टकांतून वगळूं शकेल.

(२) या परिच्छेदाच्या (१) उपपरिच्छेदान्वयें या कोष्टकाच्या (ब) विभागांत निर्दिष्ट केलेल्या जनजाति प्रदेशाबद्दल अगर त्याच्या विभागाबद्दल जाहीरनामा काढण्यापूर्वी या प्रदेशाचा अगर भागाचा कारभार, आसामच्या राज्यपालाच्या द्वारें त्यास आपला प्रतिनिधि समजून, राष्ट्रपति चालवूं शकेल, आणि या घटनेच्या ९ व्या भागांतील सर्व कलमें, जणूं काय तो प्रदेश किंवा त्याचा भाग पहिल्या परिशिष्टाच्या (ड) विभागांत निर्दिष्ट केलेल्या मुलुखाप्रमाणेंच आहे असें समजून, त्यास लागू होतील.

(३) ह्या परिच्छेदाच्या (२) उपपरिच्छेदान्वयें राष्ट्रपतीचा प्रतिनिधि या नात्यानें काम करीत असतांना राज्यपाल विवेचक बुद्धीनें (डिस्क्रीशन) कारभार करील.

१९. संक्रमणकालीन तरतुदी:—(१) ही घटना सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर आसामचा राज्यपाल त्या परिशिष्टांतील राज्यांच्या प्रत्येक स्वायत्त जिल्ह्यासाठीं असें जिल्हा कौन्सिल स्थापन करण्याची व्यवस्था करील; आणि ती स्थापना होईपर्यंत त्या जिल्ह्याचा कारभार राज्यपालाच्या हातीं राहील आणि अशा जिल्ह्यांतील टापूंच्या कारभाराला, या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या कलमांऐवजीं पुढील कलमें लागू होतील.

(अ) राज्यपालानें जाहीरनाम्यान्वयें तसा आदेश दिल्याखेरीज पार्लमेंटचा किंवा राज्याच्या विधान सभेचा कोणताहि कायदा त्या टापूला लागू होणार नाहीं; आणि एखाद्या कायद्यासंबंधीं आदेश देतांना राज्यपालाला योग्य

वाटतील त्या अपवादांसह किंवा दुरुस्त्यांसह त्या प्रदेशाला किंवा त्यांतील विशिष्ट भागाला तो लागू होईल असें सांगू शकेल.

[ब] अशा प्रदेशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यपाल नियम करूं शकेल आणि अशा प्रकारें केलेल्या नियमामुळें पार्लमेंटचा किंवा कायदेमंडळाचा कोणताहि कायदा किंवा तात्पुरता त्या प्रदेशाला लागू असलेला कोणताहि कायदा रद्द अगर दुरुस्त होऊं शकेल.

(२) या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदांतील [अ] उपकलमान्वयें राज्यपालानें दिलेला आदेश गतकालसापेक्ष असूं शकेल.

(३) या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदांतील उपकलम (ब) प्रमाणें केलेले सर्व नियम तावडतोब राष्ट्रपतीला सादर केले पाहिजेत आणि त्यानें संमति दिल्याशिवाय त्यांना कायदेशीरपणा प्राप्त होणार नाहीं.

२० जनजाति प्रदेश—(१) खालीं दिलेल्या कोष्टकाच्या [अ] व [ब] विभागांत दाखविलेले प्रदेश आसाम राज्यांतील जनजाति प्रदेश समजले जातील.

(२) ही घटना सुरू होण्यापूर्वी खासी संस्थानें आणि खासी व जैनतिया पहाडी जिल्हे म्हणून जो प्रदेश ओळखला जात होता, त्या प्रदेशाचा संयुक्त खासी जैनतिया पहाडी जिल्हा तयार होईल, मात्र शिलांग म्युनिसिपालिटी व कॅंटोनमेंट यांत त्या वेळीं अंतर्भूत असलेला प्रदेश या जिल्ह्यांत येणार नाहीं, पण मैलेमच्या खासी संस्थानचा जेवढा विभाग शिलांग म्युनिसिपालिटींत सामील होता ता भाग या जिल्ह्यांत समाविष्ट होईल.

मात्र या परिशिष्टाच्या ३ ऱ्या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदांतील [इ] व [फ] हीं कलमें ४ था, ५ वा, व ६ वा परिच्छेद, ८ व्या परिच्छेदाचा २ रा उपपरिच्छेद, तिसऱ्या उपपरिच्छेदांतील [अ] [ब] [इ] हीं उपकलमें, ४ था उपपरिच्छेद, १० व्या परिच्छेदाच्या २ ऱ्या उपपरिच्छेदांतील (ड) उपकलम —याकरतां शिलांग म्युनिसिपालिटीच्या क्षेत्रांतील कोणताहि भाग जिल्ह्यांत आहे असें समजलें जाणार नाहीं.

(३) खालील कोष्टकांत जेथें जिल्ह्याचा (संयुक्त खासा जैनतिया पहाडी जिल्हा वगळून) किंवा राज्यकारभाराच्या टापूंचा उल्लेख आहे तेथें ते

उल्लेख, ही घटना सुरू होतांना त्या जिल्ह्याचा किंवा टापूचा निदर्शक समजला जाईल.

मात्र, खालीं दिलेल्या कोष्टकांच्या ब भागांत निर्दिष्ट केलेल्या जनजाति क्षेत्रामध्यें, आसामचा राज्यपाल राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीनें त्यासंबंधीं जाहीर करील ते सपाटीवरील प्रदेश अंतर्भूत होणार नाहींत.

कोष्टक

[अ] विभाग

१ संयुक्त खासी–जैनातिया पहाडी जिल्हा.
२ गारो पहाडी जिल्हा.
३ लुशाई पहाडी जिल्हा.
४ नागा पहाडी जिल्हा.
५ उत्तर काचार पहाड.
६ मिकिर पहाड.

[ब] विभाग

१.ईशान्य सरहद्द प्रदेश, यांत बालिपारा सरहद्द प्रदेश, तिराप सरहद्द प्रदेश, अबोर पहाडी जिल्हा, मिसिमी पहाडी जिल्हा, हे प्रदेश समाविष्ट आहेत.

२. नागा जनजाति प्रदेश.

२१. परिशिष्टाला दुरुस्ती—(१) पार्लमेंट या परिशिष्टांतील कलमें, त्यांत भर घालणें, बदल करणें, किंवा रद्द करणें या पद्धतीनें, दुरुस्त करील आणि हें परिशिष्ट अशा प्रकारें दुरुस्त झाल्यावर या घटनेंत जेव्हां जेव्हां या परिशिष्टाचा उल्लेख येईल तेव्हां तेव्हां तो उल्लेख दुरुस्त परिशिष्टाला अनुलक्षून आहे असें समजावें.

(२) या परिच्छेदाच्या १ ल्या उपपरिच्छेदांत निर्देशिलेला कोणताहि कायदा ३६८ कलमाच्या दृष्टीनें घटनेंतील दुरुस्तीचा कायदा आहे असें समजलें जाणार नाहीं.

परिशिष्ट : ७

(कलम २४६)

विषयसूची : १–संघसूची

१ भारत आणि त्याचा प्रत्येक भाग यांचें संरक्षण आणि संरक्षणाची तयारी, त्याचप्रमाणें युद्धकाळांत युद्ध चालविण्यास आणि युद्धसमातीनंतर सैन्याच्या परिणामकारक विसर्जनास सहाय्यक होतील अशा बाबी.

२. लष्कर, आरमार आणि हवाईदल; तसेंच संघराज्याचें अन्य सशस्त्र सेनाबळ.

३. कँटोनमेंट भागाच्या मर्यादा ठरविणें, त्या भागांतील स्थानिक स्वराज्य, कँटोनमेंट भागांतील शासनसंस्थांची सत्ता व रचना, तसेंच त्या भागांतील राहण्याकरतां घरांचें व घरभाड्याचे नियंत्रणासह नियमन करणें.

४. आरमारी, लष्करी व हवाई दलांचे कारखाने.

५. हत्यारें, बंदुका, दारूगोळा व स्फोटक द्रव्यें.

६. अणुशक्ति आणि ती उत्पन्न करण्यास जरूर असलेली खनिज संपत्ति

७. संरक्षणासाठीं किंवा युद्धकार्यासाठीं पार्लमेंटनें कायद्यान्वयें आवश्यक म्हणून जाहीर केलेले उद्योगधंदे.

८. मध्यवर्ती गुप्त पोलीसखातें आणि गुप्त चौकशीखातें.

९. राष्ट्रीय संरक्षण, परराष्ट्रीय व्यवहार अथवा भारताची सुरक्षितता यांच्याशीं संबंधित असलेल्या कारणासाठीं गुन्हाप्रतिबंधक अटक; अशा अटक झालेल्या व्यक्ति.

१०. परराष्ट्रीय राजकारण; संघराज्याचा कोणत्याहि परकीय राष्ट्राशीं संबंध आणणाऱ्या बाबी.

११. राजनैतिक, परराष्ट्रीय व व्यापारविषयक प्रातिनिधित्व.

१३. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो)

१३. आंतरराष्ट्रीय परिषदा, मंडळें व इतर संस्था यांत सहभागी होणें व त्यांत घेतलेले निर्णय कार्यवाहींत आणणें.

१४. परकीय राष्ट्रांबरोबर तहनामे व करारनामे करणें आणि परराष्ट्रांशीं केलेले तह, करार व संविधानें अंमलांत आणणें.

१५. युद्ध आणि शांतता.
१६. परराष्ट्रीय अधिकारक्षेत्र.
१७. नागरिकत्व, स्थायिकत्व व परकीयत्व
१८. देशांतून निष्कासन.
१९. हिंदुस्थानांत प्रवेश, व हिंदुस्थानांतून बहिर्गमन आणि हकालपट्टी, परदेशीय परवाने (पासपोर्ट) व प्रवासनामे (व्हिसा)
२०. हिंदुस्थानाबाहेरील ठिकाणच्या यात्रा.
२१. समुद्रांतील किंवा आकाशांतील चांचेगिरी अगर गुन्हे; राष्ट्रांच्या कायद्याविरुद्ध जमिनीवर किंवा समुद्रांत किंवा आकाशांत घडलेले गुन्हे.
२२. आगगाड्या.
२३. पार्लमेंटनें कायद्यान्वयें अथवा कायद्याखालीं राष्ट्रीय रस्ते म्हणून जाहीर केलेले खुष्कीचे मार्ग.
२४. राष्ट्रीय जलमार्ग म्हणून पार्लमेंटनें कायद्यानें जाहीर केलेल्या अंतर्गत जलमार्गांवरील यंत्रानें चालणाऱ्या जहाजांची वाहतूक व नौकानयन; अशा जलमार्गांवर खुष्कीचे नियम.
२५. किनाऱ्यावरील वहातुकीसुद्धां दर्यावर्दी नौकानयन व नाविक वाहतूक; व्यापारी नौकानयनाचें शिक्षण आणि राज्य व इतर संस्था यांच्या द्वारें दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचें नियंत्रण.
२६. जहाजें व विमानें यांच्या सुरक्षिततेसाठीं दीपगृहें, नौकादीप, शोध-ज्योति व इतर साधनें.
२७. पार्लमेंटच्या कायद्यानुसार किंवा कायद्यान्वयें अगर विद्यमान कायद्यानुसार किंवा कायद्यान्वयें जाहीर केलेलीं मुख्य बंदरें; त्याचप्रमाणें त्यांच्या क्षेत्रमर्यादा ठरविणें व बंदरावरील अधिकाऱ्यांची अधिकार-कक्षा निश्चित करणें.
२८. बंदरांतील क्वारंटाईन व त्यासंबंधींचीं रुग्णालयें; खलाशांचीं व समुद्रावरील रुग्णालयें.
२९. हवाई मार्ग; विमानें आणि वैमानिक वहातूक; विमानदळांची योजना; हवाई वहातूक व विमानतळ यांची व्यवस्था व नियमन;

वैमानिक शिक्षणाची व अध्यापनाची सोय; राज्य किंवा अन्य संस्था यांच्या द्वारें दिल्या जाणाऱ्या वैमानिक शिक्षणाचें नियमन.

३०. समुद्रांतून, आकाशांतून अगर रेल्वेनें, तसेंच यंत्रचलित नौकांतून राष्ट्रीय जलमार्गांच्या द्वारें उतारू व माल यांची वाहतूक.

३१. पोस्ट व टेलिग्राफ; टेलिफोन व विनतारी तारायंत्र, नभोवाणी व संदेशवाहनाचे तसलेच इतर प्रकार.

३२. संघराज्याची मालमत्ता आणि त्यापासून येणारें उत्पन्न; अशी मालमत्ता पहिल्या परिशिष्टाच्या (अ) किंवा (ब) भागांत निर्दिष्ट केलेल्या राज्यांत असल्यास, पार्लमेंटनें निराळ्या कायद्याची तजवीज केली नसेल तर त्या राज्याचा कायदा तिला लागू होतो.

३३. संघराज्यासाठीं मालमत्ता संपादन करणें अगर कायद्यानें ताब्यांत घेणें.

३४. हिंदी संस्थानिकांच्या मालमत्तेसाठीं कोर्ट ऑफ वॉर्ड्स.

३५. संघराज्याचें राष्ट्रीय कर्ज.

३६. चलन, नाणीं व कायदेशीर विनिमयसाधन; परदेशी हुंडणावळ.

३७. परराष्ट्रीय कर्ज.

३८. हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक.

३९. पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक.

४०. हिंदुस्थान सरकारनें अगर राज्याच्या एखाद्या सरकारनें काढलेली लॉटरी.

४१. परराष्ट्रांशीं व्यापार व देवघेव; कस्टम सरहद्दीवरून आयात व निर्यात व्यापार, कस्टम सरहद्दींची व्याख्या.

४२. अंतर्गत व्यापार व देवघेव.

४३. सहकारी संस्थांचा ज्यांत समावेश नाहीं अशा बँका, विमा कंपन्या, व आर्थिक मंडळें आणि व्यापारी संस्था यांची: स्थापना, नियमन व विसर्जन.

४४. विद्यापीठांचा ज्यांत समावेश नाहीं अशा एकाच प्रांताशीं संलग्न नसलेल्या व ज्यांचा उद्देश व्यापार करण्याचा असो अगर नसो, अशा संस्थांची स्थापना, नियमन व विसर्जन.

४५. बँकांचे व्यवहार.

४६. हुंड्या, चेक, प्रॉमिसरी नोटा आणि तत्सम कागदपत्रें.

४७. विमा.
४८. स्टॉक एक्स्चेंज व वायदेबाजार.
४९. पेटंट, संशोधनें व डिझाइन, कॉपीराइट, ट्रेडमार्क व व्यापारी बोधचिन्हें,
५०. वजनें आणि मापें यांचें एक प्रमाण ठरविणें.
५१. हिंदुस्थानाबाहेर निर्माण होणाऱ्या अगर एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत जाणाऱ्या मालाच्या दर्जाचें गुणप्रमाण निश्चित करणें.
५२. सार्वजनिक हितासाठीं पार्लमेंटनें कायद्यान्वयें ज्या उद्योगधंद्यांचें नियंत्रण जाहीर केलें आहे असे उद्योगधंदे.
५३. तेलाच्या विहिरी व खनिज तेलांच्या खाणी, तसेंच पेट्रोल व पेट्रोल-पासून होणारे पदार्थ आणि पार्लमेंटनें कायदा करून भयंकर ज्वाला-ग्राही ठरविलेलीं द्रव्यें व पदार्थ, यांचें नियमन व वाढ.
५४. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें पार्लमेंटनें कायद्यान्वयें खाणी व खनिज द्रव्यें यांचें नियंत्रण व वाढ जरूर आहे असें जाहीर केलें असेल तर त्यांचें नियंत्रण व वाढ.
५५. खाणी व तेलाच्या विहिरी यांतील कामगारांचें काम व सुरक्षितता यांचें नियमन.
५६. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें पार्लमेंटनें कायदा करून आंतरराज्यीय नद्या व नद्यांचीं खोरीं यांचें नियमन व वाढ हीं जाहीर/केलीं अस-तील तर संघराज्यानें आपल्या अंमलाखालील नद्या व नद्यांचीं खोरीं यांचें नियमन व वाढ करणें.
५७. जलप्रांगणाबाहेर मच्छीमारी व मासळीचें उत्पादन.
५८. संघराज्याच्या एजन्सीमार्फत मिठाचें उत्पादन, पुरवठा व वांटप, इतर संस्थांनीं तयार केलेल्या मिठाचें उत्पादन, पुरवठा व वांटप यांचें नियमन आणि नियंत्रण.
५९. निर्यातीकरतां अफूची लागवड, उत्पादन व विक्री.
६०. सिनेमा फिल्म्स दाखविण्याची मंजुरी.
६१. संघांतील नोकरांसंबंधींचे औद्योगिक कलह.
६२. या घटनेच्या सुरवातीच्या दिवशीं नॅशनल लायब्ररी, इंडियन म्युझियम, इंपीरियल वॉर म्युझियम, व्हिक्टोरिया मेमोरियल व

इंडियन वॉर मेमोरियल या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या संस्था, तसेंच पार्लमेंटनें कायदा करून राष्ट्रीय महत्त्वाच्या ठरविलेल्या व हिंदुस्थान सरकारच्या पूर्णतः किंवा अंशतः पार्थिक सहाय्यानें चालणाऱ्या तत्सम संस्था.

६३. या घटनेच्या प्रारंभाच्या दिवशीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, अलिगड मुस्लीम युनिव्हार्सिटी या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या संस्था, तसेंच पार्लमेंटनें कायद्यान्वयें राष्ट्रीय महत्त्वाच्या म्हणून जाहीर केलेल्या तत्सम संस्था.

६४. हिंदुस्थान सरकारच्या पूर्णतः किंवा अंशतः आर्थिक सहाय्यें चाललेल्या व पार्लमेंटनें कायद्यान्वयें राष्ट्रीय महत्त्वाच्या म्हणून जाहीर केलेल्या शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणसंस्था.

६५. पुढील कामाकरतां संघाच्या एजन्सीज व संस्था—(अ) धंदे-शिक्षणविषयक, अगर विशिष्ट तंत्रज्ञान देणाऱ्या संस्था, तसेंच पोलीस अधिकाऱ्यांसाठीं अध्यापनशाला, (ब) विशिष्ट अभ्यासाचा अगर संशोधनाचा पुरस्कार, (क) गुन्ह्यांची चौकशी अगर तलास लावण्यासाठीं शास्त्रीय व तंत्रविषयक सहाय्य.

६६. उच्च शिक्षणाच्या किंवा संशोधनाच्या संस्था यांचा दर्जा ठरविणें व त्यांचें एकसूत्रीकरण आणि शास्त्रीय व तांत्रिक संस्था.

६७. पार्लमेंटनें कायद्यान्वयें राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर केलेलीं प्राचीन व ऐतिहासिक स्मारकें आणि कागदपत्र.

६८. सर्व्हे ऑफ इंडिया, जिऑलॉजिकल (भूगर्भशास्त्राविषयक), बोटॅनिकल (वनस्पतिशास्त्राविषयक), झूऑलॉजिकल (प्राणिशास्त्रविषयक), ॲन्थ्रापॉलॉजिकल (मानववंशशास्त्रविषयक) आणि मीटिओरॉलॉजिकल (हवामानशास्त्राविषयक) संस्था.

६९. खानेसुमारी.

७०. संघराज्याच्या सरकारी नोकऱ्या, अखिलभारतीय नोकऱ्या, संघराज्याचें सरकारी नोकऱ्यांचें नेमणूक-मंडळ.

७१. संघराज्याचीं पेन्शनें म्हणजे हिंदुस्थान सरकारकडून अगर हिंदुस्थानाच्या संचयनिधींतून दिलीं जाणारीं पेन्शनें.

७२ पार्लमेंटांतील व राज्यांतील कायदेमंडळांच्या आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका; निवडणूक-मंडळ.

७३. पार्लमेंटचे सभासद, राज्यपरिषदेचे सभापति व उपसभापति आणि लोकसभागृहाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पगार व भत्ते.

७४. पार्लमेंटच्या प्रत्येक सभागृहाचे, सभासदांचें व सभागृहांतील कमिटीचे अधिकार, हक्क आणि संरक्षणें; पार्लमेंटच्या समित्यांपुढें अगर पार्लमेंटनें नेमलेल्या मंडळांपुढें पुरावा देण्यासाठीं अगर कागदपत्र हजर करण्यासाठीं उपस्थित रहाण्यास भाग पाडणें.

१. राष्ट्रपति व राज्यपाल यांच्या गैरहजेरीच्या रजेंतील भत्ते, प्राप्ति, सवलती व विशेष हक्क; संघराज्याच्या मंत्र्यांचे पगार व भत्ते; सरहिशेबनीस व कंट्रोलर यांच्या नोकरीच्या अटी व गैरहजेरीची रजा या बाबतींतील पगार, भत्ते व हक्क.

७६ संघराज्याच्या व प्रांतांच्या हिशेबाची तपासणी.

७७. उच्चतम न्यायालयाची स्थापना, घटना, अधिकारक्षेत्र आणि सत्ता (न्यायालयाच्या बेअदबीच्या कलमासह) व त्यासाठीं घेतली जाणारी फी; उच्चतम न्यायालयापुढें काम चालविण्याचा हक्क असलेल्या व्यक्ति.

७८. हायकोर्टाचे अधिकारी व नोकरवर्ग यांच्या संबंधींच्या तरतुदी-खेरीज हायकोर्टाची स्थापना व घटना; हायकोर्टापुढें काम चालविण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्ति.

७९. कोणत्याहि राज्यांत मुख्य ठाणें असलेल्या हायकोर्टाच्या अधिकारक्षेत्राची वाढ करणें, आणि त्या राज्याबाहेरील कोणताहि प्रदेश त्या हायकोर्टाच्या अधिकारक्षेत्रांतून वगळणें.

८०. कोणत्याहि राज्यांतील पोलीसदलाच्या, त्या राज्याबाहेरील वाटेल त्या क्षेत्रमर्यादेंत, सत्तेची व अधिकारक्षेत्राची वाढ; मात्र अशा राज्यबाह्य क्षेत्रांत त्या त्या राज्याच्या सरकारच्या संमतीशिवाय पोलिसांना आपली सत्ता व अधिकार चालवितां येणार नाहींत; कोणत्याहि राज्यांतील पोलीसदलाला आपल्या राज्याबाहेरील रेल्वे-प्रदेशांत आपली सत्ता व अधिकार वापरतां येण्याचे हक्क.

८१. एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत निर्गमन व आंतरराज्य क्वारंटाईन.

८२. शेतीविरहित उत्पन्नावरील कर.

८३. निर्यात करासहित कस्टम्सची जकात.

८४. हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या अगर तयार झालेल्या तंबाखू व इतर वस्तू यांवर अबकारी कर. याला अपवाद—
(अ) पिण्याचीं मादक पेयें.
(ब) अफू, चरस, व इतर अंमली पदार्थ अगर अंमली औषधें.
तथापि वरील (ब) उपपरिच्छेदांत उल्लेखिलेल्या द्रव्यांचा समावेश असलेलीं, अगर ज्यांत मद्यार्काचा अंश आहे अशीं औषधी द्रव्यें अगर सौंदर्यप्रसाधनें अंतर्भूत केलेलीं.

८५. कार्पोरेशन कर.

८६. शेतजमीन सोडून व्यक्तीच्या अगर कंपन्यांच्या भांडवलाच्या किंमतीवर कर; कंपन्यांच्या भांडवलावर कर.

८७. शेतजमिनीव्यतिरिक्त मालमत्तेवर स्वामित्वाचा कर.

८८. शेतजमिनीव्यतिरिक्त मालमत्तेवर वारसा कर.

८९. विमानानें, रेल्वेनें अगर आगबोटीनें जाणारे उतारू व माल यांच्यावर सीमान्त कर; रेल्वे–भाडें व मालवहातुकीचें भाडें यांवर कर.

९०. स्टॉक एक्स्चेंजमधील व्यवहार व वायदेबाजार यांवर स्टँप कराव्यतिरिक्त इतर कर.

९१. हुंड्या, चेक, प्रॉमिसरी नोटा, बिल्स ऑफ लेडिंग, लेटर्स ऑफ क्रेडिट, विम्याच्या पॉलिसी, भाग वर्ग करणें व कर्जरोखे, प्रॉक्सिज आणि पावत्या यांवरील स्टँपकराचे दर.

९२. वर्तमानपत्रांच्या खरेदी-विक्रीवर कर व त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींवर कर.

९३. या यादींतील विषयासंबंधींच्या कायद्याच्या उल्लंघनाचे गुन्हे.

९४. या यादींतील कोणत्याहि विषयासंबंधीं चौकशी, पहाणी अगर आंकडेवार माहिती.

९५. या यादींतील कोणत्याहि बाबी उच्चतम न्यायालयाखेरीज इतर सर्व कोर्टांना क्षेत्राधिकारत्व सत्ता; आरमारी अधिकारक्षेत्र.

९६. कोर्टात घेतलेल्या फीव्यातिरिक्त या यादींतील कोणत्याहि बाबी-संबंधींची फी.

९७. विषयसूची क्रमांक २ अगर क्रमांक ३ यांत नमूद नसलेल्या बाबी तसेंच या दोन सूचींत निर्दिष्ट न केलेले कर.

विषयसूची : २ –राज्यसूची

१. सार्वजनिक सुव्यवस्था (मात्र यांत मुलकी राज्यव्यवस्थेच्या सहाय्यासाठीं लष्करी, आरमारी अगर हवाई दलाचा अगर संघराज्याच्या इतर सशस्त्र फौजेचा उपयोग अंतर्भूत नाहीं.)

२. पोलीस, यांत रेल्वे पोलीस व गांवपोलीस यांचा समावेश आहे.

३. न्यायदान; उच्चतम व उच्च न्यायालय यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व कोर्टांची स्थापना व घटना; भाडें–कोर्ट आणि जमीनमहसूल–कोर्ट यांची कामकाजपद्धति; हायकोर्टांचे अधिकारी व नोकरवर्ग; उच्चतम न्यायालयाखेरीज इतर कोर्टांत घेण्यांत येणारी फी.

४. तुरुंग, बालगुन्हेगारांच्या शाळा, बोस्टल संस्था व तत्सम इतर संस्था आणि त्यांत ठेवलेल्या व्यक्ति; तुरुंग आणि इतर संस्था यांच्या उपयोगाच्या बाबतींत इतर राज्यांबरोबर केलेली व्यवस्था.

५. स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणजे नगरपालिका, इंप्रुव्हमेंटट्रस्ट, जिल्हाबोर्डे, खाण–वसाहतीमधील स्थानिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य अगर ग्रामपंचायत यासंबंधींच्या संस्था, यांची स्थापना व त्यांचे अधिकार.

६. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता; रुग्णालयें व दवाखाने.

७. हिंदुस्थानाबाहेरील स्थळांच्या यात्रा सोडून इतर सर्व यात्रा.

८. मादक पेयें, म्हणजे मादक पेयें निर्माण करणें, तयार करणें, जवळ बाळगणें, बाहेर पाठविणें, विकणें अगर विकत घेणें.

९. पंगु व नोकरी करण्यास अपात्र यांना सहाय्य.

१०. दफन व दफनभूमि; दहन आणि स्मशानभूमि.

११. सूची १ मधील ६३, ६४, ६५ व ६६ व सूची ३ मधील २५ या कलमांत निर्दिष्ट केलेल्या शर्तींनुसार विद्यापीठासह शिक्षण.

१२. राज्य-सरकारनें आर्थिक सहाय्यानें चालविलेला अगर त्याच्या नियंत्रणाखालील ग्रंथालयें, पुराणवस्तुसंग्रहालयें व तत्सम इतर संस्था; पार्लमेंटनें कायद्यान्वयें राष्ट्रीय महत्त्वाच्या म्हणून जाहीर केलेल्या व्यतिरिक्त अन्य प्राचीन ऐतिहासिक स्मारकें व कागदपत्रें.

१३. दळणवळणाचीं साधनें म्हणजे पहिल्या सूचींत निर्दिष्ट न केलेले रस्ते, पूल, नावा आणि दळणवळणाचीं इतर साधनें; म्युनिसिपालिटीच्या ट्रॅमगाड्या; दोरावरील वहातुकीचा मार्ग; सूची क्रमांक १ व क्रमांक ३ मध्यें निर्दिष्ट केलेल्या तरतुदीनुसार, अंतर्गत जलमार्ग व त्यावरील वहातूक, यंत्रशक्तीवर न चालणारीं वाहनें.

१४. शेतकी, यांत शेतीशिक्षण, संशोधन, संहारक कीटकांपासून पिकांचें संरक्षण व पिकांवरील रोगांचा प्रतिबंध या गोष्टींचा समावेश आहे.

१५. गुरांची निगा, संरक्षण आणि सुधारणा, आणि गुरांच्या रोगांचा प्रतिबंध; पशुवैद्यकीचें शिक्षण व व्यवसाय.

१६. कोंडवाडे व गुरांच्या अतिक्रमणाविरुद्ध प्रतिबंधक योजना.

१७. पाणी, म्हणजे पाणीपुरवठा, कालवे व धरणें, ड्रेनेज आणि बंधारे, पाण्याचे सांठे आणि जलशक्ति—सूची १ मधील ५६ व्या कलमानुसार.

१८. जमीन, म्हणजे जमिनींतील व जमिनीसंबंधींचे हक्क, जमीनदार व रयत यांमधील संबंधासह; जमीनधारापद्धति, जमिनीच्या खंडाची वसुली; शेतजमिनीची फारकत किंवा बदली; जमिनींची सुधारणा आणि शेतीसाठीं कर्ज, वसाहत करणें.

१९. जंगलें.

२०. रानटी पशूंचें व पक्ष्यांचें रक्षण.

२१. मच्छीमारी.

२२. यादी १ मधील ३४ व्या नोंदीनुसार कोर्ट ऑफ वॉर्डस्, बोजा असलेली व जप्त झालेली मालमत्ता.

२३. सूची क्रमांक १ मध्यें संघाच्या ताब्यांतील नियमन आणि वाढ यासंबंधींच्या तरतुदींना अनुसरून खाणींचें नियमन व खनिज वस्तूंची वाढ.

२४. विषयवार सूची क्रमांक १ मधील ५२ व्या नोंदीला अनुसरून उद्योगधंदे.

२५. गॅस व गॅसचे कारखाने.

२६. विषयवार यादी क्रमांक ३ मधील ३३ व्या नोंदीला अनुसरून राज्यांतर्गत व्यापार व देवघेव.

२७. विषयवार यादी क्रमांक ३ मधील ३३ व्या नोंदीनुसार मालाचें उत्पादन, पुरवठा व वांटप.

२८. बाजार आणि जत्रा.

२९. प्रमाणस्थापनेखेरीज वजनें आणि मापें.

३०. सावकारी व सावकार; शेतकरी व कर्जनिवारण.

३१. खानावळी व खानावळींचे मालक.

३२. विषयवार यादी क्रमांक १ मध्यें निर्दिष्ट केलेल्या व्यतिरिक्त कंपन्या आणि विद्यापीठें याची स्थापना, नियमन व विसर्जन; कंपन्यांमध्यें ज्यांचें रूपांतर झालें नाहीं असा व्यापार, साहित्याविषयक, शास्त्रीय, धार्मिक व इतर संस्था आणि मंडळ्या; सहकारी पतपेढ्या.

३३. नाटकगृहें आणि नाटकें; विषयसूची क्रमांक १ मधील ६० व्या कलमानुसार चित्रपट, सांघिक क्रीडा, करमणुकी व इतर मनोविनोदनाचे कार्यक्रम.

३४. सट्टे आणि जुगार.

३५. राज्य-सरकारच्या मालकीचे किंवा ताब्यांतील बांधकाम, जमिनी व इमारती.

३६. विषयसूची क्रमांक ३ मधील ४२ व्या कलमानुसार संघराज्यासाठीं नसलेली मालमत्ता संपादन करणें अगर सक्तीनें ताब्यांत घेणें.

३७. पार्लमेंटनें केलेल्या कायद्याला अनुसरून कायदेमंडळाच्या निवडणुका.

३८. कायदेमंडळांतील सभासद, विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष,

आणि विधानपरिषद असल्यास सभापति आणि उपसभापति यांचे पगार आणि भत्ते.

३९. विधानसभा, तिचे सभासद आणि कमिट्या आणि विधानपरिषद असल्यास, ती परिषद, त्या परिषदेचे सभासद आणि कमिट्या यांचे अधिकार, विशेष अधिकार आणि संरक्षणें; राज्याच्या कायदे-मंडळांतील कमिट्यांपुढें साक्ष देण्यासाठीं किंवा कागदपत्र हजर करण्यासाठीं हजेरीची सक्ती.

४०. राज्याच्या मंत्र्यांचे पगार व भत्ते.

४१. राज्यांतील सरकारी नोकऱ्या व सरकारी नोकर नेमणूक मंडळ.

४२. राज्यानें किंवा राज्याच्या संचित निधींतून द्यावयाचें निवृत्तिवेतन.

४३. राज्याचें सार्वजनिक कर्ज.

४४. निखातानिधि.

४५. जमीनमहसूल, ज्यांत महसूल बसविणें व वसूल करणें यांचा समावेश होतो. लँड रेकॉर्ड ठेवणें, जमीनमहसुलासाठीं पहाणी करणें, हक्काची नोंद व महसूल फारकत यांचा यांत समावेश आहे.

४६. शेतीच्या उत्पन्नावरील कर.

४७. शेतजमिनीवरील वारसदारीचा कर.

४८. शेतजमिनीवरील स्वामित्वाचा कर.

४९. जमिनी आणि इमारती यांवरील कर.

५०. पार्लमेंटनें कायद्यानें लादलेल्या खनिज संपत्तीच्या विकासाच्या मर्यादा यांना अनुसरून खनिज द्रव्यांच्या हक्कांवरील कर.

५१. राज्यामध्यें तयार केलेल्या अगर निर्माण झालेल्या खालील वस्तूंवरील अबकारी कर आणि हिंदुस्थानांत अन्यत्र तयार केलेल्या किंवा निर्माण झालेल्या तत्सम वस्तूंवर त्याच किंवा कमी दरानें बसविलेलें प्रतिशुल्क.

(अ) मादक पेयें (मानवी उपयोगासाठीं.)

(ब) अफू, चरस व इतर अंमली औषधें आणि द्रव्यें. यांत मद्यार्क असणारीं औषधें व प्रसाधनें किंवा या नोंदींतील उपपरिच्छेद (ब) मध्यें समाविष्ट केलेल्या कोणत्याहि पदार्थांचा अंतर्भाव नाहीं.

५२. स्थानिक क्षेत्रांत खप, उपयोग व विक्री यासाठीं देणाऱ्या मालावर कर.
५३. विजेच्या विक्रीवर किंवा खपावर कर.
५४. वृत्तपत्रें वगळून मालाची खरेदी व विक्री यांवर कर.
५५. वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या जाहीरातीव्यतिरिक्त इतर जाहिरातीवर कर.
५६. अंतर्गत जलमार्गानें किंवा खुष्कीनें नेण्यांत येणाऱ्या मालावर व उतारूंवर कर.
५७. रस्त्यावर चालविण्याकरतां उपयुक्त असणाऱ्या वाहनांवर कर, मग हीं वाहनें यांत्रिक शक्तीनें चालणारीं असोत अगर नसोत; तसेंच विषयसूची क्रमांक ३ मधील ३५ व्या नोंदीनुसार, अंतर्भूत ट्रॅमगाड्या.
५८. जनावरें व नावा यांवर कर.
५९. टोलनाकीं.
६०. धंदे, व्यापार, उद्योग व नोकरी यांवर कर.
६१. डोईपट्टी.
६२. चैनीच्या वस्तूंवर कर. यांत करमणुका, मनोविनोदन, सट्टा व जुगार यांवरील कराचा अंतर्भाव होतो.
६३. विषयसूची क्रमांक १ मध्यें स्टँप कराच्या दरांच्या ज्या बाबी निर्दिष्ट केल्या आहेत त्या वगळून बाकीच्या दस्तऐवजांवरील स्टँपकराचे दर.
६४. या सूचींतील कोणत्याहि बाबीसंबंधींच्या कायद्याच्या उल्लंघनाचे गुन्हे.
६५. या विषयसूचींतील कोणत्याहि विषयासंबंधीं उच्चतम न्यायालयाखेरीज करून इतर सर्व कोर्टांचे अधिकारक्षेत्र व सत्ता.
६६. कोर्टांत घेतलेली फी वगळून या विषयसूचींतील कोणत्याहि बाबीसंबंधीं आकारलेली फी

विषयसूची : २ समवर्ती सूची

१. फौजदारी कायदा, यांत ही घटना अंमलांत येण्याच्या वेळीं इंडियन पिनल कोडमध्यें अंतर्भूत असलेल्या सर्व बाबींचा समावेश आहे; पण विषयसूची क्रमांक १ व २ मध्यें नमूद केलेल्या बाबींसंबंधीं कायद्याच्या

उल्लंघनाचे गुन्हे आणि मुलकी सत्तेच्या सहाय्यासाठीं आरमारी, लष्करी अगर हवाई दलाचा किंवा संघराज्याच्या इतर सशस्त्र दलाचा उपयोग, या गोष्टींचा त्यांत समावेश नाहीं.

२. ही घटना अंमलांत येण्याच्या वेळीं क्रिमिनल प्रोसीजर कोडमध्यें समाविष्ट असलेल्या सर्व बाबींसह फौजदारी कार्यपद्धति.

३. राज्याच्या रक्षणासंबंधींच्या कारणांसाठीं, सार्वजनिक सुरक्षितेसाठीं व जनतेला जरूर असणारा पुरवठा व नोकऱ्या कायम राखण्यासाठीं गुन्हा प्रतिबंधक अटक; अशा अटकेखालील व्यक्ति.

४. एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत कैदी, आरोपित व्यक्ति आणि या विषयसूचीच्या ३ ऱ्या नोंदींत निर्दिष्ट केलेल्या कारणासाठीं प्रतिबंधक अटकेंत ठेविल्या व्यक्ति यांची बदली.

५. विवाह आणि घटस्फोट, अर्भकें आणि अज्ञान मुलें; दत्तक; मृत्युपत्रें; मृत्युपत्र न करतां मृत्यु आणि वारसा; आणि अविभक्त कुटुंब वांटणी; ही घटना अंमलांत येण्यापूर्वी ज्या बाबी न्यायप्रविष्ट असतील तेथें दोन्ही पक्षांना व्यक्तिगत कायदा लागू होतो अशा बाबी.

७. शेतजमिनी व्यतिरिक्त इतर मालमत्तेचें हस्तांतर; खतपत्रें आणि दस्तऐवज यांची नोंद.

७. शेतजमिनीसंबंधींच्या करारांव्यतिरिक्त भागीदारी, एजन्सी, व वहातूक यासंबंधींचे व विशेष करार धरून सर्व करारं.

८. खटला करतां येण्यासारखे गुन्हे.

९. दिवाळखोरी आणि नादारी.

१०. विश्वस्तनिधि आणि विश्वस्त.

११. ॲडमिनिस्ट्रेटर्स जनरल आणि सरकारी विश्वस्त.

१२. पुरावा आणि शपथ, कायदे, सार्वजनिक कृत्यें, रेकॉर्ड आणि न्यायालयीन कामकाज यांना मान्यता.

१३. घटनेच्या प्रारंभीं सिव्हिल प्रोसिजर कोडमध्यें अंतर्भूत असलेल्या सर्व बाबींसह मुदतीचा कायदा आणि लवाद यांसह दिवाणी कामाची पद्धत.

१४ कोर्टांची बेअदबी, यांत उच्चतम न्यायालयाच्या बेअदबीचा समावेश नाहीं.

१५ उनाडटप्पूपणा; रानटी व भटक्या टोळ्या.
१६. वेड आणि मानसिक रोग, यांत वेडे आणि मानसिक रोगी ठेवण्याची व मानसिक रोग्यांच्या उपचारांचीं स्थळें, यांचा समावेश आहे.
१७ जनावरांना क्रूरतेनें वागविण्यास प्रतिबंध.
१८. खाद्यपदार्थांतील व इतर पदार्थांतील भेसळ.
१९. औषधें आणि विषें, विषयसूची क्रमांक १ मधील ५९ नोंदींतील अफूसंबंधींच्या भागाला अनुसरून.
२०. आर्थिक व सामाजिक नियोजन.
२१. व्यापारी आणि औद्योगिक मक्तेदारी, संयुक्त मंडळ्या आणि विश्वस्त निधि.
२२. कामगार–संघटना (ट्रेड युनियन्स) औद्योगिक व मजुरासंबंधींचे कलह.
२३. सामाजिक सुरक्षितता आणि सामाजिक विमा; रोजगारी व बेकारी
२४. कामगारांचें हितसंवर्धन, यांत कामाची परिस्थिति, प्रॉव्हिडंट फंड मालकाची जबाबदारी, कामगारांची नुकसानभरपाई, दुर्बलता वेतन, निवृत्तिवेतन आणि प्रसूतीच्या सवलती या गोष्टींचा अंतर्भाव होतो.
२५. कामगारांचें धंदेविषयक व तांत्रिक शिक्षण.
२६. वकिली, वैद्यकी व इतर व्यवसाय.
२७. हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशा दोन वसाहतराष्ट्रांची निर्मिति झाल्यामुळें ज्यांना आपल्या मूळ वसाहतस्थानाला मुकावें लागलें त्यांची पुनर्वसाहत व त्यांना साहाय्य.
२८. दानधर्म, धर्मार्थसंस्था, धर्मार्थ आणि धार्मिक देणग्या व धार्मिक संस्था.
२९. एका राज्यांत सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोगांचा प्रसार होऊं नये, तसेंच माणसें, जनावरें व वनस्पती यांचे रोग पसरूं नयेत म्हणून प्रतिबंध.
३०. जीवनाचें आंकडेशास्त्र, यांत जन्ममृत्यूच्या नोंदींचा समावेश आहे.
३१. सध्यांच्या कायद्यान्वयें अथवा पार्लमेंटनें कायदा करून जाहीर केलेल्या मोठ्या बंदरांव्यतिरिक्त इतर बंदरें.

३२. यंत्रशक्तीवर चालणाऱ्या जहाजासंबंधांतील अंतर्गत जलमार्गावरील नौकानयन व वहातूक अशा जलमार्गावरील वहातुकीचे नियम आणि राष्ट्रीय जलमार्गासंबंधींच्या विषयवार सूची क्रमांक १ मधील तरतुदीनुसार अंतर्गत जलमार्गावरून माल व उतारू यांची वहातूक.

३३. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें पार्लमेंटनें कायदा करून ज्या उद्योग-धंद्यांचें नियंत्रण आवश्यक आहे असें ठरविलें असेल त्या उद्योग-धंद्यांत निर्माण होणाऱ्या वस्तूंचा व्यापार, उत्पादन, पुरवठा आणि वांटणी.

३४. किंमतीचें नियंत्रण.

३५. यंत्रशक्तीवर चालणारीं वाहनें, यांत अशा वाहनांवर कोणत्या तत्त्वांवर कर घ्यावा तीं तत्त्वें अंतर्भूत आहेत.

३६. कारखाने.

३७. बॉयलर्स.

३८. बीज.

३९. वृत्तपत्रें, पुस्तकें आणि छापखाने.

४०. प्राचीन ऐतिहासिक स्थळें व अवशेष.

४१. निर्वासिताची मालमत्ता म्हणून कायद्यानें जाहीर केलेल्या मालमत्तेचा ताबा, व्यवस्था व विल्हेवाट; या मालमत्तेंत शेतजमिनीचा अंतर्भाव आहे.

४२. संघराज्यासाठीं किंवा एखाद्या सार्वजनिक कामासाठीं जर मालमत्ता संपादन करावयाची असेल किंवा ताब्यांत घ्यावयाची असेल तर मालमत्तेची नुकसानभरपाई किती ठरवावी त्यासंबंधींची तत्त्वें आणि कोणत्या पद्धतीनें ही नुकसानभरपाई द्यावयाची ती पद्धत आणि रीत ठरविणें.

४३. त्या राज्याच्या बाहेर निर्माण झालेल्या कर किंवा सार्वजनिक मागण्यासंबंधींच्या हक्काची वसुली, त्यांत जमीनमहसुलाची थकबाजी व वसुली येते.

४४. न्यायालयीन स्टँपच्या रूपानें जमा केलेले कर व फी, याव्यतिरिक्त स्टँपकर, यांत स्टँपकराच्या दराचा समावेश नाहीं.

४५. विषयसूची क्रमांक २ अगर क्रमांक ३ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विषयाबद्दल चौकशी आणि आंकडेवार माहिती.,

४६. या विषयसूचीतील कोणत्याहि बाबीसंबंधीं उच्चतम न्यायालयाव्यतिरिक्त कोणत्याहि कोर्टाचे क्षेत्राधिकार व अखत्यार.

४७. कोणत्याही कोर्टांत घेतलेली फी सोडून, या विषयसूचींतील कोणत्याहि बाबीबद्दल घेण्यांत येणारी फी.

परिशिष्ट : ८

(कलमें ३४४ (१) व ३५१)

भाषा

१. आसामी
२. बंगाली
३. गुजराती
४. हिंदी
५. कानडी
६. काश्मिरी
७. मल्याळम्
८. मराठी
९. ओरिया
१०. पंजाबी
११. संस्कृत
१२. तामिळ
१३. तेलगू
१४. उर्दू


शुद्धिपत्र

पान	कलम	ओळ	मूळ	शुद्ध
१	सरनामा	३	ठरवून (पूर्वी)	प्रतिज्ञापूर्वक
३	६	१३	नंतर	मात्र ती व्यक्ति असा अर्ज करण्यापूर्वी निदान सहा महिने भारतांत रहात असली तरच तिची नोंद केली जाईल.
९	१९ (५)	२	वर्गीकृत जातीच्या	वर्गीकृत जनजातींच्या
१०	२२(४)अपवाद	१	केला तर (नंतर)	पण ती मुदत उपकलम ७ व प्रमाणें केलेल्या कायद्यांत सांगितलेल्या कमाल मुदतीपेक्षां जास्त नसेल.
१०	,,	,,	उपकलम ७(नंतर)	पोटकलम अ व ब
,,	२२ (७)	१	व्यक्तीला (नंतर)	सल्ला मंडळाचा सल्ला न घेतां.
,,	,,	५	खालीं (नंतर)	कोठल्या जातींच्या किंवा जातींच्या खटल्याबाबत.
१५	३५ (अ)	७	पार्लमेंटनें (नंतर)	वरील कलमाबाबत.
२२	६४	६	५७ (ऐवजीं)	९७.
२३	६६ (४)	५	मात्र(ऐवजीं)	खुलासा:—
२६	७४ (१)	२	मुख्य प्रधानाच्या (ऐवजीं)	प्रधान मंत्र्यांच्या
,,	७५ (१)	१	मुख्य प्रधानाची (ऐवजीं)	प्रधान मंत्र्याची
,,	,,	२	मुख्य प्रधानाच्या (ऐवजीं)	प्रधान मंत्र्याच्या
३०	८५ (१)	३	महिन्यापेक्षां जास्त काळ (ऐवजीं)	महिने
३४	९८ (३)	२	व (ऐवजीं)	किंवा.

पान	कलम	ओळ	मूळ	शुद्ध
३५	१०० (१)	५	सभापतीला (नंतर)	अध्यक्षाला अगर सभापति अगर
३६	१०२ (ब)	६	'गेलीं' गाळावे	
४०	१०९ (४)	२	बील (नंतर)	राज्यपरिषदेनें.
४९	१२४स्पष्टीकरण२	२	त्यानें (नंतर)	वकील झाल्यानंतर.
५०	१२७ (१)	६	सत्ता (गाळावे)	
,,	१२७ (२)	५	आणि (पूर्वी)	सत्ता
५७	१४६ (१)	६	ते (ऐवजीं)	तो.
५८	१४८ (६)	१	खात्याचा	खात्याच्या नोकराचा
५९	१५२	२	अर्थ (नंतर)	या भागांत.
६१	१५९	३	गंभीर	गंभीरपणें.
६२	१६३ (१)	१	घटनेखालीं (नंतर)	जे.
,,	१६४ (१)	४	कोशल विदर्भ	मध्यप्रदेश.
६५	१७० (२)	२	एक या (ऐवजीं)	एकापेक्षां अधिक नसणाऱ्या
,,	,,	५	कोणत्याही (नंतर)	परिस्थितींत.
,,	१७० (३)	३	सर्व राज्यांत	राज्यांत सर्वत्र
६६	१७१ (३)(क)	३	त्या (नंतर)	प्रमाणें.
६८	१७९ (क)	६	सभासदांनीं	सर्व सभासदांच्या
६९	१८३ (क)	६	त्यावेळच्या (नंतर)	सर्व.
८०	२०४ (१)	१	प्रमाणें (नंतर)	मागण्यांना.
८३	२०९	७	२०८ (नंतर)	उपकलम (१)
८५	२१३ (३)	७	तजविजीकरतां (ऐवजीं)	तजविजींच्या
८९	२२७ (३)	३	हिशेब तक्ते	तक्ते.
९१	२३१	१०	अनुसरून (नंतर)	ज्या कायदेमंडळाला या क्षेत्रासंबंधीं कायदे करण्याचा अधिकार आहे त्याला
९२	२३५	५	उच्च	तें उच्च

पान	कलम	ओळ	मूळ	शुद्ध
९३	२३६	८	दर्जाच्या	दर्जाची
९४	(५)	१	श्रेष्ठ	ज्येष्ठ
१०१	२५२	४	कायदेमंडळांतील	कायदेमंडळाच्या
१०६	२६६	४	हुंड्या	हुंड्यांनीं
,,	,,	,,	कर्जे (नंतर)	किंवा कर्जे
१०७	२६७ (२)	१	करून (नंतर)	कायम तसलमात
१०७	२६८ (अ)	३	तें (नंतर)	अनुक्रमें
११८	२९० (अ)	५	राज्याच्या (नंतर)	स्वतंत्र
११९	२९१ (२)	५	ठरवील	ठरलें असेल त्याप्रमाणें
,,	,,	,,	समाविष्ट होईल (ऐवजीं)	आकारला व दिला जाईल.
१२१	२९५ (१)(अ)	३	संघसूची	संघसूचींत
,,	,,	५	हिंदी गाळावे	
,,	,,	८	हक्क (नंतर)	घटनेपूर्वी
,,	,,	१२	झालेल्या करारा (ऐवजीं)	होणाऱ्या
,,	२९५ (२)	१	उपकलम (पूर्वी)	वर दिल्याप्रमाणें
,,	,,	३	मिळकती (नंतर)	व येणीं
१३२	३२० (५)	३	सभागृहापुढें (नंतर)	किंवा राज्याच्या सभागृहापुढें किंवा प्रत्येक सभागृहापुढें
१३३	३२३ (२)	३	राज्याच्या (नंतर)	राज्यपाल किंवा
१३८	३३६	७	दहा (पूर्वी)	जवळजवळ
१४२	३४३ (२)	४	हिंदीच्या (ऐवजीं)	इंग्रजीच्या
,,	,,	,,	इंग्रजी (ऐवजीं)	हिंदी
१४४	३४८(१)(ब)	८	असेल (ऐवजीं)	असतील
१४९	३५७(१)(अ)	४	ब (नंतर)	जेथें
१६५	३७९स्पष्टीकरण २	१	राष्ट्रपति (ऐवजीं)	अध्यक्ष

पान	कलम	ओळ	मूळ	शुद्ध
१६६	३७९ (३)	२	पूर्वी (ऐवजी)	रोजी
,,	,,	,,	अगर (नंतर)	त्यानंतर
,,	,,	,,	सुरू (नंतर)	होण्यापूर्वी
,,	,,	६	सभासदत्वा(पूर्वी)	परिषदेच्या
,,	,,	७	सभागृहाचें (ऐवजी)	परिषदेचें
,,	३७९ (४)	२	ही घटना सुरू होण्यापूर्वी	(गाळावे)
१६७	३८२ (१)	२	झाली	(गाळावा)
१७१	३९१ (१)	३	राष्ट्रपतीच्या	अध्यक्षाच्या
१७६	भाग २	२	हें	गाळणें




जम्मू व
का श्मी र
पंजाब
दिल्ली
स
प्र
मध्य
थ
है द्रा बा
म
प्रदे
मैसूर
म ०